



# जनमाध्यम

e paper www.janmadhyam.com

एक प्रतिष्ठित सवय

✦ अमरावती, शुक्रवार २१ ऑगस्ट २०२६ ✦ मूल्य ४.०० ✦ पृष्ठ १०





# अमरावती तहसीलमध्ये वाळू माफियांचे ‘रामराज्य’

## ‘रामा-रामा’ कोडवर्ड चालतोय अन् शासनाचा महसूल बुडतोय!

**विशेष प्रतिनिधी**

**अमरावती:** ज्या महसूल विभागावर शासकीय महसूल गोळा करण्याची जबाबदारी आहे, त्याच अमरावती तहसील कार्यालयात सध्या खाजगी महसूल वाढवण्याचा आणि शासनाच्या तिजोरीवर दरोडा टाकण्याचा उघड धंदा सुरू आहे. अवैध रेती उपसा आणि विना रॉयल्टी वाहतूक करणाऱ्या माफियांचे आणि तहसीलच्या काही अधिकाऱ्यांचे साटेलोटे इतके घट्ट झाले आहे की, आता कायद्याची भीती उरलेली नाही. विशेष म्हणजे, ज्या कर्मचाऱ्याचे मूळ काम केवळ जमीन नोंदी आणि त्या निगडीत कार्यालयीन कामकाज पाहणे आहे, तो कर्मचारी सध्या आपल्या मूळ कार्यक्षेत्राबाहेर जाऊन बेकायदेशीर रेती वाहतुकीच्या 'वसुली'चे साम्राज्य सांभाळत असल्याची धक्कादायक माहिती समोर आली आहे.

अमरावती शहरात आणि ग्रामीण भागात दररोज विना रॉयल्टी रेतीची बेकायदेशीर वाहतूक केली जाते. जर चुकून एखाद्या प्रामाणिक कर्मचाऱ्याने ही वाहने पकडली जातात तर काही वाहने तहसील कार्यालयापर्यंत आणली जातात, या प्रक्रियेत अनेक वेळी मात्र अजबच खेळ पाहायला मिळतो. जप्त वाहनांचे मालक केवळ 'रामा-रामा' असा गुप्त कोडवर्ड उच्चारतात अन् हा मंत्र उच्चारताच जप्त झालेल्या गाड्यांवर कोणताही गुन्हा दाखल न करता किंवा दंड न वसूल करता त्यांना सन्मानाने सोडून दिले जाते.

सूत्रांच्या मते, हा कर्मचारी माफिया लॉबीसाठी 'सरस्वती माता प्रसन्न असलेला भगवान राम' बनला आहे. 'रामा-रामा' या कोडवर्डचा थेट अर्थ 'या गाडीचा मलिदा पोहोचला आहे,' असा होत असल्याची चर्चा खुद्द महसूल विभागातूनच कळली आहे.

महाराष्ट्र जमीन महसूल संहितेच्या नियमांनुसार, अवैध गौण खनिज जप्त केल्यास वाहनांवर लाखो रुपयांचा दंड आकारून त्याची नोंद 'मुद्देमाल रजिस्टर'मध्ये करावी लागते. मात्र,



अमरावती तहसील कार्यालयातील हा रेकॉर्ड अत्यंत अर्धवट, मोडकळीस आलेला आणि संशयास्पद असल्याची चर्चा आहे. कोणत्या गाड्या कधी पकडल्या, त्या कधी सोडल्या आणि त्यांचा दंड कुठे जमा झाला, याचा कोणताही पारदर्शक हिशोब येथे जुळत नसल्याची माहिती मिळाली आहे. परिणामी या रेकॉर्डचे पोस्टमार्टम केल्यास या ठिकाणी सुरू असलेल्या या कारभाराचा कच्चा चिट्ठा उघडणार असल्याचे बोलले जाते. दरम्यान या सर्व रेकॉर्डची तपासणी केल्यास या गंभीर विषयात अनेक मोठे मासे गळाला लागणार एवढे मात्र निश्चित !

### कोण आहे झारीतील शुक्राचार्य ?

**जमीन नोंदीच्या विषयात काम करणाऱ्या एका सामान्य कर्मचाऱ्याची अख्ख्या तालुक्याच्या रेती माफिया सिंडिकेटवर एवढी पकड कशी असू शकते? त्याला अभय देणारा तहसील कार्यालयातील तो बडा 'वरिष्ठ' अधिकारी नेमका कोण? शासनाचा कोट्यवधी रुपयांचा महसूल बुडवून स्वतःची घरे भरणारे हे 'झारीतील शुक्राचार्य' कोण आहेत, याचा शोध घेण्याची गरज निर्माण झाली आहे. अमरावतीच्या जिल्हाधिकाऱ्यांनी या गंभीर प्रकाराची स्वेच्छा दखल घेऊन, तहसील कार्यालयाचे सीसीटीव्ही फुटेज आणि जप्त गाड्यांच्या अर्धवट रेकॉर्डची उच्चस्तरीय चौकशी करावी, तरच या भ्रष्टाचाराचे मूळ बाहेर येईल.**

### अमरावती तहसील मधील रेकॉर्ड गायब?

जमीन घोटाळ्याच्या बातम्या 'जनमाध्यम' ने उघडकीस आणल्यानंतर अमरावती तहसील मधील बहुतेक रेकॉर्ड गायब करण्यात आले आहे.यापैकी अर्धेअधिक रेकॉर्ड स्वतः जिल्हाधिकाऱ्यांनी ताब्यात घेतले.तर, उर्वरित रेकॉर्ड वादग्रस्त तहसीलदार महाशयांनी आपल्या ताब्यात करून घेतल्याची माहिती आहे. जमीन घोटाळ्याची पहिली बातमी रिलायन्स कंपनीशी संबंधित असल्याने व त्याबाबत सर्वोच्च स्तरावरून दबाव आल्याने जिल्हाधिकारी खुपच अस्वस्थ झाले.त्यांनी त्याचवेळी नायब तहसीलदार पातळीवर करण्यात आलेल्या फेरफार नोंदीच्या फाईल्स त्वरेने जिल्हाधिकाऱ्यांच्या ताब्यात देण्याचे फर्मान मंडळ निरीक्षकापर्यंतच्या कर्मचाऱ्यांना दिले.त्यामुळे अस्वस्थ झालेल्या वादग्रस्त तहसिलदाराने उरलेल्या फायली आपल्या ताब्यात करून घेतल्याची माहिती मिळाली. वादग्रस्त तहसीलदार लोखंडे यांची किमान ३० संशयास्पद प्रकरणे आपल्याकडे आहेत.त्यावर समाधानकारक खुलासा झाला नाही तर आपल्याला कठोर निर्णय घेणे भाग पडेल, अशी तंबी जिल्हाधिकारी यांनी दिल्याचे समजते.मात्र, जिल्हाधिकारी येरेकर कोणालाही याबाबत भेट देण्यास व बोलण्यास तयार नसल्याने पंचाईत झाली आहे. महसूल खात्यातील गैरप्रकाराबाबत जिल्ह्याचे सर्वोच्च अधिकारीच मौन बाळगत असतील तर माध्यम समूहाने कोणाला जाब विचारावा? महसूल मंत्री व पालकमंत्री बावनकुळे यांच्या स्थानिक कार्यालयातील निवासी स्वीय सहाय्यक सुद्धा याबाबत बोलण्यास तयार नाहीत.

### वरचे खातात तर आम्ही का मागे राहावे?

जमीन नोंदीच्या टेबलवरून उठून थेट रेती माफियांच्या गाड्या मॅनेज करणाऱ्या या कर्मचाऱ्याच्या लुडबुडीमुळे संपूर्ण यंत्रणा सद्यस्थितीत गंजली आहे. सुरुवातीला काही मंडळ अधिकारी आणि तलाठ्यांनी वाळू माफियांच्या गाड्या पकडल्या होत्या. मात्र, यामधील अनेक प्रकरणात महसूल अधिनियमांना व प्रक्रियेला बगल देत अर्धवट दंडाची पावती फाडता या गाड्या मागच्या दाराने सोडण्यात आल्याची चर्चा आहे. हा प्रकार वारंवार घडल्यामुळे आता तलाठी आणि मंडळ अधिकाऱ्यांनीही आपल्या कारवाईचा वेग मंदावला आहे. 'जर वरिष्ठ अधिकारीच वाळू माफीयांना व्हीआयपी पास देत गाड्या सोडणार असतील, तर आम्ही तरी कशाला शत्रूत्व पत्करावे?' अशी भूमिका घेत आता या काही स्थानिक कर्मचाऱ्यांनीही आपले 'खिसे गरम' करण्याचा गोरखधंदा सुरू केला आहे. परिणामी, अमरावतीत वाळू माफियांची पूर्णपणे चांदी झाली आहे.

# दोन्ही सेनेच्या भांडणाचा फायदा भाजपला



**प्रकाश आंबेडकरांचा मोठा दावा**

**अकोला/प्रतिनिधी** -शिवसेना नाव आणि चिन्हाबाबत सुप्रीम कोर्टात अंतिम सुनावणी सुरू आहे. गेल्या ७ दिवसांपासून या सुनावणीत उद्धव ठाकरेंकडून कपिल सिब्बल आणि देवदत्त कामत यांनी युक्तिवाद मांडला. या युक्तिवादावरून वंचित बहुजन आघाडीचे नेते प्रकाश आंबेडकर यांनी मोठा दावा केला आहे. दोन्ही शिवसेनेतील या भांडणाचा फायदा भाजपाला होताना दिसत आहे असं सांगत त्यांनी कदाचित चिन्ह गोठवले जाउ शकते असा दावा केला आहे. अकोला येथे त्यांनी पत्रकारांशी संवाद साधला. प्रकाश आंबेडकरांनी या सुनावणीवर म्हटलं की, सुप्रीम कोर्टात उद्धव ठाकरे आणि एकनाथ शिंदे यांच्या सेनेत भांडण सुरू आहे. कपिल सिब्बल यांच्या युक्तिवादावरून या खटल्याचा निकाल दिसतो. अगोदर दक्षता न घेतल्याने निवडणूक आयोगाने शिंदेंना दिलेले चिन्ह आणि त्यावर सुप्रीम कोर्टाने शिक्कामोर्तब केले होते. परंतु आताची परिस्थिती पाहिली याचा फायदा कोणाला तर तो भाजपाला होताना दिसत आहे. शिवसेनेचे चिन्ह गोठवले जाईल असं दिसते. चिन्ह गोठवल्यास दोन्ही सेनेला एकमेकांविरोधात लढावे लागण्याची परिस्थिती आहे. चिन्ह नसल्याने या दोघांकडे असणारे आमदार, खासदार टिकतील का सगळ्यात मोठा प्रश्न आहे असं त्यांनी सांगितले.

तसेच या भांडणाचा फायदा भाजपाला आहे. जर कोर्टाने चिन्ह गोठवले तर या दोन्ही पक्षातील आमदार, खासदार भाजपाकडे पळाल्याशिवाय ➪(पान २ वर)

# काँग्रेस नेते सज्जन कुमार यांचे तिहारमध्ये निधन



**नवी दिल्ली/वृत्तसंस्था :**काँग्रेसचे माजी खासदार आणि नेते सज्जन कुमार यांचे गुरुवारी वयाच्या ८० व्या वर्षी निधन झाले आहे. न्यूज एजन्सी एएनआयच्या सूत्रांनुसार, सज्जन कुमार यांना दिल्लीतील सफदरजंग रुग्णालयात मृत अवस्थेत आणण्यात आले होते. ते १९८४ च्या शीखविरोधी दंगलीतील तीनपैकी दोन प्रकरणांमध्ये दोषी ठरल्यानंतर तिहार तुरुंगात जन्मठेपेची शिक्षा भोगत होते. त्यांना एका प्रकरणात निर्दोष मुक्तकरण्यात आले होते. सज्जन कुमार यांचा जन्म २३ सप्टेंबर १९४५ रोजी दिल्लीत झाला होता. ते मॅट्रिकपर्यंत शिकले होते. त्यांचे लग्न राम कौर यांच्याशी झाले होते. त्यांना एक मुलगा आणि दोन मुली आहेत. त्यांनी १९७७ मध्ये दिल्ली महानगरपालिका नगरसेवक म्हणून राजकारणात प्रवेश केला.नंतर ते दिल्ली प्रदेश काँग्रेसचे सरचिटणीस बनले. १९८० मध्ये ते पहिल्यांदा बाह्य दिल्लीतून खासदार म्हणून निवडून आले. १९९१ आणि २००४ मध्येही ते याच जागेवरून खासदार होते. संसदेत त्यांनी शहरी विकास आणि खासदार स्थानिक क्षेत्र विकास योजनेशी संबंधित समित्यांमध्ये काम केले. १९८४ च्या शीखविरोधी दंगलींच्या प्रकरणांनी सज्जन कुमार यांच्या राजकीय जीवनावर परिणाम केला. डिसेंबर २०१८ मध्ये दिल्ली उच्च न्यायालयाने त्यांना जन्मठेपेची शिक्षा सुनावल्यानंतर त्यांनी काँग्रेस सोडली. फेब्रुवारी २०२५ मध्ये त्यांना आणखी एका १९८४ च्या दंगल हत्या प्रकरणात जन्मठेपेची शिक्षा झाली.

### सुटे खाद्यतेल विकणे पडेल महाग

# 10 लाखांचा दंड आणि 3 वर्षांचा तुरूंगवास



**मुंबई/प्रतिनिधी :**महाराष्ट्रातील नागरिकांना शुद्ध आणि सुरक्षित अन्नपदार्थ मिळावेत यासाठी अन्न व औषध प्रशासन विभाग म्हणजेच एफडीएने कडक पावले उचलण्यास सुरुवात केली आहे. महाराष्ट्र एफडीए आयुक्त अधिकारी तुकाराम मुंढे यांनी घेतलेल्या पत्रकार परिषदेत 'सेफ फूड, सेफ महाराष्ट्र' या विशेष अभियानाची घोषणा केली. या मोहिमेअंतर्गत एफडीए खाद्यतेलातील भेसळ आणि गैरप्रकार रोखणार आहेत. एफएसएसएआयने खाद्यतेलाची विक्री आणि वापराबाबत नियम निश्चित केले असून या नियमांचे उल्लंघन करणा-यांविरोधात कठोर कारवाई केली जाईल, असाही त्यांनी इशारा दिला.खाद्यतेलाच्या व्यवसायात आणि वापरामध्ये होणा-या बेकायदेशीर प्रकारांवर बोलताना तुकाराम मुंडे यांनी खाद्यतेलात भेसळ करणा-या किंवा नियम मोडणा-यांवर १० लाख रुपयांपर्यंतचा दंड आणि तीन वर्षांपर्यंतच्या कारावासाची तरतूद करण्यात आली असल्याचे त्यांनी स्पष्ट केले. 'सेफ फूड, सेफ महाराष्ट्र' मोहिमेमुळे आता अन्नपदार्थांत भेसळ करणा-यांचे धाबे दणाणले असून एफडीए राज्यभरात कारवाईचा बडगा उगारण्याच्या तयारीत आहे.क्रूड ऑइलया टँकरमधून खाद्यतेलाची वाहतूक: प्रक्रिया केलेले खाद्यतेल ज्या टँकरमधून वाहून नेले जाते, त्यातील गंभीर गैरप्रकार समोर आले आहेत. ज्या टँकरमध्ये क्रूड ऑइल (अशुद्ध तेल) किंवा इतर रसायने वाहून नेली जातात, त्याच टँकरचा वापर खाद्यतेलाच्या वाहतुकीसाठी केला जात असल्याचे आढळले आहे. यावर आता पूर्णपणे बंदी आणि कारवाई केली जाईल.टिनच्या डब्यांचा पुनर्वापर आणि एकच तेल वारंवार गरम करणे: पॅकिंगसाठी जुन्या, गंजलेल्या आणि वापरलेल्या टिनच्या डब्यांचा पुनर्वापर करणे आरोग्यासाठी अत्यंत धोकादायक आहे. तसेच, व्यावसायिक आणि ह?टेल्समध्ये एकच तेल वारंवार गरम करून वापरण्याच्या पद्धतीवर एफडीएने कठोर आक्षेप घेतला आहे.आरोग्यावर होणारे घातक परिणाम: रिसायकल केलेले, भेसळयुक्त किंवा वारंवार तापवलेले तेल खाल्ल्यामुळे कर्करोग आणि ➪(पान २ वर)

# अमरावती-मुंबई विमानसेवेत बदल

## 25 ऑगस्टपासून आठवड्यातून चारच दिवस उड्डाण

**मुंबई/प्रतिनिधी :** अमरावतीच्या बेलोरा विमानतळावरून मुंबईसाठी सुरू असलेल्या विमानसेवेच्या वेळापत्रकात पुन्हा एकदा मोठा बदल करण्यात आला आहे. २५ ऑगस्ट ते ३० सप्टेंबर २०२६ या कालावधीत आता आठवड्यातून केवळ चार दिवसच अमरावती-मुंबई विमान उड्डाण करणार असल्याची अधिकृत घोषणा महाराष्ट्र विमानतळ विकास कंपनीचे उपाध्यक्ष व व्यवस्थापकीय संचालक दीपक कपूर यांनी गुरुवारी सोशल मीडिया प्लॅटफ?र्म एक्सद्वारे केली आहे. एअरलाइन्सच्या अंतर्गत तांत्रिक कारणांमुळे हा बदल करण्यात आला असून, आता सोमवार, बुधवार, शुक्रवार आणि रविवार या चार दिवशीच विमानसेवा उपलब्ध असेल.

**मे महिन्यापासून होती ५ दिवस सेवा; आता पुन्हा कपात**-अमरावती ते मुंबई दरम्यान १६ एप्रिल २०२५ ते एप्रिल २०२६ या एका वर्षाच्या कालावधीत अलायन्स एअरलाइन्स कंपनीमार्फत आठवड्यातून चार दिवस विमानसेवा दिली जात होती. प्रवाशांचा वाढता प्रतिसाद पाहता, मे २०२६ नंतर या विमानसेवेचे दिवस वाढवून ती आठवड्यातून ५ दिवस करण्यात आली होती. मात्र, आता कंपनीला भेडसावणा-या काही तांत्रिक अडचणींमुळे २५ ऑगस्टपासून या विमान उड्डाणांच्या संख्येत पुन्हा कपात करण्यात आली आहे.

# लॉरेन्स बिष्णोई टोळी नागपूरपर्यंत पोहोचली!

## १० लाखांच्या खंडणीसाठी जीवे मारण्याची धमकी

**नागपूर/प्रतिनिधी :**राणा प्रतापनगर पोलीसठाण्याच्या हद्दीतील सुर्वेनगरातीलरहिवासी आणि कॅनडा येथेवास्तव्यास असलेल्या त्यांच्यामुलीला १० लाखांची खंडणी मागत जीवे मारण्याची धमकी देणा-याने लारेन्स बिष्णोई टोळीचा उल्लेख केला आहे. त्यामुळे याची दखल घेत, थेट दहशतवादविरोधी पथकाने पोलीस आयुक्तालयाशी संपर्क साधत माहिती मागवली आहे. सुर्वेनगरातील ६० वर्षीय ज्येष्ठ आणि कॅनडातील रहिवासी त्यांच्या मुलीला सोमवारी सायंकाळी लारेन्स गँगकडून दहा लाख रुपयांची खंडणी मागणारा ई-मेल आला होता. तक्रारदाराची मुलगी सध्या कॅनडात राहते. तिनेही कॅनडापोलिसांत याची तक्रार केली आहे. ➪(पान २ वर)




# तो गयावया करत होता तरीही शिक्षिकेने 6 वर्षांच्या विद्यार्थ्याच्या कानशिलात लगावली; पुढच्याच क्षणी त्याने प्राण सोडले

## मांडीवर कोसळून मुलाचा मृत्यू:कुटुंबाचा दावा- भीतीने हार्ट अटॅक आला, विशाखापट्टणमची घटना



■ शिक्षिका मुलाला जवळ ओढते, त्याला थप्पड मारते आणि त्याला ओरडते.



■ शिक्षिका इतर मुलांसमोर प्रणयचा युनिफॉर्म काढू लागते, मुलगा तिला थांबवण्याचा प्रयत्न करतो.



■ पुढील काही सेकंदात प्रणय पूर्णपणे शांत होतो आणि शिक्षिकेच्या अंगावरच बेशुद्ध होउन कोसळतो.

**विशाखापट्टणम/वृत्तसंस्था :** विशाखापट्टणममध्ये गुरुवारी शिक्षिकेने मारहाण केल्यामुळे एका सहा वर्षांच्या मुलाचा मृत्यू झाला. मारहाणीनंतर लगेचच तो मुलगा शिक्षिकेच्या मांडीवर कोसळल्याचे सीसीटीव्ही फुटेजमध्ये दिसत आहे. मारहाणीच्या धक्क्यामुळे मुलाला हृदयविकाराचा झटका आला, असा आरोप त्याच्या कुटुंबीयांनी केला आहे.ही संपूर्ण घटना वर्गातील सीसीटीव्ही कॅमे-यात कैद झाली आहे. फुटेजमध्ये शिक्षिका त्या मुलाचे कपडे काढण्याचा प्रयत्न करताना आणि त्याला दोनदा थप्पड मारताना दिसत आहेत.

मिळालेल्या माहितीनुसार, मृत मुलाचे नाव प्रणय तेजा होते आणि तो 'लिटल गार्डन्स स्कूल'मध्ये यूकेजी वर्गात शिकत होता. शिक्षिकेच्या मांडीवर कोसळल्यानंतर त्याला तातडीने 'किंग जार्ज हास्पिटल'मध्ये नेण्यात आले, मात्र तिथे डॉक्टरांनी त्याला मृत घोषित केले. मुलाच्या पालकांनी केलेल्या आरोपानुसार आणि सीसीटीव्ही व्हिडीओमध्ये जे दिसत आहे त्यानुसार, शिक्षिका मुलांचा गृहपाठ तपासत आहे. निधन पावलेल्या मुलाचा अपूर्ण गृहपाठ पाहून ती संतापते. यावेळी भेदरलेला मुलगा रडत रडत मारू नका, अशी गयावया करत आहे. तरीही शिक्षिका त्याच्या कानशिलात लगावते. यानंतर पुढच्याच क्षणाला सदर मुलगा शिक्षिकेच्या अंगावर कोसळतो. दरम्यान मुलाच्या मृत्यूचे नेमके कारण अद्याप समोर आलेले नाही. मृत्यूच्या कारणाचा तपास सुरू आहे.

➪(पान २ वर)

जनमाध्यम
एक प्रतिष्ठित सवय

# डॉ. बाबासाहेब आंबेडकर स्मारकाच्या सौंदर्यीकरणाचा मार्ग मोकळा

## -सुप्रीम कोर्टाचा स्थगिती देण्यास नकार, -२८ सप्टेंबरला पुढील सुनावणी

**अमरावती/प्रतिनिधीः-** स्थानिक इर्विन चौकातील डॉ. बाबासाहेब आंबेडकर यांच्या भव्य स्मारकाच्या सौंदर्यीकरणाचा मार्ग अखेर मोकळा झाला आहे. नागपूर उच्च न्यायालयाने स्मारक समितीच्या बाजूने निकाल दिल्यानंतर जागेचे मालक चंद्रशेखर गट्टाणी यांनी सर्वोच्च न्यायालयात धाव घेतली होती. मात्र गुरुवारच्या सुनावणीत सर्वोच्च न्यायालयाने गट्टाणी यांना उच्च न्यायालयाच्या निर्णयाला स्थगिती देण्यास नकार दिला. यामुळे स्मारक सौंदर्यीकरणाचा मार्ग मोकळा झाला. सर्वोच्च न्यायालयाने न्यायमूर्ती यांनी पुढील आदेश देण्यासाठी २८ सप्टेंबर ही तारीख निश्चित केली आहे. गट्टाणी यांच्याकडून एड. रामेश्वरप्रसाद गोयल यांनी स्थगिती मिळावी यासाठी जोरदार प्रयत्न केले. तर मनपातर्फे एड. आदित्य पांडे आणि कॅव्हेट याचिका दाखल करणाऱ्या संजय आठवले यांच्याकडून एड. तनुज बग्गा-शर्मा व एड. संजय भसीन यांनी स्थगितीला कडाडून विरोध केला. यामुळे गट्टाणी यांना दिलासा मिळू शकला नाही. यावर आता २८ सप्टेंबर रोजी पुढील सुनावणी होणार आहे.गेल्या काही वर्षांपासून रखडलेल्या या स्मारकाच्या सौंदर्यीकरणामुळे आता कामाला वेग येण्याची शक्यता आहे.आता पुढील सुनावणीत सर्वोच्च न्यायालय काय निर्णय देते याकडे सर्वांचे लक्ष लागले आहे.

**भूमी अधिग्रहण कायदेशीर-**

नागपूर उच्च न्यायालयाने इर्विन चौकातील डॉ. बाबासाहेब आंबेडकर यांच्या भव्य स्मारक व सौंदर्यीकरण प्रकल्पासाठी करण्यात आलेले भूमी अधिग्रहण पूर्णपणे कायदेशीर असल्याचे घोषित करत प्रकल्पाला हिरवा कंदील दिला होता. या निर्णयामुळे स्मारक समिती आणि आंबेडकरीं अनुयायांना मोठा दिलासा मिळाला होता. उच्च न्यायालयाच्या निर्णयानंतर एकतर्फी स्थगिती आणण्याचा प्रयत्न रोखण्यासाठी भाजप अनुसूचित जाती मोर्चाचे उपाध्यक्ष संजय आठवले यांनी सर्वोच्च न्यायालयात कॅव्हेट याचिका दाखल केली होती. त्यामुळे समितीची बाजू अधिक भक्कम झाली.



**नुकसानभरपाई आधीच जमा-** इर्विन चौकातील डॉ. बाबासाहेब आंबेडकर यांच्या पुतळ्या समोर सौंदर्यीकरणसाठी ६६०० चौ. फूट जागा संपादित करण्यात आली आहे. ही जागा स्मारकाच्या परिसरातच आहे आणि त्यामुळे कोणाचेही विस्थापन होणार नाही. प्रशासनाने संबंधित जागेची ९९.२२ लाख रुपयांची नुकसान भरपाई आधीच जमा केली आहे. त्यामुळे आता ऐतिहासिक इर्विन चौकाचे नूतनीकरण झालेल्या रूपात नागरिकांना पाहायला मिळणार आहे.

# लायन्स क्लब ऑफ अमरावती रियल व रियल सफायरची संयुक्त बैठक

**अमरावती/प्रतिनिधीः-** लायन्स क्लब ऑफ अमरावती रियल व लायन्स क्लब ऑफ अमरावती रियल सफायर यांच्या संयुक्त विद्यमाने १५ व १६ ऑगस्ट रोजी चिखलदरा येथे दोन दिवसीय संयुक्त मीटिंग व पिकनिक उत्साहपूर्ण वातावरणात संपन्न झाली. शिवनंदन रिसॉर्ट, चिखलदरा येथे आयोजित या उपक्रमात दोन्ही क्लबचे सदस्य व त्यांच्या कुटुंबीयांनी मोठ्या संख्येने सहभाग घेतला.

लायन्स क्लबच्या कायमस्वरूपी प्रकल्पांतर्गत दत्तक घेतलेल्या भारतीय कन्या विद्यालय, अमरावती येथे स्वातंत्र्यदिनाचा कार्यक्रम आयोजित करण्यात आला. यावेळी ध्वजारोहणाचा मान लायन्स क्लब ऑफ अमरावती रियलचे अध्यक्ष डॉ. दीपक क-हे व लायन्स क्लब ऑफ अमरावती रियल सफायरच्या




अध्यक्षा नेहा उदासी यांना देण्यात आला. याप्रसंगी विद्यार्थिनींना गणवेश व खाऊचे वाटप करण्यात आले.

वाढदिवसानिमित्त गोसदन, दस्तुरनगर, श्री गोरक्षण संस्था, अमरावती येथे तुलादान करण्यात आले. त्यानंतर गूळ, केळी व ढेप गोमातेला अर्पण करून गोसेवा करण्यात आली.

पिकनिकच्या सेवाकार्याचा एक भाग म्हणून आमझरी, ता. चिखलदरा येथे गावातील लहान मुले, महिला व पुरुषांना नवीन कपडे, साड्या व इतर साहित्याचे वाटप करण्यात आले. या सेवाकार्यात दोन्ही क्लबच्या सदस्यांनी उत्स्फूर्त सहभाग नोंदविला.सायंकाळी शिवनंदन रिसॉर्ट, चिखलदरा येथे दोन्ही क्लबची संयुक्त बैठक आयोजित करण्यात आली. यानंतर ध्वजवंदना व राष्ट्रगीताने बैठकीस सुरुवात झाली. उपस्थित सर्व सदस्यांचे स्वागत करून विविध विषयांवर चर्चा करण्यात आली. दोन्ही क्लबच्या अध्यक्षांनी आपले मनोगत व्यक्त केले. दोन दिवसीय पिकनिकचे प्रकल्प प्रमुख लायन दिनेश अग्रवाल यांनी संपूर्ण नियोजन, विविध सेवा उपक्रम व खर्चाचा सविस्तर आढावा उपस्थितांसमोर मांडला. सचिव योगिता चेतन पटेल यांनी आभार प्रदर्शन केले. दुसऱ्या दिवशी, १६ ऑगस्ट रोजी दोन्ही क्लबच्या सदस्यांनी चिखलदरा परिसरातील नयनरम्य पॉइंट्स व विविध पर्यटनस्थळांना भेट देत निसर्गसौंदर्याचा आनंद लुटला. त्यानंतर परतवाडा येथे सर्वांनी भोजनाचा आस्वाद घेतला आणि दोन दिवसीय संयुक्त पिकनिक व मीटिंगची आनंददायी सांगता झाली. या दोन दिवसीय उपक्रमामुळे दोन्ही क्लबच्या सदस्यांमध्ये स्नेह, मैत्री, बंधुभाव आणि सेवाभाव अधिक दृढ झाला. सेवा, मनोरंजन आणि कौटुंबिक स्नेह यांचा सुंदर संगम घडवून आणणारा हा संयुक्त उपक्रम सर्वांसाठी अविस्मरणीय ठरला.

या संयुक्त मीटिंग व पिकनिकमध्ये लायन मनोज मिश्रा, लायन सुरेंद्र मावळे, लायन जितेंद्र झा, लायन डॉ. निखिल जैन, लायन चेतन पटेल, लायन लक्ष्मीकांत जोशी, लायन संजीव पोटे, लायन शैलेश शिरभाते, लायन सोहेल टॉपर, लायन हरेश उदासी, लायन विवेक भेटालू, लायन हेमंत वालचाळे, लायन हेमंत पच्चीगर, लायन गीता मिश्रा, लायन कांचन अग्रवाल, लायन भारती वालचाळे, लायन संध्या मावळे, लायन कल्याणी भेटालू, लायन विशाखा जोशी, लायन ज्योती दीपक क-हे, लायन नीलम पच्चीगर, लायन भावना श्याम जाडीया यांच्यासह दोन्ही क्लबचे अनेक सदस्य व कुटुंबीय उपस्थित होते.

# हभप नारायणदास महाराज अनंतात विलीन

**मोर्शी/प्रतिनिधीः-** निंभी गावाचे नाव महाराष्ट्रभर उज्वल करणारे,महाराष्ट्रातील प्रसिद्ध कीर्तनकार, विनोदी सम्राट समाज प्रबोधनकार व डॉ. बाबासाहेब आंबेडकर समाज भूषण पुरस्कार प्राप्त ह.भ.प.श्री. नारायणदास महाराज पडोळे यांना हजारो जनसामुदायांच्या अलोट गर्दीत अखेरचा निरोप देण्यात आला. दि.१९ ऑगस्ट रोजी एका खुल्या गाडीवर हारतुरे लावून सजविण्यात आलेल्या रथावर नारायणदास महाराजांचे प्रेत ठेवण्यात आले. यावेळी अखिल भारतीय श्रीगुरुदेव सेवा मंडळाचे अनेक प्रचारक,संपूर्ण महाराष्ट्रातील असंख्य हरी भक्त परायण,जिल्ह्यातील समस्त वारकरी आणि भजन मंडळी,पुणे, पंढरपूर,औंढा नागनाथ, पैठण,वर्धा,नागपूर येथील संत मंडळी व भाविक भक्तांच्या उपस्थितीत दु.१२ वाजता त्यांचे राहते घरातून संपूर्ण निंभी गावकऱ्यांच्या भजनी आणि हरिनामाच्या गजरात महाराजांची अंत्ययात्रा निघाली.

## १ व १० वरिल उर्वरित

### दोन्ही सेनेच्या भांडणाचा

राहणार नाहीत अशी परिस्थिती आहे. निर्णय कुणाच्याही बाजूने लागो पण फायदा भाजपाचा आहे. मध्यंतरी फोडाफोडीचे जे सत्र त्यांनी सुरू केले होते, पण जंतर मंतरवरील आंदोलनानंतर या प्रकाराला आळा बसला होता. आता पुन्हा चिन्ह गोठवल्याचा निर्णय झाल्यानंतर आमदार, खासदारांची पळापळ होण्याची दाट शक्यता दिसते. त्यामुळे सुप्रीम कोर्टाच्या या निर्णयाचा फायदा भारतीय जनता पक्षाला मिळण्याची स्थिती दिसून येते असं प्रकाश आंबेडकर यांनी म्हटलं.

### १० लाखांचा दंड आणि

हृदयविकाराचा झटका येण्याचा धोका प्रचंड वाढतो. इतकेच नाही तर लहान मुलांच्या शारीरिक व मानसिक विकासावर आणि त्यांच्या विचार-समजण्याच्या क्षमतेवरही याचे गंभीर दुष्परिणाम होतात.

भारतीय प्रशासकीय सेवेतील अत्यंत धडाडीचे आणि चर्चेत राहणारे अधिकारी म्हणून आयएएस तुकाराम मुंढे यांची ओळख आहे. आपल्या शिस्तबद्ध आणि कडक कार्यशैलीमुळे त्यांच्या नावावर सर्वाधिक बदल्यांचा विक्रम नोंदवला गेला आहे. २००५ च्या बॅचचे अधिकारी असलेल्या मुंढे यांची २१ वर्षांच्या सेवाकाळात तब्बल २५ वेळा बदली झाली आहे. मे २०२६ मध्ये महाराष्ट्र अन्न व औषध प्रशासनाचे आयुक्त म्हणून पदभार स्वीकारल्यानंतर, त्यांनी अन्न भेसळ करणा-या माफियांविरुद्ध अत्यंत आक्रमक आणि कडक मोहीम उघडून त्यांचे धाबे दणाणले आहेत.

### लॉरेन्स बिष्णोई टोळी

त्यात पंजाबमधील रहिवासी बिष्णोई टोळीचे मोठे नेटवर्क कॅनडात आहे. त्यामळे इतर सुरक्षा यंत्रणांनी कान टवकारले असल्याचीही माहिती आहे.

कुख्यात बिष्णोई टोळी देशातल्या विविध राज्यांत सक्रिय आहे. पंजाबी गायक सिद्धू मुसेवाला गु आणि बाबा सिद्दीकीच्या खून प्रकरणात थेट बिष्णोई टोळीचा सहभाग समोर आला होता.अभिनेता सलमान खानच्या बंगल्या बाहेरही याच टोळीने गोळीबारही केला होता. आघाडीचे अभिनेते, सेलिब्रेटींना धमक्या देण्याच्या प्रकरणात बिष्णोई टोळीचे नाव सातत्याने समोर आले आहे. विदर्भातील काही तरु णांचा या टोळीतसहभाग असल्याचे समोर आले होते. त्यामुळे तपास यंत्रणा सतर्क झाल्या आहेत.

### तो गयावया करत होता तरीही

**CCTV फुटेज समोर आल्यानंतर प्रकरण उघडकीस आले**

ही घटना तेव्हा उघडकीस आली, जेव्हा वर्गातील CCTV फुटेज सोशल मीडियावर समोर आले. फुटेजमध्ये शिक्षिका मुलाला आपल्याकडे ओढताना दिसत आहे. ती त्याचे कपडे काढण्याचा प्रयत्न करतानाही दिसली.अहवालांनुसार, हे सर्व गृहपाठ न केल्याबद्दल मुलाला लाजवण्यासाठी केले जात होते. मुलगा रडत शिक्षिकेला थांबण्याचा इशारा करताना दिसत आहे.मात्र, शिक्षिका काही वेळ थांबते. मुलाला काहीतरी बोलते. त्यानंतर ती त्याच्या गालावर थप्पड मारते. मुलगा काही क्षण न हलता उभा राहतो आणि नंतर शिक्षिकेला धडकून खाली पडतो. पोलिसांनी मुलाच्या मृत्यूच्या कारणाची चौकशी सुरू केली आहे. अधिकारी सीसीटीव्ही फुटेज आणि मृत्यूशी संबंधित परिस्थितीची चौकशी करत आहेत. चौकशीत मुलाला आधीपासून कोणताही आजार होता की नाही, हे देखील पाहिले जात आहे. शवविच्छेदन अहवाल मिळाल्यानंतर पुढील माहिती समोर येईल. कुटुंबाने मुलाच्या मृत्यूसाठी जबाबदार असलेल्यांवर कठोर कारवाई करण्याची मागणी केली आहे.

### संपत्ती कर वाढ, नगरोत्थान निधीवरून

म्हणजे जखमेवर मीठ चोळण्यासारखे आहे. नगरसेवक बबलू शेखावत आणि नगरसेवक मिलिंद चिमोटे यांनीही कर वाढीला विरोध करत सांगितले की आधी शहरवासियांना मूलभूत सुविधा द्या, मगच कर वाढीचा विचार करा. गॅस पाईपलाईन खोदकांमुळे विरोधकांनी प्रशासनाला चांगले धारेवर धरले.स्मार्ट सिटी'च्या नावाखाली गॅस कंपनीने शहरातील रस्ते खोदले. परंतु ते पूर्ववत केले नाहीत. त्यामुळे नागरिकांना त्रास होत आहे. प्रशासनाने गॅस कंपनीवर कारवाई करून रस्ते तातडीने दुरुस्त करावेत अशी मागणी झाली.दलित वस्ती सुधार निधीच्या वितरणातही अनियमितता झाल्याचा आरोप झाला. निधीचे वाटप लोकसंख्येच्या प्रमाणात व्हावे अशी मागणी नगरसेवकांनी केली. मनपाच्या बिकट आर्थिक स्थितीवरही चर्चा झाली. कर आणि इतर थकबाकीची वसुली वाढवण्याची गरज असल्याचे सांगण्यात आले. सभागृहात जीएसटीमधील त्रुटी दूर कराव्यात, पार्किंग शुल्क कमी करावे आणि शहरातील स्वच्छता, पाणीपुरवठा सुधारावा अशा मागण्याही करण्यात आल्या.या आमसभेत उपस्थित झालेले सर्व मुद्दे गांभीर्याने घेऊन पुढील १५ दिवसांत त्यावर तोडगा काढला जाईल, असे आश्वासन आयुक्तांनी दिले. संपत्ती कर वाढीच्या प्रस्तावावर पुढील बैठकीत अंतिम निर्णय होण्याची शक्यता आहे.

प्रभागातील विकास कामे रखडली

विरोधी पक्षांनी आरोप केला की हा निधी सर्व नगरसेवकांच्या प्रभागात समान प्रमाणात वाटला गेला नाही. प्रत्येक नगरसेवकाला ५० लाख पर्यंत निधी मिळायला हवा होता, परंतु तसे झाले नाही. त्यामुळे अनेक प्रभागातील विकासकामे रखडली आहेत. सत्ताधारी सदस्यांनी सांगितले की, १० लाखांपेक्षा कमी किमतीच्या कामांना मंजुरी न दिल्याने लहान कामे रखडली आहेत. तसेच अमरावती आणि बडनेरा या दोन विधानसभा क्षेत्रातील आमदार-खासदार आपापल्या क्षेत्रासाठी निधी मागत असल्याने वाटपात अडचणी येत आहेत.

**प्रशासक काळातील कामांची चौकशी करा-** गेल्या सुमारे २ वर्षांच्या प्रशासक काळात झालेल्या कामांवरूनही सभागृहात आरोप-प्रत्यारोप झाले. विरोधी पक्षनेते विलास इंगोले आणि नगरसेवक अनिल अग्रवाल यांनी मागणी केली की, प्रशासक काळात झालेल्या सर्व कामांची आणि झालेल्या खर्चाची सविस्तर चौकशी करून त्याचा अहवाल सभागृहात मांडण्यात यावा. त्यामुळे कारभारात पारदर्शकता येईल.यावर स्थायी समिती सभापती अविनाश मारडीकर यांनी सांगितले की, नगरोत्थान निधीतील २५० कोटींच्या खर्चाची चौकशी करण्यासाठी आधीच समिती गठित करण्यात आली आहे. समितीचा अहवाल आल्यानंतर पुढील कारवाई केली जाईल.

### जुन्या वादातून दोघांवर चाकूहल्ला

तक्रारदार महिलेच्या मुलावर व भाच्यावर चाकूने हल्ला केल्याची माहिती दिल्याचे पोलिसांनी सांगितले. या प्रकरणातील इतर संशयित साथीदारांचा गुन्हे शाखेची पथके शोध घेत आहेत. ताब्यात घेण्यात आलेल्या दोन्ही विधिसंघर्षित बालकांना पुढील तपासासाठी फ्रेजरपुरा पोलिसांच्या ताब्यात देण्यात आले आहे.

ही कारवाई पोलीस आयुक्त राकेश ओला यांच्या मार्गदर्शनाखाली, पोलीस उपायुक्त यशवंत सोळंके, पोलीस उपायुक्त श्याम घुगे आणि पोलीस उपायुक्त (मुख्यालय/गुन्हे) प्रांजली सोनवणे यांच्या मार्गदर्शनात करण्यात आली. गुन्हे शाखा युनिट क्रमांक २ चे पोलीस निरीक्षक अतुल वर आणि युनिट क्रमांक १ चे पोलीस निरीक्षक दिनेश दहातोंडे यांच्या नेतृत्वाखाली सहाय्यक पोलीस निरीक्षक महेश इंगोले, पोलीस उपनिरीक्षक गजानन सोनुने तसेच गुन्हे शाखेच्या पथकातील अधिकारी व अंमलदारांनी कारवाईत सहभाग घेतला.

### बहूचर्चित विजय जाधव हत्या

भाऊ विजय महादेवराव जाधव तेथे आला. आरोप आहे की, आरोपी प्रज्ज्वल जावरकर हा मोटारसायकल वरून आला आणि त्याने विजयला सोबत नेले. थोड्या अंतरावर निखिल सोनारही त्यांच्यासोबत बसला आणि तिघेही निघून गेले.

दुसऱ्या दिवशी सकाळी गावापासून सुमारे ५०० मीटर अंतरावर कवठा-परतवाडा मार्गावर विजय जाधव यांचा रक्तबंबाळ अवस्थेत मृतदेह आढळला. तक्रारदाराच्या मित्राने याची माहिती त्यांना दिली. ग्रामपंचायत निवडणुकीच्या राजकीय वैमनस्यातून हा खून झाल्याचा आरोप तक्रारदाराने केला होता. परतवाडा पोलिसांनी कलम ३०२ आणि ३४ नुसार गुन्हा दाखल केला होता. सुनावणी दरम्यान अभियोजनाने २२ साक्षीदारांचे जबाब नोंदवले. सीसीटीव्ही फुटेज, मोबाईल लोकेशन, वाहनावर सापडले रक्ताचे डाग ही महत्त्वाची बाब असल्याचे सांगितले. सीसीटीव्ही मध्ये मृतक आणि आरोपी एकत्र दिसल्याचा तसेच घटनेपूर्वी त्यांच्यात वाद झाल्याचा दावाही करण्यात आला होता. पण अभियोजन पक्ष हे सिद्ध करू शकले नाही. त्यामुळे न्यायालयाने दोन्ही आरोपी प्रज्ज्वल उर्फ धीरज जावरकर आणि निखिल सोनार यांना संशयाचा लाभ देत बरी केले. ॲडवोकेट परवेज खान यांना ॲड. अमीन मेनन आणि ॲड. शिरिष जाखड यांना ॲड. राजेश गोरडे यांनी सहकार्य केले.

### खासदाराच्या तालुक्यातच काँग्रेसला

अंतर्गत मतभेद, स्थानिक पातळीवरील नेतृत्वाचा अभाव, नगरसेवकांशी असलेला संवाद आणि कार्यकर्त्यांच्या अपेक्षांकडे झालेले दुर्लक्ष याबाबत प्रश्न उपस्थित होऊ लागले. आता १७ नगरसेवकांनी एकाच वेळी पक्षांतर केल्याने या प्रश्नांची उत्तरे शोधणे काँग्रेससाठी अत्यावश्यक ठरले आहे.

खासदारांच्या नेतृत्वालाच अप्रत्यक्ष आव्हान?

काँग्रेसचे खासदार असलेल्या मतदारसंघातील आणि खासदार यांच्याच गावातील दर्यापूर नगरपरिषदेत काँग्रेस पक्षाची अशी पडझड होणे ही केवळ स्थानिक राजकीय घटना म्हणून पाहणे योग्य ठरणार नाही. खासदारांचे नेतृत्व, स्थानिक संघटन आणि कार्यकर्त्यांशी असलेला संपर्क याबाबतही आगामी काळात चर्चा होणे स्वाभाविक आहे.

मात्र या घटनेचा थेट दोष कोणाच्या माथी मारण्यापेक्षा काँग्रेसच्या स्थानिक संघटनेने आत्मपरीक्षण करणे गरजेचे आहे. कारण निवडणुकीत मतदारांनी दिलेला कौल हा पक्षाच्या नावावर असतो.पण सत्ता टिकवून ठेवण्यासाठी नेतृत्व, संवाद आणि कार्यकर्त्यांचा विश्वास तितकाच महत्त्वाचा असतो.

**एक सदस्याची निष्ठा चर्चेचा विषय-** १७ नगरसेवकांनी पक्ष सोडला असताना केवळ एक काँग्रेस सदस्य खासदारांच्या सोबत ठामपणे उभा राहिल्याचे चित्र समोर आले आहे. त्यामुळे 'सत्ता बदलली म्हणून भूमिका बदलायची की विचारधारेसोबत उभे राहायचे?' हा प्रश्न राजकीय वर्तुळात चर्चिला जात आहे.

पक्षाच्या कठीण काळात सोबत राहणारे कार्यकर्ते आणि पदाधिकारीच भविष्यातील संघटनेची खरी ताकद ठरतात. त्यामुळे या एका सदस्याच्या भूमिकेकडे काँग्रेसच्या निष्ठावान कार्यकर्त्यांच्या दृष्टीने वेगळ्या नजरेने पाहिले जाण्याची शक्यता आहे.

**जनतेचा कौलच अंतिम ठरणार-** राजकारणात आज एक गट एका पक्षात तर उद्या दुसऱ्या पक्षात, अशी स्थिती निर्माण होऊ शकते. मात्र मतदार कायमस्वरूपी कोणाच्याही खिशात नसतो. निवडणुकीच्या वेळी मतदार विकास, नेतृत्व, कामगिरी आणि विश्वास याच निकषांवर निर्णय घेतो. त्यामुळे १७ नगरसेवकांचे पक्षांतर काँग्रेससाठी किती मोठा धक्का ठरेल आणि शिंदे गटाला त्याचा किती राजकीय फायदा होईल, याचे खरे उत्तर आगामी निवडणुकीतच मिळणार आहे. दर्यापूरमध्ये काँग्रेसच्या हातात असलेली एकहाती सत्ता हातातून निसटण्यामागची कारणे काँग्रेसने वेळीच शोधली नाहीत, तर नगरपरिषदेत झालेली ही राजकीय पडझड भविष्यात मोठ्या राजकीय अपयशाची नांदी ठरू शकते. मात्र काँग्रेसने या धक्क्यातून धडा घेत संघटन पुन्हा उभे केले, तर याच घटनेतून नव्या राजकीय पर्वाची सुरुवातही होऊ शकते. त्यामुळे आता जनतेचे लक्ष केवळ १७ नगरसेवकांच्या पक्षांतराकडे नसून, काँग्रेस या धक्क्यानंतर स्वतःला कसे सावरते याकडे लागले आहे.

### स्मार्ट मीटरला अंबाडा

आलेले स्मार्ट मीटर काढून जुन्या पद्धतीचे मीटर बसविण्याची मागणी करण्यात आली आहे.

याबाबत अंबाडा ग्रामपंचायतीच्या सरपंच रूपाली रविंद्र कडू व उपसरपंच रेखा रविंद्र कोकरे, तसेच उदखेड ग्रामपंचायतीचे सरपंच धनराज राठोड व प्रज्योत कवटकर यांच्या वतीने महाराष्ट्र राज्य वीज वितरण कंपनीच्या मोर्शी विभागाच्या कार्यकारी अभियंत्यांना निवेदन देण्यात आले.निवेदन देताना प्रज्योत कवटकर, रविंद्र कोकरे, अजिज सौदागर व धनराज राठोड यांची उपस्थिती होती.निवेदनात अंबाडा व उदखेड ग्रामपंचायत हद्दीत ग्रामस्थांच्या घरात नागरिक उपस्थित नसतानाही कथितरीत्या स्मार्ट मीटर बसविण्यात आल्याचा आरोप करण्यात आला आहे. नवीन स्मार्ट मीटरमुळे ग्रामस्थांना मोठ्या प्रमाणात आर्थिक भुर्दंड सहन करावा लागत असल्याचे निवेदनात नमूद करण्यात आले आहे. ग्रामस्थांना स्मार्ट मीटरबाबत योग्य माहिती देण्यात यावी. कोणत्याही प्रकारचे आमिष दाखवून अथवा दबाव टाकून नवीन स्मार्ट मीटर बसविण्यात येऊ नयेत, अशी मागणी करण्यात आली आहे. तसेच ज्या घरांमध्ये स्मार्ट मीटर बसविण्यात आले आहेत, ते तात्काळ काढून जुन्या पद्धतीचे मीटर बसवावेत. वीज वितरण कंपनीकडून सुरू असलेला कथित मनमानी कारभार तात्काळ थांबवावा, अशी मागणी करण्यात आली असून, मागण्यांची दखल न घेतल्यास ग्रामस्थांच्या वतीने आंदोलन करण्यात येईल, असा इशाराही निवेदनातून देण्यात आला आहे. अंबाडा व उदखेड ग्रामपंचायतींच्या या मागणीवर वीज वितरण कंपनी प्रशासन काय भूमिका घेते, याकडे परिसरातील ग्रामस्थांचे लक्ष लागले आहे.

### स्पीड ब्रेकर्समुळे दोन ट्रकचा

बाजूला असलेल्या खड्डयात जमा झाले.त्यामुळे सदर ट्रक मालकाचे लाखोचे नुकसान झाल्याचा प्राथमिक अंदाज व्यक्त केल्या जात आहे.

ही घटना आज दि. २० ऑगस्ट रोजी पहाटे ४ वाजताचे सुमारास घडली. याबाबत प्राप्त माहितीनुसार नांदेड येथून आयशर ट्रक क्र.जीबी २४९० मध्ये १८ टन कच्ची केळी भरून वाशिम,औंढा नागनाथ, अमरावती,मोर्शी मार्गे मुलताई(मध्यप्रदेश)येथे विक्रीसाठी जात असतांना मोर्शी येथील गजबजलेल्या सिंभोरा रोडवरील छत्रपती शिवाजी चौकात स्पीड ब्रेकर्समुळे ट्रकचा मेन पट्टा तुटून ट्रक पलटी झाला. ट्रकच्या डिझेलची टँक फुटल्यामुळे मोठा स्फोट होऊन मोठी दुर्घटना घडू शकली असती सुदैवाने मात्र मोठा अनर्थ टळला. मोर्शी येथे जागोजागी चुकीच्या पद्धतीने डांबराचे उंचच्या उंच स्पीड ब्रेकर्स टाकण्यात आल्यामुळे दररोज फोर व्हीलर टू व्हीलर स्पीड ब्रेकर्स वरून छोट्या-मोठ्या अपघाताच्या घटना घडत आहे.दुसरी घटना आज दि.२० ऑगस्ट रोजी मोर्शी वरुड रस्त्यावरील महात्मा फुले बँकेच्या मेन चौकात आयशर ट्रक क्र.सीडी ८४ ३३ मध्ये अमरावती येथून तुरीचे पोते भरून नागपूर येथे जात असतांना चौकात असलेल्या उंच स्पीड ब्रेकर्समुळे ट्रकचा लोखंडी बेल्ट तुटून ट्रक जागीच बंद पडल्यामुळे काही काळ वाहतूक खोळंबल्या गेली होती. केळी भरून पलटी झालेल्या ट्रक चालकाचे नाव संजय बघेल रा. मोहपा(मध्यप्रदेश) जिल्हा ग्वाल्हेर असे आहे.तर अमरावती येथून तुरीचे कट्टे भरून येणाऱ्या ट्रक मालकाचे नाव उमेश चौरसिया रा.नागपूर असे आहे.एकूणच हे सर्व अपघात स्पीड ब्रेकर्स मुळे होत असून शहरातील नव्याने टाकण्यात आलेले हे स्पीड ब्रेकर्स तात्काळ काढण्यात येऊन नव्याने स्पीड ब्रेकर्स उभारून त्यावर पट्टे मारण्यात यावे अशी मागणी नागरिकांच्या वतीने करण्यात आली आहे.

### जिल्हा काँग्रेस कार्यकारणीत

आली आहे.

काँग्रेस पक्षाचे निष्ठावान कार्यकर्ते म्हणून चारही जणांची तालुक्यात ओळख आहे.निवड झाल्याबद्दल चारही जणांचे दर्यापूर तालुका खरेदी विक्रीचे संचालक अमोल देशमुख, कृषी उत्पन्न बाजार समितीचे सभापती तथा दर्यापूर तालुका काँग्रेस कमिटीचे अध्यक्ष सुनिल पाटील गावंडे,युवक काँग्रेसचे इंजि. नितेश वानखडे, वैष्णवी स्पोर्टींग क्लबचे डॉ. अविनाश ठाकरे,दर्यापूर शहर काँग्रेसचे अध्यक्ष पप्पू पाटील होले यांनी कौतुक केले आहे.

### बडनेरा-लोणी परिसरातील अवैध

पेठे, हितेंद्र टवलारे, प्रतीक्षा जाधव आणि दीपाली कारेमोरे यांचा समावेश होता.

या कारवाईत मालमत्तेची कागदपत्रे, इसारचिठ्ठी, खरेदीखत आणि कोरे स्टॅम्प यांसह एकूण ३४ कागदपत्रे जप्त करण्यात आली. दुसऱ्या पथकाने बडनेरा येथील कन्हैयाल शर्मा यांच्या घराची सुमारे ३ तास झडती घेतली. येथून नऊ संशयित कागदपत्र जप्त करण्यात आली.किशोर इंगळे, विश्वजीत काळे, उज्वला मोहोड, अमित बनारसे, आशीर्वाद सावरकर, रमन धोत्रे, कासम कालीवाले आणि निलेश बिजवेच्या पथकाने ही कार्यवाही केली.

तिसऱ्या पथकाने मनोहरलाल शर्मा आणि आशिष शर्मा यांच्या घरावर छापा टाकून संशयित कागदपत्रे जप्त केले तसेच चौथ्या पथकाने अविनाश महल्ले यांच्या नेतृत्वात कन्हैयाल शर्मा यांच्या धानोरा जोग येथील फार्महाऊसवर धाड टाकली. येथूनही संशयित कागदपत्रे हस्तगत करण्यात आली. जप्त करण्यात आलेल्या सर्व कागदपत्रांची पडताळणी केली जाणार आहे. तपासात दोषी आढळणाऱ्यांविरोधात संबंधित कलमांन्वये गुन्हा दाखल करण्याची प्रक्रिया सुरू असल्याची माहिती जिल्हा उपनिबंधक कार्यालयाने दिली.

### ईद मिलादुन्नबी जुलूस मार्गाची डीसीपींकडून

जुलूसच्या मुख्य मार्ग, प्रमुख चौराहे, गल्ली आणि संवेदनशील ठिकाणांची पाहणी करून जागेचे बारकाईने निरिक्षण केले. मार्गातील संभाव्य अडथळ्यांवर, सीसीटीव्ही, बॅरिकेडिंग आणि वाहतूक नियंत्रणाबत त्यांनी अधिकाऱ्यांना आवश्यक सूचना दिल्या. डीसीपी सोळंके म्हणाले की, पोलिसांचा मुख्य उद्देश, रॅली-जुलूस पूर्ण शांततेत निघावा आणि नागरिकांना कोणत्याही प्रकारचा अडथळा होऊ नये हा आहे. शहराची शांतता बिघडवण्याचा प्रयत्न करणाऱ्या असामाजिक तत्वांवर कडक नजर ठेवण्यात येणार आहे. डीसीपींनी स्थानिक नागरिक आणि आयोजकांशीही संवाद साधला. त्यांनी सर्वांना पोलिस प्रशासनाला सहकार्य करण्याचे आणि हा सण आपसी भाईचारा, प्रेम आणि शांततेच्या वातावरणात साजरा करण्याचे आवाहन केले.

### 'नुटा बुलेटीन'चा सुवर्ण महोत्सव

, मुंबई उच्च न्यायालयाच्या नागपूर खंडपीठाचे ज्येष्ठ विधीज्ञ फिरदोस मिर्झा आणि प्रा आर के चव्हाण महासचिव, महाराष्ट्र प्राध्यापक महासंघ हे या सोहळ्याला प्रमुख पाहुणे म्हणून उपस्थित राहणार असून कार्यक्रमाचे अध्यक्षपद 'एमफुक्टो'चे माजी अध्यक्ष प्रा. एस. पी. लवांडे भूषवणार आहेत.

या कार्यक्रमात ,'नुटा? बुलेटीन ,'चा 'नुटा बुलेटीन' वरील सुवर्णमहोत्सवी विशेषांक व प्रा बी टी देशमुख स्मृती विशेषांक 'संघर्ष यात्रेतील दीपस्तंभ' प्रमुख पाहुण्याच्या हस्ते प्रकाशित करण्यात येणार आहे.

संत गाडगे बाबा अमरावती विद्यापीठ परिसरातील 'डॉ. के. जी. देशमुख सभागृह' येथे संपन्न होत असलेल्या सुवर्ण महोत्सवी कार्यक्रमाला बहुसंख्येने उपस्थित राहण्याचे आवाहन 'नुटा'चे अध्यक्ष प्रा. प्रवीण बी. रघुवंशी आणि सचिव डॉ. नितीन सी. कोंगरे यांनी सर्व शिक्षक, प्राध्यापक आणि हितचिंतकांना केले आहे.

### तेलाचे तीन डबे चोरणारा विधिसंघर्षित

महिलेच्या फिर्यादीवरून राजापेठ पोलीस ठाण्यात भारतीय न्याय संहितेच्या कलम ३०३(२) अन्वये गुन्हा दाखल करण्यात आला. गुन्ह्याचा तपास सुरू असताना पोलिसांना मिळालेल्या गोपनीय माहितीच्या आधारे एका विधिसंघर्षित बालकाला ताब्यात घेण्यात आले. त्याच्याकडे चौकशी केली असता त्याने सदर दुकानाबाहेरून तेलाचे डबे चोरी केल्याची माहिती दिल्याचे पोलिसांनी सांगितले. त्यानंतर पोलिसांनी त्याच्याकडून चोरीस गेलेले स्वस्तिक कंपनीचे तीन सोयाबीन तेलाचे डबे, किंमत ७ हजार ४४० रुपये, हस्तगत केले.

ही कारवाई पोलीस आयुक्त राकेश ओला, पोलीस उपायुक्त परिमंडळ-२ श्याम घुगे आणि सहायक पोलीस आयुक्त संजय खताळे यांच्या मार्गदर्शनाखाली वरिष्ठ पोलीस निरीक्षक संदीप चव्हाण यांच्या नेतृत्वात करण्यात आली. क्राईम पोलीस निरीक्षक उमेश मुंडे, सहायक पोलीस निरीक्षक नितीन शिंदे तसेच पोलीस अंमलदार मनीष करपे, पवन तिवारी, पंकज खटे, रवी लिखीतकर, शशी शेळके, अमोल खंडेजोड, आबिद शेख, अंकुश काळे, प्रशांत बेलोरकर, अर्जुन कदम, आकाश यादव, रफीक खान आणि सतीश टपके यांनी कारवाईत सहभाग घेतला.

# प्रशिक पतसंस्थेच्या प्रकरणात कारवाईला वेग
# सहाय्यक निबंधकांची बदली, संचालकांना कारणे दाखवा नोटिसा

■ प्रतिनिधी | कारंजा ■

**प्रशिक सहकारी पतसंस्थेतील खातेदार व ठेवीदारांच्या विविध प्रश्नांवरून गेल्या काही दिवसांपासून सुरू असलेल्या आंदोलनाची दखल घेत सहकार विभागाच्या पातळीवर हालचालींना वेग आल्याचे चित्र आहे. एका बाजूला सहाय्यक निबंधक सहकार आर. व्ही. आकुलवार यांची बदली करण्यात आली असून त्यांच्या जागी सुनील भालेराव यांची नियुक्ती करण्यात आली आहे. तर दुसरीकडे, पतसंस्थेच्या सुरू असलेल्या ऑडिटदरम्यान ऑडिटरने संचालकांना कारणे दाखवा नोटिसा बजावून सात दिवसांच्या आत लेखी स्पष्टीकरण सादर करण्याचे निर्देश दिल्याने या प्रकरणाला आता निर्णायक वळण मिळण्याची शक्यता निर्माण झाली आहे.**

प्रशिक सहकारी पतसंस्थेतील खातेदार व ठेवीदारांच्या पैशांचा प्रश्न, संस्थेच्या आर्थिक व्यवहारांची तपासणी, कारभाराचे सखोल ऑडिट, तक्रारींची चौकशी आणि दोषी आढळणाऱ्यांवर नियमानुसार कारवाई करण्यात यावी, या मागण्यांसाठी आंदोलन करण्यात आले होते. या आंदोलनाचे नेतृत्व नगरसेवक सागर राणा अंभोरे, ॲड. मिलिंद खंडारे, भाऊराव वासनिक, विलास सिरसाट आणि पुरुषोत्तम गुंजाटे यांनी केले. आंदोलनकर्त्यांनी विविध स्तरांवर सातत्याने पाठपुरावा करत ठेवीदारांच्या प्रश्नांकडे प्रशासनाचे लक्ष वेधले.

### ऑडिटदरम्यान संचालकांना कारणे दाखवा नोटिसा

दरम्यान, प्रशिक पतसंस्थेचे ऑडिट सुरू असताना ऑडिटरकडून संस्थेच्या संचालकांना कारणे दाखवा नोटिसा बजावण्यात आल्या आहेत. नोटीस मिळाल्यापासून सात दिवसांच्या आत लेखी स्पष्टीकरण सादर करण्याचे निर्देश देण्यात आले आहेत.

या नोटिसांमुळे संस्थेच्या कारभाराशी संबंधित बाबी आता ऑडिट प्रक्रियेत अधिक गांभीर्याने तपासल्या जात असल्याचे चित्र आहे. संचालकांकडून सादर होणाऱ्या स्पष्टीकरणाचा ऑडिट प्रक्रियेत विचार केल्यानंतर पुढील कार्यवाही कोणत्या स्वरूपाची होते, याकडे खातेदार व ठेवीदारांचे लक्ष लागले आहे.




### सुनील भालेराव यांच्यासमोर मोठी जबाबदारी

आर. व्ही. आकुलवार यांच्या बदलीनंतर सहाय्यक निबंधक म्हणून नियुक्त झालेले सुनील भालेराव यांच्यासमोर प्रशिक पतसंस्थेच्या प्रकरणात मोठी जबाबदारी असणार आहे. प्रलंबित तक्रारी, ऑडिटची प्रक्रिया, संचालकांना बजावण्यात आ लेल्या नोटिसा आणि ठेवीदारांच्या आर्थिक हिताचा प्रश्न याबाबत नव्या अधिकाऱ्यांकडून तातडीने कार्यवाही होण्याची अपेक्षा आहे.

### सात दिवसांच्या उत्तरानंतर काय?

संचालकांकडून सात दिवसांच्या मुदतीत कोणते स्पष्टीकरण सादर केले जाते, ऑडिटमध्ये कोणते निष्कर्ष नोंदविले जातात आणि त्यानंतर सहकार विभागाकडून कोणती कार्यवाही केली जाते, यावर प्रशिक पतसंस्थेच्या प्रकरणाची पुढील दिशा निश्चित होण्याची शक्यता आहे.

ठेवीदारांना केवळ आश्वासने किंवा प्रशासकीय हालचाली नकोत, तर त्यांच्या पैशांच्या प्रश्नावर ठोस निर्णय आणि कायदेशीर चौकटीत प्रभावी कार्यवाही हवी आहे. त्यामुळे नव्या अधिकाऱ्यांकडून या प्रकरणात पारदर्शक, निष्पक्ष आणि वेळबद्ध कार्यवाही होण्याची अपेक्षा व्यक्त केली जात आहे.

### “ आंदोलनाच्या पार्श्वभूमीवर सहाय्यक निबंधकांची बदली

प्रशिक पतसंस्थेच्या प्रश्नावरून आंदोलनाची तीव्रता वाढत असतानाच सहाय्यक निबंधक सहकार आर. व्ही. आकुलवार यांची बदली झाली असून त्यांच्या जागी सुनील भालेराव यांची नियुक्ती करण्यात आली आहे. या बदलीमुळे आंदोलनकर्त्यांच्या पाठपुराव्याची प्रशासनाने दखल घेतल्याची चर्चा कारंज्यात सुरू झाली आहे. मात्र, अधिकारी बदलल्याने प्रश्न सुटणार नसून, ठेवीदारांना त्यांच्या पैशांबाबत दिलासा मिळण्यासाठी ठोस प्रशासकीय व कायदेशीर कार्यवाही होणे आवश्यक असल्याची भूमिका आंदोलनकर्त्यांनी घेतली आहे.

### ‘बदली झाली, आता ठोस कारवाई कधी?’

सहाय्यक निबंधकांची बदली, त्यानंतर नव्या अधिकाऱ्यांची नियुक्ती आणि आता संचालकांना कारणे दाखवा नोटिसा—या सलग घडामोडींमुळे प्रशिक पतसंस्थेच्या प्रकरणात प्रशासनाच्या हालचालींना वेग आल्याचे दिसून येत आहे. मात्र, ‘अधिकारी बदलला, नोटिसा बजावल्या; आता ठेवीदारांना न्याय कधी मिळणार?’ हा मुख्य प्रश्न कायम आहे. ठेवीदारांच्या पैशांचा प्रश्न निकाली काढणे, संस्थेच्या कारभारातील वस्तुस्थिती समोर आणणे आणि दोषी आढळणाऱ्यांवर नियमानुसार कारवाई करणे, हेच आंदोलनाचे अंतिम उद्दिष्ट असल्याचे आंदोलनकर्त्यांचे म्हणणे आहे.

### केवळ नोटिसांवर समाधान नाही

आंदोलनकर्त्यांची भूमिका केवळ कारणे दाखवा नोटिसा बजावण्यापुरती मर्यादित नसून, प्रशिक पतसंस्थेच्या संपूर्ण आर्थिक व प्रशासकीय कारभाराची सखोल तपासणी व्हावी, ऑडिट निष्पक्षपणे पूर्ण करण्यात यावे, आर्थिक व्यवहारांची वस्तुनिष्ठ पडताळणी करण्यात यावी आणि दोषी आढळणाऱ्यांवर कायद्यानुसार कारवाई करण्यात यावी, अशी मागणी आहे. विशेषतः ठेवीदारांच्या पैशांचा प्रश्न प्राधान्याने सोडविण्यात यावा, अशी अपेक्षा व्यक्त होत आहे.

---

## विद्यार्थ्यांमध्ये देशप्रेम, संस्कार व आत्मविश्वास रुजविण्याचे बालविकास मंदिर प्राथमिक शाळेचे कार्य कौतुकास्पद -अजिंक्य जाधव



■ प्रतिनिधी | मालेगाव ■

येथील तहसील कार्यालया जवळ बोरगाव रोड वरील श्री व्यंकटेश सेवा समिती वाशिम द्वारा संचालित बालविकास मंदिर प्राथमिक शाळेमध्ये स्वातंत्र्य दिन मोठ्या उत्साहात व आनंदात साजरा करण्यात आला . सदर कार्यक्रमाचे अध्यक्ष शाळेचे मुख्याध्यापक विठ्ठल भिसडे, प्रमुख पाहुणे स्थानिक शाळा समिती सदस्य युसुफ साहेब, व्यंकटेश सेवा समितीचे संचालक अजिंक्य जाधव, नगरसेवक सोनाजी घुगे सामाजिक कार्यकर्ते बाळा सावंत, देवकर सर हे उपस्थित होते. कार्यक्रमाची सुरवात भारतमातेच्या प्रतिमेचे पूजनाने करण्यात आली यानंतर भारतीय राष्ट्रध्वजा चे ध्वजारोहण करून मानवंदना देन्यात आली. यांनतर कार्यक्रमाला उपस्थित मान्यवरांचे शब्दसुमनाने स्वागत करण्यात आले. कार्यक्रमाचे प्रास्ताविक नंदकिशोर भुसारी यांनी केले. त्यांनी विद्यार्थ्यांना मार्गदर्शन केले व शाळेत घेतल्या जाणाऱ्या उपक्रमाबद्दल माहिती दिली व शाळेच्या यशस्वीतेबद्दल सांगितले. या स्वातंत्र्यदिनी शाळेमध्ये विविध कार्यक्रमाचे आयोजन करण्यात आले त्यामध्ये विद्यार्थी भाषणे, गीत गायन घेण्यात आले. त्यामध्ये प्रि प्रायमरी व वर्ग १ ते ७ च्या विद्यार्थ्यांनी अतिशय मोठ्या प्रमाणात सहभाग घेतला. विद्यार्थ्यांनी इंग्लिश, मराठी, व हिंदी मध्ये भाषणे देऊन आपले मनोगत व्यक्त केले. व केजी १ ते वर्ग सातवीच्या विद्यार्थ्यांनी देशभक्तीपर विविध गीत सादर केले. स्वातंत्र्य दिनानिमित्त शाळेत निबंध व रांगोळी स्पर्धा घेण्यात आली व त्याची प्रदर्शनी सुद्धा भरवण्यात आली. यावेळी शाळेच्या परंपरेनुसार विद्यार्थ्यांना वर्षभरात उत्तम कामगिरी करणाऱ्या विद्यार्थ्यांना दरवर्षीप्रमाणे आदर्श विद्यार्थी पुरस्काराचे वितरण मान्यवरांच्या हस्ते करण्यात आले. यामध्ये वर्ग पहिली ते सातवीतील विद्यार्थ्यांना हा पुरस्कार मान्यवरांच्या हस्ते वितरित करण्यात आला. तसेच विद्यार्थ्यांची डंबेल्स कवायत सुद्धा घेण्यात आली.

## पर्यावरण उपक्रम राबविणाऱ्यांचा सन्मान

■ प्रतिनिधी | वाशिम ■

राष्ट्रीय हरित सेना योजनेअंतर्गत उन्हाळ्याच्या सुट्टीत पर्यावरण संवर्धनासाठी विविध उपक्रम राबवून जास्तीत जास्त वृक्षप्रजातींच्या बियांचे संकलन करणाऱ्या एस. एम. सी. इंग्लिश स्कूल, वाशीमच्या निसर्ग इको क्लबची विद्यार्थिनी ज्ञानेश्वरी अशोक तडस (इयत्ता सहावी) तसेच या उपक्रमासाठी मार्गदर्शन करणारे राष्ट्रीय हरित सेनेचे समन्वयक तथा मास्टर ट्रेनर अभिजीत मुकुंदराव जोशी यांना सन्मानपत्र देऊन गौरविण्यात आले.

ज्ञानेश्वरी तडस हिने अभिजीत मुकुंदराव जोशी यांच्या मार्गदर्शनाखाली विविध वृक्षप्रजातींच्या तब्बल एक हजार बियांचे संकलन केले. पर्यावरण संवर्धन व जैवविविधतेच्या जतनाच्या दृष्टीने विद्यार्थिनीने केलेल्या या उल्लेखनीय कार्याची दखल घेत सामाजिक वनीकरण विभागाच्या



वतीने तिचा तसेच मार्गदर्शक शिक्षकाचा सन्मान करण्यात आला.

राष्ट्रीय हरित सेनेच्या कार्याची व्याप्ती वाढविणे, जिल्ह्यातील शाळांमध्ये पर्यावरणविषयक विविध उपक्रम राबवून त्यामध्ये सुसूत्रता आणणे, तसेच निरनिराळ्या शाळांमध्ये स्पर्धात्मक वातावरण निर्माण करून पर्यावरणविषयक उपक्रमांची उत्कृष्ट गुणवत्ता वाढविणे, या उद्देशाने उत्कृष्ट कार्य करणाऱ्या विद्यार्थी व मार्गदर्शक शिक्षकांना सामाजिक वनीकरण विभागाच्या वतीने पुरस्कार देऊन गौरविण्यात येते. देशाच्या ८०व्या स्वातंत्र्यदिनानिमित्त १५ ऑगस्ट २०२६ रोजी वाशीम वनपरिक्षेत्र विभाग व सामाजिक वनीकरण विभाग कार्यालय, वाशीम येथे आयोजित शासकीय कार्यक्रमात विभागीय वन अधिकारी अशोक पऱ्हाड यांच्या मार्गदर्शनाखाली वनपरिक्षेत्र अधिकारी अंशुल शिर्के यांच्या हस्ते ज्ञानेश्वरी तडस व अभिजीत मुकुंदराव जोशी यांना सन्मानपत्र प्रदान करण्यात आले. यावेळी कार्यक्रमाच्या मंचावर वनपाल एम. पी. बेले, आर. आर. कामडी, बी. बी. हरणे, एस. एस. हेलंगड तसेच वनरक्षक एस. पी. तपासे व एस. के. जुमडे यांची प्रमुख उपस्थिती होती.

## विद्याभारती शाळेत स्वातंत्र्य दिन उत्साहात साजरा



■ प्रतिनिधी | वाशिम ■

विद्याभारती प्राथमिक व माध्यमिक शाळा, वाशिम येथे भारताच्या ८०व्या स्वातंत्र्य दिनानिमित्त विविध उपक्रमांसह स्वातंत्र्य दिन मोठ्या उत्साहात साजरा करण्यात आला. यानिमित्त शाळेत चित्रकला, निबंध, रांगोळी, देशभक्तीपर गीत गायन तसेच वेशभूषा अशा विविध स्पर्धांचे आयोजन करण्यात आले.

कार्यक्रमाच्या अध्यक्षस्थानी संस्थेचे अध्यक्ष दादासाहेब लाव्हरे सर होते. प्रमुख पाहुणे म्हणून शाळेचे अध्यक्ष प्रा. सुरेशराव मिटकरी, संचालक भिमरावजी गंगावणे, संचालक सुमित सुरेशराव मिटकरी, मुख्याध्यापक नितेश मिटकरी व पर्यवेक्षक विजय गोटे यांची प्रमुख उपस्थिती होती. सर्वप्रथम भारतमातेच्या प्रतिमेचे पूजन व दीपप्रज्वलन करण्यात आले. त्यानंतर संस्थेचे अध्यक्ष दादासाहेब लाव्हरे सर यांच्या हस्ते ध्वजारोहण व ध्वजवंदन करण्यात आले. यावेळी स्वातंत्र्य दिनानिमित्त उपस्थितांना साक्षरता तसेच तंबाखूमुक्तीची शपथ देण्यात आली. आयोजित करण्यात आलेल्या चित्रकला, निबंध, रांगोळी व देशभक्तीपर गीत गायन स्पर्धांमध्ये सहभाग नोंदविला.

---

## ॲड. श्रीकांत बी. वाहुरवाघ यांचा यशस्वी युक्तीवाद

**अकोला :** दि. २९.०७.२०२६ रोजी ०६.३० वाजताचे दरम्यान फिर्यादी घरी असतांना, फिर्यादीच्या भावाचे व आरोपी नामे, अजय विजय दामोदर यांचे वाद झाले होते, आरोपीस समजाविण्याचा प्रयत्न केला असता आरोपी फिर्यादीचे अंगावर धावुन आला व त्याने त्याचे खिशातील लोखंडी कटर बाहेर काढुन फिर्यादीच्या डाव्या गालावर, मानेवर व शरिरावर जीव घेण्याच्या उद्देशाने सपासप वार करून जखमी केले, अशा फिर्याद वरून पो. स्टे. बोरगांव मंजु येथे आरोपी विरूध्द अपराध क. ४३९/२०२६ अन्वये बी.एन.एस चे कलम १०९ (१) अन्वये गुन्हा दाखल करण्यात आला व आरोपीला अटक करण्यात आले. आरोपीचे वतीने विद्यमान जिल्हा व सत्र न्यायाधिश अकोला यांचे न्यायालयात जामीन मिळणेबाबतचा अर्ज दाखल करण्यात आला. सुनावणी दरम्यान आरोपी यांचे अधिवक्ता ॲड. श्रीकांत बी. वाहुरवाघ यांनी जोरदार युक्तीवाद केला व ॲड. श्रीकांत बी. वाहुरवाघ यांचा युक्तीवाद ग्राहय धरून आरोपी अजय विजय दामोदर याला विद्यमान तदर्थ जिल्हा व सत्र न्यायाधिश क. १ अकोला यांचे न्यायालयाने दि. १८.०८.२०२६ रोजी आरोपीचा अर्ज मंजुर करून आरोपीला बी.एन.एस चे कलम १०९ (१) मधुन नियमित जामीनवर सोडले आहे.


### जाहीरनामा

या जाहीरनाम्याद्वारे सर्व नागरीकांना कळविण्यात येते की, मौजे काळी कारंजा ता. कारंजा येथील सर्वे नं. ९१ मधील क्षेत्र २.०२ हे. आर. (५ एकर) या शेत जमिनीचे ७/१२ उता-यावर इतर अधिकार रकान्यात अर्जदार क्र.१ सुरैय्याबी लियाकत बेग व अर्जदार क्र.२ याहया बेग लियाकत बेग व ३) जहाँगीर बेग लियाकत बेग यांचे आजोबा नामे हारुन बेग महंम्मद बेग मय्यत यांचे सदर शेत जमिन सन १९५८-५९ पासून ताब्यात व वहितीत आहे. व नमुना १२ व वहितीमध्ये आहे. आज सुध्दा अर्जदार क्र. १ यांचे सासरे व अर्जदार क्र. २ व ३ चे मय्यत आजोबा नामें हारुन बेग महंम्मद बेग यांचे हयातीपासून अर्जदार यांचे वडील लियाकत बेग हारुन बेग, अफसर बेग हारुन बेग, याकूब बेग हारुन बेग व तय्यूब बेग हारुन बेग हे आपसी कुटुंबातील व्यवस्था व वाटणीप्रमाणे मौजे काळी कारंजा येथील शेत सर्व्हे नं.९१ मधील २.०२ हे.आर. (५ एकर) अर्जदार यांचे कुटूंबातील ताब्यात व वहितीत असल्यामुळे विदर्भ कुळ कायदयाच्या कलम ४६ च्या कायदेशीर तरतुदीनुसार दि.०१ एप्रिल. १९६१ रोजी सदर शेत जमिनीची मालकी जमीन मालकाकडून कायदयाने आपोआप अर्जदारांकडे वर्ग झालेली असून, या शेत जमिनीची विदर्भ कूळ कायदा, १९५८ च्या कलम ४७ व ४८ मधील तरतुदीनुसार योग्य ती कुळ किमत निश्चित करुन अर्जदार यांचे नावे कलम ४९ अन्वये खरेदी प्रमाणपत्र मिळणे करीता अर्जदार मय्यत लियाकत बेग हारुन बेग यांचे वारस सुरैय्याबी बेग लियाकत बेग व इतर २ रा. मंगळवारा, कारंजा ता. कारंजा जि. वाशिम यांनी या न्यायालयात अर्ज सादर केला आहे. याबाबत कोणास हरकत आक्षेप दाखल करावयाचा असल्यास त्यांनी सदरचा जाहीरनामा प्रशिध्द झाल्यापासून (कार्यालयीन सुट्टीचे दिवस वगळून) १५ दिवसाचे आत लेखी स्वरुपात या कार्यालयात हरकती / आक्षेप सादर करावे विहित मुदती नंतर आलेल्या आक्षेप हरकत अर्जाचा विचार केला जाणार नाही याची कृपया नोंद घ्यावी.

स्थळ : कारंजा
दि : १७/०८/२०२६

शिक्का

सहि/
रवि महाले
तहसिलदार, कारंजा




जाहीरनामा

[illegible]


---

## भा.मा. कन्या शाळा व कनिष्ठ महाविद्यालयात अनंतरावजी देशमुख यांच्या वाढदिवसानिमित्त विविध कार्यक्रमांची रेलचेल

■ प्रतिनिधी | रिसोड ■

रिसोड तालुक्यातील मुलींचे एकमेव भारत माध्यमिक कन्या शाळा व कनिष्ठ महाविद्यालयात संस्थाध्यक्ष अनंतरावजी उपाध्य भाऊसाहेब देशमुख यांच्या वाढदिवसानिमित्त विविध शैक्षणिक, सांस्कृतिक व क्रीडा स्पर्धांचे आयोजन करण्यात आले. इयत्ता पाचवी ते बारावीपर्यंतच्या विद्यार्थिनींनी या स्पर्धांमध्ये उत्स्फूर्त सहभाग घेत आपल्या कलागुणांना वाव दिला.

यावेळी सुंदर हस्ताक्षर, गीत गायन, चित्रकला व पोस्टर, फुगे फोडणे, दोन पायांची लंगडी, लिंबू-चमचा, धावण्याची शर्यत, थ्रो बॉल आदी विविध स्पर्धा घेण्यात आल्या. वर्गावर्गामध्ये झालेल्या चुरशीच्या स्पर्धांमुळे शाळेच्या परिसरात उत्साहाचे वातावरण निर्माण झाले होते. विद्यार्थिनींनी स्पर्धांमध्ये केवळ सहभाग नोंदविला नाही, तर तन-मनाने सहभागी होत स्पर्धांचा मनमुराद आनंद लुटला.



यानंतर बक्षीस वितरण, खाऊ वाटप व शुभेच्छापर कार्यक्रम झाला. कार्यक्रमाच्या अध्यक्षस्थानी प्राचार्या मंजुषा सु. देशमुख होत्या. प्रमुख अतिथी म्हणून पर्यवेक्षक सुनील डहाळके, ज्येष्ठ शिक्षक वसंतराव बुंदे शास्त्री, ज्येष्ठ शिक्षिका मंगला शेटे, ज्येष्ठ क्रीडा शिक्षक सुधीर देशमुख व प्रा. पांडुरंग मोरे उपस्थित होते.

मान्यवरांनी आपल्या भाषणातून अनंतरावजी देशमुख यांच्या सामाजिक, शैक्षणिक व राजकीय कार्याचा आढावा घेत विद्यार्थिनींना त्यांच्या कार्यकर्तृत्वाची माहिती करून दिली. सुनील डहाळके यांनी अनंतरावजी देशमुख यांचा वाशिम जिल्ह्याच्या राजकारणातील ‘कोहिनूर हिरा’ असा उल्लेख केला.

प्राचार्या मंजुषा सु. देशमुख यांनी अनंतरावजी देशमुख हे जनतेच्या मनातील लोकनेते, राजकारणातील धुरंधर, अजातशत्रू व्यक्तिमत्त्व आणि शिक्षण क्षेत्रासाठी योगदान देणारे शिक्षणमहर्षी असल्याचे सांगितले. समाजसेवेचा वसा घेतलेल्या त्यांच्या कार्यातून विद्यार्थिनींनी प्रेरणा घ्यावी, असे आवाहनही त्यांनी केले.

कार्यक्रमाचे सूत्रसंचालन व आभार प्रदर्शन ज्येष्ठ क्रीडा शिक्षक सुधीर देशमुख यांनी केले. कार्यक्रमाच्या यशस्वीतेसाठी प्राचार्या, पर्यवेक्षक, शिक्षक-शिक्षिका, शिक्षकेतर कर्मचारी व विद्यार्थिनींनी परिश्रम घेतले. शेवटी खाऊ व चॉकलेट वाटपाने कार्यक्रमाची सांगता करण्यात आली.

## आंतरजातीय विवाहाला विरोध प्रेमीयुगुलाने उचलले टोकाचे पाऊल

■ प्रतिनिधी | मालेगाव ■

मालेगाव तालुक्यातील गोगसावंगी येथे परिसरात धक्कादायक घटना घडली. यामध्ये तालुक्यातील २ प्रेमीयुगलांनी घरच्यां कडून आंतर जातीय विवाहाला विरोध केल्याने या दोघांनी घरच्यांच्या विरोधामुळे आपले जीवन कायमचे संपविले आहे.

महादेव गजानन निंबाळकर (वय २४) व निकिता संतोष कांबळे (वय २१) असे मृत प्रेमीयुगलाचे नाव आहे. पोलिसांनी दिलेल्या माहितीनुसार, आंतरजातीय विवाहाला कुटुंबीयांचा विरोध असल्याने प्रेमीयुगुलाने तलावात उडी घेऊन जीवन संपविल्याची घटना गोगसावंगी येथील तलावात आत्महत्या केली. ही घटना मंगळवारी रात्री समोर आली. या तलावात मासे पकडणयासाठी आलेल्या मासेकरांना दोघांची मृतदेह तरंगताना दिसले, त्यांनी पोलिसांना माहिती दिली.



घटनास्थळी पोलिसांनी येऊन पाहणी केली असता गेल्या शुक्रवारी घरातून बेपत्ता असलेले प्रेमीयुगल असल्याचे स्पष्ट झाले. यावरून मालेगाव पोलीस स्टेशनचे ठाणेदार राजेश खेरडे यांनी माहिती दिली. मृत महादेव आणि निकिता हे दोघे शुक्रवारपासून बेपत्ता होते. त्यांच्या कुटुंबीयांनी मालेगाव पोलिस ठाण्यात हरविल्याची तक्रार दाखल केली होती. दरम्यान, मंगळवारी तलाव परिसरात मासेमारीसाठी गेलेल्या नागरिकांना दोघांचे मृतदेह आढळून आले.

---

## पारस नगरच्या सार्वजनिक जागेवरील अतिक्रमण हटविण्याची मागणी

### संरक्षण भिंतीसाठी नागरिकांचे निवेदन

■ प्रतिनिधी | कारंजा ■

कारंजा लाड शहरातील काळी कारंजा परिसरातील पारस नगर येथील सार्वजनिक मोकळ्या जागेवरील अतिक्रमण तात्काळ हटवून संपूर्ण जागेला संरक्षण भिंत (वॉल कंपाऊंड) उभारण्यात यावी, अशी जोरदार मागणी पारस नगर येथील नागरिकांनी केली आहे.

मौजे पारस नगर, काळी कारंजा येथील सर्व्हे क्रमांक १६८ चे एकूण क्षेत्रफळ ४.६८ हेक्टर असून, नियमानुसार त्यामध्ये १,०५० चौ. मीटर सार्वजनिक ओपन स्पेस राखीव ठेवण्यात आली आहे. ही जागा सार्वजनिक उपयोगासाठी असल्याने तिचे संरक्षण करणे ही नगरपालिकेची जबाबदारी असल्याचे नागरिकांनी निवेदनात नमूद केले आहे.

या सार्वजनिक जागेवर काही व्यक्तींनी अतिक्रमण केल्याने नागरिकांमध्ये नाराजीचे



वातावरण निर्माण झाले आहे. विशेष म्हणजे, याच परिसरात एक पुरातन विहीर असून ती परिसराच्या ऐतिहासिक व सांस्कृतिक वारशाचा भाग आहे. अतिक्रमणामुळे विहिरीच्या सुरक्षिततेलाही धोका निर्माण झाला असून भविष्यात सार्वजनिक जागेवर आणखी अतिक्रमण होण्याची शक्यता नागरिकांनी व्यक्त केली आहे.

याप्रकरणी नगरपालिकेने तातडीने पंचनामा करून अतिक्रमण हटवावे, अधिकृत मोजणी व सीमांकन करावे आणि संपूर्ण सार्वजनिक जागेभोवती मजबूत संरक्षण भिंत उभारावी, अशी मागणी करण्यात आली आहे. तसेच या कामासाठी आवश्यक प्रस्ताव तयार करून जिल्हा नियोजन समितीकडे निधीसाठी पाठवून प्रशासकीय मान्यता मिळवावी, अशीही मागणी नागरिकांनी केली आहे.

दरम्यान, याच मागणीसंदर्भात कारंजा-मानोरा विधानसभा मतदारसंघाच्या आमदार सईताई डहाके यांनाही नागरिकांच्या वतीने निवेदन देण्यात आले. सार्वजनिक मालमत्तेचे संरक्षण आणि नागरिकांच्या हक्काच्या जागेचे संवर्धन करण्यासाठी प्रशासनाने या प्रकरणाची गांभीर्याने दखल घेऊन तातडीने कार्यवाही करावी, अशी अपेक्षा नागरिकांनी व्यक्त केली आहे.

जनमाध्यम

e paper www.janmadhyam.com

एक प्रतिष्ठित सवय

■ वर्धा ■ वर्षे १४ ■ अंक २६४ ■ शुक्रवार, २१ ऑगस्ट २०२६ ■ पृष्ठे ४ ■ मुल्य ३.०० रु.

नीलपंख म्हणे मला वाचवा, वर्धेच्या सौंदर्याला पुन्हा सजवा

# साखरेचा भाव कडाडला; गोडवा झाला महाग

## २५ दिवसांत किलोमागे तब्बल २५ रुपयांची वाढ; ४० वरून थेट ६५ रुपयांवर दर

**वर्धा जनमाध्यम :** सर्वसामान्यांच्या घरातील चहापासून सणासुदीच्या गोडधोडापर्यंत अविभाज्य असलेली साखर आता ग्राहकांच्या खिशाला चटका देत आहे. वर्ध्याच्या बाजारपेठेत अवघ्या २५ दिवसांत साखरेच्या दरात तब्बल २५ रुपयांची वाढ झाली आहे. ४० रुपये किलो दराने मिळणारी साखर आता थेट ६५ रुपये किलोवर पोहोचल्याने ग्राहकांच्या घरगुती अर्थसंकल्पाला मोठा धक्का बसला आहे.

पंधरा दिवसांत किलोमागे २५ रुपयांची वाढ म्हणजे तब्बल ६२.५ टक्क्यांची दरवाढ आहे. अचानक झालेल्या या भाववाढीमुळे गृहिणींसह चहा विक्रेते, मिठाई व्यावसायिक, बेकरी व्यावसायिक आणि खाद्यपदार्थ विक्रेत्यांच्या खर्चात मोठी वाढ झाली आहे. साखरेचा वाढलेला खर्च अखेर ग्राहकांच्या खिशातूनच वसूल होण्याची शक्यता आहे.

**भाववाढीमागे कारणांचा गुंता**

साखरेचा घटता साठा, बाजारातील आवक, उपलब्ध कोटा आणि वाढती मागणी यामुळे बाजारावर दबाव निर्माण झाल्याचे सांगितले जात आहे. मागील हंगामातील उत्पादन आणि निर्यातीमुळे देशांतर्गत उपलब्धतेवर परिणाम झाला आहे. त्यात महाराष्ट्र आणि कर्नाटकसारख्या प्रमुख साखर उत्पादक राज्यांमध्ये पाऊस आणि हवामानाच्या अनिश्चिततेमुळे आगामी हंगामाच्या उत्पादनाबाबत चिंता व्यक्त केली जात आहे.



**इथेनॉल निर्मितीचाही परिणाम**

यंदा मोठ्या प्रमाणात ऊस इथेनॉल निर्मितीकडे वळवण्यात आल्याने साखर उत्पादनासाठी उपलब्ध उसाचे प्रमाण कमी झाले आहे. सुमारे ३० लाख टन साखर तयार होऊ शकणारा ऊस इथेनॉल निर्मितीकडे वळवण्यात आल्याचे सांगितले जाते. परिणामी बाजारात उपलब्ध साखरेच्या प्रमाणावर त्याचा परिणाम झाला आहे.

**सणासुदीमुळे मागणी वाढणार**

ऑगस्ट ते नोव्हेंबर या कालावधीत गणेशोत्सव, दसरा आणि दिवाळीसह विविध सण असल्याने साखरेची मागणी वाढण्याची शक्यता आहे. मिठाई, बेकरी आणि खाद्यपदार्थ उद्योगाकडून मोठ्या प्रमाणात साखरेची खरेदी केली जाते. त्यामुळे आगामी काळात मागणी आणि पुरवठ्यातील तफावत वाढल्यास दर आणखी चढण्याची भीती व्यक्त होत आहे.

**महिन्याच्या बजेटवर थेट परिणाम**

४० रुपयांवरून ६५ रुपये किलो दर झाल्याने ग्राहकांना प्रत्येक किलोमागे २५ रुपये अधिक मोजावे लागत आहेत. महिन्याला पाच किलो साखर खरेदी करणाऱ्या कुटुंबाला आता १२५ रुपये अतिरिक्त खर्च करावा लागणार आहे. मिठाई आणि बेकरी उत्पादनांच्या निर्मिती खर्चातही वाढ होणार असल्याने त्याचा परिणाम इतर खाद्यपदार्थांच्या किमतींवर होण्याची शक्यता आहे.

**सरकारकडून साठ्यावर निर्बंध**

साखरेचे दर नियंत्रणात ठेवण्यासाठी केंद्र सरकारने मोठ्या प्रमाणात साखर हाताळणाऱ्या व्यापाऱ्यांच्या साठ्यावर मर्यादा आणण्याचा निर्णय घेतला आहे. दरमहा १० मेट्रिक टनांपेक्षा अधिक साखर वापरणाऱ्या किंवा हाताळणाऱ्या व्यापाऱ्यांना ठरावीक कालावधीपेक्षा अधिक साठा ठेवण्यावर निर्बंध राहणार आहेत. सणासुदीच्या काळात कृत्रिम टंचाई निर्माण होऊ नये, हा त्यामागील उद्देश आहे.

**गोडवा महाग; भाववाढीला आळा कधी**

एकीकडे सणासुदीची लगबग सुरू होत असताना दुसरीकडे साखरेचे दर सर्वसामान्यांच्या बजेटला कडू चटका देत आहेत. बाजारातील पुरवठा सुरळीत ठेवणे, साठेबाजीवर नियंत्रण आणणे आणि कृत्रिम टंचाईला आळा घालणे आवश्यक आहे. अन्यथा आज ६५ रुपयांवर पोहोचलेली साखर आगामी काळात आणखी महागण्याची शक्यता नाकारता येत नाही. साखरेचा गोडवा टिकवण्यासाठी सरकारला बाजारपेठेवर कडक नजर ठेवण्याची गरज निर्माण झाली आहे.

# झाडाझुडपांत हरवला वर्धेचा नीलपंख; सौंदर्यीकरणाच्या देखभालीला ग्रहण

### वर्धा शहराच्या प्रवेशद्वारावरील सेल्फी पॉईंटची दुरवस्था; नागरिकांचा आक्रोश

**वर्धा जनमाध्यम :** शहरात प्रवेश करताना प्रवाशांचे लक्ष वेधून घेणारे नीलपंख पक्ष्याचे भव्य शिल्प सध्या प्रशासनाच्या दुर्लक्षामुळे विद्रूप झाले आहे. काही वर्षांपूर्वी लाखो रुपये खर्च करून नागपूर वर्धा रोडवर पवनार जवळ नीलपंख पक्षी उभारण्यात आलेला हा परिसर नागरिकांसाठी आकर्षणाचा केंद्रबिंदू ठरला होता. नीलपंखासोबत सेल्फी घेण्यासाठी नागरिक आणि पर्यटक येथे आवर्जून थांबत होते. मात्र, आज याच सेल्फी पॉईंटची अवस्था पाहता सौंदर्यीकरणाच्या नावाखाली केलेला खर्च नेमका कुणासाठी, असा प्रश्न नागरिक उपस्थित करीत आहेत.

धातूच्या स्क्रॅपमधून कलात्मक पद्धतीने साकारण्यात आलेले हे नीलपंखाचे शिल्प वर्धेची वेगळी ओळख निर्माण करणारे ठरले होते. विशाल आकार असूनही शिल्पाला हलकेपणाची अनुभूती देणारी रचना आणि अक्षरांवरून भरारी घेणारा नीलपंख असा त्याचा देखणा आविष्कार होता. ग्रामीण विदर्भात नीलकंठ किंवा नीलपंख पक्षी शुभ मानला जात असल्याने या शिल्पाला भावनिक आणि सांस्कृतिक महत्त्वही प्राप्त झाले होते.



मात्र, देखभालीअभावी परिसरात झाडाझुडपे वाढली असून शिल्पाभोवती असलेल्या अक्षरांचे सौंदर्य झाकोळले गेले आहे. एकेकाळी आकर्षणाचा आणि सेल्फीचा केंद्रबिंदू असलेले ठिकाण आता प्रशासनाच्या बेफिकीरीचे प्रतीक ठरत आहे.

सौंदर्यीकरणासाठी लाखो रुपये खर्च करण्यापेक्षा त्याची नियमित देखभाल करणे अधिक महत्त्वाचे आहे. शहराची ओळख ठरणाऱ्या या शिल्पाची अशी अवस्था होत असताना संबंधित विभाग नेमका झोपला आहे का, असा प्रश्न नागरिक करीत आहेत. नीलपंखाला पुन्हा झाडाझुडपातून मुक्त करून परिसराचे सुशोभीकरण करावे आणि या सेल्फी पॉईंटला पूर्वीचे वैभव मिळवून द्यावे, अशी मागणी जोर धरत आहे.

# घरफोडी करणारा आरोपी जेरबंद; १.८० लाखांचा मुद्देमाल जप्त

**वर्धा जनमाध्यम :** रामनगर पोलीस ठाण्याच्या हद्दीत घरफोडी करून सोन्याचे दागिने लंपास करणाऱ्या आरोपीला स्थानिक गुन्हे शाखेने रेल्वे स्टेशन परिसरातून ताब्यात घेतले. आकाश रमेश देवतळे (३४), रा. तारफैल, वर्धा असे आरोपीचे नाव आहे. त्याच्याकडून चोरीचा १ लाख ८० हजार ४४१ रुपयांचा मुद्देमाल जप्त करण्यात आला.



विक्रम शीला नगर येथील प्रज्ञा नितीन डांगरे या ७ ऑगस्ट रोजी बाहेरगावी गेल्या होत्या. दुसऱ्या दिवशी घरी परतल्यानंतर घराच्या दरवाजाचे कुलूप तुटलेले व घरातील साहित्य अस्ताव्यस्त असल्याचे त्यांच्या निदर्शनास आले. बेडरूममधील गादीखाली ठेवलेली सोन्याचे दागिने असलेली पर्सही गायब होती. याप्रकरणी रामनगर पोलिसांत गुन्हा दाखल करण्यात आला. स्थानिक गुन्हे शाखेच्या पथकाने तपास सुरू असताना मिळालेल्या गोपनीय माहितीवरून आकाश देवतळेला ताब्यात घेतले. चौकशीत त्याने गुन्ह्याची कबुली देत चोरीचे दागिने सेलू येथील सोनाराकडे विकल्याचे सांगितले. त्यानंतर सोनाराकडून १०.८० ग्रॅम वजनाची सोन्याची लगड व १.५ ग्रॅम वजनाचे सोन्याचे मनी असा एकूण १ लाख ८० हजार ४४१ रुपयांचा मुद्देमाल जप्त करण्यात आला.

ही कारवाई पोलीस अधीक्षक सौरभ कुमार अग्रवाल, अपर पोलीस अधीक्षक सदाशिव वाघमारे यांच्या मार्गदर्शनाखाली पोलीस निरीक्षक विनोद चौधरी व पथकाने केली.

# मांग गारोडी समाजाची भव्य कावड यात्रा

**वर्धा जनमाध्यम :** श्रावण मासानिमित्त स्थानिक अशोकनगर येथील मांग गारोडी समाजाच्या वतीने रविवार, २४ ऑगस्ट रोजी भव्य कावड यात्रेचे आयोजन करण्यात आले आहे. पहाटे ३ वाजता अशोकनगर येथून या यात्रेला सुरुवात होऊन पवनार येथे यात्रेचे मार्गक्रमण होणार आहे.

दरवर्षीप्रमाणे यंदाही ही कावड यात्रा अत्यंत शिस्तबद्ध आणि भक्तिमय वातावरणात काढण्यात येणार आहे. धाम नदीच्या पात्रातून जलकलशात पवित्र जल भरून कावड यात्रेला प्रारंभ करण्यात येईल. हातात भगवे ध्वज, खांद्यावर कावड आणि मुखी महादेवाचा जयघोष अशा भक्तिमय वातावरणात शिवभक्त सहभागी होणार आहेत. या यात्रेत लहान मुले, महिला, युवक तसेच ज्येष्ठ नागरिक मोठ्या संख्येने सहभागी होणार आहेत. श्रावण मासातील या धार्मिक सोहळ्याला शिवभक्तांनी मोठ्या संख्येने उपस्थित राहून यात्रेची शोभा वाढवावी, असे आवाहन मांग गारोडी परिवाराच्या वतीने करण्यात आले आहे.

# ग्रामसेवक गायब; ग्रामपंचायतीला ग्रामस्थांचे टाळे

## विकासकामे ठप्प असल्याने संतप्त गावकऱ्यांचा आक्रमक पवित्रा

**सेलू जनमाध्यम :** तालुक्यातील दहेगाव (गोसावी) येथील ग्रामपंचायतीच्या कारभाराविरोधात संतापाचा उद्रेक झाला. ग्रामसेवकाच्या कथित सततच्या गैरहजेरीमुळे गावातील विकासकामे खोळंबली असून, ग्रामसभेसारख्या महत्त्वाच्या बैठकीलाही ग्रामसेवक गैरहजर राहिल्याने संतप्त ग्रामस्थांनी थेट ग्रामपंचायत कार्यालयालाच कुलूप ठोकले. या घटनेमुळे गावातील प्रशासनाच्या कारभारावर प्रश्नचिन्ह निर्माण झाले आहे.



दहेगाव (गोसावी) येथे ग्रामसभा आयोजित करण्यात आली होती. मात्र, या ग्रामसभेला ग्रामसेवक उपस्थित राहिले नसल्याने ग्रामस्थांमध्ये नाराजी पसरली. विशेष म्हणजे ग्रामसेवक गैरहजर राहणार असल्याची कोणतीही पूर्वसूचना ग्रामस्थांना देण्यात आली नसल्याचा आरोप करण्यात आला. त्यामुळे ग्रामसभेच्या माध्यमातून गावातील प्रश्न मांडण्यासाठी आलेल्या नागरिकांचा संताप अनावर झाला.

### विकासकामांना ब्रेक, ग्रामस्थांचा संताप

ग्रामसेवक कार्यालयात नियमित उपस्थित राहत नसल्याने गावातील विविध विकासकामे रखडली आहेत, असा गंभीर आरोप ग्रामस्थांनी केला. ग्रामपंचायतीच्या माध्यमातून नागरिकांच्या समस्या आणि विकासकामांबाबत पाठपुरावा करायचा तरी कुणाकडे, असा प्रश्नही ग्रामस्थांनी उपस्थित केला. प्रशासनाकडून वारंवार दुर्लक्ष होत असल्याचा आरोप करत नागरिकांनी अखेर आक्रमक भूमिका घेतली. ग्रामपंचायत कार्यालयाला कुलूप ठोकल्यानंतर संतप्त ग्रामस्थांनी विविध घोषणा देत प्रशासनाविरोधात आपला रोष व्यक्त केला. ग्रामसेवकाच्या अनुपस्थितीची दखल घेऊन संबंधित प्रशासनाने तातडीने कारवाई करावी आणि ग्रामपंचायतीचा कारभार सुरळीत करावा, अशी मागणी ग्रामस्थांकडून करण्यात आली आहे. गावच्या विकासाचा कारभार पाहणाऱ्या ग्रामपंचायतीलाच ग्रामस्थांनी टाळे ठोकल्याने दहेगाव (गोसावी) येथील प्रशासकीय कारभाराची चांगलीच चर्चा रंगली आहे. आता वरिष्ठ अधिकारी या प्रकाराची किती गांभीर्याने दखल घेतात आणि ग्रामस्थांच्या तक्रारींचे निराकरण कसे करतात, याकडे गावकऱ्यांचे लक्ष लागले आहे.

# तलवारीने केक कापणे पडले महागात; व्हिडीओ व्हायरल होताच तरुण पोलिसांच्या ताब्यात

**वर्धा जनमाध्यम :** वाढदिवसाच्या उत्साहात तलवारीने केक कापून त्याचा व्हिडीओ सोशल मीडियावर व्हायरल करणे एका तरुणाला चांगलेच महागात पडले आहे. वायगाव निपाणी परिसरात दहशत निर्माण करण्याच्या उद्देशाने तलवारीने केक कापतानाचा व्हिडीओ फेसबुक आणि इन्स्टाग्रामवर प्रसारित करणाऱ्या अजय अनंता नागपुरे, वय २२ वर्षे, रा. वॉर्ड क्रमांक १, वायगाव निपाणी, ता. जि. वर्धा याला देवळी पोलिसांनी ताब्यात घेतले.

पोलिसांनी दिलेल्या माहितीनुसार, १८ ऑगस्ट रोजी अजय नागपुरे याचा वाढदिवस होता. रात्रीच्या सुमारास त्याने तलवारीने केक कापला. यावेळी त्याचा व्हिडीओ तयार करून सोशल मीडियावर प्रसारित करण्यात आला. या व्हिडीओची माहिती देवळी पोलिसांना मिळताच पोलिसांनी तातडीने दखल घेत अजय नागपुरे याला ताब्यात घेतले.

त्यानंतर पोलिसांनी त्याच्या घराची झडती घेतली असता एक लोखंडी पात्याची तलवार तसेच विक्रीसाठी साठवून ठेवलेली गावठी मोहाची दारू असा एकूण १३ हजार ५०० रुपयांचा मुद्देमाल आढळून आला. पोलिसांनी तो मुद्देमाल जप्त केला आहे.

या प्रकरणी देवळी पोलीस ठाण्यात अपराध क्रमांक ६५१/२०२६ अन्वये महाराष्ट्र दारूबंदी कायद्यातील कलम ६५ (ई) तसेच शस्त्र अधिनियम १९५९ मधील कलम ४ व २५ अन्वये गुन्हा दाखल करण्यात आला आहे. प्रकरणाचा पुढील तपास पोलीस हवालदार गणेश बावणे करीत आहेत.

# ई-पिक पाहणीत आष्टी तालुक्याची उल्लेखनीय कामगिरी

## बोरखेडी व चामला गावांत १०० टक्के ई-पिक पाहणी पूर्ण

### तहसीलदाराच्या हस्ते पोलिस पाटलांचा विशेष गौरव

**वर्धा जनमाध्यम :** खरीप हंगाम २०२६-२७ मधील ई-पिक पाहणी मोहिमेत आष्टी तालुक्याने उल्लेखनीय कामगिरी केली आहे. तालुक्यातील बोरखेडी व चामला या गावांमध्ये १०० टक्के ई-पिक पाहणीचे काम पूर्ण झाले असून जिल्ह्यात १०० टक्के ई-पिक पाहणी पूर्ण करणारी ही पहिली गावे ठरली आहेत. या उल्लेखनीय कामगिरीबद्दल तहसीलदार ऐश्वर्या गिरी यांच्या हस्ते दोन्ही गावांतील पोलिस पाटलांचा प्रशस्तीपत्र देऊन विशेष गौरव करण्यात आला.



शासनाच्या महत्त्वाकांक्षी ई-पिक पाहणी मोहिमेंतर्गत खरीप हंगाम २०२६-२७ मध्ये शेतकऱ्यांनी आपल्या शेतातील पिकांची ऑनलाइन नोंद करणे आवश्यक आहे. आष्टी तालुक्यात ई-पिक सहाय्यकांच्या माध्यमातून डीसीएचएमएच या मोबाईल ॲपद्वारे शेतकऱ्यांच्या पिकांची ऑनलाइन नोंदणी करण्यात येत आहे.

बोरखेडी व चामला गावांमध्ये ग्रामपातळीवरील पोलिस पाटलांनी ग्राम महसूल अधिकारी, ई-पिक सहाय्यक तसेच शेतकऱ्यांशी समन्वय साधत ही मोहिम प्रभावीपणे राबविली. बोरखेडी येथील पोलिस पाटील प्रणीता धनराज लोमटे यांनी गावातील सर्व शेतकऱ्यांची १०० टक्के ई-पिक पाहणी पुर्ण करण्यासाठी महत्त्वपूर्ण योगदान दिले. तसेच चामला येथील पोलिस पाटील गंगाधर बिटने यांनी प्रत्यक्ष शेतात जाऊन प्रत्येक शेतकऱ्याला भेट देत ई-पिक पाहणी पूर्ण करून घेण्यासाठी प्रशासनाला सहकार्य केले. दोन्ही पोलिस पाटलांनी गावकऱ्यांशी उत्तम समन्वय साधून उद्दिष्ट वेळेत पूर्ण केले. त्यांच्या उल्लेखनीय कार्याची दखल घेत तहसीलदार ऐश्वर्या गिरी यांच्या हस्ते त्यांना प्रशस्तीपत्र देऊन सन्मानित करण्यात आले.

ई-पिक पाहणीसाठी १० नोव्हेंबर ही अंतिम मुदत आहे. मुदत संपण्यास अवकाश असला तरी तालुक्यातील सर्व शेतकऱ्यांनी विलंब न करता आपल्या गावातील ग्राम महसूल अधिकारी (तलाठी) अथवा ई-पिक सहाय्यकांशी संपर्क साधावा. आपल्या शेतातील पिकांची नोंदणी विहित वेळेत पुर्ण करून घ्यावी, असे आवाहन तहसीलदार ऐश्वर्या गिरी यांनी केले आहे.

# वसंतराव नाईकांच्या कार्याला उजाळा; बंजारा समाजाच्यावतीने अभिवादन

## स्मृतिदिनानिमित्त विविध कार्यक्रमांचे आयोजन

**आर्वी जनमाध्यम :** हरितक्रांतीचे प्रणेते, महाराष्ट्राचे माजी मुख्यमंत्री तथा बंजारा समाजाचे प्रेरणास्थान स्व. वसंतरावजी नाईक यांच्या स्मृतिदिनानिमित्त आर्वी येथे बंजारा समाजाच्यावतीने विविध कार्यक्रमांचे आयोजन करण्यात आले. लाकूड बाजार येथील कार्यालयात स्व. नाईक यांच्या प्रतिमेचे पूजन व माल्यार्पण करून त्यांना आदरांजली वाहण्यात आली.

यानंतर वर्धा तळेगाव टी पॉईंटवरील स्व. वसंतरावजी नाईक चौकातील नामफलकाचे पूजन करण्यात आले. यावेळी त्यांच्या कार्याचा गौरवपूर्ण उल्लेख करून महाराष्ट्राच्या कृषी आणि ग्रामीण विकासातील योगदानाला उजाळा देण्यात आला.



कार्यक्रमाच्या अध्यक्षस्थानी माजी प्राचार्य प्रा. प्रेमसिंग राठोड होते. शिवसेनेचे उपजिल्हाप्रमुख दशरथ जाधव प्रमुख अतिथी म्हणून उपस्थित होते. यावेळी पंतुसींग जाधव, किसन जाधव, महेश देवशोध, अर्जुन राठोड, गेमसिंग राठोड, नामदेव राठोड, दिलीप जाधव यांच्यासह समाजबांधव मोठ्या संख्येने उपस्थित होते.

स्व. वसंतराव नाईक यांनी मुख्यमंत्री म्हणून महाराष्ट्राच्या कृषी क्षेत्रात परिवर्तन घडवून आणले. पंचायत राज व्यवस्था, रोजगार हमी आणि ग्रामीण विकासाला त्यांनी चालना दिली. त्यांच्या दूरदृष्टीमुळे महाराष्ट्राच्या विकासाला नवी दिशा मिळाली. त्यामुळे त्यांचे कार्य आजही समाजासाठी प्रेरणादायी असल्याचे यावेळी उपस्थितांनी सांगितले. स्मृतिदिनानिमित्त त्यांच्या विचारांचे स्मरण करून आदरांजली वाहण्यात आली.

# राजीव गांधी जयंतीनिमित्त अभिवादन

## दादाराव उगेमुगे यांना श्रद्धांजली

**वर्धा जनमाध्यम :** वर्धा जिल्हा काँग्रेस कमिटीच्या वतीने इंदिरा सद्भावना भवन येथे भारताचे माजी पंतप्रधान व आधुनिक भारताचे शिल्पकार भारतरत्न स्वर्गीय राजीव गांधी यांच्या जयंतीनिमित्त अभिवादन करण्यात आले.

त्यांच्या प्रतिमेला पुष्पहार अर्पण करून उपस्थितांनी अभिवादन केले. तंत्रज्ञान, संगणकीकरण, युवकांना संधी, शिक्षण तसेच सामाजिक सलोखा आणि देशाच्या विकासासाठी राजीव गांधी यांनी दिलेल्या योगदानाचे यावेळी स्मरण करण्यात आले.

याच कार्यक्रमात काँग्रेसचे खंदे समर्थक तथा सेवा दलाचे ज्येष्ठ नेते दिवंगत दादाराव उगेमुगे यांना भावपूर्ण श्रद्धांजली अर्पण करण्यात आली. काँग्रेस पक्षासाठी त्यांनी केलेले प्रदीर्घ संघटनात्मक कार्य आणि सेवाभावी योगदानाचा गौरवपूर्ण उल्लेख करण्यात आला.



दरम्यान, जिल्हाध्यक्ष सुनील कोल्हे यांच्या वाढदिवसानिमित्त त्यांचा सत्कार करण्यात आला. पदाधिकारी व कार्यकर्त्यांनी त्यांना शुभेच्छा देत सामाजिक आणि राजकीय वाटचालीसाठी सदिच्छा व्यक्त केल्या.

यावेळी नगराध्यक्ष सुधीर पांगुळ, प्रदेश काँग्रेस सचिव अभ्युदय मेघे, बाळकृष्ण माउसकर, धर्मपाल ताकसांडे, निलेश तिजारे, अर्चना भोमले, ऋतुजा भोयर, नंदकिशोर कांबळे, मनोज देशमुख, ॲड. नंदकुमार वानखेडे, संजय गावंडे, डॉ. रामकृष्ण मिरगे, सुनील कोपुलवार, कौडुजी काका, सुरेश ठाकरे, श्रीकांत बाराहत यांच्यासह पदाधिकारी, कार्यकर्ते व नागरिक उपस्थित होते.

# मध्य प्रदेशातील अनेक जिल्ह्यांमध्ये पूरस्थिती

## प्रयागराजमध्ये 5 फूट पाणी साचले, 2000 विद्यार्थ्यांनी वसतिगृह सोडले; उत्तराखंडमध्ये 4 जणांचा मृत्यू










**नवी दिल्ली/वृत्तसंस्था :** देशातील अनेक राज्यांमध्ये सतत पाउस सुरू आहे. दिल्ली-एनसीआरमध्ये गुरुवार सकाळपासून जोरदार पाउस पडत आहे. एअरपोर्ट रोडवरील द्वारका अंडरपाससह अनेक भागांत पाणी साचले, त्यामुळे वाटसरूंना अडचणींचा सामना करावा लागला. उत्तर प्रदेशातील प्रयागराजमध्ये तीन दिवसांत २०५ मि.मी. पाउस झाला आहे. शहरातील अनेक भागांत ५ फुटांपर्यंत पाणी साचले आहे. घरे आणि वसतिगृहांमध्ये पाणी शिरले. बुधवारी सुमारे २००० स्पर्धा परीक्षा देणारे विद्यार्थी वसतिगृहे सोडून गेले.मध्य प्रदेशातील अनेक जिल्ह्यांमध्ये पूरसदृश परिस्थिती आहे. सतनामध्ये मुसळधार पावसामुळे चित्रकूटमधील गुप्तगोदावरी नदीची पाणी पातळी वाढली. डिंडोरीमध्ये नद्या-नाले दुथडी भरून वाहत आहेत आणि १२ हून अधिक गावांचा संपर्क तुटला आहे. पन्ना जिल्ह्यातील अनेक गावांमध्येही पाणी शिरले आहे.उत्तराखंडमध्ये पावसाशी संबंधित घटनांमध्ये बुधवारी ४ लोकांचा मृत्यू झाला. यामध्ये २ वर्षांचे बाळ आणि दिल्लीतील २५ वर्षीय महिलेचा समावेश आहे. भूस्खलनामुळे अनेक रस्ते बंद झाले आहेत.हिमाचल प्रदेशमध्ये पाउस आणि भूस्खलनामुळे ८८ रस्ते बंद आहेत. आसाममधील गुवाहाटी आणि जोनाईमध्ये पूरसदृश परिस्थिती आहे. ओडिशामध्ये सुवर्णरेखा आणि बैतरणी नद्यांच्या पाण्याची पातळी वाढल्याने ६ जिल्ह्यांमधील अनेक गावे पाण्याखाली गेली आहेत. ३ लाखांहून अधिक लोकांना सुरक्षित ठिकाणी हलवण्यात आले आहे.उत्तरप्रदेशमधील गोंडा येथे घागरा नदी धोक्याच्या पातळीवरून वाहत आहे. पुराचे पाणी ५ गावांमध्ये पोहोचले आहे.नेपाळमधून सोडल्या जाणा-या पाण्यामुळे बिहारमधील गंडक नदी दुथडी भरून वाहत आहे. नदीच्या धूपामुळे बगहा येथील एक शाळा नदीत वाहून गेली. आसाममधील गुवाहाटीमध्ये मुसळधार पावसामुळे रस्त्यांवर पाणी साचले, ज्यामुळे वाटसरूंना त्रास झाला. आसाममधील जोनाई येथे २८ जून रोजी नदीच्या पुरात पूल तुटला होता. त्यामुळे आता मुलांना बोटीने नदी पार करून शाळेत जावे लागत आहे. सततच्या पावसामुळे मध्य झारखंडमधील अनेक भाग पाण्याखाली गेले आहेत. बुधवारी हजारीबागच्या अनेक भागांत पाणी साचले. यूपीच्या सोनभद्र जिल्ह्यात कनहर धरणाची पाणी पातळी बुधवारी २६३.१ मीटरपर्यंत पोहोचली. यामुळे धरणाचे १४ दरवाजे उघडण्यात आले.

## मिहान इंडियाकडून 1 कोटी 35 लाख रूपयांची मदत

**नागपूर :** मिहान इंडिया लिमिटेडतर्फे सामाजिक बांधीलकी जपत विविध लोकहिताच्या उपक्रमांसाठी सीएसआर निधीचे वितरण करण्यात आले. मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांच्या हस्ते विविध संस्था आणि नागपूर महानगरपालिकेला एकूण १ कोटी ३५ लाख रुपयांचे धनादेश रामगिरी या मुख्यमंत्री निवासस्थानी प्रदान करण्यात आले. यामध्ये जीविका फाउंडेशनला सर्व्हायकल कॅन्सर लसीकरण अभियानासाठी २५ लाख रुपये देण्यात आले. नागपूर महानगरपालिकेला सांडपाणी व्यवस्थापनासाठी ३५ लाख रुपये, तर महिला सक्षमीकरण प्रकल्पासाठी ३५ लाख रुपये देण्यात आले आहेत. तसेच शहरातील हरित क्षेत्र वाढविण्याच्या उद्देशाने वृक्षारोपणासाठी १० लाख रुपयांचा निधी महापालिकेला देण्यात आला.याशिवाय वूमन्स एज्युकेशन सोसायटी, नागपूर येथील महाविद्यालयीन इमारत आणि सभागृहाच्या नूतनीकरणासाठी ३० लाख रुपयांचा सीएसआर निधी देण्यात आला. या निधीमुळे आरोग्य, पर्यावरण, महिला सक्षमीकरण, शिक्षण आणि नागरी सुविधांच्या विकासाला हातभार लागणार आहे. या वेळी नागपूरच्या महापौर नीता ठाकरे, स्थायी समिती अध्यक्ष शिवानी दाणी-वखरे, गटनेते नरेंद्र (बाल्या) बोरकर यांच्यासह मिहान इंडिया लिमिटेडचे अधिकारी आणि अन्य मान्यवर उपस्थित होते.

## अशोक सराफ यांनी मराठी सिनेमाला वेगळी ऊंची दिली-मुख्यमंत्री

### अभिनेते अशोक सराफ यांचा नागपूर येथे नागरी सत्कार



**नागपूर/प्रतिनिधी :** मराठी माणसाच्या जीवनातील संघर्ष, वास्तव, मर्यादा, दुःख आणि आनंद हे अशोक सराफ यांच्या कलाकृतींमध्ये दिसतात. सर्वसामान्यांच्या जीवनातील या भावभावनांना त्यांनी आपल्या अभिनयातून हास्याची आणि आनंदाची किनार दिली.मराठी सिनेमा ख-या अर्थाने लोकाभिमुख करून या सिनेमाला वेगळी उंची प्राप्त करून देण्याचे कार्य अभिनेते अशोक सराफ यांनी केले असल्याचे प्रतिपादन मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांनी केले. ज्येष्ठ चित्रपट अभिनेते महाराष्ट्र भूषण पद्मश्री अशोक सराफ यांच्या नागरी सत्कार सोहळ्यानिमित्त वसंतराव देशपांडे सभागृहात झालेल्या कार्यक्रमात मुख्यमंत्री फडणवीस बोलत होते.नागपूर महानगरपालिका, विदर्भ गौरव प्रतिष्ठान आणि श्री सिद्धीविनायक ट्रस्ट यांच्या संयुक्त विद्यमाने हा कायर्क्रम आयोजित करण्यात आला होता. महापौर नीता ठाकरे, विदर्भ गौरव प्रतिष्ठानचे अध्यक्ष डॉ. गिरीश गांधी, श्री सिद्धीविनायक सेवा ट्रस्टचे अध्यक्ष, माजी आमदार संदीप जोशी, उपमहापौर लीला हाथीबेड, स्थायी समिती अध्यक्ष शिवानी दाणी- वखरे, नागपूर मनपातील सत्ता पक्षनेते नरेंद्र बोरकर, मनपा आयुक्त डॉ. विपीन इटनकर यावेळी उपस्थित होते. मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस म्हणाले की,अशोक सराफ यांच्यासारखे कलाकार लाभणे ही मराठी रंगभूमी, चित्रपटसृष्टी आणि रसिकांसाठी अभिमानाची बाब आहे. त्यांच्या कलेचे कौतुक करण्यासाठी आणि त्यांच्या योगदानाचा गौरव करण्यासाठी नागरी सत्कार हा नागपूरकरांच्या वतीने कृतज्ञता व्यक्तकरण्याचा क्षण आहे.अशोक सराफ यांच्या कलाकृतींनी अनेक पिढ्यांना आनंद दिला आहे.अशोक सराफ यांनी आपल्या सर्वांना मराठी सिनेमाची गोडी लावली आहे. रसिकांच्या मनात त्यांनी निर्माण केलेल्या आनंदाचा हा सत्कार असल्याचे ते म्हणाले. आजच्या इतका भव्य सत्कार माझा आजवर झाला नाही, प्रेक्षक आहेत म्हणून आम्ही आहोत, अशी भावना सत्काराला उत्तर देताना अशोक सराफ यांनी व्यक्त केली. प्रारंभी अभिनेते पुष्कर श्रोत्री यांनी अशोक सराफ यांची प्रकट मुलाखत घेतली. मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांच्या हस्ते सन्मान चिन्ह आणि ५ लक्ष रुपयांचा धनादेश प्रदान करून अशोक सराफ यांचा सत्कार करण्यात आला. विदर्भ गौरव प्रतिष्ठानतर्फे गिरीश गांधी यांनी सन्मान चिन्ह आणि ५१ हजार रुपयांचा धनादेश देउन त्यांचा गौरव केला.

## शासकीय आश्रमशाळांमध्ये शिक्षकांच्या 2,421 पदांसाठी मेगाभरती

### ‘पवित्र’ पोर्टलवरून शंभर टक्के पदे भरली जाणार

**मुंबई/प्रतिनिधी :** महाराष्ट्र शासनाच्या आदिवासी विकास विभागांतर्गत कार्यरत असलेल्या शासकीय आश्रमशाळांमधील पेसा व न?न-पेसा क्षेत्रातील शिक्षकांच्या रिक्त पदांसाठी भरती प्रक्रिया राबविण्यात येत आहे. ‘पवित्र’ पोर्टलद्वारे वर्ग ३ संवर्गातील प्राथमिक, माध्यमिक आणि उच्च माध्यमिक शिक्षक (शिक्षण सेवक) अशी एकूण २,४२१ रिक्तपदे भरण्यात येणार आहे. या भरती प्रक्रियेमुळे राज्यातील हजारो पात्रधारक उमेदवारांना सुवर्णसंधी उपलब्ध झाली आहे.

आदिवासी विकास विभागाच्या नाशिक, ठाणे, अमरावती आणि नागपूर या चारही विभागांतील शासकीय आश्रमशाळांतील २,४२१ जागांसाठी शिक्षक भरती प्रक्रिया सुरु आहे. नाशिक विभागात सर्वाधिक ८२६ पदे असून, त्याखालोखाल ठाणे विभागात ६१३ पदे, नागपूर विभागात ५१४ पदे तर अमरावती विभागात ४६८ पदे भरली जाणार आहे. यामध्ये प्राथमिक शिक्षक (मराठी व इंग्रजी माध्यम), माध्यमिक शिक्षक (मराठी व इंग्रजी माध्यम) आणि उच्च माध्यमिक शिक्षक (शिक्षण सेवक) अशा विविध पदांचा समावेश आहे. शासकीय आश्रमशाळा शिक्षक भरतीमध्ये पेसा क्षेत्रातील ८८५ तर नान-पेसा क्षेत्रातील १,५३६ पदांचा समावेश आहे. प्राथमिक शिक्षक (मराठी माध्यम) नान-पेसा क्षेत्रामध्ये ८६२ जागा तर पेसा क्षेत्रामध्ये ४३६ जागा उपलब्ध आहेत. इंग्रजी माध्यमाच्या प्राथमिक शिक्षकांसाठी पेसा व न?न-पेसा क्षेत्रामध्ये अनुक्रमे ६७ आणि १६१ जागांवर भरती होईल. माध्यमिक शिक्षक (मराठी माध्यम) नान-पेसा क्षेत्रामध्ये ३५२ तर पेसा क्षेत्रात १३८ जागा उपलब्ध आहेत. माध्यमिक शिक्षक (इंग्रजी माध्यम) पेसा क्षेत्रात ५ आणि नान-पेसा क्षेत्रात २२ जागांवर भरती प्रक्रिया पार पडेल.उच्च माध्यमिक शिक्षकांच्या पेसा क्षेत्रामध्ये २५१ आणि नान-पेसा क्षेत्रामध्ये १०६ अशा एकूण ३५७ जागा उपलब्ध आहेत. यात मराठी, इंग्रजी, इतिहास, राज्यशास्त्र, भूगोल, अर्थशास्त्र, गणित, जीवशास्त्र, रसायनशास्त्र आणि भौतिकशास्त्र या उच्च माध्यमिक स्तरावरील विविध शाखांच्या विषयांचा समावेश आहे. आश्रमशाळा शिक्षक भरती प्रक्रियेत स्थानिक व आदिवासी क्षेत्रांना न्याय मिळवून देण्यासाठी पेसा आणि नान-पेसा क्षेत्रांचे स्पष्ट विभाजन करण्यात आले आहे. यानुसार संपूर्ण भरतीमध्ये पेसा क्षेत्रासाठी ८८५ तर नान-पेसा क्षेत्रासाठी १,५३६ जागा राखीव आहेत.

**विभागनिहाय उपलब्ध जागा**

- नाशिक- 826
- ठाणे- 613
- अमरावती- 468
- नागपूर- 514
- एकूण- 2421

## दहावी परीक्षेसाठी विद्यार्थ्यांना 31 ऑक्टोबरपर्यंत अर्ज भरण्याचे आवाहन

मुंबई, दि. २० : महाराष्ट्र राज्य माध्यमिक व उच्च माध्यमिक शिक्षण मंडळामार्फत फेब्रुवारी-मार्च २०२७ मध्ये होणा-या माध्यमिक शालान्त प्रमाणपत्र (इयत्ता दहावी) परीक्षेसाठी विद्यार्थ्यांचे ऑनलाइन अर्ज स्वीकारण्याची प्रक्रिया सुरू झाली आहे. नियमित विद्यार्थी, पुनर्परीक्षार्थी, नावनोंदणी प्रमाणपत्र प्राप्त झालेले खासगी विद्यार्थी, श्रेणीसुधार योजनेअंतर्गत तसेच आयटीआयच्या ट्रान्सफर ऑफ क्रेडिट योजनेतील विद्यार्थ्यांनी त्यांच्या शाळा प्रमुखांमार्फत ३१ ऑक्टोबरपर्यंत अर्ज सादर करावेत, असे आवाहन महाराष्ट्र राज्य माध्यमिक व उच्च माध्यमिक शिक्षण मंडळाने केले आहे. राज्य मंडळाने जाहीर केलेल्या वेळापत्रकानुसार नियमित शुल्कासह अर्ज भरण्याची मुदत ३१ ऑक्टोबर २०२६ अशी आहे. विलंब शुल्कासह अर्ज १ नोव्हेंबर ते १५ नोव्हेंबर २०२६ या कालावधीत स्वीकारले जातील. तर अतिविलंब शुल्कासह अर्ज १६ नोव्हेंबर ते ३० नोव्हेंबर २०२६ पर्यंत भरता येणार आहेत. माध्यमिक शाळांनी विद्यार्थ्यांकडून परीक्षा शुल्क संकलित करून ते निर्धारित पद्धतीने मंडळाकडे जमा करावे. शुल्क पावत्या व विद्यार्थ्यांची यादी विभागीय मंडळांकडे ७ डिसेंबर २०२६ पर्यंत सादर करावयाची आहे. मंडळाने सर्व माध्यमिक शाळांना अर्ज भरण्यापूर्वी विद्यार्थ्यांची माहिती अचूक असल्याची खात्री करण्याच्या सूचना दिल्या आहेत. अर्जातील नाव, जन्मतारीख व अन्य तपशील काळजीपूर्वक तपासून विद्यार्थी आणि पालकांच्या स्वाक्ष-या घेण्याचे निर्देश देण्यात आले आहेत. अर्जासोबत छायाचित्र अपलोड करताना निर्धारित निकषांचे पालन करण्याचेही मंडळाने स्पष्ट केले आहे. मुदतीनंतर अर्ज स्वीकारले जाणार नसल्याने सर्व संबंधित शाळा, विद्यार्थी आणि पालकांनी वेळेत प्रक्रिया पूर्ण करावी, असे आवाहन राज्य मंडळाचे सचिव डा. दिपक माळी यांनी केले आहे.

## तेलंगणामध्ये मुख्याध्यापिकेची 27 वेळा चाकूने भोसकून हत्या

### बाबू शब्दावरून पोलिसांनी प्रकरण सोडवले, 10 वीचे 2 विद्यार्थी ताब्यात

**नलगोंडा /वृत्तसंस्था :** तेलंगणातील नलगोंडा येथे पोलिसांनी ४८ वर्षीय शाळेच्या मुख्याध्यापिका कल्लू रूपा रेड्डी यांच्या हत्येचा छडा लावला आहे. पोलिसांनी हत्येच्या आरोपाखाली १०वीच्या दोन विद्यार्थ्यांना ताब्यात घेतले आहे.रूपा रेड्डी कोंडामल्लेपल्ली येथील नागार्जुन पब्लिक स्कूलच्या मुख्याध्यापिका आणि संचालिका होत्या. त्या १२ ऑगस्टच्या सकाळी त्यांच्या घरी मृतावस्थेत आढळल्या होत्या. त्यांच्या शरीरावर चाकूने केलेल्या २७ वारचे निशाण होते.तपासात पोलिसांना रूपा रेड्डी यांच्या त्यांच्या मावशीसोबत फोनवर झालेल्या संभाषणातून पुरावा मिळाला. फोन बंद होण्यापूर्वी संभाषणादरम्यान त्यांनी ’बाबू’ या शब्दाचा वापर केला होता. यानंतर पोलिसांनी शाळेतील विद्यार्थ्यांवर संशय घेत तपास पुढे नेला.

**शेजा-यांनी पोलिसांना माहिती दिली होती-** रेड्डीचे पती हैदराबादमध्ये होते. त्यांनी तिला फोन केला, पण कोणताही प्रतिसाद न मिळाल्याने त्यांनी शेजा-यांना याची माहिती दिली. यानंतर शेजा-यांनी पोलिसांना माहिती दिली आणि पोलिसांनी घटनास्थळी पोहोचून मृतदेह ताब्यात घेतला.यानंतर पोलिसांनी ५ पथके तयार केली. तपासादरम्यान सीसीटीव्ही फुटेज, फारेन्सिक पुरावे, फिंगरप्रिंट्स, तांत्रिक डेटा आणि संशयितांच्या हालचालींची तपासणी करण्यात आली. पोलिसांनी ८० हून अधिक लोकांची चौकशीही केली.

**तपासात दहावीचे ५ विद्यार्थी शाळेतून बेपत्ता होते-** पोलिस अधिकारी शरथ चंद्र पवार यांनी बुधवारी पत्रकारांना सांगितले की, संभाषणादरम्यान रेकार्ड




झालेला शेवटचा शब्द ’बाबू’ होता. रूपा रेड्डी कोणाला हे शब्द बोलत होत्या, याचा शोध घेण्याचा पोलिसांनी प्रयत्न केला. याच पुराव्यामुळे तपास शाळेतील विद्यार्थ्यांपर्यंत पोहोचला.यानंतर पोलिसांनी विद्यार्थ्यांची स्वतंत्रपणे चौकशी केली. तपासात १०वी इयत्तेतील ५ असे विद्यार्थी आढळले, जे शाळेतून गैरहजर होते. यापैकी २ विद्यार्थी गेल्या काही दिवसांपासून खूप पैसे खर्च करून पार्ट्या करत होते.पोलिसांनी बुधवारी सकाळी दोन्ही विद्यार्थ्यांना ताब्यात घेतले. पोलिसांच्या माहितीनुसार, चौकशीदरम्यान दोघांनी रेड्डीच्या हत्येची कबुली दिली आणि सांगितले की त्यांनी योजना आखून या घटनेला अंजाम दिला होता.

**५ दिवस चोरीचा कट रचला, घराची रेकी केली-** आरोपींनी चोरीचा कट ५ दिवसांपूर्वी रचला होता. त्यांनी रेड्डीच्या घराची रेकी केली आणि ओळख लपवण्यासाठी चाकू व हातमोजे विकत घेतले. त्यामुळे सुरुवातीला पोलिसांना फारसे पुरावे मिळाले नाहीत. हत्येच्या दिवशी, दोन विद्यार्थ्यांपैकी एक मंकी कॅप आणि हातमोजे घालून घरात घुसला. त्याने बेडरूममध्ये ठेवलेले २.५० लाख रुपये पाहिले आणि ते घेउन पळून जाउ लागला. याच दरम्यान त्याची मंकी कॅप डोक्यावरून सरकली आणि रेड्डीने त्याला ओळखले. पोलिसांनुसार, ओळख उघड होईल या भीतीने आरोपीने चाकूने रेड्डीवर २७ वेळा वार केले.

**रक्ताने माखलेले कपडे आणि मंकी कॅप जमिनीत पुरले-** हत्येनंतर आरोपी घरातून पैसे घेउन पसार झाले. पुरावे नष्ट करण्यासाठी त्यांनी रक्ताने माखलेले कपडे आणि मंकी कॅप जमिनीत पुरण्याचा प्रयत्न केला. पोलिसांनुसार, त्यानंतर दोघे गोव्यालाही गेले होते. तपासादरम्यान आरोपींकडून १.५४ लाख रुपये, एक आयफोन आणि रेड्डीचा मोबाईल फोन जप्त करण्यात आला. पोलिसांना असेही आढळून आले की, दोघांनी गुन्हा करण्यापूर्वी लवकर पैसे कमवण्याचे मार्ग एका व्हिडिओ-शेअरिंग प्लॅटफार्मवर शोधले होते. दोन्ही आरोपी अल्पवयीन आहेत आणि प्रकरणाचा तपास सुरू आहे.

## भारत बनवतोय लढाउ विमानांसाठी युनिव्हर्सल ‘एअर बॉम्ब’

**नागपूर :** जगातील अनेक देशांमध्ये सध्या युद्धाची परिस्थिती आहे. अशातच भारतानेही संरक्षण क्षेत्रात आत्मनिर्भरतेच्या दिशेने वाटचाल सुरू केली आहे. यासाठी अनेक भारतीय संस्था काम करत आहेत. अशातच भारतामध्ये मोठ्या प्रमाणावर संरक्षण क्षेत्रासाठी क्षेपणास्त्र तयार करण्याचे काम सोलर ग्रुप ऑफ इंडस्ट्रीजला देण्यात आले आहे. सोलर ग्रुप ऑफ इंडस्ट्रीजचे अध्यक्ष सत्यनारायणजी नुवाल यांचा नुकताच पद्मश्री पुरस्काराबद्दल सत्कार करण्यात आला. आयआयएममधील कार्यक्रमात त्यांनी लढाउ विमानांसाठी युनिव्हर्सल एअर बाम्बच्या निर्मितीचे काम सुरू असल्याची माहिती दिली. हा बाम्ब कसा असेल पाहूया. सोलर ग्रुप ऑफ इंडस्ट्रीजचे अध्यक्ष सत्यनारायणजी नुवाल यांनी बुधवारी भारतीय व्यवस्थापन संस्था (आयआयएम) नागपूरच्या विद्यार्थ्यांशी संवाद साधताना केले. व्यापार आणि उद्योग क्षेत्रातील योगदानासाठी पद्मश्री प्रदान झाल्याबद्दल आयआयएम नागपूरच्या वतीने नुवाल यांचा विशेष सत्कार करण्यात आला. भारताच्या संरक्षण क्षेत्रातील आत्मनिर्भरतेच्या दिशेने सुरू असलेल्या वाटचालीचाही त्यांनी उल्लेख केला. सोलर ग्रुपच्या संरक्षणविषयक कामाबाबत माहिती देताना त्यांनी सांगितले की, कंपनीची काउंटर-ड्रोन प्रणाली आणि मायक्रोमॅक्स क्षेपणास्त्र ऑक्टोबरपर्यंत तयार होण्याची अपेक्षा आहे. तसेच विविध देशांमध्ये निर्मित लढाउ विमानांमध्ये वापरता येईल अशा युनिव्हर्सल एअर बाम्बच्या निर्मितीचे काम सुरू असल्याचे त्यांनी सांगितले.



**एअर चीफ मार्शल यांनी केली होती पाहणी-** निवृत्त हवाई दल प्रमुख (सीएएस) एअर चीफ मार्शल व्ही. आर. चौधरी यांनी २०२३ मध्ये सोलर ग्रुपची उपकंपनी असलेल्या इकानामिक एक्सप्लोझिव्हज लिमिटेड (ईईएल) ला भेट देउन कंपनीच्या नवीनतम उत्पादन विकासाचा आढावा घेतला होता. नागपूरस्थित सोलर ग्रुप, भारतीय हवाई दलासाठी (आयएएफ) स्वदेशी आणि सार्वत्रिक १२५ किलो वजनाचा एअर बाम्ब, तसेच चॅफस आणि फलेअर्सच्या निर्मितीमध्ये गुंतलेली आहे. या दौ-यादरम्यान, हवाई दल प्रमुखांनी दारुगोळा आणि स्फोटके तयार करण्यासाठी समर्पित असलेल्या विविध प्रयोगशाळा, एकात्मिक संयंत्रे आणि उत्पादन सुविधांना भेट दिली, ज्यामध्ये चॅफ सुविधा आणि राकेट असेंब्ली बे यांचा समावेश होता. या दौ-यात पिनाका राकेट्सच्या मिश्रण आणि ओतकाम प्रक्रियेचे प्रात्यक्षिकही दाखवण्यात आले. युनिव्हर्सल बाम्ब हा भारतीय हवाई दलाच्या (IAF) नाटो आणि रशियन दोन्ही प्रकारच्या विमानांशी सुसंगत आहे. हे ब?म्ब फ्रेंच मिराज २००० किंवा संभाव्यतः सुखोई-३० विमानावर अनुकूलन आणि खड्ड्यातून टाकण्याच्या चाचण्यांसाठी बसवण्याकरिता तयार करण्यात आले आहेत. पुढील वर्षाच्या सुरुवातीला वापरकर्त्यांच्या चाचण्यांसाठी नियोजित असलेले, कंपनीने उत्पादित केलेले हे बाम्ब भारतीय हवाई दलाची (IAF) २,००० युनिट्सची गरज पूर्ण करण्याच्या उद्देशाने बनवले आहेत, ज्यासाठी सोलर ग्रुप बोली लावण्याची योजना आखत आहे. खाजगी क्षेत्राने बनवलेला हा पहिलाच हवाई बाम्ब असल्याचा दावा तर केला जातोच, पण क्ष्डक्ष् ने विकसित केलेल्या स्व-रचनेमुळे याचे आणखी एक वैशिष्ट्य आहे.

## महाराष्ट्राच्या पशुवैभवाचा राष्ट्रीयस्तरावर दुहेरी सन्मान

**मुंबई, दि. २०:** महाराष्ट्रातील प्रसिद्ध असलेल्या उमरडा या गाईला स्वतंत्र देशी गोवंश म्हणून, तर ’माडग्याळ’ प्रजातीच्या मेंढीला राष्ट्रीय स्तरावर स्वतंत्र व अधिकृत प्रजाती (ब्रीड) म्हणून मान्यता मिळाली आहे. यामुळे राज्यातील उमरडा या स्थानिक गोवंशाचे व माडग्याळ या मेंढी प्रजातीचे संवर्धन, जतन व आनुवंशिक सुधारणा कार्यक्रमांना मोठी चालना मिळणार आहे. महाराष्ट्र शासनाच्या पशुसंवर्धन विभागाने राष्ट्रीय पशु आनुवंशिक संसाधन ब्यूरो, करनाल (हरियाणा) या संस्थेला पाठवलेल्या प्रस्तावाच्या अनुषंगाने ही नोंदणी प्रक्रिया पूर्ण झाली आहे. भारतीय कृषी संशोधन परिषदेच्या (आयसीएआर) राष्ट्रीय पशु आनुवंशिक संसाधन ब्यूरो, करनाल (हरियाणा) चे संचालक डा. एन.एच. मोहन यांनी याबाबतचे अधिकृत पत्र जारी केले आहे. ७ ऑगस्ट २०२६ रोजी पार पडलेल्या ’आयसीएआर ब्रीड रजिस्ट्रेशन कमिटी’च्या १४ व्या बैठकीत या निर्णयावर शिक्कामोर्तब करण्यात आले. पशुसंवर्धन विभागाचे सचिव डा. रामास्वामी एन. यांच्या मार्गदर्शनाखाली या प्रस्तावाचा पाठपुरावा आणि संशोधनात पुण्यातील ’पुण्यश्लोक अहिल्यादेवी महाराष्ट्र शेळी व मेंढी विकास महामंडळ’, महाराष्ट्र पशुधन विकास मंडळ, नागपूर तसेच कर्नाटक येथील कृषी व पशुवैद्यकीय विद्यापीठातील तज्ज्ञांनी महत्त्वपूर्ण योगदान दिले असल्याचे मंडळाचे मुख्य कार्यकारी अधिकारी तथा अतिरिक्त आयुक्त पशुसंवर्धन ड?. शितलकुमार मुकणे यांनी सांगितले. महाराष्ट्राच्या मातीत विकसित झालेल्या उमरडा गाईला स्वतंत्र देशी गोवंश म्हणून आणि माडग्याळ मेंढीला स्वतंत्र अधिकृत प्रजाती म्हणून मिळालेली राष्ट्रीय मान्यता ही राज्यातील पशुपालकांसाठी अभिमानाची बाब आहे. या मान्यतेमुळे आपल्या पारंपरिक पशुधनाच्या संवर्धनाला संस्थात्मक आणि शास्त्रीय बळ मिळणार असून, भविष्यात पशुपालकांचे उत्पन्न वाढविण्यासाठीही त्याचा उपयोग होईल. राज्यातील स्थानिक गोवंश व मेंढी प्रजातींचे जतन करतानाच त्यांची उत्पादकता आणि आनुवंशिक गुणवत्ता सुधारण्यासाठी शासन आवश्यक त्या सर्व उपाययोजना करेल.



लोकभवन येथे राज्यपालांकडून सद्भावना प्रतिज्ञा
दिवंगत पंतप्रधान राजीव गांधी यांना अभिवादन

## अंबाझरी तलावाची मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांनी केली पाहणी

**नागपूर/प्रतिनिधी :** नागपूरचे वैभव म्हणून अंबाझरी तलावाकडे पाहिले जाते. पाण्याची व्यवस्था नव्हती तेव्हा नागनदीवरील धरण किंवा साठवण तलाव म्हणून याकडे पाहिले जायचे. अनेक वर्ष या तलावाने पिण्याचे पाणी नागपूर शहराला दिले. मध्यंतरी जलपर्णीने हा तलाव व्यापला होता. मात्र, महानगरपालिकेने जलपर्णी नामशेष करण्यासाठी प्रयत्न केले व ते अत्यंत यशस्वी झाले आहेत. एक उत्तम पर्यटनस्थळ म्हणून हा तलाव विकसित करण्यासाठी राज्य शासन महानगरपालिकेला संपूर्ण सहकार्य करणार असल्याचे मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांनी सांगितले. नागपूरची ओळख असलेल्या ऐतिहासिक अंबाझरी तलावाचे सौंदर्य आणि पर्यावरणीय महत्व जपण्यासाठी नागपूर महानगरपालिकेने राबविलेल्या जलपर्णी निर्मूलन मोहिमेची मुख्यमंत्री फडणवीस यांनी पाहणी केली. तलाव जलपर्णीमुक्त करण्यासाठी मनपाने केलेल्या प्रयत्नांचे कौतुक करत मुख्यमंत्र्यांनी नौकेतून अंबाझरी तलावाची पाहणी केली. यावेळी महापौर नीता ठाकरे, उपमहापौर लिला हाथीबेड, स्थायी समिती सभापती शिवानी दाणी-वखरे, सत्ता पक्षनेते नरेंद्र (बाल्या) बोरकर, मनपा आयुक्त डॉ. विपीन इटनकर, माजी महापौर दयाशंकर तिवारी, विविध समित्यांची सभापती, नगरसेवक नगरसेविका यांच्यासह मनपाचे वरिष्ठ अधिकारी उपस्थित होते. गेल्या काही महिन्यांपासून अंबाझरी तलावात मोठ्या प्रमाणात पसरलेल्या जलपर्णीच्या निर्मूलनासाठी मनपातर्फे विशेष मोहीम राबविण्यात येत आहे. जलपर्णीमुळे तलावाचा मोठा परिसर व्यापला गेला होता. त्यामुळे तलावाचे नैसर्गिक सौंदर्य बाधित होण्यासोबतच जलतरणपटू आणि नौकायनाचा सराव करणा-या विद्यार्थ्यांनाही अडचणींचा सामना करावा लागत होता. अंबाझरी तलावाला जलपर्णीच्या विळख्यातून मुक्त करण्यासाठी महानगरपालिकेतर्फे विशेष मोहीम हाती घेण्यात आली.



# संपादकीय

**प्रबंध संपादक : प्रदीप देशपांडे**

## आश्रमशाळा की, 'काळशाळा'

**म**हाराष्ट्रासारख्या पुरोगामी आणि प्रगत राज्यात आदिवासी आश्रमशाळांमधील ५८४ चिमुकल्यांचा गेल्या दोन वर्षांत झालेला मृत्यू ही केवळ एक आकडेवारी नसून आपल्या संपूर्ण प्रशासकीय व्यवस्थेच्या तोंडावर मारलेली जोरदार चपराक आहे. दरवर्षी कोट्यवधी रुपयांची उधळपट्टी करूनही जर आदिवासी कुटुंबांतील बालकांना सुरक्षित आणि निरोगी आयुष्य देता येत नसेल, तर या व्यवस्थेला 'कल्याणकारी' म्हणावे का, हा गंभीर प्रश्न निर्माण होतो. नुकत्याच गडचिरोली जिल्ह्यातील जपतलाई आश्रमशाळेत तीन मुलींचा सर्पदंशाने मृत्यू झाला आणि प्रशासनाला पुन्हा एकदा जाग आली. आता नेहमीप्रमाणे चौकशीच्या समित्या स्थापन होतील, अहवाल मागवले जातील आणि काही दिवसांनी हे प्रकरण कागदी घोड्यांच्या गर्दीत गडप होईल. परंतु, ५८४ कोवळ्या कळ्यांचा अंत होणे ही काही साधी गोष्ट नाही. ज्या आश्रमशाळांना आदिवासी पालकांनी विश्वासाने आपल्या मुलांचे भविष्य घडवण्याचे साधन मानले, त्या शाळाच आज मुलांसाठी 'काळशाळा' ठरत आहेत का, अशी भीती निर्माण झाली आहे. राज्यातील १,०५६ आदिवासी आश्रमशाळांमध्ये सुमारे ४.६६ लाख मुले शिक्षण घेत आहेत. या विद्यार्थ्यांच्या निवास, भोजन, आरोग्य आणि शिक्षणावर राज्य सरकार दरवर्षी तब्बल ४,३०० कोटी रुपयांहून अधिक खर्च करते. ५०० सरकारी आश्रमशाळांवर २,३०३ कोटी रुपये, तर ५५६ अनुदानित आश्रमशाळांवर २,०२५ कोटी रुपये दरवर्षी खर्च केले जातात. प्रति विद्यार्थी हिशोब केला, तर हा खर्च लाखांच्या घरात जातो. तरीही मुलांचा मृत्यू होतोच कसा? एकूण ५८४ मृत्यूपैकी ६६ मृत्यू हे थेट आश्रमशाळांच्या परिसरात झाले आहेत, तर उर्वरित ५१८ (सुमारे ८८ टक्के) मृत्यू घरी झाले आहेत. प्रशासनाकडून अनेकदा 'मुले आजारी असताना घरी गेली आणि तिथे दगावली' असा सोयीस्कर युक्तिवाद केला जातो; परंतु मुले आश्रमशाळेत असतानाच आजारी पडतात आणि त्यांची प्रकृती चिंताजनक झाल्यानंतरच त्यांना पालकांच्या स्वाधीन केले जाते, हे उघड सत्य आहे. वेळेवर वैद्यकीय उपचार न मिळणे, आश्रमशाळांमधील अपुरे आणि निकृष्ट दर्जाचे पोषण, अस्वच्छता आणि प्राथमिक आरोग्य केंद्र दूर असणे ही या मृत्यूमागची खरी कारणे आहेत. आश्रमशाळांमधील मृत्यूंमध्ये ५ टक्के घटना या सर्पदंशामुळे घडल्या आहेत. ही आकडेवारी जितकी भयानक आहे तितकीच लाजीरवाणीही आहे. बहुतांश आश्रमशाळा दुर्गम आणि जंगलाच्या भागात आहेत. तिथे संरक्षक भिंती नाहीत, रात्रीच्या वेळी पुरेशी वीज नसते आणि विषारी प्राण्यांचा वावर असतो. साप चावल्यानंतर आवश्यक असणारी 'अँटी-स्नेक व्हेनम' (प्रती विष) औषधे किंवा प्रथमोपचाराची साधने अनेक शाळांमध्ये उपलब्ध नसतात. अनेक ठिकाणी वसतिगृहांमध्ये स्वच्छ पाण्याचा अभाव, उघड्यावर टाकलेला कचरा आणि निकृष्ट अन्न यांमुळे मुले कुपोषित आणि आजारी होतात. दहा वर्षांपूर्वी एका सुरक्षा समितीने आश्रमशाळांमधील सुरक्षा, आरोग्य आणि निवास व्यवस्थेबाबत अनेक महत्त्वाच्या शिफारसी केल्या होत्या; परंतु त्या शिफारसी केवळ धूळखात पडून राहिल्या. प्रशासनाच्या या बेफिकिरीची किंमत निष्पाप बालकांना आपल्या प्राणाने मोजावी लागत आहे. आता या दुर्घटनेनंतर आदिवासी विकास विभाग ओडिशा राज्याच्या 'कलिंग मॉडेल'च्या धर्तीवर आश्रमशाळांचा 'क्लस्टर विकास' करण्याच्या विचारात आहे. ओडिशाचे हे मॉडेल आदिवासी मुलांना सीबीएसई अभ्यासक्रमासह मोफत निवासी शिक्षण, चांगल्या आरोग्य सुविधा आणि पोषण पुरवते. कागदावर हे मॉडेल निश्चितच कौतुकास्पद आहे; परंतु प्रश्न मॉडेलचा नसून 'इच्छाशक्तीचा' आहे. महाराष्ट्राकडे निधीची अजिबात कमतरता नाही. ४,३०० कोटी रुपयांचा भव्य निधी असताना नवीन मॉडेल आणण्याची गरज का पडते? उपलब्ध निधीचा गैरवापर, कंत्राटदारांची साखळी आणि भ्रष्ट अधिकारी यांच्यावर जर वचक बसवला नाही, तर कोणतेही नवीन मॉडेल अपयशीच ठरेल. आदिवासी समाज हा आजही मुख्य प्रवाहापासून वंचित आहे. त्यांच्या मुलांच्या शिक्षणाचा आणि आरोग्याचा हक्क हिरावून घेणे म्हणजे त्यांच्या भविष्याचा खून करण्यासारखे आहे. केवळ कागदी सूचना देऊन किंवा सचिव स्तरावरून निर्देश जारी करून हा प्रश्न सुटणारा नाही. प्रत्येक आश्रमशाळेत आठवड्यातून किमान दोनदा वैद्यकीय अधिकाऱ्यांची भेट अनिवार्य केली पाहिजे. दुर्गम भागातील प्रत्येक आश्रमशाळेत प्रथमोपचार, सर्पदंशावरील औषधे आणि रुग्णवाहिका उपलब्ध असायला हवी. आश्रमशाळांना दिला जाणारा ४,३०० कोटींचा निधी कुठे आणि कसा खर्च होतो, याचे त्रयस्थ संस्थेकडून सामाजिक आणि आर्थिक ऑडिट झाले पाहिजे. विद्यार्थ्यांच्या मृत्यूसाठी जबाबदार असणाऱ्या संस्थाचालक, अधीक्षक आणि अधिकाऱ्यांवर थेट सदोष मनुष्यवधाचे गुन्हे दाखल झाले पाहिजेत. आदिवासी बालकांचेही जीवन मोलाचे आहे. ते केवळ आकडेवारीतील 'संख्या' नाहीत. सरकारने आता तरी झोपेतून जागे व्हावे आणि आश्रमशाळांना मृत्यूच्या विळख्यातून बाहेर काढून खऱ्या अर्थाने 'विद्यामंदिर' बनवावे, हीच काळाची गरज आहे.

## कृषी निर्यातीचे फसलेले रसायन

**एकीकडे देशाच्या कृषी उत्पादनात आणि दर्जामध्ये सतत वाढ होत आहे, तर दुसरीकडे परदेशांत आपल्या कृषी उत्पादनांमध्ये रसायनांच्या उर्वरित अंशाचे प्रमाण जास्त असल्याचे कारण देऊन विविध शेतीमाल आणि प्रक्रियायुक्त अन्न पदार्थांना बंदी घातली जात असल्याचे चित्र आहे.**

**ए**कीकडे देशाच्या कृषी उत्पादनात आणि दर्जामध्ये सतत वाढ होत आहे, तर दुसरीकडे परदेशांत आपल्या कृषी उत्पादनांमध्ये रसायनांच्या उर्वरित अंशाचे प्रमाण जास्त असल्याचे कारण देऊन विविध शेतीमाल आणि प्रक्रियायुक्त अन्न पदार्थांना बंदी घातली जात असल्याचे चित्र आहे. जागतिक बाजारपेठ व्यापण्याची क्षमता असूनही केवळ ठोस धोरण, धोरण सातत्याचा अभाव आणि प्रभावी व्यापारी आंतरराष्ट्रीय धोरणाच्या अभावामुळे भारतीय शेतीमालाला अद्यापपर्यंत जागतिक बाजारपेठेत अपेक्षित स्थान मिळालेले नाही. परिणामी भारतीय कृषी आणि प्रक्रियायुक्त अन्न पदार्थांची जागतिक बाजारपेठ आखाती देशांपर्यंतच मर्यादित राहिली आहे. उलट कृषी निर्यातीतील विघ्ने दिवसेंदिवस वाढतच आहे.

एप्रिल २०२४ मध्ये हाँगकाँग आणि सिंगापूरच्या अन्न सुरक्षा यंत्रणांनी देशातील प्रमुख कंपन्यांच्या मसाल्यांच्या नमुन्यांमध्ये 'इथिलीन ऑक्साईड' हे हानिकारक रसायन आढळल्याचे सांगून भारतीय कंपन्यांच्या तयार मसाल्यांची आयात थांबविली, पाठोपाठ अमेरिका आणि युरोपियन युनियननेही या मसाल्यांच्या तपासणीची व्याप्ती वाढवली. त्यामुळे गत दोन वर्षांपासून मसाल्यांच्या निर्यातीला फटका बसत आहे. भारतातील आंबा प्रक्रिया केंद्रांमधील कीड नियंत्रण आणि निर्जंतुकीकरण प्रक्रियेत त्रुटी आढळल्याचे सांगून जपानने यंदाच्या हंगामात हापूस, केशरसह सर्व भारतीय आंब्यांच्या आयातीवर बंदी घातली आहे. ही घटना ताजी असतानाच चीनने भारतीय व्यापाऱ्यांनी पाठवलेला तांदूळ जनुकीय सुधारित (जीएम) असल्याचे सांगत तांदूळ निर्यात परवाना रद्द केला. या घटना वरवर पाहता किरकोळ, कमी महत्त्वाच्या वाटतात. पण, त्यांचे परिणाम दीर्घकाळ जाणवतात. किंबहुना भारतीय शेतीमालाचे जागतिक बाजारपेठेत अवमूल्यन करण्यासाठी, कृषी निर्यातीला खीळ घालण्यासाठी उचललेली पावले आहेत. दुर्दैवाने केंद्र सरकारकडून अशा घटनांबाबत ठोस भूमिका घेतली जात नाही. त्यामुळे वर्षानुवर्षे सुरू असलेली निर्यात ठप्प होते. व्यापारी साखळी खंडित झाल्यामुळे शेतकरी आणि पर्यायाने व्यापारी आणि सरते शेवटी देशाचे नुकसान होते.

२०१४-१५ मध्ये देशाच्या कषी निर्यातीचे मूल्य सुमारे ३२.०९ अब्ज डॉलर्स होते, ते २०२५-२६ मध्ये ५२.५५ अब्ज डॉलर्सवर गेले आहे, अशी आकडेवारी जाहीर करून केंद्र सरकारने स्वत:ची पाठ थोपटून घेतली आहे. पण, आखाती युद्ध सुरू झाल्यापासून कृषी निर्यातीमध्ये मोठे अडथळे आले आहेत. निर्यातीसाठी वातानुकूलित कंटेनर मिळत नाहीत. परदेशातील बंदरांमध्ये गेलेल्या जहाजांवरून कंटेनर उतरवून घेण्यासाठी आठवडाभर वाट पहावी लागते आहे. होर्मुजची सामुद्रध्वनी बंद असल्यामुळे आफ्रिकेला वळसा घालून निर्यात करावी लागत असल्यामुळे वाहतूक खर्चात आणि वेळेत प्रचंड वाढ झाली आहे. निर्यात कालावधी १५ दिवसांपासून वरून ३० ते ४५ दिवसांवर गेला आहे. या अडचणींवर मार्ग काढण्यात केंद्र सरकारला अपयश आले आहे.

निर्यात धोरणात सातत्य हा एक महत्त्वाचा मुद्दा आहे. आपली १४० कोटींहून जास्त लोकांची भूक भागविण्याला प्राधान्य दिलेच पाहिजे. पण, ते करूनही निर्यात धोरणात सातत्य ठेवण्याची गरज असतानाही हंगामनिहाय धोरणात बदल केला जातो. त्यामुळे जागतिक बाजारपेठेत भारताला बेभरवशाचा निर्यातदार संबोधले जाते. याचे अत्यंत ताजे उदाहरण म्हणजे पंतप्रधान मोदींनी भारत जगाला गव्हाचा पुरवठा करून शकतो, जगाची भूक भागवू शकतो, असे मोठ्या अभिमानाने सांगितल्यानंतर काही महिन्यांतच गहू आणि गव्हाच्या विविध उत्पादनांच्या निर्यातीवर बंदी घालण्यात आली. साखर निर्यात अशीच बेभरवशाची झाली आहे. त्यामुळे जागतिक व्यापारी किंवा देश भारतावर विश्वास ठेवत नाहीत, ते पर्यायी मार्गाचा वापर करतात, त्यामुळे भारताची आणि भारतीय व्यापाऱ्यांची पत आतंरराष्ट्रीय बाजारात पुरती ढासळलेली आहे.

भारत आज तांदूळ, गहू, मका, तृणधान्ये, द्राक्ष, डाळिंब, केळी, आंबा आदी कृषी उत्पादनांमध्ये जगात अग्रेसर आहे. पण, या कृषीमालाचा दर्जा काय, असा प्रश्न उपस्थित केल्यावर मान खालीच घालावी लागते. देशात उत्पादित होणाऱ्या सर्व प्रकारच्या शेती उत्पादनांमध्ये रसायनांचे अंश सापडतात. ते केवळ रसायनांचे अंश नसतात. तर मानवी आरोग्याला अपायकारक असलेल्या, कर्करोगासारख्या आजाराला निमंत्रण देणाऱ्या रसायनांचे अंश असतात. शेतकरी वर्षानुवर्षे पिकांवर या घातक रसायनांची फवारणी करत आला आहे. अशा शेतीमालाचा देशातील जनतेने अन्न म्हणून का वापर करावा, असाही प्रश्न या निमित्ताने उपस्थित होतो. रसायनांच्या आरोग्याला अपाय होणार नाही अशा किंवा कमी वापराबाबत ना सरकार, ना कृषी विद्यापीठे, ना भारतीय कृषी संशोधन परिषदेने शेतकऱ्यांना योग्य आणि पुरेसे मार्गदर्शन केले आहे.

आज भारतीय द्राक्षांनी अमेरिका, युरोपची बाजारपेठ काबीज केली आहे. द्राक्षे हे अत्यंत नाजूक फळ असूनही कोणत्या देशात, कोणते आयात नियम आहेत, याचा अभ्यास करून, स्व-प्रयोगातून निर्यातक्षम द्राक्ष उत्पादन करण्यात प्रामुख्याने महाराष्ट्रातील शेतकऱ्यांनी यश मिळविले आहे. त्यांना कोणाकडूनही कसलेही मार्गदर्शन मिळालेले नाही. केवळ प्रयोग आणि अनुभवातून त्यांनी हे कौशल्य आत्मसात केले आहे. पण, राज्यातच उत्पादित होणाऱ्या डाळिंब, केळी, संत्रा, मोसंबी, चिकू, पेरू उत्पादक शेतकऱ्यांना हे कौशल्य आत्मसात करता आलेले नाही. हवामान बदलामुळे रसायनांच्या फवारण्यांची गरज आणि प्रमाण वाढले आहे. पण, त्यातही सर्वसामान्य उपाययोजना म्हणून काय करावे आणि काय करू नये, या बाबत मार्गदर्शन होत नाही.

परिणामी भारतीय केळी, डाळिंब फक्त शेजारील देशांसह आखाती देशांना निर्यात होते. प्रामुख्याने केळी निर्यातदारांनी आखातापलीकडे अद्याप पाहिलेलेच नाही आणि




डाळिंब निर्यातदारांनी बांगलादेशाच्या पलीकडे. भारतातून होणाऱ्या डाळिंबाच्या निर्यातीपैकी तब्बल ८० टक्के निर्यात बांगलादेशाला होते, यात कसला पराक्रम? अमेरिका, युरोपात भारतीय डाळिंबाला मागणी असूनही रसायनांचा उर्वरीत अंश आणि उत्पादन आणि निर्यात खर्च परवडत नाही म्हणून डाळिंबाची निर्यात बंद आहे, तरीही सरकारी पातळीवरून कोणतीही उपाययोजना होत नाही, ही आपल्या कृषी निर्यातीची अवस्था.

बासमती आणि बिगर बासमती तांदूळ निर्यातीत आजवर भारत अव्वल आहे. शरद पवार केंद्रीय कृषिमंत्री म्हणून कार्यरत असताना बिगर बासमती तांदळाच्या निर्यातीला वेग आला. बासमतीसह बिगर बासमती तांदूळ उत्पादकांना चांगले पैसे मिळू लागले. मोगरा, इंद्रायणी, आंबेमोहर यासारखा बिगर बासमती तांदूळ अमेरिकेपर्यंत पोहोचला. जागतिक बाजारपेठेत भारतीय तांदळाला मोठी मागणी असतानाच्या काळात आता चीनने नवा खोडा घातला आहे. देशात जनुकीय सुधारित म्हणजेच जीएम कापूस वगळता अन्य कोणत्याही शेतीमालाचे उत्पादन होत नाही, तरीही चीनने जीएम तांदूळ निर्यात केला म्हणून भारतीय व्यापाऱ्यांचे परवाने रद्द करण्याचा खोडसाळपणा केला आहे. भारतीय तांदळाला बदनाम करण्याचे हे व्यापारी कारस्थान आहे. पण, चीनच्या या कृतीला केंद्र सरकारने काय उत्तर दिले, हा प्रश्न अनुत्तरितच आहे.

२०२५ मध्ये जागतिक पातळीवर एकूण तांदूळ उत्पादन सुमारे ५४.५५ कोटी टनांवर पोहोचले आहे. भारत चीनला मागे टाकून जगातील सर्वात मोठा तांदूळ उत्पादक देश बनला आहे. जगातील एकूण तांदूळ उत्पादनापैकी ८५ टक्क्यांहून अधिक उत्पादन आशियाई देशांमध्ये होते. २०२५ मध्ये भारतात १५.४ कोटी टन तर चीनमध्ये १४.६ कोटी टन उत्पादन झाले आहे. भारतातून चीनला अगदी अल्प प्रमाणात तांदूळ जातो. तरीही चीनने त्यांच्या तांदळाची जागतिक बाजारपेठ सुरक्षित ठेवण्यासाठी ही कुरघोडी केली आहे.

जपानने आंबा आयातीवर बंदी घातली तरीही राज्यातून यंदा एक हजार टनांनी आंबा निर्यात वाढली आहे. देशाचा विचार करता गतवर्षी सुमारे पाच कोटी ६५ लाख डॉलर्स मूल्याची आंबा निर्यात झाली होती, यंदा उत्पादनात घट झाल्यामुळे सुमारे पाच कोटी ३० लाख डॉलर्स मूल्याची आंबा निर्यात झाली आहे. तांदूळ आणि मसाल्यांच्या पदार्थांच्या निर्यातीत सतत वाढच होत आहे.

प्रामुख्याने राज्यात फळपीकच्या लागवडीखालील क्षेत्रात वाढ झाली आहे. सिंचन सुविधांमुळे माळराने हिरवीगार झाली आहेत. कधीकाळी बारमाही दुष्काळी भाग असलेल्या सांगोल, कवठेमहांकाळ, जत, आटपाडी भागात डाळिंबाच्या, पेरूच्या बागा बहरल्या आहेत. त्यासाठी कृषी विभागाने फार काही कष्ट केले आहेत, असे नाही. शेतकऱ्यांनी स्वत:च्या हिमतीवर हे केले आहे. अशा शेतकऱ्यांना हंगामात मागणी नसल्यामुळे सीताफळ, पेरू, डाळिंब बांधांवर फेकून द्यावे लागतात. कांद्याची रडकथा वर्षांनुवर्षे कायम आहे. शेतकऱ्यांना काय हवे, ग्राहकांची मागणी काय आहे, बाजारपेठेची गरज काय, याचा अंदाज घेऊन शेती करण्याची वेळ आली आहे. त्यासाठी कृषी विभागाने पुढाकार घेण्याची गरज आहे. केवळ मोबाईल ?प तयार केले आणि आमच्या ?पवर इतक्या शेतकऱ्यांनी नोंदणी केली, असा दावा करून शेखी मिरविण्यात शेतकऱ्यांचे हित नाही. शेतीमालाचे उत्पादन वाढत असतानाच्या काळात आपल्या कृषीमालांच्या दर्जाकडे दुर्लक्ष करून चालणार नाही, शेतीमालामधील रसायनांचा उर्वरित अंश नियंत्रित ठेवला आणि ठोस व्यापारी धोरण ठेवले, धोरणात सातत्य ठेवले तर आखाताच्या पुढे जाऊन जागतिक बाजारपेठ काबीज करण्याची क्षमता निर्माण होईल. पण, त्यासाठी उच्च दर्जाची शेतीमाल स्टेसिबिलिटी (उत्पादक ते ग्राहक साखळी), कृषी संशोधन संस्था, सरकार आणि शेतकऱ्यांच्या सामूहिक प्रयत्नांची गरज आहे. शेतकऱ्यांनी जास्त उत्पादन घेतल्यावर त्यांचा सन्मान करण्याची गरज आहे. मात्र आपल्याकडे याच्या उलटे घडते. मुबलक उत्पादन झाल्यावर शेतीमालाचे दर पडतात, शेतीमाल शेतीच्या बांधावर फेकून देण्याच्या घटना उघड्या डोळ्यांनी पुन्हा पुन्हा पहाव्या लागतात. असा हवालदील शेतकरी रस्त्यावर उतरला, की त्याला देशविरोधी ठरविले जाते, हे बळीराजाचे दुर्दैव नाही काय?

**दत्ता जाधव**

## पिकांचे किमान आधारभूत मूल्य जाहीर करा

**माननीय**
श्री नरेंद्र मोदी,
पंतप्रधान, भारत सरकार,
नवी दिल्ली

**विषय:** रासायनिक खतांवरील (युरिया आणि डीएपी) अनुदान त्वरित बंद करण्याची आणि 'कृषी खर्च आणि मूल्य आयोगा'ला (CAPC) युरियासाठी ३,००० रुपये प्रति पिशवी (४५ किलो) व डीएपीसाठी ५,००० रुपये प्रति पिशवी या दरांचा आधार घेऊन पिकांचे किमान आधारभूत मूल्य (MSP) जाहीर करण्याचे निर्देश देण्याची विनंती.

**सप्रेम नमस्कार,**

स्वातंत्र्यादिनी आपण देशाला उद्देशून केलेले भाषण ऐकल्यानंतर, एक शेतकरी म्हणून माझ्या मनातील विचार 'मन की बात' आपल्यासमोर मांडण्याचे धाडस करीत आहे. गेल्या बारा वर्षांपासून आपले सरकार देशातील शेतकऱ्यांना हे दिले आणि ते दिले, अशा घोषणा करत आहे; तरीही आमचे उत्पन्न दुप्पट झालेले नाही, उलट आमचे कर्ज मात्र दुप्पट झाले आहे.

२०१९ पासून आपण 'पीएम किसान निधी' योजनेअंतर्गत प्रत्येक शेतकऱ्याला ६,००० रुपये देत आहात. २०१९ ते २०२६ या काळात पंतप्रधान कार्यालयाचा खर्च स्थिर राहिला आहे का? हा प्रश्न विचारल्याबद्दल कृपया क्षमा करावी. हा असा प्रश्न आहे की, जो एकेकाळी काँग्रेस पक्षाविरुद्ध उपस्थित केला जात असे. महाराष्ट्रातील गावागावांत आम्ही (शेतकरी संघटनांनी) काँग्रेसविरोधी वातावरण कसे निर्माण केले होते, याबद्दल आपण आपले सहकारी माननीय श्री नितीन गडकरी आणि माननीय श्री देवेंद्र फडणवीस यांना विचारू शकता.

यावर्षीही आपण लाल किल्ल्यावरून देश आणि जगाला सांगितले की, भारत सरकार सरकारी तिजोरीतून शेतकऱ्यांना भरीव आर्थिक मदत देते. आपण म्हणालात, 'आम्ही (सरकार) युरिया ज्याची किंमत ३,००० रुपये प्रति पिशवी आहे, तो ३०० रुपयांना आणि डीएपी ज्याची किंमत ५,००० रुपये प्रति पिशवी आहे, तो १,३५० रुपयांना उपलब्ध करून देतो.' आम्हाला नम्रपणे हे सांगायचे आहे की, हे अनुदान आमच्या फायद्यासाठी दिले जात नाही, तर ग्राहकांना कमी दरात अन्नधान्य खरेदी करता यावे यासाठी दिले जाते. आम्ही आपल्याला कळकळीची विनंती करतो की, हे अनुदान त्वरित रद्द करावे. कृपया 'कृषी मूल्य आणि लागत आयोगा'ला (DAP) अशा प्रकारे पिकांचे भाव जाहीर करण्याचे निर्देश द्यावेत, ज्यात युरियासाठी ३,००० आणि डीएपी (DAP) साठी ५,००० यांसारख्या खर्चांचा विचार केला जाईल. सध्याचे दर म्हणजेच धानासाठी २,३६९ (२०२५-२६) आणि गव्हासाठी २,५८५ (२०२६-२७) वाढवणे आवश्यक आहे. असे न केल्यास, सरकारला कालांतराने मोफत ५ किलो धान्य योजनेसाठीची अर्थसंकल्पीय तरतूद सध्याच्या जो २ लाख ३०,००० रुपये वरून वाढवून ४ लाख रुपये करावी लागू शकते. तुम्ही खतांवर अनुदान देता, तरीही आम्हाला जनतेच्या रोषाचा सामना करावा लागतो आणि आम्ही कर्जाच्या ओझ्याखाली जगत आहोत! आम्ही विनंती करतो की, तुम्ही आमच्या समस्यांची दखल घ्यावी आणि तुमच्या 'मन की बात' या कार्यक्रमातून आम्हाला मार्गदर्शन करावे.

धन्यवाद.

**विजय जावंधिया,**
शेतकरी संघटना पाईक
मो.९४२१७२७९९८

## बालमनावर सुसंस्कार करण्याचे महत्त्व

केरळ राज्यात एका १३ वर्षांच्या मुलीने आजोबांची हत्या करून त्यांच्याकडील पैसे चोरले. कारण तिला आयफोन आणि दुचाकी खरेदी करायची होती. हे वाचून लक्षात येते की, मुलांना पैसे आणि वस्तू यांच्यापुढे घरातील माणसांचेही काही महत्त्व वाटत नाही! हे अत्यंत दुर्दैवी आहे. मुलांना जन्मापासूनच आई, वडील यांनी काळजीपूर्वक सद्गुणांचे संस्कार केले तर पुढे मोठी झाल्यावर हीच मुले सुजाण नागरिक होऊ शकतील. आई हीच मुलाची पहिली गुरू असते. यासाठी बालमनावर नुसते मोबाईलचे संस्कार व्हायला नको, हे पहावें लागेल. बाहेरचे अन्न वारंवार खाण्याचे कुसंस्कार टाळले पाहिजेत. मुलामुलींनी छोटे कपडे न घालता अंगभर कपडे घालण्याचे संस्कार, मोठ्यांशी बोलतांना नम्रतेने बोलण्याचे संस्कार, बोलण्यात कधीही शिवी किंवा अपशब्द न बोलण्याचे संस्कार, इतरांना मदत करण्याचे संस्कार, गरजा मर्यादित ठेऊन पैसे काटकसरीने वापरण्याचे संस्कार, हे सर्व सुसंस्कार पालकांना करावे लागतील.

यासाठी पालकांना विशेष लक्ष स्वतःच्या वागण्यावर आणि बोलण्यावर पण द्यायला पाहिजे. आपली भारतीय संस्कृती 'वसुधैव कुटुंबकम' म्हणजे 'संपूर्ण पृथ्वीच आपले कुटुंब आहे', ही शिकवण देते.

**आदिती देखणे**

## आंदोलने की, संधीसाधू नेत्यांची राजकीय भूक?

मागील आठवड्यात 'ओबीसी' नेते नवनाथ वाघमारे यांनी 'ओबीसी मंत्र्यांचा पैसा आणि मुले बघून मराठा समाजाच्या मुली त्यांच्या घरात घुसतात' असे वादग्रस्त आणि तितकेच संतापजनक वक्तव्य केले होते. अपेक्षेप्रमाणे, या विधानावरुन राजकारणात संतप्त प्रतिक्रिया उमटू लागल्या आहेत.

याबाबत चौफेर टीका होऊ लागल्याने, वाघमारे यांनीही इतर 'असंस्कारी' 'वाचाळ विरां'प्रमाणेच आधी लाथ मारायची, मग माफी मागायची या कोडग्या वृत्तीनुसार दिलगिरी व्यक्त केली.

**प्रदीप व्ही. खोलमकर**

## राष्ट्रीय प्रतीकांचा सन्मान की तुष्टीकरणाचे राजकारण?

काँग्रेसच्या केंद्रीय कार्यालयातील ध्वजारोहण सोहळ्यात एक धक्कादायक प्रकार समोर आला होता. 'वंदे मातरम्' सुरू असताना अवघी दोन कडवी झाल्यावर काँग्रेसच्या वरिष्ठ नेत्या सोनिया गांधी अस्वस्थ दिसल्या आणि त्यांनी मल्लिकार्जुन खर्गे यांच्याकडे याबाबत विचारणा केली.

वास्तविक, केंद्र सरकारने नुकतेच राष्ट्रीय प्रतीकांबाबत हे महत्त्वाचे विधेयक मंजूर केले आहे.

यानुसार 'वंदे मातरम्'ची संपूर्ण रचना अधिकृत मानून सर्व सरकारी व राष्ट्रीय कार्यक्रमांमध्ये राष्ट्रगीत आणि राष्ट्रगान (वंदे मातरम्) पूर्ण गायले जाणे अनिवार्य केले आहे. या नवीन कायद्याला काँग्रेससह संपूर्ण विरोधी पक्षांकडून विरोध होताना दिसत आहे. याचे मूळ कारण केवळ आणि केवळ तुष्टीकरणाचे राजकारण असल्याचे स्पष्ट होते; कारण एक विशिष्ट वर्ग सातत्याने 'वंदे मातरम्' गायनाला विरोध करत आला आहे. या घटनेच्या निमित्ताने काँग्रेसने पुन्हा एकदा आपल्या तुष्टीकरणाच्या भूमिकेला खतपाणी घालत राष्ट्रीय प्रतीकांबाबतची आपली नकारात्मक मानसिकता स्पष्ट केली आहे.

**अविनाश देशपांडे**

**संवाद**

## शिक्षणव्यवस्थेतील मूलभूत सुविधांची स्थिती चिंताजनक

सध्याच्या काळात शिक्षणाचा गंध नसलेले लोक उच्च शिक्षित विद्यार्थ्यांचे अभ्यासक्रम तयार करत आहेत. त्यामुळेच पेपरफुटीसारखी नामुष्कीची वेळ पुन्हा पुन्हा येत आहे. परिणामी सध्याची तरुण पिढी व्यवस्थेला जाब विचारत आहे. जंतरमंतरवरील आंदोलनातून हाच संदेश देशांमध्ये सर्वदूर पोहोचला आहे. त्याचे सकारात्मक पडसाद उमटण्यास सुरुवात झाली आहे. खरे तर संपूर्ण देश हा एकसंघ आणि एकजिनसी असल्याचीच ही सुचिन्हे आहेत. धार्मिक आणि सामाजिक प्रश्नांची व्याप्ती वाढणे राजकीय पक्षांसाठी तात्पुरते फायद्याचे ठरत असले तरी देशातील मूलभूत समस्या सोडवण्यात जितका विलंब होईल तितका हा प्रश्न चिघळत जाण्याची शक्यता आहे. निवडणुकीच्या आधी काही वर्षे भावनिक मुद्दे उपस्थित करून त्याच्या बळावरच निवडणुका जिंकण्याचे कसब सत्ताधाऱ्यांनी चांगलेच आत्मसात केले आहे परंतु, शिक्षणासारख्या महत्वाच्या विषयाकडे दुर्लक्षित करणे कोणालाच परवडणारे नाही. आंदोलनांमधून निर्माण झालेली ऊर्जा देशाला सकारात्मक दिशेने वाटचाल करण्यास आणि भारतीय लोकशाही आणखी मजबूत होण्यास सहायक ठरावी. शाळांमध्ये मूलभूत सुविधांची उपलब्धता हा केवळ शिक्षण विभागाचा प्रशासकीय विषय नाही, तर तो देशाच्या भवितव्याचा प्रश्न आहे. म्हणूनच सीजीपी ची शाळासुधार मोहीम हा केवळ एखाद्या शाळेचा प्रश्न मांडणारा उपक्रम न राहता आपल्या परिसरातील सरकारी शाळांची परिस्थिती काय आहे, हा प्रश्न प्रत्येक नागरिकाने विचारण्याची गरज अधोरेखित करणारा प्रयत्न ठरतो.

**प्रा. मधुकर चुटे**

शुक्रवार, दि. २१ ऑगस्ट २०२६
E-mail:-ytljanmadhyam@gmail.com

# जनमाध्यम

एक प्रतिष्ठित सत्य

## महिला आरक्षणाच्या मार्गात काँग्रेसच अडथळा - ना.रामदास आठवले

### पीक विम्यासाठी कृषिमंत्र्यांकडे पाठपुरावा रिपाइंला सत्तेत योग्य वाटा देण्याची मागणी

✦जनमाध्यम | प्रतिनिधी

**यवतमाळ, दि. २० : महिला आरक्षणाच्या अंमलबजावणीसाठी परिसीमन विधेयकाला काँग्रेससह विरोधकांनी पाठिंबा देणे आवश्यक आहे. मात्र, विरोधकांच्या भूमिकेमुळे महिला आरक्षणाच्या मार्गात अडथळा निर्माण होत आहे, असा घणाघात केंद्रीय सामाजिक न्याय राज्यमंत्री रामदास आठवले यांनी गुरुवारी यवतमाळात केला.**




हॉटेल राधामंगलम इन येथे झालेल्या पत्रकार परिषदेत त्यांनी केंद्र व राज्य शासनाच्या सामाजिक न्याय योजनांसह विविध राजकीय व सामाजिक प्रश्नांवर भूमिका स्पष्ट केली. यवतमाळसह पीक विम्यापासून वंचित जिल्ह्यांतील शेतकऱ्यांना योजनेचा लाभ मिळावा, यासाठी केंद्रीय कृषिमंत्री शिवराजसिंह चौहान यांच्याकडे पाठपुरावा करणार असल्याचे आठवले यांनी सांगितले. विद्यार्थ्यांच्या शिष्यवृत्तीच्या रकमेत वाढ करण्याचा विचार सुरू असून जात पडताळणीची १,९५४ प्रकरणे आहेत. त्यापैकी १,२०० प्रकरणे तयार असून त्रुटींच्या पूर्ततेसाठी विशेष शिबिरे घेतली जात असल्याची माहिती त्यांनी दिली. यवतमाळ येथील स्टेट बँक चौकात क्रांतीज्योती सावित्रीबाई फुले यांचा पुतळा उभारण्यासाठी ८,९४८ चौ. फूट जागा शासनाकडे जमा असून ती नगरपरिषदेला हस्तांतरित करण्याचे निर्देश देण्यात आले आहेत. पुतळा, वाचनालय व अन्य कामांसाठी सुमारे पाच कोटी रुपयांचा प्रस्तावित खर्च असल्याचे त्यांनी सांगितले. भूमिहीनांना गायरान, भूदान व झुडपी जंगलाच्या जमिनी उपलब्ध करून देण्याबाबतही चर्चा झाली. अ‍ॅट्रॉसिटी प्रकरणातील मृतांच्या २४ वारसांना शासकीय सेवेत सामावून घेतल्याची माहितीही देण्यात आली. राजकीय मुद्द्यांवर बोलताना आठवले यांनी रिपाइं NDA सोबतच राहणार असून महाराष्ट्राच्या सत्तेत पक्षाला योग्य वाटा मिळावा, अशी मागणी केली. रिपाइंला एक-दोन महामंडळे मिळावीत, अशी अपेक्षाही त्यांनी व्यक्त केली. पेपर लीक विरोधातील आंदोलन योग्य वेळी सुरू झाले. मात्र लाठीचार्ज, आंदोलनातील खिळे आणि विद्यार्थ्यांवरील गुन्हे या बाबी गंभीर असल्याचे सांगत विद्यार्थ्यांवरील गुन्हे मागे घेण्याची भूमिका त्यांनी मांडली. अभिजित दीपके यांच्या टीमने शाळांबाबत केलेल्या मागण्या योग्य असल्याचे सांगत त्यांनी रिपाइं मध्ये येण्याची ऑफर दिल्याचेही नमूद केले. शिवसेना प्रकरणावर आठवले यांनी एकनाथ शिंदे यांच्याकडे दोन-तृतीयांश बहुमत असल्याचा दावा करत शिवसेनेचे चिन्ह शिंदेंकडेच द्यावे. अशी भूमिका मांडली. राहुल गांधींवर टीका करत नरेंद्र मोदी २०२९ आणि २०३४ पर्यंत देशाचे नेतृत्व करतील, असा दावा त्यांनी केला. समता मार्च महाड सत्याग्रहाला २०२७ मध्ये शंभर वर्षे पूर्ण होत असल्याने १४ ऑक्टोबरला साताऱ्यातून समता रॅली काढण्यात येणार असून १५ नोव्हेंबरला पुण्यात तिचा समारोप होईल, अशी माहिती आठवले यांनी दिली.

## इस्लामिक यूथ फेडरेशनतर्फे मोफत हिजामा शिबिर संपन्न..!

### २८० हून अधिक नागरिकांनी घेतला लाभ

✦जनमाध्यम | प्रतिनिधी




**उमरखेड, दि. २० :** येथील इस्लामिक यूथ फेडरेशनच्या (IYF) च्या वतीने ईद मिलादुन्नबी(पैगंबर जयंती) निमित्त 'तिब्ब-ए-नबवी' (पारंपरिक आरोग्य पद्धती) चा प्रसार करण्याच्या उद्देशाने बुधवार, १९ ऑगस्ट २०२६ रोजी एकदिवसीय मोफत हिजामा (कपिंग थेरपी) शिबिराचे यशस्वी आयोजन करण्यात आले. नांदेड रोडवरील 'ए-वन फंक्शन हॉल' येथे हे शिबिर पार पडले.

या शिबिरामध्ये पुसद येथील प्रसिद्ध हिजामा तज्ज्ञ डॉ. इरफान आणि डॉ.सैफ उमरखेड येथील हकीम शहा मुदसशीर यांनी रुग्णांची तपासणी करून उपचार केले. सकाळी १० वाजल्यापासून सुरू झालेल्या या शिबिरात सुमारे २८० हून अधिक नागरिकांनी सहभाग नोंदवला आणि ३५० हून अधिक कप्सद्वारे हिजामा उपचार करून घेतला. विशेष म्हणजे हिजामा ही शरीरातील दूषित रक्त (Toxins) बाहेर काढून वेदना, विशेषतः स्नायू व पाठदुखीपासून आराम देणारी पारंपरिक व गुणकारी उपचार पद्धती आहे. या शिबिरात संसर्ग टाळण्यासाठी स्वच्छता आणि निर्जंतुक (Sterilized) उपकरणांच्या वापरावर विशेष भर देण्यात आला. शिबिर यशस्वी करण्यासाठी साबीर कुरेशी, अकील खान, सज्जाद शेख, सय्यद झैद, शादाब शेख यांच्यासह इस्लामिक यूथ फेडरेशनच्या इतर कार्यकर्त्यांनी परिश्रम घेतले. या सामाजिक व आरोग्यदायी उपक्रमाचे उमरखेड परिसरातील नागरिकांकडून मोठे कौतुक होत आहे.

## वृत्तपत्राच्या वृत्ताची दखल, समस्या तातडीने न सुटल्यास तलावाच्या भिंतीवर आमरण उपोषणाचा शेतकऱ्यांचा इशारा

✦जनमाध्यम | प्रतिनिधी

**राळेगाव :** राळेगाव तालुक्यातील वरूड जहांगीर येथील मध्यम प्रकल्पाच्या दुरवस्थेबाबत वृत्तपत्रातून वृत्त प्रकाशित होताच पाटबंधारे विभागाच्या अधिकाऱ्यांनी बुधवारी (दि. १९) तलाव परिसराची पाहणी केली. मात्र, वर्षानुवर्षे समस्यांचा सामना करणाऱ्या शेतकऱ्यांना तातडीच्या उपाययोजना ऐवजी 'कामाच्या प्रक्रियेला चार महिने लागतील' असे उत्तर मिळाल्याने संताप व्यक्त होत आहे.



वरूड जहांगीर मध्यम प्रकल्पाला सुमारे तीन दशके उलटली आहेत. मात्र, या प्रकल्पाचा स्थानिक शेतकऱ्यांना अपेक्षित लाभ मिळत नसल्याची शेतकऱ्यांची तक्रार आहे. उलट तलावामुळे विविध समस्यांना सामोरे जावे लागत असल्याचा आरोप करण्यात आला आहे. तलावाच्या कामादरम्यान गावातील स्मशानभूमीतून तयार करण्यात आलेल्या कच्च्या रस्त्याचे अद्याप खडीकरण किंवा डांबरीकरण झालेले नाही. त्यामुळे पावसाळ्यात शेतकरी, बैलगाडी व ट्रॅक्टर चालकांना मोठ्या अडचणींचा सामना करावा लागतो. गावाजवळील नाल्यावर उंच पूल उभारण्याऐवजी रपटा ठेवण्यात आल्याने पावसाळ्यात कंबरभर पाण्यातून ये-जा करण्याची वेळ येते. याशिवाय तलावाच्या भिंतीखाली मोठ्या प्रमाणात झाडाझुडपे वाढल्याने परिसराला जंगलाचे स्वरूप आले आहे. त्यामुळे शेतात जाणाऱ्या तसेच रात्री पिकांच्या रखवालीसाठी जाणाऱ्या शेतकऱ्यांमध्ये जंगली प्राण्यांची भीती निर्माण झाली आहे. कालव्याच्या दोन्ही बाजूंनाही झाडाझुडपे वाढल्याने वाहतूक आणि पायी ये-जा करणाऱ्यांना त्रास सहन करावा लागत आहे. या समस्यांकडे शासनाचे लक्ष वेधण्यासाठी काही दिवसांपूर्वी वृत्तपत्रातून बातमी प्रसिद्ध करण्यात आली होती. त्याची दखल घेत बुधवारी पाटबंधारे विभागाचे अधिकारी व कर्मचारी तीन शासकीय वाहनांतून तलावाच्या भिंतीवर दाखल झाले. त्यांनी परिसराची पाहणी केली; मात्र पाहणीनंतर परत जात असताना वरूड जहांगीर येथील शेतकरी रामधन राठोड यांनी अधिकाऱ्यांची वाहने थांबवून समस्यांबाबत विचारणा केली. यावेळी संबंधित कामाच्या प्रक्रियेला सुमारे चार महिन्यांचा कालावधी लागणार असून त्यानंतर काम सुरू होईल, असे अधिकाऱ्यांनी सांगितल्याची माहिती शेतकऱ्यांनी दिली. त्यामुळे 'चार महिने प्रक्रिया आणि त्यानंतर काम' या भूमिकेवर शेतकऱ्यांमध्ये नाराजी आहे. सध्या पिकांची रखवाली करण्यासाठी शेतकऱ्यांना दररोज शेतात जावे लागत असताना चार महिन्यांनी होणाऱ्या कामाचा तातडीच्या समस्यांवर काय उपयोग, असा सवाल उपस्थित होत आहे. दरम्यान, तलाव परिसरातील झाडझुडपे हटविणे, रस्त्याची दुरुस्ती करणे, नाल्यावर योग्य पूल उभारणे तसेच कालव्याच्या दुतर्फा स्वच्छता करण्याची कामे तातडीने हाती घ्यावीत, अशी मागणी करण्यात आली आहे. तातडीने उपाययोजना न झाल्यास तलावाच्या भिंतीवर आमरण उपोषण करण्याचा निर्णय घेऊ,असा इशारा बंजारा कर्मचारी संघटनेचे राळेगाव तालुकाध्यक्ष तथा वरूड जहांगीर येथील शेतकरी श्रावणसिंग वडते यांनी प्रसिद्धीपत्रकाद्वारे दिला आहे.

## राष्ट्रसंतांच्या राष्ट्रीय कार्याचे स्मरण ठेवा: आकाश ताविडे

**पुसद, दि. २० :** राष्ट्रसंत तुकडोजी महाराजांनी ओजस्वी भजनांतून जनतेत राष्ट्रभक्तीची ज्योत पेटवून ब्रिटिश सत्तेविरुद्ध जनजागृती केली. चिमूरसह विदर्भातील स्वातंत्र्यलढ्यात त्यांच्या विचारांचा मोठा प्रभाव होता. त्यामुळे राष्ट्रासाठी देह चंदनाप्रमाणे झिजविणाऱ्या राष्ट्रसंतांचे योगदान विसरता कामा नये, असे प्रतिपादन राष्ट्रीय कीर्तनकार आकाश ताविडे यांनी केले. स्वातंत्र्यदिनानिमित्त सावित्रीबाई फुले वारकरी सेवा संस्था भजनी मंडळातर्फे आयोजित सामुदायिक प्रार्थना व भजन संध्येप्रसंगी ते बोलत होते. सेवानिवृत्त शिक्षिका आशा माने यांच्या निवासस्थानी हा कार्यक्रम पार पडला. यावेळी प्रतिमापूजनासह चिमूरच्या ऐतिहासिक घटनेचे स्मरण करून राष्ट्रसंतांना 'भारतरत्न' देऊन गौरविण्याची मागणी ताविडे यांनी केली. याप्रसंगी विविध मान्यवरांसह भाविकांची मोठी उपस्थिती होती.

## थोडक्यात

### ग्रामसभा न घेणाऱ्या गावांची चौकशी करा, दोषींवर कारवाई करा!

**मनसे तालुकाध्यक्ष अश्विन मुठाकरे यांची गटविकास अधिकाऱ्यांकडे मागणी, तातडीने ग्रामसभा घेण्याचा इशारा**

**पांढरकवडा :** केळापूर तालुक्यातील ज्या गावांमध्ये नियमानुसार



ग्रामसभा झालेल्या नाहीत, त्या गावांची तातडीने चौकशी करून संबंधित गावांमध्ये ग्रामसभा घेण्याचे आदेश द्यावेत, अशी मागणी महाराष्ट्र नवनिर्माण सेनेचे तालुकाध्यक्ष अश्विन मुठाकरे यांनी पंचायत समितीच्या गटविकास अधिकाऱ्यांकडे निवेदनाद्वारे केली आहे.ग्रामसेवक संघटनेच्या आंदोलनामुळे काही गावांमध्ये ग्रामसभा झाल्या, तर काही गावांमध्ये त्या झालेल्या नाहीत. ग्रामसभा ही केवळ ग्रामसेवकांच्या कामकाजाचा भाग नसून ती ग्रामस्थांचा वैधानिक अधिकार आहे. ग्रामसभा न झाल्याने विकासकामे, निधीचा वापर, विकास आराखडा, शासकीय योजना आणि गावातील विविध प्रश्नांवर चर्चा करून मत मांडण्याची संधी ग्रामस्थांपासून हिरावली जाते, असा आरोप मुठाकरे यांनी केला.

केळापूर तालुक्यात ग्रामसभा न झालेल्या सर्व गावांची चौकशी करून त्यामागील कारणे संबंधित ग्रामसेवक व जबाबदार अधिकाऱ्यांकडून लेखी स्वरूपात घ्यावीत. तसेच ग्रामस्थांकडून प्रत्यक्ष माहिती घेऊन चौकशी पारदर्शकपणे करावी. दोष आढळल्यास संबंधितांवर नियमानुसार कारवाई करावी, अशी मागणी करण्यात आली आहे. ग्रामसेवकांनी नियमानुसार काम केले असेल तर चौकशीला घाबरण्याचे कारण नाही. त्यामुळे सत्य जनतेसमोर येण्यासाठी निष्पक्ष चौकशी होणे आवश्यक आहे, अशी भूमिका मुठाकरे यांनी मांडली. प्रशासनाने तातडीने कारवाई न केल्यास ग्रामस्थांना सोबत घेऊन मनसेच्या वतीने लोकशाही मार्गाने तीव्र आंदोलन छेडण्याचा इशाराही त्यांनी दिला.

### आई-बाप' पालक-विद्यार्थी शाळा-शाळांत जनजागृती..!

**२४ ऑगस्टला महासंवाद**

**पांढरकवडा :** पालक आणि विद्यार्थ्यांमधील संवादाची दरी कमी करण्यासाठी युवा टायगर फोर्सच्या पुढाकाराने आयोजित 'न समजलेले आई-बाप' पालक-विद्यार्थी महासंवादाची शहरात जोरदार जनजागृती सुरू आहे. पंचायत समितीचे गटशिक्षण अधिकारी राजू मेश्राम आणि पोलीस ठाण्याचे ठाणेदार लहु तावरे यांनी विविध शाळा-महाविद्यालयांना भेटी देऊन विद्यार्थी, शिक्षक व पालकांना कार्यक्रमात सहभागी होण्याचे आवाहन केले. विद्यार्थ्यांच्या शैक्षणिक प्रगतीसोबतच त्यांच्या भावनिक व सामाजिक जडणघडणीकडे पालकांनी लक्ष देणे गरजेचे असल्याचे मेश्राम यांनी सांगितले. तर विद्यार्थ्यांना चुकीच्या मार्गापासून दूर ठेवण्यासाठी पालक, शिक्षक, समाज व पोलीस प्रशासनाने एकत्रितपणे काम करण्याची गरज तावरे यांनी व्यक्त केली. विकास हिंदी विद्यालय, शिवरामजी मोघे महाविद्यालय, बाबासाहेब देशमुख पारवेकर महाविद्यालय, शारदा ज्ञानपीठ, के.ई.एस. कन्या शाळा व जिल्हा परिषद उच्च माध्यमिक शाळेत जनजागृती करण्यात आली.२४ ऑगस्ट रोजी होणाऱ्या महासंवादात हजारो पालक-विद्यार्थ्यांनी सहभागी व्हावे, असे आवाहन युवा टायगर फोर्सच्या वतीने करण्यात आले आहे.

## सेवानिवृत्त अंगणवाडी कर्मचाऱ्यांना सेवा उपदानाचा मार्ग मोकळा..!

### कामगार न्यायालयाचा महत्त्वपूर्ण निर्णय

✦जनमाध्यम | प्रतिनिधी

**बाभुळगाव, दि. २० :** देशाच्या सर्वोच्च न्यायालयाने एप्रिल २०२२ मध्ये दिलेल्या निर्देशांच्या पार्श्वभूमीवर यवतमाळ जिल्ह्यातील सेवानिवृत्त अंगणवाडी कर्मचाऱ्यांना त्यांच्या हक्काचे सेवा उपदान व इतर सेवानिवृत्तीनंतरचे लाभ मिळण्याचा मार्ग आता मोकळा झाला आहे. यासंदर्भात दाखल करण्यात आलेल्या विविध प्रकरणांमध्ये कामगार न्यायालय, यवतमाळ यांनी अर्जदार सेवानिवृत्त अंगणवाडी कर्मचाऱ्यांच्या बाजूने निर्णय दिला आहे.

या निर्णयानुसार संबंधित जिल्हा परिषद प्रशासनाला न्यायनिर्णयाच्या तारखेपासून ६० दिवसांच्या आत पात्र सेवानिवृत्त अंगणवाडी कर्मचाऱ्यांना त्यांच्या हक्काची सेवा उपदानाची रक्कम देण्याचे निर्देश देण्यात आले आहेत. त्यामुळे अनेक वर्षांपासून प्रलंबित असलेल्या सेवा उपदानाच्या रकमेचा प्रश्न मार्गी लागण्याची शक्यता निर्माण झाली आहे. दरम्यान, औद्योगिक न्यायालय, यवतमाळ येथे दाखल करण्यात आलेल्या अपील प्रकरणांमध्येही एकात्मिक बाल विकास प्रकल्प अधिकारी, कार्यक्रम अधिकारी तथा उपमुख्य कार्यकारी अधिकारी, महिला व बालकल्याण, जिल्हा परिषद यवतमाळ तसेच प्रधान सचिव, महिला व बाल विकास विभाग, मंत्रालय, मुंबई यांच्याविरुद्ध न्यायनिर्णय झाला आहे. या अपील प्रकरणांत १५ ते २० सेवानिवृत्त अंगणवाडी कर्मचाऱ्यांच्या सेवा उपदानाच्या रकमेचे धनादेश न्यायालयात जमा करण्यात आल्याची माहिती देण्यात आली आहे. अत्यल्प मानधनावर दीर्घकाळ प्रामाणिक सेवा बजावलेल्या अंगणवाडी कर्मचाऱ्यांना त्यांच्या हक्काचा मोबदला मिळवून देण्यासाठी करण्यात आलेल्या या प्रयत्नांमुळे सेवानिवृत्त कर्मचाऱ्यांमध्ये समाधानाचे व आनंदाचे वातावरण निर्माण झाले आहे. सर्व पात्र सेवानिवृत्त अंगणवाडी कर्मचाऱ्यांना सेवा उपदानाची थकीत रक्कम नियमाप्रमाणे मिळण्याचा मार्ग या न्यायनिर्णयामुळे अधिक सुलभ झाला असल्याचे अ‍ॅड. अरुण जवके यांनी प्रसिद्धीपत्रकाद्वारे कळविले आहे.

## महागाव ग्रामीण रुग्णालयात रुग्णाचा राडा !

### डॉक्टर सह कर्मचाऱ्यांना जीवे मारण्याचा प्रयत्न,पोलिसांत गुन्हा दाखल

✦जनमाध्यम | प्रतिनिधी




**महागाव, दि. २० :** ग्रामीण रुग्णालयात आलेल्या रुग्णाने डॉक्टर व आरोग्य कर्मचाऱ्यांशी वाद करीत आपल्या साथीदारांना बोलवून कर्मचाऱ्यांवर प्राणघातक हल्ला करून रुग्णालयात तोडफोड केल्याने महागाव पोलिसांनी रुग्णासह दहा ते १२ आरोपींवर गुन्हा दाखल केला आहे. महागाव ग्रामीण रुग्णालयात दिनांक १८ऑगस्ट रोजी रात्री १०.३० वाजताच्या सुमारास वैद्यकीय अधिकारी डॉ . दिक्षा मुजमुले व इतर कर्मचारी कार्यरत असतांना अंबोडा येथील शेख इजराईल शेख शाबुद्दीन (वय ३०वर्ष) हा जखमी अवस्थेत आपल्या मित्रासह आला त्यावेळी त्याच्या चेहऱ्यावर व गुडघ्यावर मार लागल्याने त्यावर मलम पट्टी केली.

परंतु आपण माझ्यावर अशी मलमपट्टी का केली म्हणुन नर्स पुनम कोकरे यांच्याशी वाद घालण्यास सुरुवात केली असता डॉ.मुजमुले यांनी पुन्हा मलमपट्टी करून देतो परंतु वाद घालु नका अशी विनंती केली असता तो ऐकण्याच्या मनःस्थिती नव्हता त्याने आपल्या १० ते १२ साथीदारांना त्याठिकाणी बोलावून रुग्णालयात गोंधळ घालण्यास सुरुवात करून रुग्णालयाच्या डिलिव्हरी रूम,डॉक्टर व कर्मचारी कक्षाच्या काचा फोडून टाकल्या त्यामुळे घाबरल्या डॉक्टरांनी कर्मचारी प्रशिक काळबांडे यांना बोलावले सदर कर्मचारी त्याठिकाणी येताच रुग्णांसह सर्वांनी काळबांडे यांना साप पकडण्याची लोखंडी काठी व लाथाबुक्क्यांनी मारहाण करून गंभीर जखमी केले त्यामुळे आपल्याला सुद्धा आरोपी मारतील या भीतीने डॉक्टर व नर्स ह्या दोघी बाथरूममध्ये लपल्या परंतु सर्व आरोपींनी या दोघींची शोधाशोध करण्यास सुरुवात केली .तेव्हाच डॉ.मुजमुले यांनी आपत्कालीन ११२ क्रमांकावर मदत मागुन पोलिसांना पाचारण केले .पोलिस घटनास्थळी दाखल होण्या अगोदरच सर्व आरोपींनी रुग्णालयातून पळ काढला .त्यानंतर ग्रामीण रुग्णालयाच्या वैद्यकीय अधिकारी डॉ. दिक्षा मुजमुले यांनी महागाव पोलिस स्टेशन गाठुन घडलेली आपबीती कथन करून फिर्याद दाखल केली त्यावरून पोलिसांनी आरोपी शेख इजराईल शेख शाबुद्दीन यांच्यासह १० ते१२ जणांविरोधात विविध कलमान्वये गुन्हे दाखल केले आहे. पुढील तपास ठाणेदार सेवानंद वानखेडे यांच्या मार्गदर्शनाखाली बिट जमादार गजानन एडतकर करीत आहेत.

## ग्रामसभा बहिष्कार आंदोलनाला महाराष्ट्र राज्य ग्रामसेवक संघटनेचा जाहीर पाठिंबा

✦जनमाध्यम | प्रतिनिधी

**झरी, दि. २० :** जळगाव जिल्ह्यातील पाचोरा तालुक्यातील शिवरे येथे ग्रामसभेदरम्यान ग्रामपंचायत अधिकारी श्री. पी. एन. पाटील यांच्या झालेल्या दुर्दैवी मृत्यूच्या पार्श्वभूमीवर महाराष्ट्र राज्य ग्रामसेवक युनियन DNE १३६, जिल्हा शाखा यवतमाळ यांनी ग्रामसभा बहिष्कार आंदोलनाला जाहीर पाठिंबा दिला आहे.



याबाबत महाराष्ट्र राज्य ग्रामसेवक युनियनच्या झरी-जामणी शाखेने गटविकास अधिकारी, पंचायत समिती झरी-जामणी यांना निवेदन सादर केले आहे. निवेदनात ग्रामसभेदरम्यान घडलेली घटना अत्यंत वेदनादायी व निषेधार्ह असल्याचे नमूद करण्यात आले आहे. ग्रामसभा तसेच शासकीय कामकाजाच्या वेळी ग्रामपंचायत अधिकारी व कर्मचाऱ्यांना सुरक्षित आणि निर्भय वातावरण उपलब्ध करून देण्याची मागणी संघटनेने केली आहे. अधिकारी व कर्मचाऱ्यांच्या सुरक्षिततेबाबत शासनाने ठोस उपाययोजना कराव्यात, अशीही मागणी निवेदनातून करण्यात आली आहे. जिल्हा संघटनेच्या निर्णयानुसार ग्रामपंचायत अधिकारी संघटना DNE १३६, झरी-जामणी यांच्या वतीने ग्रामसभा बहिष्कार आंदोलनास जाहीर सहभाग नोंदविण्यात येत असल्याचे निवेदनात स्पष्ट करण्यात आले आहे. या मागणीची तातडीने दखल घेऊन ग्रामपंचायत अधिकारी व कर्मचाऱ्यांच्या सुरक्षिततेसाठी आवश्यक उपाययोजना करण्याची मागणी संघटनेने प्रशासनाकडे केली आहे.

## विशाल पवार यांची स्वाभिमानी शेतकरी संघटनेच्या जिल्हा सचिव पदी फेर निवड

✦जनमाध्यम | प्रतिनिधी

**महागाव, दि. २० :** स्वाभिमानी शेतकरी संघटनेचे जिल्हा सचिव म्हणून ओळख असणारे विशाल मोहन पवार यांची पुणे येथे राज्य कार्यकारणी बैठकीत स्वाभिमानी शेतकरी संघटनेचे संस्थापक/ अध्यक्ष माजी खासदार राजू शेट्टी साहेब व यवतमाळ जिल्हा अध्यक्ष स्वाभिमानी शेतकरी संघटना तथा शेतकरी नेते मनीष जाधव यांच्या उपस्थितीत पार पडलेल्या निवड प्रक्रियेत विशाल पवार यांची यवतमाळ जिल्हा सचिव पदी फेरनिवड करण्यात आली आहे.



विशाल पवार यांच्या खांद्यावर ही जबाबदारी देण्यात आली आहे. शेतकऱ्यांच्या हितासाठी सदैव लढत राहतील व जनतेच्या गळ्यातील ताईत बनतील असा विश्वास राजू शेट्टी साहेब व मनीष जाधव यांनी अशी आशा व्यक्त केली आहे. अशा अनेक वेळा शेतकऱ्यांच्या हितासाठी सतत लढत राहणारे आणि योग्य वेळी शेतकऱ्यांच्या सोबत उभे राहणारे शेतकऱ्यांची तीव्र जाण असणारे या संघटनेत गेल्या सात वर्षापासून कार्य करणारे यांची दखल घेता या राज्य कार्यकारणी बैठकीत निवड करण्यात आली असून यवतमाळ जिल्ह्यातील या ठिकाणी उपस्थीत मनीष भाऊ जाधव शेतकरी नेते जिनकर राठोड ,विकास राठोड, प्रेमराव सरगर,सुनील राठोड आणि महाराष्ट्र राज्यातील अनेक स्वाभिमानी शेतकरी संघटनेचे पदाधिकारी यांच्या उपस्थितीत ही निवड करण्यात आली आहे. त्यांच्या या निवडीचे परिसरात कौतुक होत आहे, त्यांच्यावर अभिनंदनाचा वर्षाव होत आहे.

## जाहीरनामा

क्रमांक : म/सहा.प्रस्तु-४/कावि/१८२/२०२५
तहसीलदार उमरखेड यांचे कार्यालय, उमरखेड
दिनांक : १३/०२/२०२६

सर्व नागरिकांना याद्वारे कळविण्यात येते की, अर्जदार देविदास पुंजाराम सोळंके , रा. करंजी, ता. उमरखेड, जि. यवतमाळ यांनी अर्ज सादर केला आहे की, त्यांचे स्वतःचे नाव देविदास पुंजाराम सोळंके असून त्यांचा जन्म दिनांक ०८/०१/१९६१ रोजी मौजा करंजी, ता. उमरखेड येथे झालेला आहे.

अर्जदार यांनी जन्माची नोंद उपलब्ध नसल्याबाबतचे प्रमाणपत्र व अर्ज या कार्यालयास सादर केलेला आहे.

उपरोक्त प्रकरणी अर्जदार यांना जन्मनोंद आदेश देण्याबाबत कोणाचे काही आक्षेप / हरकती असल्यास त्यांनी सदर हरकत योग्य पुराव्यासह या कार्यालयात कार्यालयीन दिवशी व कार्यालयीन वेळेत लेखी स्वरूपात सादर करावी.

सदर प्रकरणी अर्जदार यांनी त्यांच्या जन्मापासून ते विलंबाने जन्मनोंदणीसाठी अर्ज सादर करेपर्यंतच्या कालावधीत कोठे वास्तव्य केले याबाबत स्थानिक चौकशी करून वस्तुस्थितीदर्शक अहवाल सादर करण्याचे निर्देश संबंधित ग्राम महसूल अधिकारी व ग्रामपंचायत अधिकारी, करंजी यांना देण्यात आलेले आहेत.

त्यामुळे सदर जन्मनोंदणीबाबत कोणास काही आक्षेप, हरकत अथवा संबंधित प्रकरणास बाधक अशी माहिती असल्यास ती संबंधित कागदपत्रे व पुराव्यांसह कार्यालयास सादर करावी.

निर्धारित कार्यवाहीदरम्यान प्राप्त झालेल्या हरकती व आक्षेपांचा नियमानुसार विचार करण्यात येईल. त्यानंतर प्राप्त कागदपत्रे व चौकशी अहवालाच्या आधारे पुढील कार्यवाही करण्यात येईल. याची सर्व संबंधितांनी नोंद घ्यावी.

स्वा/-
तहसीलदार, उमरखेड

# अंजनगाव सुर्जी येथे जुगार अड्ड्यावर पोलिसांचा छापा

## १२ जुगारी ताब्यात, ७ लाखांचा मुद्देमाल जप्त

**अंजनगाव सुर्जी/वार्ताहर**

अंजनगाव सुर्जी पोलीस स्टेशनच्या हद्दीत नागपंचमी सणानिमित्त पेट्रोलिंग करीत असताना पोलीस निरीक्षक यांना मिळालेल्या माहितीनुसार खोंडगाव रोडवरील स्मशानभूमी जवळ,शहानूर नदीपात्रात भावलींग मंदिराजवळ काही इसम जुगार खेळत आहेत. पोलीसांनी या धाडीत १२ जुगाऱ्यांना रंगेहाथ अटक केली असून त्यांच्याकडून रोख रक्कम आणि ११ मोटारसायकली असा एकूण ७,०३,२९० रुपयांचा मुद्देमाल जप्त केला आहे.

या गुप्त माहितीच्या आधारे दहा बारा इसम खाली पिवळ्या रंगाची ताडपत्री टाकून जुगार खेळताना दिसून आले.या कारवाईत जुगार खेळणारे १२ आरोपी जागीच मिळून आले.

नरेश ढगे,रा. खोंडगाव, मोहन गायकवाड,रा. तेलीपुरा अंजनगाव सुर्जी,नय्यम प्रभुदास तेलगोटे,रा. जळतारे प्लॉट, हिवरखेड रोड अकोट,आनंद किशोर गौर,वर्ष, रा. भोईपुरा बुधवारा सुर्जी,अंकुश गजानन लाडोळे,रा. रुक्मिणी नगर अंजनगाव सुर्जी,रहीम खान हमीद खान,रा. अजीजपुरा सुर्जी, मोहम्मद ईरशाद शेख रहीम,रा. कम्मुपुरा अंजनगाव सुर्जी,मोहम्मद शाहरूख मोहम्मद शफी, रा. कम्मुपुरा अंजनगाव सुर्जी,अब्दुल मतीन अब्दुल खालीद,रा. डब्बीपुरा अंजनगाव सुर्जी,धीरज आवंदकर,रा. पानअटाई अंजनगाव सुर्जी,अजर खाँ मंजर खाँ,रा. सलीम नगर अंजनगाव सुर्जी,विक्की धर्मे,रा. बारगणपुरा अंजनगाव सुर्जी आरोपींच्या अंगझडतीत व जुगाराच्या डावावरील मिळून एकूण २३,२९०/- रुपये रोख जप्त करण्यात आले. तसेच घटनास्थळावरून ११ मोटारसायकली, ज्यांची किंमत अंदाजे ६,८०,०००/- रुपये आहे, जप्त करण्यात आल्या आहेत. अशा प्रकारे एकूण ७,०३,२९०/- रुपयांचा जुगाराचा मुद्देमाल पोलिसांनी जप्त केला आहे.सदर कार्यवाही मा. पोलीस अधीक्षक श्री. निकेतन कदम साहेब, अप्पर पोलीस अधीक्षक श्री. दत्ता टोटेवाड साहेब, उपविभागीय पोलीस



अधिकारी श्री. सुनिल दुध साहेब यांचे मार्गदर्शनात पोलीस निरीक्षक सुरज बोंडे यांचे पथकातील पोउपनि भारत चिरडे, पोहेकॉ जयसिंग चव्हाण, पोकॉ शुभम मारकंड, पोकॉ रवि राठोड, पोकॉ अमित घाटे, पोकॉ आकाश रंगारी, पोकॉ प्रमोद चव्हाण, चापोकॉ इक्बाल पठाण, चापोकॉ विलास रावते यांनी केली आहे.या प्रकरणी पोलीस स्टेशन अंजनगाव सुर्जी येथे महाराष्ट्र जुगार प्रतिबंधक कायद्यांतर्गत गुन्हा दाखल करण्यात आले असून पुढील तपास सुरू आहे.

## ‘नशामुक्त भारत अभियाना’ अंतर्गत रॅली व प्रतिज्ञा ग्रहण

**अमरावती/का.प्र.**



भारत सरकारच्या सामाजिक न्याय आणि अधिकारिता मंत्रालयाच्या ‘नशामुक्त भारत अभियान’ आणि ब्रह्माकुमारीज मेडिकल विंग यांच्या संयुक्त विद्यमाने देशभरात राबविल्या जाणाऱ्या ‘नशामुक्त युवा – विकसित भारत’ या देशव्यापी मोहिमेंतर्गत, पी. आर. पोटे पाटील कॉलेज ऑफ मेडिकल सायन्सेस (आयुर्वेद), अमरावती येथे नशामुक्ती जनजागृती कार्यक्रमाचे यशस्वी आयोजन करण्यात आले.

देशातील तरुण पिढीला व्यसनांच्या विळख्यातून मुक्त करून सुदृढ, निरोगी व सक्षम भारत घडविण्याच्या उद्देशाने आणि पंतप्रधान नरेंद्र मोदी यांच्या ‘नशामुक्त भारत’ संकल्पाला प्रतिसाद देत महाविद्यालयाच्या वतीने एका भव्य जनजागृती रॅलीचे आयोजन करण्यात आले होते. या रॅलीच्या माध्यमातून नागरिकांमध्ये व्यसनमुक्तीचा संदेश पोहोचवण्यात आला.याप्रसंगी आयोजित विशेष कार्यक्रमात ‘Say No to Drugs, Say Yes to Life' चा संकल्प करत महाविद्यालयातील १८० विद्यार्थी आणि १०० शिक्षक व शिक्षकेतर कर्मचाऱ्यांनी व्यसनांपासून दूर राहण्याची सामूहिक प्रतिज्ञा घेतली.हा संपूर्ण उपक्रम महाविद्यालयाचे प्राचार्य डॉ. रणजित देशमुख यांच्या अध्यक्षतेखाली व मार्गदर्शनाखाली पार पडला. कार्यक्रमाचे उत्कृष्ट नियोजन व संयोजन नशामुक्ती अभियानाचे नोडल ऑफिसर तथा स्वस्थवृत्त व योगा विभाग प्रमुख डॉ. मनोदय मोहोड व डॉ. निकिता लांडे यांनी केले. या मोहिमेत महाविद्यालयातील सर्व प्राध्यापक, डॉक्टर्स, शिक्षकेतर कर्मचारी व विद्यार्थी मोठ्या संख्येने सक्रिय सहभागी झाले होते.

## जन्म -मृत्यू दाखला देण्यात होणाऱ्या विलंबामुळे प्रहार आक्रमक

### जिल्हा परिषद कार्यालयावर धडक

**अमरावती/का.प्र.**

जन्ममृत्यू दाखले देण्यास होत असलेल्या विलंबामुळे नागरिकांना मोठ्या अडचणींना तोंड द्यावे लागत आहे.यामुळे संतापलेल्या प्रहार सामाजिक संघटनाच्या पदाधिकाऱ्यांनी जिल्हा परिषद आरोग्य विभागात धडक दिली. लवकरात लवकर या समस्येचे निवारण करावे नाहीतर तीव्र आंदोलनाचा इशारा आरोग्य अधिकाऱ्याला देण्यात आला.



महानगरपालिकेत जन्ममृत्यू दाखले मिळवण्यासाठी येणाऱ्या नागरिकांना मोठ्या प्रमाणावर नाहक त्रास सहन करावा लागत आहे.याच्या अनेक तक्रारी समोर येत आहे. जन्म आणि मृत्यूचा नोंदी विभागाच्या रजिस्टरवर तसेच संगणीकृत नोंद उपलब्ध असतानाही दाखले देण्यात टाळाटाळ केली जात आहे. विशेष म्हणजे ज्यांच्याकडे जुने दाखले उपलब्ध आहे,त्यांना सुद्धा दाखले देण्यात विलंब होत आहे. यामुळे नागरिक वैतागले आहे. दाखले देण्याच्या प्रक्रियेमध्ये होणारा विलंब थांबविण्यात यावा. संबंधित अधिकाऱ्यांच्या कामकाजाची चौकशी करून नागरिकांना होणारा त्रास दूर करावा. नागरिकांना लवकरात लवकर न्याय द्यावी नाहीतर तीव्र आंदोलनाचा इशारा देण्यात आलेला आहे. यावेळी प्रहार चे छोटू महाराज वसू, बंटी रामटेके, जितू दुधाने, नितीन शिरभाते, प्रशांत शिरभाते, इम्रान भाई, सुनील खत्री, सोनू नवाब आदी उपस्थित होते.

## राज्य महोत्सव गणेशोत्सवाच्या स्पर्धेत
# अधिकाधिक गणेश मंडळांनी सहभाग घ्यावा
### विभागीय आयुक्त नयना गुंडे यांचे आवाहन

**अमरावती/का.प्र.**

महाराष्ट्र शासनाने राज्यातील सार्वजनिक गणेशोत्सव हा ‘राज्य महोत्सव’ म्हणून साजरा करण्याचा निर्णय घेतला असून, या अंतर्गत ‘उत्कृष्ट सार्वजनिक गणेशोत्सव मंडळ स्पर्धा’ आता तालुका, जिल्हा, राज्य, राष्ट्रीय व आंतरराष्ट्रीय स्तरावर आयोजित करण्यात येणार आहे. पर्यटन व सांस्कृतिक कार्य विभागाने जारी केलेल्या शासन निर्णयानुसार या भव्य स्पर्धेची घोषणा करण्यात आली आहे. अमरावती विभागातील जास्तीत जास्त गणेशोत्सव मंडळांनी या स्पर्धेत सहभागी व्हावे, असे आवाहन विभागीय आयुक्त नयना गुंडे यांनी केले आहे.

या स्पर्धेत सहभागी होण्यासाठी इच्छुक आणि पात्र मंडळांनी पु. ल. देशपांडे महाराष्ट्र कला अकादमीच्या संकेतस्थळावर उपलब्ध करून दिलेल्या ganeshostav.pldmka.co.in या पोर्टलद्वारे विहित वेळेत ७ सप्टेंबर २०२६ पर्यंत आपला अर्ज ऑनलाईन सादर करावयाचा आहे. स्पर्धेसाठी पात्रता व अटी पुढील प्रमाणे आहेत या स्पर्धेत केवळ संबंधित यंत्रणेद्वारे नोंदणीकृत संस्था अथवा परवानाधारक गणेशोत्सव मंडळेच सहभागी होऊ शकतात. नवीन मंडळांना संधी देण्याच्या उद्देशाने, चालू आर्थिक वर्षाच्या मागील सलग दोन वर्षे राज्यस्तरीय किंवा जिल्हास्तरीय पारितोषिके प्राप्त झालेली सार्वजनिक गणेशोत्सव मंडळे यावर्षीच्या पारितोषिकास पात्र ठरणार नाहीत. या स्पर्धेसाठी मंडळांनी केलेल्या कामाचा कालावधी मागील वर्षाच्या अनंत चतुर्दशीपासून चालू वर्षाच्या अनंत चतुर्दशीपर्यंत ग्राह्य धरण्यात येईल.



विविध स्तरांवरील विजेत्या मंडळांना तालुका स्तर: प्रथम क्रमांक - २५ हजार रुपये, जिल्हा स्तर: प्रथम क्रमांक -५० हजार रुपये, द्वितीय क्रमांक -४० हजार रुपये, तृतीय क्रमांक - ३० हजार रुपये, राज्य स्तर: प्रथम क्रमांक - ७ लाख ५० हजार रुपये, द्वितीय क्रमांक - ५ लाख रुपये, तृतीय क्रमांक- २ लाख ५० हजार रुपये राष्ट्रीय स्तर: प्रथम क्रमांक - ७ लाख ५० हजार रुपये द्वितीय क्रमांक- ५ लाख रुपये, तृतीय क्रमांक-२ लाख ५० हजार रुपये आंतरराष्ट्रीय स्तर: प्रथम क्रमांक- ७ लाख ५० हजार रुपये, द्वितीय क्रमांक- ५ लाख रुपये, तृतीय क्रमांक- २ लाख ५० हजार रुपये याव्यतिरिक्त, राज्यस्तरीय निवड समितीकडे आलेल्या ३६ जिल्हास्तरीय प्रथम विजेत्या मंडळांपैकी, राज्यस्तरावरील पहिले ३ विजेते वगळून उर्वरित ३३ मंडळांना राज्य शासनाकडून प्रत्येकी ५० हजार रुपये चे पारितोषिक व प्रमाणपत्र देऊन सन्मानित करण्यात येईल.

उत्कृष्ट मंडळांची निवड करताना कलांचे जतन व संवर्धन, संस्कृतीचे जतन, निसर्गाचे व सार्वजनिक संपत्तीचे संवर्धन, सामाजिक कार्य आणि गणेशोत्सव आयोजनातील विधायकता (उदा. पर्यावरणपूरक मूर्ती, सजावट, महिलांचा ३० टक्के सहभाग इत्यादी) या १०० गुणांच्या निकषांवर परीक्षण केले जाईल.स्पर्धेचे सविस्तर निकष, आवश्यक कागदपत्रे आणि अर्जाच्या प्रक्रियेबाबत अधिक माहिती जाणून घेण्यासाठी सर्व सार्वजनिक गणेशोत्सव मंडळांनी १७ ऑगस्ट २०२६ रोजीच्या शासन निर्णयाचे सविस्तर अवलोकन करावे तसेच पु.ल. देशपांडे महाराष्ट्र कला अकादमीच्या अधिकृत संकेतस्थळाला ganeshostav.pldmka.co.in आवर्जून भेट द्यावी. अधिक माहितीसाठी शासन निर्णय महाराष्ट्र शासनाच्या www.maharashtra.gov.in या अधिकृत संकेतस्थळावर देखील उपलब्ध आहे.अमरावती व्हिउत्स्फूर्तपणे सहभाग नोंदवावा, असे आवाहन विभागीय आयुक्त, नयना गुंडे, यांनी केले आहे.

# विद्युत अभियंत्यांचे राष्ट्रीय अधिवेशन आजपासून

### विकसित भारत २०४७ संकल्पना प्रत्यक्षात आणण्यासाठी एआय आणि ग्रीन तंत्रज्ञानाचा वापरवर जोर

**अमरावती/का.प्र.**

इन्स्टिटयूशन ऑफ इंजिनिअर्सच्या वतीने विद्युत अभियंत्यांचे राष्ट्रीय अधिवेशन उद्या शुक्रवार २१ आणि शनिवार २२ ऑगस्ट रोजी अभियंता भवन येथे आयोजित करण्यात आले आहे. या दोन दिवसीय अधिवेशनाचे उद्घाटन शुक्रवार २१ ऑगस्ट रोजी पालकमंत्री चंद्रशेखर बावनकुळे यांच्या हस्ते होणार असल्याची माहिती पत्रकार परिषद मध्ये नगरसेवक प्रा संजय शिरभाते यांनी दिली.



त्यांनी सांगितले की,पंतप्रधान नरेंद्र मोदी यांची विकसित भारत २०४७ ही संकल्पना प्रत्यक्षात आणण्या साठी एआय आणि ग्रीन तंत्रज्ञानाचा वापर करून २०४७ पर्यंत भारतात वीज निर्मितीचे उद्दिष्ट पूर्ण करणे हा या अधिवेशनाचा मुख्य उद्देश आहे.वीज निर्मितीमध्ये पारंपरिक कोळशावरील औष्णिक वीज केंद्रांवरील अवलंबित्व कमी करून सौर ऊर्जा, पवन ऊर्जा आणि जलविद्युत निर्मितीवर भर देण्यात येणार आहे. यामुळे वायू प्रदूषणाचे प्रमाण कमी होऊन भविष्यासाठी वीजेची वाढती मागणी पूर्ण करण्यासाठी आवश्यक वीज वितरण जाळे विकसित करण्यावर भर दिला जाईल. अधिवेशनाच्या उद्घाटन समारंभाला प्रमुख पाहुणे म्हणून प्र कुलगुरु डॉ. महेंद्र ढोरे, आईआयचे राष्ट्रीय अध्यक्ष मनीष कोठारी उपस्थित राहणार आहे. समारंभात उल्लेखनीय कार्य करणाऱ्या विद्युत अभियंत्यांचा गौरवही करण्यात येणार आहे. त्यात वीज कंपनीचे संचालक राजेंद्र पवार यांच्यासह राष्ट्रीय प्रद्योगीकी संस्थांचे संचालक डॉ मोहन आवारे, बीएचई एल चे कार्यकारी अभियंता अरुण मोझी, आणि मराठवाड्यातील सुप्रसिद्ध उद्योजक प्रभात पवार यांचा सत्कार होईल.दोन दिवस चालणाऱ्या या अधिवेशनात विविध विषयांवर चर्चासत्रे आयोजित केली जाणार आहेत.उद्योग, संशोधन आणि शैक्षणिक क्षेत्रातील अभियंत्यांची भूमिका या विषयावर १०० हून अधिक शोधनिबंध सादर केले जाणार आहेत. त्यांचे सादरीकरणही या अधिवेशनात होणार आहे.एआयचा वापर करून भविष्यातील वीज मागणी, वीजेचा कार्यक्षम वापर आणि वितरण प्रणाली यावर सखोल मंथन केले जाईल. पत्रकार परिषद मध्ये आनंद जवंजाळ, सुनील राठी, शरद मोहोड, गणेश बारब्दे, राम दिघे, जीवन सदार आदि उपस्थित होते.

# आर्थिक सक्षमीकरणासाठी सुलभ कर्ज आणि स्वयंरोजगाराच्या संधी उपलब्ध-आ. सुलभा खोडके

### अमरावती जिल्हा महिला सहकारी बँकची ५१ वी वार्षिक सर्वसाधारण सभा

**अमरावती/का.प्र.**

आर्थिक सक्षमीकरणासाठी सुलभ कर्ज आणि स्वयंरोजगाराच्या संधी उपलब्ध करून देणे याकरिता आपण सातत्याने प्रयत्नरत आहोत. महिलांच्या आर्थिक सबळीकरणाचे एक आगळेवेगळे महत्व आहे. नोकरी आणि व्यवसायात महिलांना पुरुषाप्रमाणे समान संधी मिळते. आर्थिक सक्षमीकरणामुळे महिलांचा आत्मसन्मान वाढतो व त्या स्वतंत्र होतात. महिलांच्या उत्पन्नात वाढ झाल्यास संपूर्ण कुटुंबाचे राहणीमान सुधारते. आर्थिक सुबत्तेमुळे घरातील व समाजातील निर्णय प्रक्रियेत महिलांचा सहभाग वाढतो.




महिलांच्या ऐक्यशक्तीच्या माध्यमातून सामूहिक आर्थिक प्रगती साधणे याला आपले सर्वतोपरी प्राधान्य आहे. असे प्रतिपादन आमदार सुलभा खोडके यांनी उपस्थितांना संबोधून केले.

अग्रसेन भवन, रायली प्लॉट येथे अमरावती जिल्हा महिला सहकारी बँक लि., अमरावती च्या ५१ व्या वार्षिक सर्वसाधारण सभेत त्या बोलत होत्या.अमरावती जिल्हा महिला सहकारी बँक लि.,अमरावतीच्या अध्यक्ष आ.सुलभा खोडके यांच्या अध्यक्षतेत पार पडलेल्या या ५१ व्या वार्षिक सर्वसाधारण सभेत व्यासपीठावर बँकेच्या उपाध्यक्ष - ज्योत्स्ना कोरपे, संचालिका पुष्पा गावंडे, संजीवनी देशमुख, उषा उपाध्याय, सुचिता काळे,ज्योती धोपटे, सोनाली पाटील,मंदाकिनी बागडे,प्रीती पाल,रेश्मा सावरकर, अंजली चौधरी,मंगला कोहळे,सुधा पाटील,हर्षा जगताप,दर्शना देशमुख,निता मिश्रा,दीपाली भेटाळू, अर्चना शिंदे,माधुरी ठाकरे, तज्ज्ञ संचालक एच. ई. गावंडे, प्रभारी मुख्य कार्यकारी अधिकारी ऋषिकेश एस. भामोदकर आदी उपस्थित होते.

सर्वप्रथम बँकेच्या अध्यक्षा आ.सुलभा खोडके यांच्या हस्ते माँ लक्ष्मी यांच्या प्रतिमेस वंदन-पूजन व माल्यार्पण करण्यात आले. तदनंतर अहवाल वर्षात दिवंगत झालल्यांना श्रद्धांजली अर्पण केली. वार्षिक सर्वसाधारण सभे दरम्यान सभेपुढील विषय तालीकेनुसार ५० व्या वार्षिक सर्वसाधारण सभेचे इतिवृत्त वाचून कायम करण्यात आले. तदनंतर बँकेच्या ३१ मार्च २०२६ अखेर संपलेल्या वर्षाचा अहवाल करण्यासह त्यास मंजुरी देण्यात आली. यासोबतच बँकेच्या सन २०२६-२०२७ या आर्थिक वर्षाचे अंदाजपत्रक मंजूर करणे व सन २०२५-२०२६ मधील मंजूर अंदाज पत्रकापेक्षा कमी / जास्त झालेल्या खर्चास मंजुरी देण्यात आली. यासोबतच सभेपुढील अन्य विषयांना घेऊन मंजूरात देण्यात आली. बँकेच्या उपलब्ध सेवेचा सर्वांनी लाभ घ्यावा, असे आ.सुलभा खोडके यांनी यावेळी उपस्थितांना आवाहन केले. वार्षिक सर्वसाधारण सभेदरम्यान सर्व विषय व ठरावांना यावेळी उपस्थित सभासदांनी हात उंचावीत एकमताने मंजुरी देत बँकेच्या प्रगती व गतिमान भरारीसाठी सुलभा खोडकेंच्या नेतृत्वात आपली कटीबद्धता व्यक्त केली. यावेळी अमरावती जिल्हा महिला सहकारी बँकेचे सभासद तसेच कर्मचारी प्रामुख्याने उपस्थित होते. यावेळी उपस्थित सभासदांना बँकेच्या ५१ वा वार्षिक अहवाल २०२५-२०२६ च्या पुस्तिकेचे वाटप करण्यात आले.

## संक्षिप्त

### कुलगुरूंनी उपस्थितांना दिली सद्भावना दिनाची प्रतिज्ञा



**अमरावती-** भारताचे माजी पंतप्रधान भारतरत्न राजीव गांधी यांची जयंती सद्भावना दिन म्हणून विद्यापीठात साजरी करण्यात आली. याप्रसंगी कुलगुरू डॉ. मिलींद बारहाते यांनी विद्यापीठाच्यावतीने माजी पंतप्रधान राजीव गांधी यांच्या प्रतिमेचे पूजन व पुष्पार्पण करुन अभिवादन केले व उपस्थितांना सद्भावना दिनाची प्रतिज्ञा दिली. जयंती कार्यक्रमाला व्यवस्थापन परिषद सदस्य डॉ.आर.डी. सिकची, कुलसचिव डॉ. अविनाश असनारे, उपकुलसचिव (आस्था) मंगेश वरखेडे, आजीवन अध्ययन व विस्तार विभागाचे संचालक डॉ. श्रीकांत पाटील, उपकुलसचिव (माक) डॉ. दादाराव चव्हाण, उपकुलसचिव (विकास) डॉ. सुलभा पाटील, सहा. कुलसचिव डॉ. साक्षी ठाकुर, अधीक्षक (प्रशासन) डॉ. धनंजय पाटील, डॉ. आंबेडकर अभ्यास केंद्राच्या समन्वयक डॉ. अरुणा वाडेकर तसेच विद्यापीठाचे अधिकारी व कर्मचारी उपस्थित होते. संचालन व माजी पंतप्रधान राजीव गांधी यांच्याबद्दल माहिती डॉ. धनंजय पाटील यांनी दिली.

### सेंट्रल बँक ऑफ इंडिया तर्फे आज विविध कर्ज वितरण शिबीर

**अमरावती-** सेंट्रल बँक ऑफ इंडियाच्या वतीने २१ ऑगस्ट रोजी सायंकाळी ७.०० वाजता गाडगे बाबा महाराज हॉल, गाडगे नगर येथे विविध किरकोळ कर्ज योजनांची माहिती देण्यासाठी ‘ विविध कर्ज वितरण शिबीरा’चे आयोजन करण्यात आले आहे.शिबीरामध्ये नागरिकांना सेंट्रल बँक ऑफ इंडियाच्या विविध किरकोळ कर्ज योजनांची सविस्तर माहिती देण्यात येणार आहे. यामध्ये गृह कर्ज, वाहन कर्ज, गोल्ड लोन, पर्सनल लोन तसेच मॉर्टगेज लोन यांचा समावेश आहे. ग्राहकांना बँकेच्या विविध कर्ज योजनांच्या अटी, पात्रता, आवश्यक कागदपत्रे तसेच उपलब्ध व्याजदर याबाबत मार्गदर्शन करण्यात येणार आहे.कार्यक्रमास सेंट्रल बँक ऑफ इंडियाचे वरिष्ठ क्षेत्रीय प्रबंधक सुनील पाण्डेय यांची प्रमुख उपस्थिती राहणार असून, विविध शासकीय विभागांचे वरिष्ठ अधिकारीही उपस्थित राहणार आहेत. नागरिकांनी मोठ्या संख्येने या शिबिराला उपस्थित राहून बँकेच्या विविध कर्ज योजनांची माहिती घेऊन त्याचा लाभ घ्यावा, असे आवाहन अग्रणी जिल्हा व्यवस्थापक नरेश हेडाऊ यांनी केले आहे.

### आयुक्त कार्यालयात कर्मचाऱ्यांची सद्भावना प्रतिज्ञा



**अमरावती-** सद्भावना दिनानिमित्त विभागीय आयुक्त कार्यालय, अमरावती येथे विभागीय आयुक्त नयना गुंडे यांच्या अध्यक्षतेखाली अधिकारी व कर्मचाऱ्यांनी सद्भावना प्रतिज्ञा घेतली.यावेळी विभागीय आयुक्त नयना गुंडे यांनी उपस्थित अधिकारी व कर्मचाऱ्यांना सद्भावना दिनाची प्रतिज्ञा दिली.जात, वंश, धर्म, प्रदेश किंवा भाषा यावरून कोणताही भेदभाव न करता सर्व भारतीय जनतेमध्ये भावनिक ऐक्य व सामंजस्याची भावना वृद्धिंगत करण्यासाठी कार्य करण्याचा संकल्प यावेळी करण्यात आला.सद्भावना, शांतता, परस्पर आदर आणि बंधुभावाच्या माध्यमातून समाजात एकोपा निर्माण करण्याचा संदेश यावेळी देण्यात आला. राष्ट्रीय एकात्मता व सामाजिक सलोखा अधिक बळकट करण्यासाठी सर्वांनी सकारात्मक योगदान देण्याचा संकल्प केला.कार्यक्रमास अपर आयुक्त (विकास/आस्थापना) संतोष कवडे, उपायुक्त (पुरवठा) नरेंद्र वंजारी, तहसीलदार अनिता झाडे, सागर ढोमसे, नायब तहसीलदार श्यामसुंदर देशमुख, संजय मुरतकर, मधुकर धुळे, संदिप टांक, आदि अधिकारी व कर्मचारी उपस्थित होते.

## बांधकाम विभागातील कामांना गती देण्याचे आयुक्तांचे निर्देश

### प्रलंबित विकासकामे तातडीने मार्गी लावण्यावर भर; गुणवत्ता आणि वेळेचे नियोजन करण्याच्या सूचना

**अमरावती/का.प्र.**



अमरावती महानगरपालिकेचे आयुक्त डॉ. मंगेश गोंदावले यांनी महानगरपालिकेच्या बांधकाम विभागाचा सविस्तर आढावा घेतला. यावेळी शहरात प्रस्तावित करण्यात येणाऱ्या विविध विकासकामांच्या अंदाजपत्रकासोबत आवश्यक माहिती आणि कागदपत्रे सादर करण्याबाबत त्यांनी संबंधित अधिकाऱ्यांना स्पष्ट व काटेकोर निर्देश दिले.

प्रस्तावित विकासकामांचे अंदाजपत्रक सादर करताना केवळ कामाचा खर्च अथवा तांत्रिक बाबी नमूद न करता त्या कामाची आवश्यकता, सद्यस्थिती आणि प्रत्यक्ष स्थळाची माहिती स्पष्टपणे नमूद करण्यात यावी, असे आयुक्त डॉ. मंगेश गोंदावले यांनी सांगितले. यामुळे प्रस्तावित कामाची गरज, त्याची उपयुक्तता आणि प्रत्यक्ष परिस्थिती याबाबत प्रशासनाला योग्य निर्णय घेणे सुलभ होणार आहे.

आढावा बैठकीत आयुक्तांनी बांधकाम विभागामार्फत सुरू असलेल्या विविध विकासकामांची सद्यस्थितीही जाणून घेतली. प्रलंबित कामांमागील कारणांचा आढावा घेऊन आवश्यक त्या उपाययोजना कराव्यात आणि नागरिकांच्या दैनंदिन जीवनाशी संबंधित कामांना प्राधान्य देऊन ती निर्धारित वेळेत पूर्ण करावीत, असे निर्देश त्यांनी दिले.रस्ते, नाली बांधकामे, कॉंक्रीट व डांबरी रस्ते, पेव्हिंग ब्लॉक तसेच इतर नागरी सुविधा उपलब्ध करून देणाऱ्या कामांमध्ये गुणवत्तेशी कोणतीही तडजोड होऊ नये, यावरही आयुक्तांनी भर दिला. विकासकामाचे अंदाजपत्रक तयार करताना कामाचे नाव, प्रस्तावित करण्याचे कारण, स्थळ निरीक्षणाची तारीख व वेळ, GPS फोटोग्राफ्स, कामाचा प्रकार, प्रस्तावित कामाचा प्रकार, पूर्वी झालेल्या कामाचे अंदाजे वर्ष, अंदाजपत्रकातील समाविष्ट बाबी तसेच काम पूर्ण झाल्यानंतर नियमानुसार फलक लावण्याची तरतूद या सर्व बाबींचा समावेश आहे किंवा नाही, याची विभागप्रमुखांनी काटेकोरपणे तपासणी करावी, असे आयुक्तांनी स्पष्ट केले.बैठकीस अतिरिक्त आयुक्त महेश देशमुख, उपायुक्त नरेंद्र वानखडे, शहर अभियंता श्रीधर कांबळे, कार्यकारी अभियंता सुहास चव्हाण, उपअभियंता, अभियंता, बांधकाम विभागातील कर्मचारी उपस्थित होते.

जनमाध्यम
एक प्रतिष्ठित सवय

# जलसंधारणाच्या उपाययोजना

कमी पाण्यामध्ये जास्त फायदा घेण्यासाठी शेतकऱ्यांनी जलसंधारणाच्या उपाययोजना आपल्या शेतीमध्ये करणे गरजेचे आहे. त्यामुळे शेतीमधील पिकांमध्ये तसेच उत्पादनामध्ये प्रचंड वाढ होऊ शकते. त्याबरोबरच शेतीसाठी लागणाऱ्या पाण्याचे काटकसरीने वापर केला जाऊ शकतो व कमी पाण्यात बहारदार शेतीचा प्रयोग करता येऊ शकतो या पार्श्वभूमीवर शेतकऱ्यांनी जलसंधारणाच्या उपाययोजनांचा कल्पकतेने वापर केला पाहिजे मृद व जलसंधारणाच्या पद्धतींचा वापर करताना पाऊसमान, जमिनीचा प्रकार, उतार, जमिनीची खोली आणि जमिनीवरील आच्छादन या बाबी लक्षात घ्याव्यात. ज्या ठिकाणी कमी पाऊस, कमी उतार व कमी खोलीच्या जमिनी आहेत, अशा ठिकाणी जागच्या जागी पाणी मुरविण्याच्या पद्धतींचा अवलंब करावा. ज्या ठिकाणी जास्त पाऊस आणि जास्त उताराच्या जमिनी आहेत, अशा ठिकाणी मूलस्थानी जलसंधारणाबरोबर अभियांत्रिकी कामे करून मृद व जलसंधारणाचे उपाय करावेत.

जमिनीच्या उतारानुसार जमिनीचे निरनिराळे भाग करावेत. त्यानुसार बांध टाकावेत, बांधाच्या आतील भागाचे सपाटीकरण करावे. सध्याच्या काळात फुटलेले बांध दुरुस्त करावेत. योग्य ठिकाणी सांडवा ठेवावा. त्यामुळे जादा झालेले पाणी सुरक्षितरीत्या शेताबाहेर काढता येते. सांडव्यामधून माती वाहून जाऊ नये म्हणून त्यामध्ये दगडी बांध घालावेत. मातीचे बांध पुन्हा पावसाने फुटू नयेत यासाठी पावसाळ्यात त्यावर स्टायलो, मद्रास अंजन, खस, सुबाभूळ, ग्लिरिसिडियाची लागवड करावी.जमिनीची प्राथमिक मशागत केल्यानंतर पाऊस जागच्या जागी मुरविण्यासाठी मूलस्थानी जलसंधारण पद्धतीचा अवलंब करावा. शेतामध्ये जादा होणारे पाणी शेताबाहेर

**राज्यात यंदा २१ ऑगस्ट हा 'जलसंधारण दिन' तसेच १५ ऑगस्ट २०२६ ते २६ जानेवारी २०२७ या कालावधीत 'जलसंधारण अभियान' राबविण्यात येत आहे. माजी मुख्यमंत्री दिवंगत सुधाकरराव नाईक यांच्या जयंतीनिमित्त साजरा होणारा हा जलसंधारण दिन त्यांच्या जलसंधारण विषयक दूरदृष्टीला अभिवादन करण्याबरोबरच महाराष्ट्राच्या जलसुरक्षित भविष्यासाठी नव्या संकल्पाची सुरुवात ठरणार आहे. या जलसंधारण अभियानाच्या निमित्ताने जलसंधारणाच्या विविध उपाययोजनाविषयी ही माहिती....**




काढण्यासाठी योग्य ठिकाणी ढाळीचे बांध ठेवावेत. जादा झालेले पाणी हे पाणी वाहून नेणाऱ्या चरामध्ये सोडावे. हा चर गवताने आच्छादित करावा. चराच्या उताराबद्दल काळजी घ्यावी. त्यामुळे जमिनीची धूप होत नाही. शेतातील जादा झालेले पाणी हे योग्य त्या तांत्रिक गोष्टींचा अवलंब करून विहीर किंवा कूपनलिका पुनर्भरणासाठी वापरावे. जादा झालेले पाणी वैयक्तिक किंवा सामूहिक स्तरावर शेततळे खोदून साठवावे. पाऊस, पाणलोट क्षेत्र, जमिनीचा प्रकार, उतार, पीक पद्धती इत्यादींचा विचार करून शेततळ्याचे आकारमान व ठिकाण ठरवावे. पाझर तलाव, बंधारे इत्यादींची साठवणक्षमता अबाधित ठेवण्यासाठी त्यामधील गाळ काढावा, त्यांची दुरुस्ती करावी.

### मृद व जलसंधारणाच्या पद्धती

मृद व जलसंधारणाच्या पद्धतींचा वापर हा पाऊसमान, जमिनीचा प्रकार, जमिनीचा उतार, जमिनीची खोली आणि जमिनीवरील आच्छादन इत्यादी बाबी लक्षात घेऊन करावा. ज्या ठिकाणी कमी पाऊस, कमी उतार व कमी खोलीच्या जमिनी आहेत, अशा ठिकाणी जागच्या जागी पाणी मुरविण्याच्या पद्धतींचा अवलंब करावा. ज्या ठिकाणी जास्त पाऊस आणि जास्त उताराच्या जमिनी आहेत, अशा ठिकाणी मूलस्थानी जलसंधारणाबरोबर अभियांत्रिकी कामे करून मृद व जलसंधारणाचे उपाय करावेत. या पद्धती अत्यंत परिणामकारक आणि कमी खर्चाच्या आहेत. या पद्धतीमध्ये जागच्या जागी जमिनीत पाणी मुरविले जात असल्यामुळे अभियांत्रिकी मृद व जलसंधारण पद्धतीपेक्षा बाष्पीभवन कमी होते.

### भौतिक पद्धती

अवर्षणप्रवण विभागात ८० टक्के क्षेत्र रब्बी पिकाखाली असते. या प्रचलित रब्बी पीकपद्धतीमध्ये पावसाळ्यात म्हणजे खरीप हंगामात बहुधा पीक घेतले जात नाही. त्यामुळे खरीप हंगामात जमिनीस पिकाचे पांघरुण मिळत नाही. रब्बी हंगाम हा पिकांचा दुसरा हंगाम पावसाळ्याच्या शेवटी सुरू होतो. या हंगामात पिकांना प्रत्यक्ष पावसाचे पाणी फारसे मिळत नाही. खरीप हंगामात पडलेले पावसाचे पाणी भारी खोल जमिनीत खरीप पिके न घेता मुरविले जाते आणि जमिनीतील ओलावा वाढविला जातो. अशा जमिनीत रब्बी हंगामातील पिके चांगली येतात.

### सपाट वाफे

कोरडवाहू शेतीमध्ये जेथे पाणी मुरण्याचा वेग जास्त आहे आणि जमिनीला फारसा उतार नाही, अशा ठिकाणी उताराला आडवे वाफे तयार करावेत. वाफे तयार करताना प्रथम कुळवाची पाळी द्यावी. त्यानंतर बळिराम नांगराने उभे-आडवे ६ मीटर ˘ ६ मीटर अंतरावर उतारास आडवे सपाट वाफे तयार करावेत. वरंब्याची उंची साधारणपणे २० ते ३० सें.मी. ठेवावी. असे वाफे जागोजागी पाणी मुरविण्यास मदत करतात. त्यामुळे जमिनीमध्ये नेहमीपेक्षा ५० टक्के जास्त ओल साठविली जाते.

### सरी वरंबे

मध्यम ते भारी जमिनीत बळीराम नांगराने उतारास आडवे तास घालावे. त्यामुळे सऱ्या तयार होतात आणि पडणाऱ्या पावसाचे पाणी सऱ्यांमधून जमिनीत मुरते. या पद्धतीत ८० टक्क्यांपर्यंत पाणी जमिनीत मुरते. जमिनीतून माती वाहून जात नाही. सऱ्यांची लांबी साधारणतः ९० मीटरपर्यंत ठेवावी. या पद्धतीमुळे उत्पादनात ३५ ते ४० टक्के वाढ दिसून येते.

### बंदिस्त सरी वरंबे

या पद्धतीत मुख्य वरंबे उताराला आडवे ठेवावेत, तर बंदिस्त वरंबे उताराच्या दिशेने ठेवावेत. अशा रीतीने उताराला आडवे बंदिस्त सरी वरंबे तयार होतात. मुख्य वरंब्याची उंची ६ मीटर व उंची ३० सें.मी. ठेवावी, तर बंदिस्त वरंब्याची उंची २० सें.मी. व दोन वरंब्यांतील अंतर ३ मीटर ठेवावे. या पद्धतीत जास्त पाऊस पडला तरी बंदिस्त वरंबे फुटून संथ गतीने पाणी शेतातून बाहेर जाते. ही पद्धत कोरडवाहू भागात चोपण व क्षारयुक्त जमिनीत पाणी मुरविण्यासाठी उपयुक्त असून, त्यामुळे जमिनीतील विद्राव्य क्षारांचे प्रमाण कमी होण्यास मदत होते.

मृद व जलसंधारणाची अभियांत्रिकी कामे मूलस्थानी जलसंधारणाच्या कामांबरोबरच मृद व जलसंधारणाचे अभियांत्रिकी उपचार पाणलोट क्षेत्र विकासाच्या माथा ते पायथा या सूत्रानुसार करावेत.

### तुटक व सलग समतल चर

पाणलोट क्षेत्राच्या माथ्यावरील पडीक जमिनीच्या पृष्ठभागावरून वाहून जाणारे पाणी अडविण्यासाठी सलग समतल चराचा वापर करतात. यासाठी समपातळी रेषेवर ३० सें.मी. खोल व ६० सें.मी. रुंद असे सलग चर खोदावेत. या चरातून निघणारी माती चराच्या खालच्या बाजूस लावावी. त्यामुळे दोन चरांमधील पट्ट्यामध्ये ओलावा दीर्घ काळ राहतो.

या ओलाव्याचा फायदा गवताची वाढ चांगल्या प्रकारे होण्यास होते. शिवाय जमिनीवरून वाहून जाणाऱ्या पाण्याचा प्रवाह थांबविला जातो. चराच्या खालच्या बाजूस जो बांध तयार होतो, त्यावर झाडे लावता येतात. तुटक समतल चर हा सलग समतल चरासारखाच असून, यामध्ये समतल चर हा सलग नसून, तुटक स्वरूपात असतो.

### शेततळे

पावसाचे वाहून जाणारे पाणी जमा करण्यासाठी आणि त्याचा पुन्हा वापर करण्यासाठी पाणलोट क्षेत्रात योग्य ठिकाणी शेततळे खोदावे. जमिनीवरून वाहून जाणारे पाणी शेततळ्याकडे वळविण्यासाठी योग्य ठिकाणी गवत लागवड केलेली चारी तयार करावी. शेततळ्यामुळे जमिनीतील पाण्याची पातळी वाढविण्यास मदत होते. शेततळ्यास योग्य पद्धतीचे अस्तरीकरण केल्यास त्यामध्ये पाणी जास्त काळ साठविता येते. हे साठविलेले पाणी पिकास आणि फळबागेस निकडीच्या अवस्थेत संरक्षित पाणी म्हणून वापरावे.

### सिमेंट नालाबांध

सिमेंट नालाबांधामुळे मोठ्या प्रमाणावर पाण्याचा साठा अडवून जवळपासच्या विहिरीतील पाण्याची पातळी वाढते. भूपृष्ठावरून वाहणाऱ्या पाण्याची गती कमी करून थांबविणे, बांधाच्या प्रभाव क्षेत्रातील भूगर्भातील पाण्याची पातळी वाढविणे आणि त्याद्वारा सिंचन क्षेत्रात वाढ करणे, हे सिमेंट नालाबांधाचे उद्देश आहेत. सिमेंट नालाबांधासाठी जागेची निवड करताना नाल्याची रुंदी ५ ते ३० मी.पर्यंत असावी, तसेच नाल्याचे पाणलोट क्षेत्र ४० हेक्टरपासून १०० हेक्टरपर्यंत असावे. नाल्याच्या दोन्ही बाजूंस स्थिर काठ असावेत. नाल्याच्या तळाचा उतार तीन टक्क्यांपेक्षा जास्त असू नये. नाला काठापासून नाल्याच्या तळापर्यंत कमीत कमी दोन मीटर खोली असावी. नालाबांधाच्या क्षेत्रातील जमिनीचा सामू ६.५ ते ८ च्या दरम्यान असावा, जेणेकरून बांधाशेजारची जमीन चिबडयुक्त होणार नाही. नाल्याच्या दोन्ही बाजूंस म्हणजेच बांधाच्या वरील व खालील बाजूस ३० मी. अंतरावर कोठेही वळण किंवा अडथळा नसावा. सिमेंट नालाबांध गाळाने भरू नये म्हणून पाणलोट क्षेत्रात गाळप्रतिबंधक कामे पूर्ण झालेली असावीत. सिमेंट नाला बंधाऱ्याची साठवणक्षमता अबाधित राखण्यासाठी दर पाच वर्षांनी गाळ काढावा. जलसंधारणाच्या विविध उपायोजनांची राज्यातील शेतकऱ्यांनी अंमलबजावणी केल्यास मृद व जलसंधारणाच्या बरोबरच आपला उत्कर्ष साध्य होऊ शकेल.

**विभागीय माहिती कार्यालय,**
अमरावती

# कष्ट करून मोठे होऊ ! परंतु पर्याय कुठे आहेत?

**शिक्षण, नोकरी, उपजीविका, शेती आणि शेती प्रश्नांचा मोठा गुंता, लग्न न होणे अशा सर्व पार्श्वभूमीवर युवा वर्ग चक्रव्यूहामध्ये अडकलेल्या अभिमन्यूसारखा वाटतो. त्यांचे प्रश्न आणि त्यावरील उपाय अशी चर्चा सुरू करून त्यांच्या ऊर्जेला दिशा देणे हेच आपले व्यवस्था म्हणून कर्तव्य असले पाहिजे. परंतु तशी चर्चासुद्धा होत नाही, हेच मोठे दुर्दैव !!**

जगभरातील अर्थतज्ज्ञांची एक मान्यता अशी आहे, की कोणत्याही देशाला विकसित अर्थव्यवस्था व्हायचे असेल तर त्या देशांमधील लोकांचे शेतीवरील अवलंबित्व कमी केले पाहिजे. शेतीतून बाहेर पडण्याची प्रक्रिया ही निरंतर सुरू असते. म्हणजे आज शहरांमध्ये असणाऱ्या लोकांचे मूळ हे कधीतरी शेतीमध्ये होते. त्यांना उपजीविका साधनांचे पर्याय मिळतात आणि ते शेती सोडून शहरांमध्ये वास्तव्यास जातात. उपजीविका साधनांचे पर्याय हे चांगले शिक्षण, कौशल्य विकास, उद्योग व्यवसाय अशा मार्गातून वाढत असतात. तशी प्रक्रिया देश स्वतंत्र झाल्यापासून आपल्याला दिसून येते. आज महाराष्ट्र राज्याचा विचार केला तर राज्याचे नागरीकरण जवळपास ५० टक्क्यांपर्यंत पोहोचले आहे.

परंतु एक आकडेवारी अशी सांगितली जाते, की २०२० नंतर शेतामध्ये काम करणाऱ्या



लोकांची संख्या ही देशपातळीवर सुमारे आठ कोटींनी वाढलेली आहे. त्याला जोडून दुसरी एक आकडेवारी अशी आहे, की एकूण पदवीधर झालेल्या युवा वर्गापैकी ५० टक्के युवकांनासुद्धा काम उपलब्ध नाही. काम उपलब्ध नाही, याचा अर्थ त्यांना केवळ नोकरी नाही असे नसून त्यांना उपजीविका साधनांचा कोणताही पर्याय उपलब्ध नाही. पदवीधर झालेला ग्रामीण युवक अगदी पोलिस भरती, स्पर्धा परिक्षेची तयारी करतो, त्याचा नोकरीची शोध सुरू राहतो. त्यामध्ये अपयश आल्यानंतर त्याला उपजीविका करण्यासाठी कोणताही पर्याय राहत नाही. त्यामुळे तो शेतीमध्ये ढकलला जातो. त्या आठ कोटींमध्ये असे शेतीमध्ये ढकललेले अनेक युवक असतील. जर ते बागायती शेतीमध्ये गेले तर ठीक, परंतु कोरडवाहू शेतीमध्ये जाणे म्हणजे एका चक्रव्यूहामध्ये अडकणे असेच ठरते. त्यातून सुटका म्हणजे शहरात जाऊन किडा, मुंगी सारखे जीवन व्यतीत करणे, काही संघर्ष करतात, प्रयोग करतात त्याला साथ मिळाली तर यशस्वी होतात, नाही तर अपयश निश्चित मिळते, हे सर्व अपयश हे पर्याय नसल्यामुळे आलेले असते. चांगले शिक्षण उपलब्ध असणे, कौशल्ये विकास, विकासाला पूरक इकोसिस्टीम आकाराला येण्यासाठीच्या पायाभूत सुविधा निर्माण करणे, सिंचन सुविधा निर्माण करणे या मार्गाने पर्याय निर्माण होत असतात आणि ते सरकारचे काम असते.

# कोरडवाहू शेतकऱ्यांची व्यथा

कोरडवाहू ग्रामीण भागातील युवकांची समस्या हा विषय तुळशी (ता. माढा, जि. सोलापूर) या गावशिवारातील युवकांच्या उदाहरणावरून समजून घेऊयात. माढा तालुक्यामध्ये उजनी धरण तसेच तीन साखर कारखाने आहेत. म्हणजे उसाखाली मोठे क्षेत्र आहे. असे सर्व असताना तुळशी हे दुष्काळी गाव. काही वेळी शेतीला नव्हे तर पिण्याला आणि जनावरांनासुद्धा पाणी उपलब्ध नसते. या गावातील मुख्य व्यवसाय म्हणजे पशुपालन. नावावर शेती म्हणून शेतकरी, परंतु खरे शेतमजूर असणाऱ्यांची संख्या मोठी आहे. या गावातील अनेक तरुण हे इतर गावांमध्ये शेतमजूर म्हणून कामासाठी जातात.

या गावातील महेश बोचरे हा तरुण, घरची तीन एकर शेती. मोठा भाऊ सिद्धेश्वर. महेश सध्या वाहनचालक म्हणून काम करतो. त्याला बीएससीच्या प्रथम वर्षानंतर शिक्षण सोडावे लागले. भाऊ सिद्धेश्वर यास परिस्थितीनुसार सातवीतून शिक्षण सोडावे लागले. महेश नववीत असताना वडिलांचा मृत्यू झाला. घरी तीन एकर शेती, परंतु सिंचनाची मोठी समस्या. अशा सर्व पार्श्वभूमीवर सिद्धेश्वर यांना मजुरी करण्याशिवाय पर्याय राहिला नाही. तर महेश याने शिक्षण सोडून ड्रायव्हर होण्याचा निर्णय घेतला. त्यांच्या वडिलांना फळबागेतील मोठे कौशल्य, ते परिसरातील अनेक फळबागांची कामे कंत्राट पद्धतीने करून द्यायचे, त्यांना फळबागेतील उत्पादनवाढीचे सर्व तंत्रज्ञान आत्मसात झाले होते. मात्र पाणी टंचाईमुळे त्यांना स्वतःची फळबाग करता आली नाही. मुलांना चांगले शिक्षण देता आले नाही. थोडे पाणी असले असते तर भाजीपाला शेतीकरून गुजराण करता आली असती, मात्र तेवढेही पाणी नाही. म्हणजे कोणताच पर्याय नसल्याने दोघे भाऊ शेती आणि मजुरीमध्ये ढकलले गेले. सिद्धेश्वरला सातवीतून शिक्षण सोडावे लागणे आणि महेशला सुद्धा बीएससी पूर्ण न करता येणे याचे मूळ हे त्यांचे वडील कोरडवाहू शेतकरी असण्यात आहे. हे आपण लक्षात घेतले पाहिजे.

कदाचित महेश इंजिनिअर सुद्धा झाला असता. ही भाषा केवळ जर-तरची नाही, कारण त्यांचे वडील शेतमजूर होते. त्यामुळे त्यांना शिक्षणावर खर्च करणे अजिबात शक्य नसणार, हे त्या गावातील इतर उदाहरणावरून सुद्धा आपल्या लक्षात येते. आज ते दोन गायी सांभाळतात, त्यांना गाईची संख्या वाढवता येत नाही, कारण विकत वैरण आणून गाईचे संगोपन हे न परवडण्यासारखे आहे. त्याच बरोबर पेंड आणि इतर संगोपन खर्च सुद्धा वाढत आहे. त्या प्रमाणात दुधाचे भाव वाढत नाहीत. याचाच अर्थ, की त्यांचे पर्याय आक्रसत जात आहेत. त्यामुळे पुढच्या पिढीत सुद्धा त्यांचे शेतमजूर म्हणून असणे निश्चित होत आहे आणि ती निश्चिती करण्यामध्ये आपल्या व्यवस्थेचा अपयश हे मुख्य कारण आहे, असे नक्की म्हणता येतं. त्या गावात मागील दहा वर्षांमध्ये पाच तरुणांना सुद्धा चतुर्थ श्रेणी ते प्रथम श्रेणी अशी नोकरी मिळालेली नाही. काही तरुण भरतीची तयारी करतात. मात्र त्यामध्ये अपयश आले, की शेतमजुरी शिवाय त्यांच्यापुढे पर्याय राहत नाही. गावात किमान दोनशे तरुण आहेत, की ज्यांचे लग्न होत नाही. सिंचन सुविधा असत्या तर त्यांना काही पर्याय उपलब्ध नक्की झाले असते. यावर काही जणांचे असे मत असेल, की अगदी कोरडवाहू भागातील सुद्धा मुलं क्लास वन अधिकारी होतात, नौकरी करतात. अशा अपवादांना उल्लेखून पुढे जाणे हीच फसगत आहे. त्या शाळेत शे पाचशे विद्यार्थी शिकत असतात आणि त्यातील एखादा क्लास वन झाला म्हणजे शिकण्यास गरिबी आडवी येत नसते, असे मानले जाते. परंतु व्यक्ति विकासामध्ये गरिबी किती प्रकारे आडवी येत असते, याचे मोठे संशोधन उपलब्ध आहे. परंतु आपल्याला अपवाद हे प्रातिनिधिक मानण्याची मोठी सवय झालेली आहे.

तुळशी गावातील रणजीत बोचरे हा दुसरा युवक, तो सुद्धा सध्या शेती आणि शेतमजुरी करतो, त्याची सुद्धा समस्या तीच, की शेतीला पाणी नाही. तो आणि त्याचा भाऊ तेजस, हे दोघेही शेतीमध्ये आहेत. तरुण असल्यामुळे त्यांनी द्राक्ष बाग लावण्याचा निर्णय घेतला आहे. त्यातून त्यांना चांगले पैसे मिळतील ही आशा. परंतु यावर्षी त्या गावांमध्ये अत्यंत कमी पाऊस पडल्यामुळे त्यांची चिंता खूप वाढलेली आहे. म्हणजे मी पाहिलेले स्वप्न भंगते, की काय असा घोर त्यांना लागलेला आहे. पाणी विकत आणून देण्याची तयारी त्यांना करावी लागेल. या गावातील अनेक शेतकरी शेजारच्या ऊस असणाऱ्या गावातून पाणी विकत आणतात. थोडक्यात शिकून मोठे होणे, शेतीत कष्ट करून मोठे होणे, ही दोन्ही स्वप्नं ते युवक बघू शकत नाहीत. हे व्यवस्था म्हणून आपले मोठे अपयश. असे अनेक रणजीत आणि महेश तुळशी गावात आहेत. गावाची शीव ओलांडली, की त्यांना समृद्धी दिसते आणि गावात गरीबी समन्यायी पाणी वाटपाची चर्चा सुद्धा त्यांना ऐकू येत नाही. त्यामुळे पाण्याचा कार्यक्षम आणि उत्पादक वापर हा पर्याय त्यांना मिळणे आणखी कठीण.

देशाचे भविष्य हे युवकांच्या हाती असते असे मानले जाते. त्या युवकांची अशी अवस्था झाली आहे, की मला कष्ट करून मोठे व्हायचे आहे, हे स्वप्न सुद्धा ते पाहू शकत नाहीत. त्या आठ कोटींमध्ये अशा युवकांची संख्या मोठी असणार आहे हे नक्की!

**डॉ. सतीश करंडे**

# चीनच्या कुरापतींना भारताचे चोख प्रत्युत्तर

गेल्या काही वर्षांपासून, चीन सातत्याने अरुणाचल प्रदेशचा उल्लेख 'झांगनान' (झांगनान किंवा दक्षिण तिबेट) असा करत आहे आणि तेथील ठिकाणांना काल्पनिक चिनी नावे देत आहे.यावेळी केवळ शाब्दिक निषेध व्यक्त करण्याऐवजी, भारताने आपला अधिकृत सरकारी नकाशा कायदेशीररित्या अद्ययावत करून चीनला जोरदार प्रत्युत्तर दिले आहे.भारतीय सरकारने अरुणाचल प्रदेशातील २७ सामरिक आणि ऐतिहासिक ठिकाणांना त्यांच्या प्रमाणित भारतीय नावांसह औपचारिकपणे समाविष्ट केले आहे, आणि भारतीय सर्वेक्षण विभागाचा अधिकृत राजकीय नकाशा अद्ययावत केला आहे. शी जिनपिंग यांच्या भारत भेटीच्या (सप्टेंबर २०२६ मधील ब्रिक्स शिखर परिषद) अगदी आधी उचललेले हे पाऊल,भारताकडून एक जोरदार भू-राजकीय संदेश म्हणून पाहिले जात आहे.

भारतीय सर्वेक्षण भागाने विभागाच्या नकाशात २७ ठिकाणांचा समावेश करून जोरदार प्रत्युत्तर दिले आहे.यामध्ये २१ निवासी/भूभाग,४ मोक्याच्या खिंडी, १ उंचावरील सरोवर आणि १ युद्ध स्मारक जोडण्यात आले आहे. प्रमुख नावे: यामध्ये लोंगजू, माजा, थाग ला खिंड आणि शेर-ए-थापा स्मारक यांसारख्या ऐतिहासिक आणि संवेदनशील ठिकाणांचा समावेश आहे.१९६२ च्या युद्धातील नायक त्रिलोक सिंग थापा यांच्या स्मृतीप्रित्यार्थ उभारलेले शेर-ए-थापा स्मारक आणि अतिउंचावरील सांभो सरोवर या ऐतिहासिक स्थळांना नकाशात अधिकृत स्थान देण्यात आले आहे.

चीनने २०१७ सालापासून अरुणाचल प्रदेशातील अनेक भागांची नावे बदलून काल्पनिक



चिनी किंवा मँडरीन नावे ठेवण्याचा प्रयत्न चालवला आहे. चीन अरुणाचल प्रदेशला 'झांगनान' किंवा दक्षिण तिबेटचा भाग मानतो.भारताने केवळ चीनच्या या दाव्यांचा तीव्र निषेधच केला नाही, तर स्वतःचा अद्ययावत नकाशा जारी करून अरुणाचल प्रदेशवरील भारताचे सार्वभौमत्व आणि कायदेशीर अधिकार पुन्हा एकदा जागतिक पातळीवर ठामपणे अधोरेखित केले आहेतअरुणाचल प्रदेशचे नाव वारंवार बदलून 'दक्षिण तिबेट' (झांगनान) ठेवण्याच्या चीनच्या कुटिल डावपेचाला हे एक स्पष्ट आणि ठोस नकाशाशास्त्रीय (नकाशा) प्रत्युत्तर आहे.

भारत सप्टेंबर २०२६ मध्ये नवी दिल्लीत ब्रिक्स शिखर परिषदेचे आयोजन करणार आहे, ज्यामध्ये चीनचे राष्ट्राध्यक्ष शी जिनपिंग उपस्थित राहण्याची शक्यता आहे. बैठकीच्या अगदी आधी नकाशा प्रसिद्ध करून, भारताने हे स्पष्ट केले आहे की द्विपक्षीय संबंध सुधारण्याचा प्रयत्न करत असतानाही, तो आपल्या प्रादेशिक अखंडतेशी तडजोड करणार नाही.भारतीय सरकारच्या या निर्णयानंतर लगेचच, चीनच्या परराष्ट्र मंत्रालयाने या नकाशांकनाला 'बेकायदेशीर, निरर्थक आणि अवैध' ठरवत आपली नाराजी व्यक्त केली. तथापि, भारताच्या परराष्ट्र मंत्रालयाने नेहमीप्रमाणेच आपल्या भूमिकेचा पुनरुच्चार केला आहे की, अरुणाचल प्रदेश हा भारताचा अविभाज्य आणि अहस्तांतरणीय भाग होता, आहे आणि नेहमीच राहील.

**प्रा.डॉ.सुधीर अग्रवाल,**
वर्धा
मो.९५६१५९४३०६

### कुठे नेऊन ठेवलाय ?

राज्यातील नेत्यांना..
झालय काय वाफरायला?

दारुड्याला लाजवेल असे
शब्दालंकार
लागलेत वापरायला..

कोणी म्हणतं कलंकीत
कोणी म्हणतय गद्दार

फ्री स्टाईल पाहून
कार्यकर्त्यांची
अवाक झाले सारे मतदार..

महाराष्ट्राच्या उज्वल
परंपरेला- सत्तापिपासुंनी
कलंक लावला राजा
नाही जनाची तर

मनाची ठेवा
कुठे नेऊन ठेवलाय
महाराष्ट्र माझा?

**प्रा. अशोक सारडा,**
मेहकर
मो.९४२१३९४३३९

# मुरूमाचे रात्री उत्खनन; अवैध वाहतुकीला ऊत

## पातूर तालुक्यातील उंबरवाडी परिसरातील प्रकार

■ प्रतिनिधी | खेट्री ■

पातूर तालुक्यातील उंबरवाडी परिसरात रात्रीच्या अंधाराचा फायदा घेत मुरूमाचे उत्खनन करून त्याची अवैध वाहतूक केली जात असल्याचा प्रकार चर्चेत आला आहे. जेसीबीसह यंत्रसामग्रीच्या सहाय्याने रात्रीपासून पहाटेपर्यंत मुरूमाचे उत्खनन केले जात असल्याची माहिती असून, उत्खनन केलेला मुरूम विविध वाहनांद्वारे इतरत्र नेला जात असल्याचे नागरिकांचे म्हणणे आहे. त्यामुळे शासनाचा मोठ्या प्रमाणात महसूल बुडत असल्याचा आरोप होत आहे.

उंबरवाडी परिसरात सुरू असलेल्या या कथित अवैध उत्खननामुळे नैसर्गिक भूभागाची मोठ्या प्रमाणात हानी होण्याची शक्यता असून, पर्यावरणीय परिणामांचाही प्रश्न उपस्थित झाला आहे. मुरूम उत्खनन व वाहतुकीसाठी संबंधितांकडे आवश्यक परवानग्या आहेत का, याची महसूल प्रशासनाने प्रत्यक्ष पाहणी करून तपासणी करावी, अशी मागणी नागरिकांकडून होत आहे. या परिसरात यापूर्वीही मोठ्या प्रमाणात गौण खनिजाचे उत्खनन व वाहतूक झाल्याचा आरोप करण्यात येत आहे.

### महसूल विभागाच्या कारवाईकडे लक्ष



त्यामुळे महसूल विभागाने केवळ कागदोपत्री चौकशी न करता प्रत्यक्ष घटनास्थळी पाहणी करून उत्खननाचे मोजमाप करावे, तसेच वाहतुकीसाठी वापरण्यात आलेल्या वाहनांची तपासणी करावी, अशी मागणी जोर धरत आहे.

### तलाठ्याकडून अहवाल मागविणार

उंबरवाडी परिसरातील शासकीय जागेतील उत्खनन व वाहतुकीच्या प्रकरणाची तातडीने दखल घेण्यात आली आहे. याबाबत तलाठ्याकडून अहवाल मागविण्यात येईल. चौकशी अहवाल प्राप्त झाल्यानंतर प्रत्यक्ष मोजमाप करून दोषी आढळणाऱ्यांविरुद्ध नियमानुसार कारवाई करण्यात येईल, अशी प्रतिक्रिया पातूरचे तहसीलदार राहुल वानखेडे यांनी दिली.

### अधिकारी-मुरूम माफियांच्या कथित संगनमताची चर्चा

उंबरवाडी परिसरात गौण खनिजाच्या उत्खनन आणि अवैध वाहतुकीचा प्रकार वारंवार समोर येत असल्याने महसूल प्रशासनाच्या कार्यपद्धतीवरही प्रश्नचिन्ह उपस्थित होत आहे. यापूर्वी याच परिसरातून हजारो ब्रास मुरूमाचे उत्खनन करून वाहतूक झाल्याचा आरोप नागरिकांकडून करण्यात येत आहे. महसूल विभागातील काही अधिकारी आणि मुरूम व्यावसायिकांमध्ये कथित संगनमत असल्याने शासनाचा लाखो रुपयांचा महसूल बुडत असल्याची चर्चा परिसरात आहे. या आरोपांची प्रशासनाने निष्पक्ष चौकशी करून सत्यता स्पष्ट करावी, अशी मागणी नागरिकांनी केली आहे. आता तहसीलदारांच्या आदेशानंतर महसूल विभाग प्रत्यक्षात कोणती कारवाई करतो, याकडे नागरिकांचे लक्ष लागले आहे.

# कटर हल्ला प्रकरणात आरोपीला न्यायालयाचा दिलासा

## ॲड. श्रीकांत वाहुरवाघ यांच्या प्रभावी युक्तीवादानंतर नियमित जामीन मंजूर

■ प्रतिनिधी | अकोला ■

लोखंडी कटरने गाल, मान आणि शरीरावर वार करून जीवे मारण्याचा प्रयत्न केल्याचा आरोप असलेल्या अजय विजय दामोदर याला न्यायालयाकडून मोठा दिलासा मिळाला आहे. बचाव पक्षाचे अधिवक्ता ॲड. श्रीकांत बी. वाहुरवाघ यांनी केलेल्या प्रभावी युक्तीवादानंतर तदर्थ जिल्हा व सत्र न्यायालय क्रमांक १, अकोला यांनी आरोपीचा नियमित जामीन अर्ज मंजूर केला. १८ ऑगस्ट रोजी न्यायालयाने हा आदेश दिला.

२९ जुलै रोजी सायंकाळी साडेसहा वाजताच्या सुमारास फिर्यादी घरी असताना त्याच्या भावाचा आणि आरोपी अजय दामोदर याचा वाद झाला. हा वाद मिटविण्यासाठी फिर्यादीने मध्यस्थी करण्याचा प्रयत्न केला असता आरोपीने त्याच्यावर धाव घेतल्याचा आरोप फिर्यादीने केला. तसेच खिशातून लोखंडी कटर काढून फिर्यादीच्या डाव्या गालावर, मानेवर आणि शरीराच्या विविध भागांवर वार करून जखमी केल्याचे तक्रारीत नमूद करण्यात आले आहे.

या तक्रारीवरून बोरगाव मंजू पोलिस ठाण्यात आरोपीविरुद्ध गुन्हा क्रमांक ४३९/२०२६ दाखल करण्यात आला. भारतीय न्याय संहितेच्या कलम १०९ (१) अंतर्गत गुन्हा दाखल करून पोलिसांनी आरोपीला अटक केली होती.

अटकेनंतर आरोपीच्या वतीने नियमित जामिनासाठी अकोला जिल्हा व सत्र न्यायालयात अर्ज दाखल करण्यात आला. सुनावणीदरम्यान ॲड. श्रीकांत बी. वाहुरवाघ यांनी आरोपीच्या बाजूने जोरदार युक्तीवाद करत न्यायालयासमोर विविध बाबी मांडल्या. बचाव पक्षाचा युक्तीवाद ग्राह्य धरून न्यायालयाने आरोपीचा जामीन अर्ज मंजूर केला. या प्रकरणात ॲड. श्रीकांत बी. वाहुरवाघ यांना ॲड. यथार्थ आर. वानखडे, ॲड. वैष्णवी हागोणे आणि अमोल धारपवार यांनी सहकार्य केले.

# ‘काळा पोळा’ साजरा करीत शेतकरी १० सप्टेंबरला तहसीलवर धडकणार

- पीक विमा, बोगस बियाण्यांची भरपाई अन् कर्जमाफीच्या मागण्या
- मागण्या मान्य न झाल्यास उच्च न्यायालयात जाण्याचाही इशारा

■ प्रतिनिधी | मूर्तिजापूर ■

खरीप २०२५चा थकीत पीक विमा, बोगस बियाण्यांमुळे झालेल्या नुकसानीची भरपाई आणि कर्जमाफीच्या मागण्यांसाठी मूर्तिजापूर तालुक्यातील शेतकरी १० सप्टेंबर रोजी पोळ्याच्या दिवशी तहसील कार्यालयावर धडकणार आहेत. शासनाच्या दुर्लक्षाचा निषेध म्हणून यंदा ‘काळा पोळा’ साजरा करण्याचा निर्धार शेतकऱ्यांनी केला आहे.

मुख्यमंत्र्यांनी कबूल केलेला १७ हजार ५०० रुपयांचा पीक विमा तातडीने शेतकऱ्यांच्या खात्यात जमा करावा, बोगस बियाण्यांमुळे नुकसान झालेल्या शेतकऱ्यांना रोख भरपाई द्यावी आणि कर्जमाफीच्या यादीतील शेतकऱ्यांना बजावण्यात आलेल्या कोर्ट नोटिसा रद्द कराव्यात, अशा प्रमुख मागण्या आहेत. नियमित कर्जदारांना ५० हजार ते एक लाख रुपयांचे प्रोत्साहनपर अनुदान पोळ्यापूर्वी देण्यात यावे, तसेच शेतकऱ्यांच्या पूर्वपरवानगीशिवाय कर्जाचे पुनर्गठन करणाऱ्या बँका व संबंधित अधिकाऱ्यांवर कारवाई करावी, अशीही मागणी करण्यात आली आहे. पीक विम्याची रक्कम न मिळाल्यास मुंबई उच्च न्यायालयात जनहित याचिका दाखल करण्याचा इशारा शेतकरी नेत्यांनी दिला आहे. या आंदोलनात शेतकरी मंडळाचे अध्यक्ष राजूभाऊ वानखडे, स्वाभिमानी शेतकरी संघटनेचे अध्यक्ष कैलासभाऊ साबळे, मुन्ना नाईकनव्हरे, विकी तिवारी, नंदकिशोर बबानिया, प्रफुल मालदुरे, योगेश सोळंके, विलास गाडेकर, श्रीकृष्ण गुल्हाने आणि अरुण बोंडे यांच्यासह तालुक्यातील असंख्य शेतकरी सहभागी होणार आहेत.

# मोकाट जनावरांचा वर्दळीच्या रस्त्यांवर मुक्तसंचार

- विद्यार्थी, ज्येष्ठ नागरिकांचा जीव टांगणीला
- तेल्हारा नगरपरिषदेच्या दुर्लक्षामुळे नागरिक त्रस्त
- प्रहारची तातडीने बंदोबस्ताची मागणी

■ प्रतिनिधी | तेल्हारा ■

शहरातील विविध भागांत मोकाट जनावरांचा सुळसुळाट वाढल्याने नागरिकांच्या सुरक्षिततेचा प्रश्न ऐरणीवर आला आहे. रस्ते, शाळा परिसर तसेच नागरिकांच्या घरांसमोर जनावरांचे कळप ठाण मांडून बसत असल्याने विद्यार्थी, महिला, ज्येष्ठ नागरिकांसह वाहनचालकांना मोठ्या अडचणींचा सामना करावा लागत आहे. नगरपरिषद प्रशासनाचे या गंभीर समस्येकडे दुर्लक्ष होत असल्याचा आरोप नागरिकांकडून केला जात आहे.

शहरातील प्रमुख रस्त्यांसह अंतर्गत मार्गांवरही मोकाट जनावरांचा वावर वाढला आहे. शाळेत ये-जा करणाऱ्या विद्यार्थ्यांना या जनावरांमधून मार्ग काढताना भीती वाटत असून, काही ठिकाणी विद्यार्थ्यांना दुखापत झाल्याच्या घटनाही घडल्याचे सांगण्यात येत आहे. त्यामुळे पालकांमध्येही चिंतेचे वातावरण निर्माण झाले आहे.

ज्येष्ठ नागरिकांचीही या मोकाट जनावरांमुळे मोठी गैरसोय होत आहे. अचानक जनावर अंगावर धावून येण्याच्या भीतीने रस्त्यावरून चालणेही धोकादायक ठरत आहे. याशिवाय मोकाट जनावरे नागरिकांच्या घरांच्या कंपाउंडमध्ये घुसून नुकसान करीत असल्याच्या तक्रारीही पुढे आल्या आहेत.



मोकाट जनावरांचा तातडीने बंदोबस्त करून नागरिकांना सुरक्षित वातावरण उपलब्ध करून द्यावे, अशी मागणी प्रहार संघटनेचे अकोला जिल्हा महासचिव राजेश पाटील खारोडे यांनी केली आहे. नागरिकांच्या जीवितास धोका निर्माण झाल्यानंतर उपाययोजना करण्यापेक्षा नगरपरिषद प्रशासनाने आताच ठोस कारवाई करावी, अशी अपेक्षाही त्यांनी व्यक्त केली.

‘रस्ते नागरिकांच्या सुरक्षित वावरासाठी आहेत की मोकाट जनावरांच्या धिंगाण्यासाठी, हा प्रश्न आता निर्माण झाला आहे. विद्यार्थ्यांना शाळेत जाताना आणि ज्येष्ठ नागरिकांना रस्त्यावरून चालताना भीती वाटत असेल, तर ही गंभीर बाब आहे. नगरपरिषदेने मोकाट जनावरांना तातडीने पकडून सुरक्षित ठिकाणी बंदिस्त करण्याची व्यवस्था करावी,’ अशी मागणी खारोडे यांनी केली. मोकाट जनावरांच्या समस्येवर कायमस्वरूपी उपाययोजना करण्यासाठी विशेष मोहीम राबवावी, अशी मागणी जोर धरत आहे. आता नगरपरिषद प्रशासन या प्रश्नाची दखल घेऊन कारवाई करणार का, याकडे तेल्हारावासीयांचे लक्ष लागले आहे.

# माहेश्वरी वरिष्ठ नागरिक प्रकोष्ठच्या वतीने वृक्षारोपण मोहिम

■ प्रतिनिधी | अकोला ■

सामाजिक सेवेत सक्रिय माहेश्वरी वरिष्ठ नागरिक प्रकोष्ठच्या वतीने वृक्षारोपण मोहिम राबविण्यात आली.यास उत्स्फूर्त प्रतिसाद मिळाला. प्रकोष्ठचे सहसचिव राजेंद्र चितलांगे यांच्या ६५ व्या वाढदिवसाचे निमित्त साधून हा उपक्रम आयोजित केला गेला. प्रकोष्ठचे अध्यक्ष सुरेश माहेश्वरी यांच्या नेतृत्वात ‘वरिष्ठ प्रकोष्ठ’ यांनी त्यांच्या निवासस्थानी जाऊन त्यांचा सन्मान केला. या वेळी राजेंद्र चितलांगे यांच्या विविध सामाजिक कार्यांचे कौतुक करून त्यांच्या दीर्घायुषी व उत्तम आरोग्याची एकत्रित प्रार्थना करण्यात आली. या पार्श्वभूमीवर परीसरात वृक्षारोपण मोहिम साकार करण्यात आली. या कार्यक्रमात प्रकोष्ठ अध्यक्ष सुरेश माहेश्वरी, प्रवीण मोहता, राजीव मुंदडा, प्रा. गोपीकिशन कासट, भगवानदास तोष्णीवाल आदी उपस्थित होते.

# ‘महावॉकेथॉन-वॉक फॉर वॉटर’मध्ये अधिकाधिक नागरिकांनी उत्स्फुर्तपणे सहभागी व्हावे

■ प्रतिनिधी | अकोला ■

मृद व जलसंधारणाची व्यापक जनचळवळ उभी करण्यासाठी जिल्हा प्रशासन आणि जलसंधारण विभागातर्फे २१ ऑगस्ट रोजी ’महावॉकेथॉन- वॉक फॉर वॉटर’चे आयोजन करण्यात आले असून यामध्ये नागरिक, स्वयंसेवी संस्था, विद्यार्थ्यांनी मोठ्या प्रमाणात सहभागी व्हावे, असे आवाहन जिल्हाधिकारी वर्षा मीना यांनी केले आहे. मृद व जलसंधारण क्षेत्रातील उल्लेखनीय कार्याची दखल घेत माजी मुख्यमंत्री स्व. सुधाकररावजी नाईक यांचा जन्मदिन २१ ऑगस्ट हा जलसंधारण दिन म्हणून साजरा करण्यात येतो. या जलसंधारण दिनानिमित्त राज्यात १५ ते २१ ऑगस्ट दरम्यान ’जलसंधारण सप्ताह’ आयोजित करण्यात आला आहे. तो प्रभावीपणे साजरा करण्याच्या दृष्टीने संबंधित सर्व यंत्रणांनी समन्वयाने कार्यवाही करावी, असे निर्देश जिल्हाधिकारी यांनी दिले आहेत.‘महावॉकेथॉन-वॉक फॉर वॉटर’ या कार्यक्रमांतर्गत २१ ऑगस्ट रोजी सकाळी ७ वाजता माती व पाणी संवर्धन संबंधी जनजागृतीपर रॅलीचे आयोजन केले आहे. सदर रॅली ही अकोला क्रिकेट क्लबच्या मैदानापासून सुरु होऊन एसटी बसस्थानक, अशोक वाटिका चौक, जिल्हाधिकारी कार्यालय, टॉवर चौक ते पुन्हा क्रिकेट क्लब मैदान अशाप्रकारे मार्गक्रमण करेल. या रॅलीमध्ये अधिकाधिक अकोलेकरांनी सहभागी होण्याचे आवाहन जिल्हा प्रशासनाने केले आहे.


**Change In Name**

I Have Changed
My Name From
**NASIM BANU AFSAR KHAN**
**-TO-**
**NASIM BANO YUSUF KHAN**
My Residential Address in:- Near Altaf Hussain Masjid Bharat Nagar Shiloda Akot Fail Shiloda Akola 444006

**Change In Name**

I Have Change My in my Educational Documents etc.From
**AMIT KUMAR RAMESH KUMAR BANGA**
**--TO--**
**AMIT RAMESHKUMAR BANGA**
My Residential Address is Zon No.01 Ward No 23, Dhoni Galli, Balaji Plot, Khamgaon, Buldhana, Maharashtra 444303


## जाहीर नोटीस

**वि.सह दिवाणी न्यायाधीश (क. स्तर) अकोला यांचे न्यायालयात**

एम. जे. सी. नं. १०४१/२०२६ — प्रोसेस नं.८५०७/२०२६
चौ.ता. २१/०९/२०२६ — दिनांक : ०८/०७/२०२६

**अर्जदार :** १. अमित गजानन शर्मा २. आशिष गजानन शर्मा ३. ममता गजानन शर्मा तिघेही रा. अन्नपूर्णा माता मंदिर जवळ, गोकर्णा प्लॉट, डाबकी रोड, अकोला. ता. जि. अकोला.

**विरुध्द**

**गैरअर्जदार :** निल.
**मयताचा पत्ता :-** मयत : गजानन प्रभुदयाल शर्मा
**पत्ता :-** रा. अन्नपूर्णा माता मंदिर जवळ, गोकर्णा प्लॉट, डाबकी रोड, अकोला. ता. जि. अकोला.

या अर्थीउपरोक्त अर्जदार हयांनी मुंबई विनिमय अधिनियम १८२७, कलम २ अन्वये या न्यायालयात वारस प्रमाणपत्र मिळण्यासाठी अर्ज केला आहे. त्या अर्जामध्ये असे नमूद केले आहे की, मयत गजानन प्रभुदयाल शर्मा यांचे दि. ०८/०२/२०२५ रोजी राहते घरी अकोला ता. जि. अकोला येथे निधन झाले आहे.

वरील अर्जदार त्यांचे कायदेशिर वारस आहेत, त्याशिवाय इतर कोणीही मयतास वारस नाही. सबब वारस प्रमाणपत्र मिळण्यास अर्जदारांनी अर्ज दाखल केला आहे.

त्याअर्थी सदर अर्जामध्ये कोणाची कसल्याही प्रकारची हरकत असल्यास दिनांक २१/०९/२०२६) रोजी सकाळी ११:०० वाजता स्वतः जातीने अगर निर्दीष्ट केलेल्या वकीला मार्फत न्यायालयामध्ये हजर होउन आपली लेखी हरकत दाखल करावी. अन्यथा कोणाची कसल्याही प्रकारची हरकत नाही. असे गृहीत धरुन सदर अर्ज निकाली काढण्यात येईल. हयाची नोंद घ्यावी. आज दिनांक ०८/०७/२०२६ रोजी माझे सही व न्यायालयाचे शिक्क्यानिशी दिले.

शिक्का

**आदेशानुसार**
अधिक्षक
दिवाणी न्यायालय (व-स्तर), अकोला

## जाहीर नोटीस

**वि.०२ रे सह दिवाणी न्यायाधीश (क. स्तर) अकोला यांचे न्यायालयात**

एम. जे. सी. नं. १३९३/२०२६ — प्रोसेस नं.१०६५९/२०२६
चौ.ता. ०३/१०/२०२६ — दिनांक : १९/०८/२०२६

**अर्जदार :** श्रीमती. अंतकलाबाई मधुकर जंजाळ रा. खडकी टाकळी, पो. सुकोडा, ता. जि. अकोला.

**विरुध्द**

**गैरअर्जदार :** निल.
**मयताचा पत्ता :-** मयत : अंजनाबाई उदेभान ढोकणे
**पत्ता :-** रा. खडकी टाकळी, ता. जि. अकोला.

या अर्थीउपरोक्त अर्जदार हयांनी मुंबई विनिमय अधिनियम १८२७, कलम २ अन्वये या न्यायालयात वारसा प्रमाणपत्र मिळण्यासाठी अर्ज केला आहे. त्या अर्जामध्ये असे नमूद केले आहे की, मयत अंजनाबाई उदेभान ढोकणे यांचे दि. १४/०२/२०२० रोजी खडकी टाकळी, ता. जि. अकोला. येथे निधन झाले आहे.

वरील अर्जदार त्यांचे कायदेशिर वारस आहेत, त्याशिवाय इतर कोणीही मयतास वारस नाही. सबब वारस प्रमाणपत्र मिळण्यास अर्जदारांनी अर्ज दाखल केला आहे.

त्याअर्थी सदर अर्जामध्ये कोणाची कसल्याही प्रकारची हरकत असल्यास दिनांक ०३/१०/२०२६ रोजी सकाळी ११:०० वाजता स्वतः जातीने अगर निर्दीष्ट केलेल्या वकीला मार्फत न्यायालयामध्ये हजर होउन आपली लेखी हरकत दाखल करावी. अन्यथा कोणाची कसल्याही प्रकारची हरकत नाही. असे गृहीत धरुन सदर अर्ज निकाली काढण्यात येईल. हयाची नोंद घ्यावी. आज दिनांक १९/०८/२०२६ रोजी माझे सही व न्यायालयाचे शिक्क्यानिशी दिले.

शिक्का

**आदेशानुसार**
अधिक्षक
दिवाणी न्यायालय (व-स्तर), अकोला

## जाहीर नोटीस

**वि.०२ रे सह दिवाणी न्यायाधीश (क. स्तर) अकोला यांचे न्यायालयात**

एम. जे. सी. नं. १३०४/२०२६ — प्रोसेस नं.१०३३९/२०२६
चौ.ता. २८/०९/२०२६ — दिनांक : ११/०८/२०२६

**अर्जदार :** १. कमलाबाई श्रीराम खंडारे रा. गिता नगर, वाशिम बायपास रोड, अकोली बु, अकोला, ता. जि. अकोला. २. गोविंदराव राजाराम गोपनारायण रा. बि हाउल चक्की समोर, वार्ड नं. ६९, अकोली बु. गीता नगरच्या मागे, जुना हिंगणा रोड, अकोला, ता. जि. अकोला. ३. समाधान राजाराम गोपनारायण रा. गिता नगर, पोलीस वसाहत, अकोली खु, जुना गाव, अकोला, ता. जि. अकोला. ४. लिला बळीराम पोहरे रा. जान्हवी रॉ हाउस नं. ९, इंद्र नगर, सिडको कॉलनी, नाशिक, ता. जि. नाशिक. ५. रामा रमेश शेगोकार रा. शिव मंदिराजवळ, गोकुळ कॉलनी, अकोला. ता. जि. अकोला. ६. उषा अनिल इंगळे रा. जिवनधारा बिल्डिंग, एसबीआय कॉलनी, शेगाव, ता. शेगाव, जि. बुलढाणा.

**विरुध्द**

**गैरअर्जदार :** निल.
**मयताचा पत्ता :-** मयत : १. राजाराम कोळशीराम गोपनारायण २. सकवारबाई राजारामजी गोपनारायण
**पत्ता :-** रा. अकोली खुर्द, अकोला, ता. जि. अकोला.

या अर्थीउपरोक्त अर्जदार हयांनी मुंबई विनिमय अधिनियम १८२७, कलम २ अन्वये या न्यायालयात वारसा प्रमाणपत्र मिळण्यासाठी अर्ज केला आहे. त्या अर्जामध्ये असे नमूद केले आहे की, मयत राजाराम कोळशीराम गोपनारायण यांचे दि. ०७/०७/१९८७ रोजी अकोली खुर्द, अकोला, ता. जि. अकोला येथे निधन झाले आहे. तसेच मयत सकवारबाई राजारामजी गोपनारायण जि. यांचे दि. २९/११/१९९३ रोजी पोलीस क्वॉर्टर, परतवाडा, अचलपूर, ता. अचलपूर, अमरावती येथे निधन झाले आहे.

वरील अर्जदार त्यांचे कायदेशिर वारस आहेत, त्याशिवाय इतर कोणीही मयतास वारस नाही. सबब वारस प्रमाणपत्र मिळण्यास अर्जदारांनी अर्ज दाखल केला आहे.

त्याअर्थी सदर अर्जामध्ये कोणाची कसल्याही प्रकारची हरकत असल्यास दिनांक २८/०९/२०२६ रोजी सकाळी ९:०० वाजता स्वतः जातीने अगर निर्दष्ट केलेल्या वकीला मार्फत न्यायालयामध्ये हजर होउन आपली लेखी हरकत दाखल करावी. अन्यथा कोणाची कसल्याही प्रकारची हरकत नाही, असे गृहीत धरून सदर अर्ज निकाली काढण्यात येईल. हयाची नोंद घ्यावी. आज दिनांक ११/०८/२०१६ रोजी माझ्या वही व न्यायालयाचे शिक्क्यानिशी दिले.

शिक्का

**आदेशानुसार**
प्र. अधिक्षक
दिवाणी न्यायालय (व-स्तर), अकोला

## जाहीर नोटीस

**वि.०३ रे सह दिवाणी न्यायाधीश (क. स्तर) अकोला यांचे न्यायालयात**

एम. जे. सी. नं. ३७४/२०२६ — प्रोसेस नं.९६९४/२०२६
चौ.ता. २८/०९/२०२६ — दिनांक : २९/०७/२०२६

**अर्जदार :** १. मनोहरराव मोतीरामजी वाणे मो. क्र. ९७३०८२४३०७ २. सौ. रूपाली सुभाषराव जाधव रा. किन्होळा, ता. चिखली, जि. बुलढाणा. ३. ज्योत्सना मनोहरराव वाणे क. १ व ३ दोन्ही रा. मॉ पॅलेस, स्वालंबी नगर, गौरक्षण रोड, सिल्वर आयकॉन बिल्डिंग चे बाजूला, अकोला. ता. जि. अकोला.

**विरुध्द**

**गैरअर्जदार :** १. श्रीमती. यशोदा कमलेश वाणे २. अंजना कमलेश वाणे ३. मिरा कमलेश वाणे सर्व रा. व्दारा विवेक अशोक इंगळे, दर्यापूर रोड, अकोट, ता. अकोट, जि. अकोला. दुसरा पत्ता- विध्यांचल कॉन्व्हेंट, अकोला रोड, अकोट, ता. अकोट, जि. अकोला.
**मयताचा पत्ता :-** मयत : मृणालिनी मनोहरराव वाणे
**पत्ता :-** रा. मॉ पॅलेस, स्वालंबी नगर, गौरक्षण रोड, सिल्वर आयकॉन बिल्डिंग चे बाजूला, अकोला. ता. जि. अकोला.

या अर्थीउपरोक्त अर्जदार हयांनी मुंबई विनिमय अधिनियम १८२७, कलम २ अन्वये या न्यायालयात वारस प्रमाणपत्र मिळण्यासाठी अर्ज केला आहे. त्या अर्जामध्ये असे नमूद केले आहे की, मयत मृणालिनी मनोहरराव वाणे यांचे दि. २७/१२/२०२५ रोजी डॉ. डी. वाय. पाटील हॉस्पिटल, पिंपरी, पिंपरी चिंचवड, हवेली, पुणे येथे निधन झाले आहे.

वरील अर्जदार व गैरअर्जदार त्यांचे कायदेशिर वारस आहेत, त्याशिवाय इतर कोणीही मयतास वारस नाही. सबब वारस प्रमाणपत्र मिळण्यास अर्जदारांनी अर्ज दाखल केला आहे.

त्याअर्थी सदर अर्जामध्ये कोणाची कसल्याही प्रकारची हरकत असल्यास दिनांक. २८/०९/२०२६ रोजी सकाळी ११:०० वाजता स्वतः जातीने अगर निर्दष्ट केलेल्या वकीला मार्फत न्यायालयामध्ये हजर होउन आपली लेखी हरकत दाखल करावी. अन्यथा कोणाची कसल्याही प्रकारची हरकत नाही. असे गृहीत धरुन सदर अर्ज निकाली काढण्यात येईल. हयाची नोंद घ्यावी. आज दिनांक २९/०७/२०२६ रोजी माझे सही व न्यायालयाचे शिक्क्यानिशी दिले.

शिक्का

**आदेशानुसार**
प्र. अधिक्षक
दिवाणी न्यायालय (व-स्तर), अकोला

## जाहीर नोटीस

**वि.०३ रे सह दिवाणी न्यायाधीश (क. स्तर) अकोला यांचे न्यायालयात**

एम. जे. सी. नं. १३७७/२०२६ — प्रोसेस नं.१०४६०/२०२६
चौ.ता. २८/०९/२०२६ — दिनांक : १४/०८/२०२६

**अर्जदार :** १. अनिकेत गजानन ठाकरे २. सविता गजानन ठाकरे ३. अभिषेक गजानन ठाकरे सर्व रा. गुरूप्रसाद, संत तुकाराम चौक, सरस्वती नगर, अकोला. ता. जि. अकोला.

**विरुध्द**

**गैरअर्जदार :** निल.
**मयताचा पत्ता :-** मयत : गजानन एकनाथ ठाकरे
**पत्ता :-** रा. गुरूप्रसाद, संत तुकाराम चौक, सरस्वती नगर, अकोला. ता. जि. अकोला.

या अर्थीउपरोक्त अर्जदार हयांनी मुंबई विनिमय अधिनियम १८२७ कलम २ अन्वये या न्यायालयात वारसा प्रमाणपत्र मिळण्यासाठी अर्ज केला आहे. त्या अर्जामध्ये असे नमूद केले आहे की मयत गजानन एकनाथ ठाकरे यांचे दि. २७/०७/२०२६ रोजी आयकॉन हॉस्पिटल, अकोला. ता. जि. अकोला येथे निधन झाले आहे.

वरील अर्जदार त्यांचे कायदेशिर वारस आहेत, त्याशिवाय इतर कोणीही मयतास वारस नाही. सबब वारस प्रमाणपत्र मिळण्यास अर्जदारांनी अर्ज दाखल केला आहे.

त्याअर्थी सदर अर्जामध्ये कोणाची कसल्याही प्रकारची हरकत असल्यास दिनांक २८/०९/२०२६ रोजी सकाळी ११:०० वाजता स्वतः जातीने अगर निर्दीष्ट केलेल्या वकीला मार्फत न्यायालयामध्ये हजर होउन आपली लेखी हरकत दाखल करावी. अन्यथा कोणाची कसल्याही प्रकारची हरकत नाही. असे गृहीत धरुन सदर अर्ज निकाली काढण्यात येईल. हयाची नोंद घ्यावी. आज दिनांक १४/०८/२०२६ रोजी माझे सही व न्यायालयाचे शिक्क्यानिशी दिले.

शिक्का

**आदेशानुसार**
प्र. अधिक्षक
दिवाणी न्यायालय (व-स्तर), अकोला

## जाहीर नोटीस

**वि. सह दिवाणी न्यायाधीश (क. स्तर) अकोला यांचे न्यायालयात**

एम. जे. सी. नं. १२०४/२०२६ — प्रोसेस नं.९६३९/२०२६
चौ.ता. ०७/०९/२०२६ — दिनांक : २८/०७/२०२६

**अर्जदार :** सुनंदा रतन डोंगरे रा. जेतवन नगर, धोबी खदान, अकोला. ता. जि. अकोला. मो. क्र. ९७३०६८०४३३

**विरुध्द**

**गैरअर्जदार :** निल.
**मयताचा पत्ता :-** मयत : रतन सीताराम डोंगरे
**पत्ता :-** रा. जेतवन नगर, धोबी खदान, अकोला. ता. जि. अकोला. मो. क्र. ९७३०६८०४३३

या अर्थीउपरोक्त अर्जदार हयांनी मुंबई विनिमय अधिनियम १८२७, कलम २ अन्वये या न्यायालयात वारसा प्रमाणपत्र मिळण्यासाठी अर्ज केला आहे. त्या अर्जामध्ये असे नमूद केले आहे की, मयत रतन सीताराम डोंगरे यांचे दि. १३/१०/२०२३ रोजी जेतवन नगर, धोबी खदान, अकोला. ता. जि. अकोला येथे निधन झाले आहे.

वरील अर्जदार त्यांचे कायदेशिर वारस आहेत, त्याशिवाय इतर कोणीही मयतास वारस नाही. सबब वारस प्रमाणपत्र मिळण्यास अर्जदारांनी अर्ज दाखल केला आहे.

त्याअर्थी सदर अर्जामध्ये कोणाची कसल्याही प्रकारची हरकत असल्यास दिनांक ०७/०९/२०२६ रोजी सकाळी १:०० वाजता स्वतः जातीने अगर निर्दष्ट केलेल्या वकीला मार्फत न्यायालयामध्ये हजर होउन आपली लेखी हरकत दाखल करावी. अन्यथा कोणाची कसल्याही प्रकारची हरकत नाही. असे गृहीत धरुन सदर अर्ज निकाली काढण्यात येईल. हयाची नोंद घ्यावी. आज दिनांक २८/०७/२०२६ रोजी माझे सही व न्यायालयाचे शिक्क्यानिशी दिले.

शिक्का

**आदेशानुसार**
प्र. अधिक्षक
दिवाणी न्यायालय (व-स्तर), अकोला

## जाहीर नोटीस

**वि.०२ रे सह दिवाणी न्यायाधीश (क. स्तर) अकोला यांचे न्यायालयात**

एम. जे. सी. नं. १३४६/२०२६ — प्रोसेस नं.१०४६६/२०२६
चौ.ता. २९/०९/२०२६ — दिनांक : १४/०८/२०२६

**अर्जदार :** १. मोहीनी योगेंद्र नातु रा. ए–१, धवलगिरी को ऑप हाउसिंग सोसायटी, स. नं. ३५ / २, प्रतिज्ञा हॉल जवळ, कर्वे नगर, पुणे. ता. जि. पुणे. ४११०५२ २. माधव मुरलीधर घाटे रा. ब्लॉक क. २, बि-५, सर्वत्र सोसायटी, पौड रोड, कृष्णा हॉस्पिटल जवळ, कोथरूड, पुणे. ता. जि. पुणे. ४११०३८ ३. मिलिंद मुरलीधर घाटे रा.. सी-००६, स्प्रिंग फिल्डस सोसायटी, नविन डि. पी. रोड, गणंजय सोसायटी जवळ, कोथरूड, पुणे. ४११०३८ मो. क्र. ९८२२०९३६१२ ४. स्वाती श्रीकांत परांजपे रा. प्लॉट क्र. १७, नॉर्थ अंबाझरी रोड, दास ज्वेलर्स जवळ, शिवाजी नगर, नागपूर, ता. जि. नागपूर. ४४००१०

**विरुध्द**

**गैरअर्जदार :** निल.
**मयताचा पत्ता :-** मयत : मालीनी मुरलीधर घाटे
**पत्ता :-** रा. फ्लॅट नं. एफ-३, विघ्नराजेंद्र अपार्टमेंट, रामदास पेठ, अकोला. ता. जि. अकोला.

या अर्थीउपरोक्त अर्जदार हयांनी मुंबई विनिमय अधिनियम १८२७, कलम २ अन्वये या न्यायालयात वारसा प्रमाणपत्र मिळण्यासाठी अर्ज केला आहे. त्या अर्जामध्ये असे नमूद केले आहे की, मयत मालीनी मुरलीधर घाटे यांचे दि. ०७/०२/२०२१ रोजी सी-००६, स्प्रिंग फिल्डस सोसायटी, नविन डि. पी. रोड, गणंजय सोसायटी जवळ, कोथरूड, पुणे येथे निधन झाले आहे.

वरील अर्जदार त्यांचे कायदेशिर वारस आहेत, त्याशिवाय इतर कोणीही मयतास वारस नाही. सबब वारस प्रमाणपत्र मिळण्यास अर्जदारांनी अर्ज दाखल केला आहे.

त्याअर्थी सदर अर्जामध्ये कोणाची कसल्याही प्रकारची हरकत असल्यास दिनांक १७/०९/२०२६ रोजी सकाळी १:०० वाजता स्वतः जातीने अगर निर्दष्ट केलेल्या वकीला मार्फत न्यायालयामध्ये हजर होउन आपली लेखी हरकत दाखल करावी. अन्यथा कोणाची कसल्याही प्रकारची हरकत नाही, असे गृहीत धरुन सदर अर्ज निकाली काढण्यात येईल. हयाची नोंद घ्यावी. आज दिनांक ०७/०८/२०२६ रोजी माझे सही व न्यायालयाचे शिक्क्यानिशी दिले.

शिक्का

**आदेशानुसार**
प्र. अधिक्षक
दिवाणी न्यायालय (व-स्तर), अकोला

## जाहीर नोटीस

**वि.सह दिवाणी न्यायाधीश (क. स्तर) अकोला यांचे न्यायालयात**

एम. जे. सी. नं. १३४९/२०२६ — प्रोसेस नं.१०३९७/२०२६
चौ.ता. २८/०९/२०२६ — दिनांक : १२/०८/२०२६

**अर्जदार :** १. श्रीमती पुष्पा आनंद बकाल २. संकेत आनंदराव बकाल दोघेही रा. ह. मु. सांगवी खुर्द, ता. जि. अकोला. मो. क्र. ९३५६२१०१२०

**विरुध्द**

**गैरअर्जदार :** निल.
**मयताचा पत्ता :-** मयत : आनंदा श्रीरामजी बकाल
**पत्ता :-** रा. सांगवी खुर्द, ता. जि. अकोला.

या अर्थीउपरोक्त अर्जदार हयांनी मुंबई विनिमय अधिनियम १८२७, कलम २ अन्वये या न्यायालयात वारस प्रमाणपत्र मिळण्यासाठी अर्ज केला आहे. त्या अर्जामध्ये असे नमूद केले आहे की, मयत आनंदा श्रीरामजी बकाल यांचे दि. ०७/०२/२०१२ रोजी राहत्या घरी रिधोरा, ता. जि. अकोला येथे निधन झाले आहे.

वरील अर्जदार त्यांचे कायदेशिर वारस आहेत, त्याशिवाय इतर कोणीही मयतास वारस नाही. सबब वारस प्रमाणपत्र मिळण्यास अर्जदारांनी अर्ज दाखल केला आहे.

त्याअर्थी सदर अर्जामध्ये कोणाची कसल्याही प्रकारची हरकत असल्यास दिनांक २८/०९/२०२६ रोजी सकाळी ११:०० वाजता स्वतः जातीने अगर निर्दीष्ट केलेल्या वकीला मार्फत न्यायालयामध्ये हजर होउन आपली लेखी हरकत दाखल करावी. अन्यथा कोणाची कसल्याही प्रकारची हरकत नाही. असे गृहीत धरुन सदर अर्ज निकाली काढण्यात येईल. हयाची नोंद घ्यावी. आज दिनांक १२/०८/२०२६ रोजी माझे सही व न्यायालयाचे शिक्क्यानिशी दिले.

शिक्का

**आदेशानुसार**
प्र. अधिक्षक
दिवाणी न्यायालय (व-स्तर), अकोला


जनमाध्यम — जनमाध्यम न्युज अँड पब्लीकेशन प्रा.लि.च्या मालकीचे हे वृत्तपत्र मुद्रक, प्रकाशक प्रदीप देशपांडे यांनी प्लॉट नं. बी -५०, सातुर्णा औद्योगिक वसाहत, बडनेरा रोड, अमरावती-४४४६०७ येथे छापून बी-२४ दोरकर हाऊस, महसुल कॉलनी, एसटी स्टॅण्डच्या मागे अकोला - ४४४००१ येथे प्रकाशित केले.

**संपादक - प्रदीप देशपांडे**
संचालक (वृत्त) - अभिराम देशपांडे
(Responsible for selection of News Under PRB Act)

**अकोला आवृत्ती वर्ष - ३० अंक २५१**
आर.एन.आय.रजी.नं. MAHMAR/1997/04048 पोस्टल लायसन क्र. AKL/HO/03/2004

**मुख्य कार्यालय :—** अंबापेठ, राजकमल चौक, अमरावती - ४४४६०१
फोन - ९८२३०१६३००, ९४२२९५६२६८
ई-मेल - atimadhyam@gmail.com, abhiram.deshpande70@gmail.com

# वर्ध्यात १.७८ लाख मतदार बेपत्ता; एसआयआरमध्ये धक्कादायक चित्र

## स्थलांतरित, मृत आणि दुबार मतदारांचा समावेश; २४ ऑगस्टला प्रारूप मतदार यादी

**वर्धा/जनमाध्यम**

महाराष्ट्रात सुरू असलेल्या मतदार याद्यांच्या विशेष सखोल पुनरीक्षण कार्यक्रमात राज्यातील लाखो मतदार प्रक्रियेबाहेर राहिल्याचे समोर आले असतानाच वर्धा जिल्ह्यातही धक्कादायक चित्र स्पष्ट झाले आहे. जिल्ह्यातील चार विधानसभा मतदारसंघांमध्ये तब्बल १ लाख ७८ हजार १३१ मतदारांची गणना पत्रके जमा झालेली नाहीत. त्यामुळे हे मतदार सध्या एसआयआर प्रक्रियेत 'अनकलेक्टेबल' गटात गेले आहेत. २४ ऑगस्ट रोजी प्रारूप मतदार यादी प्रसिद्ध होणार असल्याने या नावांवर आता सर्वांचे लक्ष लागले आहे.

जिल्ह्यात आर्वी, देवळी, हिंगणघाट आणि वर्धा विधानसभा मतदारसंघांत विशेष सखोल पुनरीक्षणांतर्गत घरोघरी जाऊन गणना पत्रके भरून घेण्यात आली. जिल्ह्यात एकूण ११ लाख ३७ हजार २४२ मतदार असून त्यापैकी ९ लाख ५९ हजार १११ मतदारांची गणना पत्रके स्वाक्षरीसह प्राप्त झाली आहेत. म्हणजेच ८४.३४ टक्के प्रक्रिया पूर्ण झाली आहे.

**हिंगणघाटमध्ये सर्वाधिक 'बेपत्ता'**

हिंगणघाट विधानसभा मतदारसंघात सर्वाधिक ४७ हजार ८७० मतदार गणना पत्रक जमा न झालेल्या प्रवर्गात आहेत. यामध्ये २४ हजार ९०७ कायमस्वरूपी स्थलांतरित, १४ हजार ४०६ मृत, ४ हजार ३८८ दुबार अथवा अन्यत्र नोंदणीकृत, ४ हजार ११० गैरहजर आणि ५९ इतर मतदारांचा समावेश आहे.

वर्धा विधानसभा मतदारसंघात ४७ हजार ३५२ मतदार या प्रक्रियेत आढळून आले नाहीत. यात २६ हजार ७३५ कायमस्वरूपी स्थलांतरित, ११ हजार ९७२ मृत, ७ हजार १९८ दुबार अथवा अन्यत्र नोंदणीकृत, १ हजार ३६७



गैरहजर आणि ८० इतर मतदार आहेत.

देवळी मतदारसंघात ४५ हजार ६२८ मतदार प्रक्रियेबाहेर आहेत. यामध्ये २२ हजार ८०९ कायमस्वरूपी स्थलांतरित, १२ हजार ४२५ मृत, ९ हजार १८ दुबार अथवा अन्यत्र नोंदणीकृत, १ हजार ३०४ गैरहजर आणि ७२ इतर मतदारांचा समावेश आहे.

आर्वी विधानसभा मतदारसंघात ३७ हजार २८१ मतदार गणना पत्रक जमा न झालेल्या गटात आहेत. यामध्ये २० हजार ६६८ कायमस्वरूपी स्थलांतरित, ८ हजार ८७४ मृत, ४ हजार १६९ दुबार अथवा अन्यत्र नोंदणीकृत, ३ हजार ५२२ गैरहजर आणि ४८ इतर मतदार आहेत.

दरम्यान, चारही मतदारसंघातील गणना पत्रक जमा न झालेल्या मतदारांच्या नावांच्या याद्या संबंधित मतदान केंद्रस्तरीय अधिकाऱ्यांकडून मान्यताप्राप्त राजकीय पक्षांच्या मतदान केंद्रस्तरीय प्रतिनिधींना उपलब्ध करून देण्यात आल्या आहेत. त्यामुळे २४ ऑगस्टला प्रसिद्ध होणाऱ्या प्रारूप मतदार यादीत कोणाची नावे राहतात आणि कोणाची वगळली जातात, याकडे राजकीय पक्षांसह मतदारांचे लक्ष लागले आहे.

# साहेब...आमच्या गावातील दारूबंदी करा हो!

## ▶ टेंभरी परसोडीतील महिलांचा पोलीस अधीक्षकांकडे आर्तहाक
## ▶ निवेदनानंतर पोलिसांची धडक कारवाई; दारू विक्रेत्यांचे धाबे दणाणले

**विरूळ आकाजी/जनमाध्यम**

नजिकच्या टेंभरी परसोडी गावात अवैध दारू विक्रीचा अक्षरश महापूर आल्याने गावातील वातावरण बिघडले होते. दारूच्या नशेत होणारे वाद, भांडणे आणि त्रासामुळे सामान्य नागरिकांसह महिलांना कमालीचा त्रास सहन करावा लागत असल्याने अखेर गावातील महिलांनीच पोलिस प्रशासनाच्या दारात धाव घेतली. साहेब आमच्या गावातील दारू बंदी करा हो. अशी आर्तहाक देत महिलांनी वर्धा जिल्ह्याचे पोलिस अधीक्षक यांची भेट घेऊन निवेदन दिले.

गावातील अवैध दारू विक्री तातडीने बंद करावी आणि महिलांसह नागरिकांना सुरक्षित



वातावरण मिळावे अशी मागणी या निवेदनातून करण्यात आली. गावात दारूचा वाढता धंदा हा केवळ कायदा आणि सुव्यवस्थेचा प्रश्न नसून त्याचा थेट परिणाम कुटुंबांवर होत असल्याची व्यथा महिलांनी पोलिस अधीक्षकांसमोर मांडली.महिलांच्या या निवेदनाची पोलिस अधीक्षकांनी गांभीर्याने दखल घेत तत्काळ कारवाईचे निर्देश दिल्याचे समोर आले. त्यानंतर खरांगना पोलिस ठाण्याचे कर्मचारी आणि स्थानिक गुन्हे शाखा पुलगावच्या पथकाने संयुक्तपणे टेंभरी परसोडी परिसरात धडक कारवाई केली. अवैध दारू विक्री करणाऱ्यांविरुद्ध कारवाई करण्यात आल्याने गावातील दारू विक्रेत्यांचे धाबे दणाणले आहेत. पोलिस प्रशासनाने दाखविलेल्या या तत्परतेमुळे महिलांमध्ये समाधान व्यक्त होत आहे. मात्र एका कारवाईने प्रश्न संपणार नसून अवैध दारू विक्रीचा मुळापासून बंदोबस्त करण्याची गरज आहे. दारू विक्री पुन्हा सुरू होऊ नये यासाठी पोलिसांनी सातत्याने गस्त आणि कारवाई करावी अशी अपेक्षा ग्रामस्थांकडून व्यक्त होत आहे.दरम्यान नजिकच्या पाचोड गावातही अवैध दारू विक्रीचा महापूर वाहत असल्याची चर्चा असून तेथेही खरांगना पोलिसांनी लक्ष देण्याची गरज आहे. टेंभरी परसोडीतील महिलांनी दाखविलेल्या धाडसामुळे गावातील दारूबंदीचा प्रश्न पुन्हा ऐरणीवर आला आहे. महिलांनी आवाज उठवला आणि पोलिस प्रशासनाने कारवाई केली. आता ही कारवाई केवळ एका दिवसापुरती न राहता अवैध दारूविरोधात कायमस्वरूपी मोहीम उभी राहणार का हा प्रश्न आहे.

# कर्जमाफीचा गाजावाजा,पण शेतकऱ्यांच्या खात्यात पैसा नाही

## पहिल्या यादीतील लाभार्थीही प्रतीक्षेत, दुसऱ्या यादीचा पत्ताच नाही, शेतकरी बँकांच्या उंबरठ्यावर

**विरूळ (आकाजी)/जनमाध्यम**

राज्य शासनाने मोठा गाजावाजा करत जाहीर केलेल्या कर्जमाफी योजनेबाबत शेतकऱ्यांमध्ये आता प्रचंड संभ्रम आणि नाराजीचे वातावरण निर्माण झाले आहे. घोषणा होऊन तब्बल सहा महिने उलटले, जाहिरातींवर कोट्यवधी रुपये खर्च झाले, मात्र प्रत्यक्षात अनेक पात्र शेतकऱ्यांच्या खात्यात अद्याप एक रुपयाही जमा झालेला नाही.

कर्जमाफीची घोषणा होताच शेतकऱ्यांना मोठा दिलासा मिळेल, अशी अपेक्षा निर्माण झाली होती. त्यानंतर यादी जाहीर करण्याबाबत वारंवार तारखा देण्यात आल्या. अखेर जुलै महिन्यात पहिली यादी प्रसिद्ध झाली. यादीतील शेतकऱ्यांनी तातडीने केवायसी प्रक्रिया पूर्ण केली. त्यानंतर लवकरच खात्यावर रक्कम जमा होईल, असे सांगण्यात आले. मात्र अनेक शेतकरी आजही बँकांच्या फेऱ्या मारत असून त्यांच्या खात्यात कर्जमाफीची रक्कम जमा झालेली नाही.दुसरी यादी १० ऑगस्टपर्यंत प्रसिद्ध होईल, असे प्रशासनाकडून सांगण्यात आले होते. मात्र ऑगस्टचा तिसरा आठवडा सुरू झाला तरी दुसऱ्या यादीचा कुठेही पत्ता नाही. त्यामुळे उर्वरित शेतकरी हवालदिल झाले असून कर्जमाफी नेमकी कधी मिळणार, हा प्रश्न त्यांच्यासमोर उभा ठाकला आहे.

दरम्यान, सोशल मीडियावर कर्जमाफीचे पैसे जमा झाल्याच्या आणि दुसरी यादी आल्याच्या विविध पोस्ट व्हायरल होत आहेत. मात्र प्रत्यक्ष परिस्थिती वेगळी असल्याने शेतकरी अधिकच संभ्रमात पडत आहेत. शासनाने केवळ घोषणांचा पाऊस पाडण्यापेक्षा प्रत्यक्ष लाभ शेतकऱ्यांच्या खात्यात पोहोचवावा, अशी जोरदार मागणी आता शेतकरी वर्गातून होत आहे.

# ग्रामसभेत प्रश्न विचारताच राडा..दोन गटांत हाणामारी

## नांदगाव ग्रामसभेला गालबोट;सांडपाण्याच्या प्रश्नावरून वाद पेटला सभागृहाबाहेरही धक्काबुक्की

**हिंगणघाट/जनमाध्यम**

ग्रामसभा म्हणजे गावाच्या विकासाचा आरसा. नागरिकांनी गावातील समस्या मांडाव्यात आणि प्रशासनाने त्यावर तोडगा काढावा, अशी अपेक्षा असते. मात्र, हिंगणघाट पंचायत समितीअंतर्गत येणाऱ्या नांदगाव ग्रामपंचायतीच्या ग्रामसभेत विकासाच्या प्रश्नावरूनच चांगलाच राडा झाल्याची घटना समोर आली आहे. नागरिकाने गावातील सांडपाण्याचा प्रश्न उपस्थित करत रस्ता दुरुस्तीसाठी मुरूम टाकण्याची मागणी केल्यानंतर वादाला तोंड फुटले. पाहता पाहता वादाचे पर्यवसान दोन गटांतील जोरदार हाणामारीत झाले. या घटनेचा व्हिडिओ सोशल मीडियावर मोठ्या प्रमाणात व्हायरल झाल्याने ग्रामसभेतील गोंधळाची चर्चा गावभर रंगली आहे.

नांदगाव येथे आयोजित ग्रामसभेत गावातील विविध प्रश्नांवर चर्चा सुरू असताना रस्त्यावर साचणाऱ्या सांडपाण्याचा मुद्दा उपस्थित करण्यात आला. सांडपाण्यामुळे नागरिकांना होणारा त्रास लक्षात घेता संबंधित ठिकाणी मुरूम टाकून रस्ता व्यवस्थित करण्याची मागणी एका नागरिकाने केली. याच प्रश्नावरून उपस्थितांमध्ये शाब्दिक वाद सुरू झाल्याची प्राथमिक माहिती आहे.काही वेळातच शाब्दिक वादाचे रूपांतर धक्काबुक्की आणि हाणामारीत झाले. ग्रामपंचायत सभागृहातील वातावरण अचानक तापल्याने उपस्थितांमध्येही गोंधळ उडाला. त्यानंतर दोन्ही गट सभागृहाबाहेर आल्यावरही वाद थांबला नाही. एकमेकांना धक्काबुक्की करत मारहाण केल्याचे व्हायरल झालेल्या व्हिडिओमध्ये दिसून येत आहे. त्यामुळे ग्रामसभेच्या कामकाजाला काही काळ गालबोट लागले.

विशेष म्हणजे, ग्रामसभेचे कामकाज सुरळीत पार पडावे यासाठी हिंगणघाट पंचायत समितीच्या गटविकास अधिकाऱ्यांकडून एका मुख्याध्यापकाची नोडल अधिकारी म्हणून नियुक्ती करण्यात आली होती.

मात्र, त्यांच्या उपस्थितीतच ग्रामसभेत दोन गट आमनेसामने आल्याने ग्रामसभेच्या शिस्तीवर प्रश्नचिन्ह निर्माण झाले आहे.घटनेनंतर दोन्ही गटांनी हिंगणघाट पोलिस ठाणे गाठले. दोन्ही बाजूंनी तक्रार दाखल करण्याची प्रक्रिया वृत्त लिहिस्तोवर सुरू होती. त्यामुळे या प्रकरणात पोलिसांकडून नेमकी कोणती कारवाई केली जाते, याकडे ग्रामस्थांचे लक्ष लागले आहे.

गावातील मूलभूत समस्या मांडण्यासाठी आयोजित करण्यात आलेल्या ग्रामसभेतच हाणामारी झाल्याने नागरिकांमध्ये नाराजी व्यक्त होत आहे. प्रश्न मांडण्याचा अधिकार ग्रामस्थांना असताना त्या प्रश्नावरून वाद वाढवून कायदा हातात घेण्याचा प्रकार योग्य आहे का, असा प्रश्नही उपस्थित केला जात आहे. ग्रामसभेतील या प्रकारामुळे विकासाच्या मुद्द्यांऐवजी गटबाजी आणि वादाला अधिक महत्त्व मिळत असल्याची चर्चा सुरू झाली आहे.दरम्यान, व्हायरल व्हिडिओच्या आधारे घटनेची सत्यता आणि हाणामारीमागील नेमके कारण स्पष्ट होण्याची शक्यता आहे. पोलिस तपासानंतरच या प्रकरणातील वस्तुस्थिती समोर येणार आहे.

# प्राचार्य रमेश निमसडकर यांना राजर्षी शाहू महाराज पुरस्काराने सन्मानित

**वर्धा/जनमाध्यम**

समाजहितासाठी केलेले कार्य हीच खरी मानवसेवा असून, कुटुंबाच्या पलीकडे जाऊन समाजाचा विचार करणाऱ्या व्यक्तीलाच खऱ्या अर्थाने समाधान मिळते, असे प्रतिपादन साहित्यिक इमरान राही यांनी केले.

सिंदी मेघे परिसरातील समाज मंदिरात अश्वघोष सांस्कृतिक कला मंचाच्या वतीने अखिल भारतीय समता सैनिक दलाचे विदर्भ सचिव तथा समाजसेवक प्राचार्य रमेश निमसडकर यांना सामाजिक, कला व सांस्कृतिक क्षेत्रातील उल्लेखनीय योगदानाबद्दल राजर्षी शाहू महाराज पुरस्कार प्रदान करण्यात आला. यावेळी इमरान राही बोलत होते.प्राचार्य रमेश निमसडकर यांनी सतत आणि



प्रामाणिकपणे कार्य केल्यास कोणत्याही क्षेत्रात यश निश्चित मिळते, असे सांगितले. आतापर्यंत अनेक पुरस्कार मिळाले असले तरी राजर्षी शाहू महाराज पुरस्कार हा आपल्या आयुष्यातील विशेष आनंदाचा क्षण असल्याचे त्यांनी नमूद केले.कार्यक्रमाला राजू लभाणे, कवि प्रकाश जिंदे, ॲड. निखिल बुरबुरे, स्मिता चौहान, राजू वाघमारे, रचना नगराळे, आरती निमसडकर यांच्यासह मान्यवर उपस्थित होते. संचालन संजय मोडक यांनी केले. आभार चैतन्य चौहान यांनी मानले.

# आभाळ भरून आले; पण बळीराजाच्या डोळ्यात पावसाऐवजी अश्रू...

**मोझरी (शेकापूर)/जनमाध्यम**

आभाळ रोज काळवंडते, ढग दाटून येतात; मात्र पावसाच्या सरींचा पत्ता नाही. मागील पंधरा दिवसांपासून पावसाने दडी मारल्याने शेतकऱ्यांची चिंता दिवसेंदिवस वाढत आहे. फुलोऱ्यावर आलेली कपाशी आणि सोयाबीन पिके पाण्याच्या प्रतीक्षेत असून जमिनीतील ओलावा झपाट्याने कमी होत असल्याने बळीराजाच्या डोळ्यांसमोर आता उत्पादनाचे संकट उभे ठाकले आहे.

यंदा खरीप हंगामाच्या सुरुवातीलाच सोयाबीनने अनेक शेतकऱ्यांना दगा दिला. दुबार पेरणीचे संकट ओढवल्यानंतर शेतकऱ्यांनी पदरमोड करून पुन्हा पेरणी केली. कपाशी आणि सोयाबीनच्या भरघोस उत्पादनाची आशा ठेवून खत, फवारणी, डवरणी आणि मशागतीवर मोठा खर्च केला. मात्र आता पावसानेच पाठ फिरवल्याने केलेला खर्च वाया जाण्याची भीती निर्माण झाली आहे.सध्या कपाशी फुलोऱ्यावर आहे. पावसाअभावी पाते, फुले आणि बोंड गळण्यास सुरुवात झाली आहे. सोयाबीन शेंगा भरण्याच्या अवस्थेत असताना पावसाचा ताण बसल्याने उत्पादनात मोठी घट होण्याची शक्यता आहे. पिके पिवळी पडत असून मुळांपर्यंत आवश्यक अन्नद्रव्य पोहोचत नसल्याच्या तक्रारी शेतकरी



पंधरा दिवसांपासून पावसाची दडी; फुलोऱ्यातील कपाशी-सोयाबीन तहानेने करपू लागले

करीत आहेत. दरम्यान, कपाशीत तण वाढल्याने शेतकऱ्यांनी तणनाशकांची फवारणी केली; मात्र अपेक्षित परिणाम मिळत नसल्याने पुन्हा मजुरांकडून निंदण करण्याचा खर्च समोर आला आहे. मजुरांना शेतापर्यंत ने-आण करण्यासाठी वाहनभाड्याचाही अतिरिक्त भार पडत आहे.एकीकडे पिकांसाठी पैसा हवा, तर दुसरीकडे सावकारही पावसाची स्थिती पाहून पैसे देण्यास टाळाटाळ करीत आहेत. उत्पादन घटले तर घेतलेले कर्ज फेडायचे कसे, हा प्रश्न बळीराजाला सतावत आहे. शासनाने केवळ पंचनामे आणि घोषणांपुरते न थांबता पिकांची प्रत्यक्ष पाहणी करून शेतकऱ्यांना तातडीने मदत द्यावी, अशी मागणी परिसरातील शेतकऱ्यांकडून होत आहे.

# ग्रामीण सार्वजनिक वाचनालयाचा ३१ वा वर्धापनदिन



**वर्धा/जनमाध्यम**

ग्रामीण सार्वजनिक वाचनालय साईनगर सिंदी मेघे येथे स्वातंत्र्यदिन आणि वाचनालयाचा ३१ वा वर्धापनदिन उत्साहात साजरा करण्यात आला. कार्यक्रमाची सुरुवात ध्वजारोहणाने झाली. अध्यक्षस्थानी वाचनालयाचे अध्यक्ष प्रा. डॉ. उमाजी नाल्हे होते. प्रमुख अतिथी म्हणून प्रा. अनिल इंगळे आणि बाबाराव बावणे उपस्थित होते.

वाचनालयाच्या विकासासाठी मोलाची देणगी देणारे प्रा. अनिल इंगळे यांचा डॉ. उमाजी नाल्हे आणि वासुदेव खडंतकर यांच्या हस्ते सत्कार करण्यात आला. तसेच त्यांच्या पत्नी मायाताई इंगळे यांचा डॉ. मिलिंद घंगारे यांच्या हस्ते गौरव करण्यात आला.यावेळी ग्रामीण भागातील वाचनालयांचे महत्त्व आणि वाचन संस्कृतीच्या माध्यमातून होणाऱ्या बौद्धिक विकासावर मार्गदर्शन करण्यात आले. उत्कृष्ट वाचक म्हणून ज्ञानेन्धर पुसदेकर, मगवान गणसिंग आणि पल्लवी बोषीले यांचा सन्मान करण्यात आला.अध्यक्षीय भाषणात डॉ. नाल्हे यांनी वाचनालयाच्या ३१ वर्षांच्या वाटचालीचा आढावा घेतला. ॲड. रुपाली मिलिंद घंगारे यांनी सूत्रसंचालन केले. कार्यक्रमास नागरिक, विद्यार्थी, महिला आणि वाचनप्रेमी मोठ्या संख्येने उपस्थित होते.

# रामचरितमानस आदर्श व सामाजिक जीवनाची प्रेरणा देणारा ग्रंथ

## तुळशी जयंतीनिमित्त राष्ट्रभाषा पुस्तकालयात कार्यक्रम; डॉ. हेमचंद्र वैद्य यांचे प्रतिपादन

**वर्धा/जनमाध्यम**

संत तुलसीदास यांच्या 'रामचरितमानस'ला भारतीय समाजजीवनात अनन्यसाधारण स्थान आहे. अक्षरज्ञान असलेल्या सामान्य व्यक्तीपासून ते प्रकांड पंडितांपर्यंत सर्वांकडून या ग्रंथाचा आदर केला जातो. रामचरितमानस आपल्याला आदर्श आणि सामाजिक जीवनाची प्रेरणा देतो. संत तुलसीदास यांनी समाजासमोर आदर्श रामराज्याची संकल्पना मांडली, असे प्रतिपादन राष्ट्रभाषा प्रचार समितीचे प्रधानमंत्री डॉ. हेमचंद्र वैद्य यांनी केले.

राष्ट्रभाषा पुस्तकालयाच्या वतीने तुळशी जयंतीनिमित्त आयोजित कार्यक्रमात ते बोलत



होते. सकाळी ११ वाजता तुळशी उद्यानातील राष्ट्रभाषा प्रचार समितीच्या प्रांगणात स्थापित संत तुलसीदास यांच्या प्रतिमेला डॉ. वैद्य यांनी माल्यार्पण करून अभिवादन केले.यावेळी संत तुलसीदास यांच्या साहित्यिक आणि सामाजिक योगदानाचा गौरव करताना डॉ. वैद्य यांनी १९७५ मध्ये नागपूर येथे राष्ट्रभाषा प्रचार समितीच्या पुढाकाराने आयोजित करण्यात आलेल्या प्रथम विश्व हिंदी संमेलनातील आठवणींना उजाळा दिला. या संमेलनात विशेष अतिथी म्हणून उपस्थित असलेले डॉ. कामिल बुल्के यांनी संत तुलसीदास यांच्याविषयी व्यक्त केलेल्या श्रद्धेचा उल्लेख त्यांनी केला. संत तुलसीदास यांच्या साहित्याने डॉ. कामिल बुल्के यांच्यावर मोठा प्रभाव टाकला होता. त्यांच्या तुलसी साहित्यावरील लेखनातून आजही प्रेरणा मिळते, असेही त्यांनी सांगितले. याच काळात डॉ. कामिल बुल्के यांच्या हस्ते समितीच्या प्रांगणातील संत तुलसीदास यांच्या प्रतिमेचे अनावरण करण्यात आले होते. त्यामुळे ही प्रतिमा केवळ श्रद्धेचे प्रतीक नसून राष्ट्रभाषा प्रचार समितीच्या साहित्यिक आणि सांस्कृतिक परंपरेची साक्ष देणारी असल्याचेही डॉ. वैद्य यांनी नमूद केले. कार्यक्रमाची प्रस्तावना ग्रंथपाल योगेश शेन्डे यांनी केली. आभार सहायक ग्रंथपाल सचिन माकोडे यांनी मानले. कार्यक्रमाला छत्रपाल धाबर्डे, अरुणा देशमुख, प्रेमकुमार आसोपा, ज्योती सिरसोदे, संजय मालोदे, ज्ञानेश्वर भोयर, बाबुराव कोसमकर, संजय पालीवाल, पूजा लोहिया, योगेश शेंडे, दिलीप पिस्तुलकर, सचिन माकोडे, अर्चना देशमुख, ऋषिकेश उर्कुड़कर, राजू ठाकरे, निवृत्ती बाभळे, श्याम भोयर, शंकर खासबागे, अंकुश खंडाते, नकुल बकाले यांच्यासह समितीचे कार्यकर्ते, पुस्तकालयाचे वाचक व सदस्य तसेच पूर्वांचलमधून आलेले विद्यार्थी मोठ्या संख्येने उपस्थित होते.

जनमाध्यम न्युज अँड पब्लीकेशन प्रा.लि.च्या मालकीचे हे वृत्तपत्र मुद्रक, प्रकाशक प्रदीप देशपांडे यांनी प्लॉट नं.बी.-५०, सातुर्णा औद्योगिक वसाहत, बडनेरा रोड, अमरावती-४४४६०७ येथे छापून जनमाध्यम कार्यालय, हवालदारपुरा,वर्धा-४४२२२१ येथे प्रकाशित केले.

**संपादक-प्रदीप देशपांडे**
**संचालक (वृत्त) - अभिराम देशपांडे**
(Responsible for selection of News Under PRB Act)

**वर्धा आवृत्ती वर्ष-१४ अंक २६४**
**आर.एन.आय.रजी.नं. MAHMAR/२०१३/५१०९३**

**मुख्य कार्यालय**– अंबापेठ, राजकमल चौक, अमरावती-४४४६०१
फोन - ९८२३०१६३००, ९४२२९५६२६८
ई-मेल-atimadhyam@gmail.com,
abhiramdeshpande@gmail.com

# इन्स्टाग्रामवरील चाकूसह फोटो 'स्टाईल' पडली महागात

## -तरुण पोलिसांच्या ताब्यात

**अमरावती/प्रतिनिधीः-** हातात चाकूसदृश शस्त्र घेऊन फोटो काढून तो इन्स्टाग्रामवर प्रसारित करणाऱ्या तरुणाची 'सोशल मीडिया स्टाईल' राजापेठ पोलिसांच्या कारवाईमुळे चांगलीच अंगलट आली. पोलिसांनी गोपालनगर परिसरात सापळा रचून २० वर्षीय वेदांत वर्गे याला ताब्यात घेतले. त्याच्याकडून १ हजार २०० रुपये किमतीचा चायना चाकू जप्त करण्यात आला.





राजापेठ पोलिसांना एका तरुणाने हातात धोकादायक शस्त्र घेऊन फोटो सोशल मीडियावर व्हायरल केल्याची माहिती मिळाली. वरिष्ठ पोलिस निरीक्षक संदीप चव्हाण यांनी प्रकाराची गंभीर दखल घेत डीबी पथकाला संबंधित तरुणाचा शोध घेण्याच्या सूचना दिल्या.

१८ ऑगस्ट रोजी सायंकाळपासून पोलिसांनी परिसरात शोधमोहीम सुरू केली. दरम्यान, गोपालनगर येथील सुतगीरणीसमोर एक तरुण चाकूसदृश शस्त्र घेऊन फिरत असल्याची माहिती पथकाला मिळाली. त्यानंतर पोलिसांनी पंचांच्या उपस्थितीत परिसरात सापळा रचला. यावेळी वेदांत विनोदराव वर्गे (वय २०, रा. आदर्शनगर, गोपालनगर) याला ताब्यात घेण्यात आले. झडतीदरम्यान त्याच्याकडे चायना चाकू आढळला. या चाकूची लांबी १२.५० इंच असून, त्याचे पाते नऊ इंच लांब असल्याचे पोलिसांनी सांगितले.

सोशल मीडियावर शस्त्राचे प्रदर्शन करून परिसरात दहशत निर्माण करण्याचा प्रयत्न केल्याप्रकरणी वर्गे याच्याविरुद्ध राजापेठ पोलिस ठाण्यात गुन्हा दाखल करण्यात आला आहे. आर्म्स ॲक्टच्या कलम ४/२५ तसेच महाराष्ट्र पोलिस कायद्याच्या कलम १३५ अन्वये कारवाई करण्यात आली.

ही कारवाई पोलिस उपायुक्त श्याम घुगे, सहायक पोलिस आयुक्त संजय खटाळे यांच्या मार्गदर्शनाखाली वरिष्ठ पोलिस निरीक्षक संदीप चव्हाण, क्राइम पीआय उमेश मुंढे, एपीआय नितीन शिंदे व पोलिस पथकाने केली.

# बंदींच्या समस्या ऐकताना जेल अधिकाऱ्यावरच हल्ला

## कॉलर पकडून ठोसे; न्यायाधीन बंदीविरुद्ध गुन्हा दाखल

**अमरावती/प्रतिनिधीः-** कारागृहातील बंदींच्या अडचणी जाणून घेण्यासाठी गेलेल्या जेल अधिकाऱ्यावरच एका न्यायाधीन बंदीने हल्ला केल्याने अमरावती मध्यवर्ती कारागृहात खळबळ उडाली. बॅरेक क्रमांक १३ मध्ये घडलेल्या या प्रकारात बंदीने अधिकाऱ्याचा कॉलर पकडून हात व मानेवर ठोसे मारल्याचे समोर आले आहे. इतर अधिकारी-कर्मचाऱ्यांनी हस्तक्षेप करून परिस्थिती नियंत्रणात आणली.



धनसिंग धोंडिबा कवाले (वय ५१) यांच्या तक्रारीवरून फ्रेजरपुरा पोलिसांनी न्यायाधीन बंदी निखिल कैलास पाटील (वय २४, रा. मंडळ, अमळनेर, जि. जळगाव) याच्याविरुद्ध गुन्हा दाखल केला आहे.

मंगळवारी सकाळी न्यू बॅरेक परिसरातील बंदींच्या समस्या व अर्ज ऐकण्यासाठी जेल अधिकारी आणि कर्मचारी बॅरेक क्रमांक १३ मध्ये गेले होते. याचवेळी निखिल पाटील याने अचानक कवाले यांच्यावर झडप घेतली. त्यांचा कॉलर पकडून डाव्या हातावर आणि मानेवर ठोसे मारल्याचे तक्रारीत नमूद करण्यात आले आहे. अचानक घडलेल्या प्रकारामुळे बॅरेकमध्ये काही काळ गोंधळ निर्माण झाला. मात्र, इतर अधिकारी व कर्मचाऱ्यांनी तातडीने हस्तक्षेप करून बंदीला आवरले. या घटनेत जेल अधिकारी कवाले यांना किरकोळ दुखापत झाल्याची माहिती आहे.

### आधीपासून २२ गुन्ह्यांची नोंद-

निखिल पाटील हा भातकुली पोलिस ठाण्यात दाखल असलेल्या एका गुन्ह्यात न्यायालयीन आदेशाने ६ ऑक्टोबर २०२५ पासून अमरावती मध्यवर्ती कारागृहात आहे. पोलिसांच्या माहितीनुसार, त्याच्याविरुद्ध विविध प्रकारचे २२ गुन्हे वेगवेगळ्या न्यायालयांत प्रलंबित आहेत. जेल अधिकारी कवाले यांच्या तक्रारीवरून फ्रेजरपुरा पोलिसांनी गुन्हा दाखल केला असून, पोलिस उपनिरीक्षक खुशाल तायवाडे पुढील तपास करीत आहेत. न्यायाधीन बंदी असल्याने पुढील कायदेशीर प्रक्रियेसाठी कारागृह प्रशासन व न्यायालयाशी आवश्यक कार्यवाही केली जात आहे

# नाईट पेट्रोलिंगदरम्यान युवक देशी कट्ट्यासह अटकेत

## नागपुरी गेट पोलिसांची कारवाई

**अमरावती/प्रतिनिधीः-** शहरातील गुन्हेगारी कारवायांना आळा घालण्यासाठी सुरू असलेल्या नाईट पेट्रोलिंगदरम्यान नागपुरी गेट पोलिसांनी एका १९ वर्षीय युवकाला देशी कट्ट्यासह अटक केली. डिप्टी ग्राउंड परिसरात करण्यात आलेल्या या कारवाईत पोलिसांनी सुमारे ४० हजार रुपये किमतीचे अवैध शस्त्र जप्त केले.

२० ऑगस्ट रोजी नागपुरी गेट पोलीस ठाण्याचे डीबी पथक रात्रीच्या गस्तीवर असताना डिप्टी ग्राउंड परिसरात एक युवक अवैध शस्त्र घेऊन फिरत असल्याची माहिती पोलिसांना खबऱ्यामार्फत मिळाली.

माहितीची खातरजमा करून पोलिसांनी परिसरात सापळा रचला. संशयित युवक पोलिसांच्या हाती लागताच त्याला ताब्यात घेऊन झडती घेण्यात आली. झडतीदरम्यान त्याच्या कमरेला देशी बनावटीचा कट्टा आढळून आला. आरोपीची ओळख मोहम्मद साकीब मोहम्मद रफीक (वय १९, रा. हैदरपुरा) अशी झाली. पंचांसमक्ष देशी कट्टा जप्त करण्यात आला. याप्रकरणी नागपुरी गेट पोलीस ठाण्यात आर्म्स ॲक्टच्या कलम ३/२५ अन्वये गुन्हा दाखल करण्यात आला आहे. आरोपीकडे हा देशी कट्टा नेमका कुठून आला, त्याने तो कोणाकडून घेतला तसेच या प्रकरणामागे आणखी कोणाचा सहभाग आहे का, याचा तपास नागपुरी गेट पोलीस करीत आहेत. ही कारवाई पोलीस आयुक्त राकेश ओला, पोलीस उपायुक्त यशवंत सोलंके आणि सहायक पोलीस आयुक्त नीलेश ब्राम्हणे यांच्या मार्गदर्शनाखाली वरिष्ठ पोलीस निरीक्षक मनोहर कोटनाके यांच्या नेतृत्वात करण्यात आली. डीबी पथकाचे प्रभारी पोलीस उपनिरीक्षक विकास मनपिया, तसेच इरफान रायलीवाले, प्रवीण ढेंगेकार, इमरान खान, मनीष यादव, मोहन चव्हाण आणि शेखर गायकवाड यांनी कारवाईत सहभाग घेतला.


## फ्लॅट विकणे आहे

शास्त्री नगर , टोपे नगर बोर्ड ऑफिस जवळ असलेला डुप्लेक्स फ्लॅट विकणे आहे . एक बेड रूम , किचन, स्वतंत्र डायनिंग , प्रशस्त हॉल, एक गेस्ट रूम, टेरेस असा फ्लॅट आहे.

**संपर्क : ९४२२८५७१६९ ९४२२१२०४०६**


## MAHAVITARAN e-TENDER NOTICE

Separate digitally sealed and signed two bid system e-Tenders are invited from registered and experienced contractors for the work of design, shop test, supply, transport, fixing of LT. spiral type PVC Spacers to LT. Lines and allied works in Mehkar Division under Buldhana Circle on "Full Turnkey basis", under O&M Scheme. against tender No. EE/MEH/T/LT Spacers/T-02(2026-27) amounting to Rs.10 Lakh. The above tender documents are available at our website etender.mahadiscom.in/eatApp//. The tender fee is according to tender amount as floated including GST. The tender documents can be downloaded from aforesaid website. The tender will be processed as per e-Tendering procedure of MSEDCL from date 21.08.2026 and Last date of submission of tender is 04.09.2026 up to 17.30 Hrs. Any changes in tender schedule, corrigendum, amendment, extension of due date etc, if any shall be available on our website only & will not be published in newspaper separately. Contact No.7058735502.

**PRO.NO-CE/AKLZ/86 Dt.20.08.2026**

**Executive Engineer, M.S.E.D.C.L., Mehkar Division**

## जाहीर नोटीस

सर्व लोकांस या जाहीर नोटीसने कळविण्यात येते की, माझे पक्षकार श्री चेतन विठ्ठलराव कावरे रा. झेंडा चौक नेर पिंगळाई ता. मोर्शी जि. आणि विक्रम विठ्ठलराव कावरे रा. रुक्मिणी नगर अमरावती हे खालील अनुसूचीमध्ये वर्णन केलेली मालमत्ता अजीज खान अयुब खान पठाण आणि नसरीम बानो अजीज खान रा नेर पिंगळाई ता मोर्शी जि अमरावती यांच्याकडून खरेदी / कराराद्वारे प्राप्त करण्याचे ठरविले असून, उभयतांमध्ये सदर मालमत्तेच्या व्यवहार (इसार) झाला आहे.

मालमत्तेचा तपशील

जिल्हा अमरावती, तालुका मोर्शी , मौजे सावरखेड येथील सर्व्हे नंबर २३७ क्षेत्र ६ हेक्टर १६ आर पैकी पच्छीमेकडील अजीज खान अयुब खान पठाण यांच्या मालकीची २ हेक्टर ९२ आर जमीन तसेच नसरीम बानो अजीज खान यांच्या मालकीची शेत सर्वे नंबर २३७ मधील ६ हेक्टर १६ आर मधील पूर्वेकडील उत्तर

दक्षिण धुऱ्याची १ हेक्टर ६२ आर जमीन कोरड वाहून भोगवटदार क्र १ ची जमीन ज्याची चतुरसीमा अशी कि :

पूर्वेस चेतन कावरे यांची जमीन
पच्छीमेस विक्रम कावरे यांची जमीन
उत्तरेस मासोदकर यांचे शेत
दक्षिणेस ठाकूर यांचे शेत
असे एकूण ४ हेक्टर ५४ आर शेत जमीन

सदर नमूद मालमत्तेवर कोणाचाही कोणत्याही प्रकारचा हक्क, अधिकार, हितसंबंध, वारसा हक्क, दान, गहाण, लीज, अन्नवस्त्र, बक्षीसपत्र, अथवा कोर्टाचा स्टे/वाद किंवा कोणत्याही बँकेचा/संस्थेचा बोजा वहीवाटीचा रस्ता किंवा इतर कोणताही प्रभार असल्यास, त्यांनी ही नोटीस प्रसिद्ध झाल्याच्या तारखेपासून चौदा (१४) दिवसांच्या आत खालील पत्यावर माझ्याशी लेखी स्वरूपात, आवश्यक त्या कागदपत्रांच्या पुराव्यासह संपर्क साधावा. मुदतीमध्ये कोणाचाही कोणताही आक्षेप किंवा हरकत न आल्यास, सदर मालमत्ता ही सर्व प्रकारच्या बोजांपासून, वादांपासून व प्रभारांपासून मुक्त आहे असे समजून माझे पक्षकार पुढील व्यवहार पूर्ण करतील. मुदतीनंतर आलेला कोणताही आक्षेप किंवा दावा माझे पक्षकारावर बंधनकारक राहणार नाही, याची नोंद घ्यावी.

ठिकाण: अमरावती

**ॲडव्होकेट: निखिल नि. बिजवे**
**पत्ता: मुधलियार नगर मोती नगर मेन रोड अमरावती**
**मोबाईल नंबर :८९८३२६९९३९**

## जाहीर सुचना

सर्व लोकांना या जाहीर सुचनेद्वारे कळविण्यात येते की, माझे पक्षकार नामे **गजानन उदेभान भोयर**, रा.जुना धामणगांव, ता.धामणगांव रेल्वे, जि.अमरावती यांनी दिलेल्या माहितीवरुन मी सदरचे जाहीर नोटीसीद्वारे सर्वांना सुचित करतो की,

माझे पक्षकाराच्या मालकी व ताब्यातील शेत सर्वे नंबर ७९/२७/१ मौजा हिरापूर, ता.धामणगांव रेल्वे, जि.अमरावती, भोगवटदार वर्ग १ एकुण क्षेत्रफळ ३ हे.१३ आर ही शेतजमीन असून सदर शेतावर माझे पक्षकाराचा सन २००७ पासून निरंतरपणे ताबा आहे. सदर शेताचे माझे पक्षकार हे वहिती व मशागत करुन पिके घेत होते. परंतु सदर शेताचा वाद हा वि.दिवाणी न्यायाधीश, क.स्तर, धामणगांव रेल्वे या न्यायालयात दिवाणी दावा क्र.६१/२०२५ **जया - विरुध्द - गजानन** हे प्रकरण न्यायप्रविष्ठ आहे व वि.न्यायालयाने माझे पक्षकाराच्या ताब्यातील शेताबाबत दिनांक ०२.०२.२०२६ रोजीच्या आदेशाप्रमाणे **जया कमलाकर डांगे** हिला फक्त शेतातील लोखंडी खांब काढण्याचा आदेश दिला होता. त्यावर माझे पक्षकाराने वि.३ रे अतिरिक्त न्यायाधीश, अमरावती यांच्या न्यायालयात सदर आदेशावर अपिल दाखल केले असून त्याचा नंबर ८०/२०२६ असा आहे. सदरचे अपिल हे वि.न्यायासमोर न्यायप्रविष्ठ आहे. दिनांक ११.०८.२०२६ रोजी बेकायदेशीरपणे **जया कमलाकर डांगे** हिने सरकारी यंत्रणेची मदत घेवून आदेश नसतांना माझे पक्षकाराच्या ताब्यातील असलेल्या शेताचा पूर्णपणे मनुष्यबळावर ताबा माझे पक्षकाराच्या माघारी घेतला आहे.

**जया कमलाकर डांगे** ही शेत सर्वे नंबर ७९/२७/१ मौजा हिरापूर, ता.धामणगांव रेल्वे, जि.अमरावती, भो.वर्ग १, एकुण क्षेत्रफळ ३ हे.१३ आर सदर शेताचा परस्पर त्रयस्थ व्यक्तीसोबत विकीचा व्यवहार करीत आहे. तरी वरील वादांकित शेताचा वि.न्यायालयासमोर वाद न्यायप्रविष्ठ असून सदर बाबत **जया कमलाकर डांगे** ही महिला सदर शेत त्रयस्थ व्यक्तिला विकी करीत आहे. तेव्हा सदर वादांकित शेताचा जर **जया कमलाकर डांगे** हिने व्यवहार करीत असल्यास तो व्यवहार कायदेशीर नसून सदरचा व्यवहार जो कोणी कोणत्याही व्यक्तिने केल्यास सदरचा वादांकित शेतावर केलेला विकी वा अन्य व्यवहार हा माझे पक्षकारावर बंधनकारक राहणार नाही. करीता आपण सर्वांना या जाहीर नोटीसद्वारे कळविण्यात येत आहे.

अमरावती
दिनांक २०.०८.२०२६

पक्षकाराची सही
(गजानन उदेभान भोयर)

ॲड.ए.एस.बेले
कॅम्प रोड, अमरावती
मो.९८६०२१९७४०

## नगर परिषद कार्यालय, अचलपूर

## जाहीरनामा

या जाहीरनाम्याद्वारे सर्व जनतेला कळविण्यात येते की, अर्जदाराचे नांव **प्रणव वसंतराव बिजवे**, पत्ता - वार्ड क्र.२९,नौबागपुरा, अचलपूर जि.अमरावती यांनी अचलपूर नगर परिषदेच्या वार्ड क्र.२९ संगणक मालमत्ता क्र.**ACHA000/25751, ACHA000/25752** जुना मालमत्ता क्र. **29000617/29000648** नझुल शिट क्र.**४-डी** प्लॉट नं.**१८७** ही कर आकारणी नोंदवहीनुसार **श्री.वसंतराव मारोतीराव बिजवे** या नावाने असून वरील अर्जदार यांनी या **१)केतन वसंतराव बिजवे,२) प्रणव वसंतराव बिजवे** नावाने फेरफार घेण्याकरिता **बक्षीसपत्र** या कार्यालयामध्ये दिनांक **२०.०८.२०२६** रोजी अर्ज सादर केलेला आहे. याविषयी कोणास आक्षेप/हरकत घ्यावयाची असल्यास हा जाहीरनामा प्रसिध्द झाल्यापासून पंधरा दिवसांच्या आत लेखी स्वरुपात दस्तऐवजाचे पुराव्यासह दाखल करुन हजर रहावे. मुदतीनंतर नियमाप्रमाणे प्रकरण निकाली काढण्यात येईल, याची नोंद घ्यावी.

उपरोक्त मालमत्तेची चतुःसिमा -

**पुर्वेस** - रस्ता
**पश्चिमेस** - रस्ता
**दक्षिणेस** - भोंडे यांचे घर
**उत्तरेस** - वासुदेव चौकडे यांचे घर

शिक्का

**सही/-**
**मुख्याधिकारी,**
**नगर परिषद, अचलपूर**

## जाहीर नोटीस

सर्व सामान्य लोकांना सूचित करण्यात येते की, मी, माझे पक्षकार नामे **श्री प्रमोद उध्दवराव पोफळे** यांचे वतीने सदरची जाहीर नोटीस देतो ती येणेप्रमाणे,

**मिळकतीचे वर्णन :- मौजे-तारखेडा,प्रगणे- बडनेरा,शेत सर्वे क्र.23/3 मधील लेआउट प्लॉट क्र.47 पैकी पश्चिमेकडील भाग याचे एकूण क्षेत्रफळ 600 चौ.फुट, (पीआर कार्ड नुसार नझुल शीट क्र.21 आणि नझुल प्लॉट क्र.4135 ) ता. आणि जिल्हा अमरावती**

सदर मिळकत माझे पक्षकार नामे **श्री प्रमोद उध्दवराव पोफळे** यांच्या मालकीची आहे.तद्नंतर,त्यांनी ***Aditya Birla Housing Finance Limited*** येथे कर्जासाठी अर्ज केला असता, सदर मिळकतीचे मुळ खरेदी खत ज्याचे दि.१२/०८/१९९९ रोजीचे दस्त क्र.२९२६ हे मुळ दस्त गहाळ झालेले आहे. तसेच सदर खरेदीखत कोणाला सापडल्यास किंवा कुठे गहाण/ राष्ट्रीयकृत /खाजगी /पतसंस्था/ सहकारी /इतर बॅक बोजा, या मालमत्तेविषयी शासकीय-निमशासकीय काही भानगड, कोणाचा मालकी अथवा वारसा हक्क, इतर कोणती हरकत असल्यास त्यांनी खाली दिलेल्या माझ्या मो.क्र. वर ही जाहिरात प्रसिध्द झाल्याच्या **१० (दहा) दिवसाच्या** आत पुराव्यानिशी हरकत नोंदवावी तद्नंतर कोणतीही हरकत ग्राहय धरल्या जाणार नाही. आणि सदर मालमत्ता हि ***Aditya Birla Housing Finance Limited*** येथे गहाण करण्यात येईल करिता ही जाहीर सूचना.

ठिकाण -तालुका - अमरावती आणि जिल्हा अमरावती
दि.२०/०८/२०२६

STAMP

**-आपला-**
**ADVOCATE**
**रविंद्र रु.वाटाणे**
**स्नेहगंधा कॉलोनी, अमरावती**
**मो.नं. ९८२३६९८७४५**

## दिवाणी न्यायालय, वरिष्ठ स्तर, अमरावती
## वि.श्री.एस.बी.कळदाते सह दिवाणी न्यायाधीश (क.स्तर) अमरावती यांचे न्यायालयात

**किरकोळ अर्ज क्र.१४५८/२०२६**
**रविंद्र व इतर विरुध्द निरंक**
**पुढील ता.२२.०९.२०२६**

**जाहीरनामा/सायटेशन**

अर्जदार : **Ravindra Devrao Telang**
Age 52 years. Occu.: Business
R/o. Near National Garage, Rampuri Camp, Amravati

**विरुध्द**

**गैरअर्जदार - निरंक**

सर्वत्र लोकांस सुचित करण्यात येते की, **मयत सुशिला देवराव तेलंग** हे दिनांक २३.०८.२०२५ रोजी अमरावती येथे मयत झाले. अर्जदार **रविंद्र विरुध्द निरंक** यांनी वरीलप्रमाणे या कोर्टात सदर्हु मयत यांचे वारसाचे प्रमाणपत्र मिळण्याबाबत **APPLICATION UNDER SECTION 2 OF BOMBAY REGULATION ACT CLAUSE VIII OF 1827 FOR GRANT OF LEGAL HEIRSHIP CERTIFICATE** प्रमाणे अर्ज दाखल केलेला आहे.

त्यापेक्षा **रविंद्र विरुध्द निरंक** वरीलप्रमाणे सदर्हु मयतांचे वारसदार नव्हे असे कोणास समजावण्याचे असेल तर या जाहीरनाम्याचे प्रसिध्दीच्या तारखेपासून एक महिन्याचे आत त्याने या कोर्टात हजर होवून आपल्या हरकती कळवाव्यात आणि या लेखावरुन असे कळविण्यात येते की, जर सदर्हु मुदतीत कोणी योग्य हरकत न दाखविल्यास सदर्हु कोर्ट अर्जदार यांचे हक्काबद्दल लागलीच पुरावा घेवून त्यांचा हक्क साबीत दिसल्यास त्यांना सदर्हु मयत यांचे वारसाचे प्रमाणपत्र देण्यात येईल.

आज दिनांक **१६.०७.२०२६** रोजी माझ्या सहीने व न्यायालयाच्या शिक्क्यानिशी दिले.

शिक्का

आदेशानुसार,
**सहायक अधीक्षक**
दिवाणी न्यायालय वरिष्ठ स्तर,
अमरावती

## दिवाणी न्यायालय, वरिष्ठ स्तर,
## वि.श्री.ए.बी.कट्टे, २ रे सह दिवाणी न्यायाधीश (क.स्तर) अमरावती

किरकोळ दिवाणी अर्ज क्र.१७१४/२०२६
**अतिया व ईतर -वि- निरंक**
पुढील ता.२१.०९.२०२६

**जाहीरनामा/सायटेशन**

अर्जदार :
1. Atiya Khatun Rahim Khan, Age 53 Yrs. Occu.: Household
R/o Near Waheed Masjid Ansar Nagar, Amravati
2. Rahman Khan Rahim Khan, Age 52 Yrs. Occu.: Labour
R/o 133, Ratanganj Part of Ansar Nagar, Amravati.
3. Sultan Khan Rahim Khan Pathan, Age 51 Yrs. Occu.: Labour\
R/o S/o Rahim Khan Pathan, Ghutkala Ward, Samaskal Dargah Ward, Chandrapur
4. Irfan Khan Rahim Khan, Age 42 Yrs. Occu.: Labour
R/o S/o Rahim Khan Near Wahed Masjid Ansar Nagar, Khurshid Pura,Amt.
5. Safiya Khan Rahim Khan, Age 37 Yrs. Occu.: Household
R/o D/o Rahim Khan Near Wahed Masjid Ansar Nagar, Khurshid Pura,Amt.
6. Shabana Parveen Rahim Khan, Age 43 Yrs. Occu.: Household
R/o D/o Rahim Khan Near Wahed Masjid Ansar Nagar, Khurshid Pura,Amt.
7. Imran Khan Rahim Khan, Age 36 Yrs. Occu.: Labour
R/o Near Water Tank Ansar Nagar, Amravati.

**-- विरुध्द --**

**गैरअर्जदार :** Nil

सर्वत्र लोकांस सुचित करण्यात येते की, **मयत रहिम खान गफुर खान** हे दिनांक 28.11.2012 रोजी **अमरावती, ता.जि.अमरावती** येथे मयत झाले. अर्जदार **अतिया व ईतर विरुध्द निरंक** यांनी वरीलप्रमाणे या कोर्टात सदर्हु मयत यांचे वारसाचे प्रमाणपत्र मिळण्याबाबत APPLICATION UNDER SECTION 2 OF BOMBAY REGULATION ACT CLAUSE VIII OF 1827 FOR GRANT OF LEGAL HEIRSHIP CERTIFICATE प्रमाणे अर्ज दाखल केलेला आहे.

त्यापेक्षा **अतिया व ईतर विरुध्द निरंक** वरीलप्रमाणे सदर्हु मयतांचे वारसदार नव्हे असे कोणास समजावण्याचे असेल तर या जाहीरनाम्याचे प्रसिध्दीच्या तारखेपासून एक महिन्याचे आत त्याने या कोर्टात हजर होवून आपल्या हरकती कळवाव्यात आणि या लेखावरुन असे कळविण्यात येते की, जर सदर्हु मुदतीत कोणी योग्य हरकत न दाखविल्यास सदर्हु कोर्ट अर्जदार यांचे हक्काबद्दल लागलीच पुरावा घेवून त्यांचा हक्क साबीत दिसल्यास त्यांना सदर्हु मयत यांचे वारसाचे प्रमाणपत्र देण्यात येईल.

आज दिनांक **१९.०८.२०२६** रोजी माझ्या सहीने व न्यायालयाच्या शिक्क्यानिशी दिले.

शिक्का

आदेशानुसार,
**सहायक अधीक्षक**
दिवाणी न्यायालय वरिष्ठ स्तर
अमरावती

## दिवाणी न्यायालय, वरिष्ठ स्तर,
## विद्यमान श्री.आर.आर.खामतकर, ४ थे सह दिवाणी न्यायाधीश (क.स्तर) अमरावती यांचे न्यायालयात

किरकोळ अर्ज क्र.१५९८/२०२६
**मिना अधिक एक -वि- निरंक**
पुढील ता.०७.०९.२०२६

**जाहीरनामा/सायटेशन**

अर्जदार :
1. Meena Sureshrao Khare, Age 61 Yrs. Occu.: HOusehold
R/o Ward No.3, Sharad Pawar Colony, Walgaon, Amravati.
2. Gaurav Sureshrao Khare, Age 33 Yrs. Occu.: Labour
R/o Chandur Bazar Road, Walgaon, Tq.Dist. Amravati

**-- विरुध्द --**

**गैरअर्जदार :** Nil

सर्वत्र लोकांस सुचित करण्यात येते की, **मयत** Suresh Digambar Khare यांचे दिनांक **१६.०९.२०१६** रोजी **अमरावती** येथे निधन झाले. **अर्जदार** Meena Sureshrao Khare+1 यांनी वरीलप्रमाणे या कोर्टात सदर्हु मयत यांचे वारसाचे प्रमाणपत्र मिळण्याबाबत APPLICATION UNDER SECTION 2 OF BOMBAY REGULATION ACT CLAUSE VIII OF 1827 FOR GRANT OF LEGAL HEIRSHIP CERTIFICATE प्रमाणे अर्ज दाखल केलेला आहे.

त्यापेक्षा Meena Sureshrao Khare+1 वरीलप्रमाणे सदर्हु मयतांचे वारसदार नव्हे असे कोणास समजावण्याचे असेल तर या जाहीरनाम्याचे प्रसिध्दीच्या तारखेपासून एक महिन्याचे आत त्याने या कोर्टात हजर होवून आपल्या हरकती कळवाव्यात आणि या लेखावरुन असे कळविण्यात येते की, जर सदर्हु मुदतीत कोणी योग्य हरकत न दाखविल्यास सदर्हु कोर्ट अर्जदार यांचे हक्काबद्दल लागलीच पुरावा घेवून त्यांचा हक्क साबीत दिसल्यास त्यांना सदर्हु मयत यांचे वारसाचे प्रमाणपत्र देण्यात येईल.

आज दि.**१८.०८.२०२६** रोजी माझ्या सहीने व न्यायालयाच्या शिक्क्यानिधी दिले.

शिक्का

आदेशानुसार,
**सहायक अधीक्षक**
दिवाणी न्यायालय वरिष्ठ स्तर
अमरावती

## दिवाणी न्यायालय, वरिष्ठ स्तर,
## विद्यमान श्री.ए.बी.कट्टे, ३ रे सह दिवाणी न्यायाधीश (क.स्तर) अमरावती यांचे न्यायालयात

किरकोळ अर्ज क्र.१६९५/२०२६
**विवेक व ईतर -वि- निरंक**
पुढील ता.२८.०९.२०२६

**जाहीरनामा/सायटेशन**

अर्जदार :
1. Vivek Ashok Gupta
Age 40 Yrs. Occu.: Pvt.Service
R/o Plot No.15-A, Akoli Road, Shadani Nagar,
Sai Nagar, Amravati

**-- विरुध्द --**

**गैरअर्जदार :** Nil

सर्वत्र लोकांस सुचित करण्यात येते की, **मयत प्रणाली अनिल अनासाने** यांचे दिनांक **२२.०३.२०२६** रोजी **अमरावती** येथे निधन झाले. **अर्जदार विवेक विरुध्द निरंक** यांनी वरीलप्रमाणे या कोर्टात सदर्हु मयत यांचे वारसाचे प्रमाणपत्र मिळण्याबाबत APPLICATION UNDER SECTION 2 OF BOMBAY REGULATION ACT CLAUSE VIII OF 1827 FOR GRANT OF LEGAL HEIRSHIP CERTIFICATE प्रमाणे अर्ज दाखल केलेला आहे.

त्यापेक्षा **विवेक विरुध्द निरंक** वरीलप्रमाणे सदर्हु मयतांचे वारसदार नव्हे असे कोणास समजावण्याचे असेल तर या जाहीरनाम्याचे प्रसिध्दीच्या तारखेपासून एक महिन्याचे आत त्याने या कोर्टात हजर होवून आपल्या हरकती कळवाव्यात आणि या लेखावरुन असे कळविण्यात येते की, जर सदर्हु मुदतीत कोणी योग्य हरकत न दाखविल्यास सदर्हु कोर्ट अर्जदार यांचे हक्काबद्दल लागलीच पुरावा घेवून त्यांचा हक्क साबीत दिसल्यास त्यांना सदर्हु मयत यांचे वारसाचे प्रमाणपत्र देण्यात येईल.

आज दि.**१३.०८.२०२६** रोजी माझ्या सहीने व न्यायालयाच्या शिक्क्यानिधी दिले.

शिक्का

आदेशानुसार,
**सहायक अधीक्षक**
दिवाणी न्यायालय वरिष्ठ स्तर
अमरावती

## जाहीर नोटीस

**अमरावती येथील विद्यमान तदर्थ जिल्हा व सत्र न्यायाधीश-०२, यांचे न्यायालय**

एम.ए.सी.पी. क्रमांक ४६३/२०२४ — ने.ता.०७.०९.२०२६

**अर्जदार - किशोर पंढरी चावके**
**-- वि --**
**गैरअर्जदार - अब्दुल नईम अब्दुल करीम व ईतर**

**बनाम -** 1.Abdul Naim Abdul Karim
Near Dr.Shabbir Ali Hospital, Chaya Nagar,
Amravati.-444601

**Application U/Sec.166 of Motor Vehicle Act 1988 for Grant of Compensation**

ज्याअर्थी वरील पिटीशनर **किशोर पंढरी चावके** यांनी तदर्थ जिल्हा व सत्र न्यायालय-०२, अमरावती यांचे न्यायालयात नुकसान भरपाई मिळण्याकरीता दावा दाखल केला आहे.

त्याअर्थी वरील गैरअर्जदार **अब्दुल नईम अब्दुल करीम**, यांना पेपर प्रसिध्दीद्वारे नोटीस देण्यात येते की, त्यांनी दाव्याचे सुनावणीसाठी दिनांक **०७.०९.२०२६** रोजी सकाळी ११.०० वाजता वि.तदर्थ जिल्हा व सत्र न्यायाधीश-०२, अमरावती यांचे न्यायालयात स्वतः किंवा रितसर निर्दिष्ट केलेल्या वकीलामार्फत हजर व्हावे. वर नमुद केलेल तारखेस जर कोणीही हजर न झाल्यास सदरहू दाव्याची एकतर्फी सुनावणी होवून निकाल दिला जाईल.

आज दिनांक १०/०८/२०२६ रोजी माझ्या सहीनिशी व न्यायालयाच्या शिक्क्यानिशी दिले असे.

शिक्का

आदेशान्वये,
प्र.सहाय्यक अधीक्षक, (न्यायीक विभाग)
जिल्हा व सत्र न्यायालय,
अमरावती

## दिवाणी न्यायालय, वरिष्ठ स्तर,
## विद्यमान श्री.ए.बी.कट्टे, २ रे सह दिवाणी न्यायाधीश (क.स्तर) अमरावती यांचे न्यायालयात

किरकोळ अर्ज क्र.१७०१/२०२६
**चंद्रभागा व ईतर -वि- निरंक**
पुढील ता.२८.०९.२०२६

**जाहीरनामा/सायटेशन**

अर्जदार :
1. Chandrabhaga Narayan Ajmire, Age 97 Yrs. Occu.: HOusehold
R/o Rohan Kheda Vichori, Amravati.
Through its Power of Attorney Holder **Miss Narayanrao Ajmire,** Age 66 Yrs. Occu.: HOusehold
R/o Hira Colony, Near Jyoti Basti, Sipna College Road, Sai Nagar, Amravati.

**-- विरुध्द --**

**गैरअर्जदार :** Nil

सर्वत्र लोकांस सुचित करण्यात येते की, **मयत सुरेश नारायण अजमिरे** यांचे दिनांक **११.०८.१९९९** रोजी **अमरावती** येथे निधन झाले. **अर्जदार चंद्रभागा विरुध्द निरंक** यांनी वरीलप्रमाणे या कोर्टात सदर्हु मयत यांचे वारसाचे प्रमाणपत्र मिळण्याबाबत APPLICATION UNDER SECTION 2 OF BOMBAY REGULATION ACT CLAUSE VIII OF 1827 FOR GRANT OF LEGAL HEIRSHIP CERTIFICATE प्रमाणे अर्ज दाखल केलेला आहे.

त्यापेक्षा **चंद्रभागा विरुध्द निरंक** वरीलप्रमाणे सदर्हु मयतांचे वारसदार नव्हे असे कोणास समजावण्याचे असेल तर या जाहीरनाम्याचे प्रसिध्दीच्या तारखेपासून एक महिन्याचे आत त्याने या कोर्टात हजर होवून आपल्या हरकती कळवाव्यात आणि या लेखावरुन असे कळविण्यात येते की, जर सदर्हु मुदतीत कोणी योग्य हरकत न दाखविल्यास सदर्हु कोर्ट अर्जदार यांचे हक्काबद्दल लागलीच पुरावा घेवून त्यांचा हक्क साबीत दिसल्यास त्यांना सदर्हु मयत यांचे वारसाचे प्रमाणपत्र देण्यात येईल.

आज दि.**१७.०८.२०२६** रोजी माझ्या सहीने व न्यायालयाच्या शिक्क्यानिधी दिले.

शिक्का

आदेशानुसार,
**सहायक अधीक्षक**
दिवाणी न्यायालय वरिष्ठ स्तर
अमरावती

## दिवाणी न्यायालय, वरिष्ठ स्तर,
## विद्यमान श्री.आर.आर.खामतकर, ४ थे सह दिवाणी न्यायाधीश (क.स्तर) अमरावती यांचे न्यायालयात

किरकोळ अर्ज क्र.१५८९/२०२६
**नलिनी अधिक दोन -वि- निरंक**
पुढील ता.०७.०९.२०२६

**जाहीरनामा/सायटेशन**

अर्जदार :
1. Nalini Bhaskar Kale, Age 62 Yrs. Occu.: HOusehold
2. Vrushali Bhaskar Kale, Age 45 Yrs. Occu.: Housewife
3. Nilesh Bhaskar Kale, Age 45 Yrs. Occu.: Pvt.Job
All R/o Flat No.1, Jay Sai Anand Chsl Near Jankadevi Temple Road, Vartak Nagar, Thane, Tq.Dist.Thane

**-- विरुध्द --**

**गैरअर्जदार :** Nil

सर्वत्र लोकांस सुचित करण्यात येते की, **मयत** Bhaskar Tulsiram Kale यांचे दिनांक **२७.०९.२०२५** रोजी **ठाणे** येथे निधन झाले. **अर्जदार** Nalini Bhaskar Kale+2 यांनी वरीलप्रमाणे या कोर्टात सदर्हु मयत यांचे वारसाचे प्रमाणपत्र मिळण्याबाबत APPLICATION UNDER SECTION 2 OF BOMBAY REGULATION ACT CLAUSE VIII OF 1827 FOR GRANT OF LEGAL HEIRSHIP CERTIFICATE प्रमाणे अर्ज दाखल केलेला आहे.

त्यापेक्षा Nalini Bhaskar Kale+2 वरीलप्रमाणे सदर्हु मयतांचे वारसदार नव्हे असे कोणास समजावण्याचे असेल तर या जाहीरनाम्याचे प्रसिध्दीच्या तारखेपासून एक महिन्याचे आत त्याने या कोर्टात हजर होवून आपल्या हरकती कळवाव्यात आणि या लेखावरुन असे कळविण्यात येते की, जर सदर्हु मुदतीत कोणी योग्य हरकत न दाखविल्यास सदर्हु कोर्ट अर्जदार यांचे हक्काबद्दल लागलीच पुरावा घेवून त्यांचा हक्क साबीत दिसल्यास त्यांना सदर्हु मयत यांचे वारसाचे प्रमाणपत्र देण्यात येईल.

आज दि.**१४.०८.२०२६** रोजी माझ्या सहीने व न्यायालयाच्या शिक्क्यानिधी दिले.

शिक्का

आदेशानुसार,
**सहायक अधीक्षक**
दिवाणी न्यायालय वरिष्ठ स्तर
अमरावती

## दिवाणी न्यायालय, वरिष्ठ स्तर,
## विद्यमान श्री.आर.आर.खामतकर, ४ थे सह दिवाणी न्यायाधीश (क.स्तर) अमरावती यांचे न्यायालयात

किरकोळ अर्ज क्र.१५०७/२०२६
**अर्चना अधिक तीन -वि- निरंक**
पुढील ता.२१.०८.२०२६

**जाहीरनामा/सायटेशन**

अर्जदार :
1. Archana Vijayrao Khokale, Age 44 Yrs. Occu.: Household
2. Dhiraj Vijayrao Khokale, Age 23 Yrs. Occu.: Education
3. Tanishka Vijayrao Khokale, Age 20 Yrs. Occu.: Education
4. Vimal Pundlikrao Khokale, Age 57 Yrs. Occu.: Household
All R/o Naikwadi Pura, Nandgaon Peth, Tq.Dist.Amravati.

**-- विरुध्द --**

**गैरअर्जदार :** Nil

सर्वत्र लोकांस सुचित करण्यात येते की, **मयत** Vijay Pundlik Khokale यांचे दिनांक **२१.१२.२०२४** रोजी **नांदगांव पेठ, अमरावती** येथे निधन झाले. **अर्जदार** Archana Vijayrao Khokale+3 यांनी वरीलप्रमाणे या कोर्टात सदर्हु मयत यांचे वारसाचे प्रमाणपत्र मिळण्याबाबत APPLICATION UNDER SECTION 2 OF BOMBAY REGULATION ACT CLAUSE VIII OF 1827 FOR GRANT OF LEGAL HEIRSHIP CERTIFICATE प्रमाणे अर्ज दाखल केलेला आहे.

त्यापेक्षा Archana Vijayrao Khokale+3 वरीलप्रमाणे सदर्हु मयतांचे वारसदार नव्हे असे कोणास समजावण्याचे असेल तर या जाहीरनाम्याचे प्रसिध्दीच्या तारखेपासून एक महिन्याचे आत त्याने या कोर्टात हजर होवून आपल्या हरकती कळवाव्यात आणि या लेखावरुन असे कळविण्यात येते की, जर सदर्हु मुदतीत कोणी योग्य हरकत न दाखविल्यास सदर्हु कोर्ट अर्जदार यांचे हक्काबद्दल लागलीच पुरावा घेवून त्यांचा हक्क साबीत दिसल्यास त्यांना सदर्हु मयत यांचे वारसाचे प्रमाणपत्र देण्यात येईल.

आज दि.**१२.०८.२०२६** रोजी माझ्या सहीने व न्यायालयाच्या शिक्क्यानिधी दिले.

शिक्का

आदेशानुसार,
**सहायक अधीक्षक**
दिवाणी न्यायालय वरिष्ठ स्तर
अमरावती

जनमाध्यम
जनमाध्यम न्युज अँड पब्लीकेशन प्रा.लि.च्या मालकीचे हे वृत्तपत्र मुद्रक, प्रकाशक प्रदीप देशपांडे यांनी प्लॉट नं. बी-५०, सातुर्णा औद्योगिक वसाहत, बडनेरा रोड, अमरावती - ४४४६०७ येथे छापून जनमाध्यम कार्यालय, रेल्वेपुलाजवळ, राजकमल चौक, अमरावती -४४४६०१ येथे प्रकाशित केले.

**संपादक-प्रदीप देशपांडे**

**संचालक (वृत्त) - अभिराम देशपांडे**
(Responsible for selection of News Under PRB Act)

**अमरावती आवृत्ती वर्ष - ३७ अंक ३४३**
आर.एन.आय.रजी.नं. 49763/89 पोस्टल लायसन क्र. ATI/RNP/47/2023-2025

**मुख्य कार्यालय :–** अंबापेठ, राजकमल चौक, अमरावती - ४४४६०१
फोन - ९८२३०१६३००,९४२२९५६२६८
**ई-मेल** - atimadhyam@gmail.com, abhiram.deshpande70@gmail.com

# मेळघाटातील आश्रमशाळांचा कारभार रामभरोसे?

**मेळघाट/वार्ताहर**

मेळघाटातील दुर्गम आणि आदिवासीबहुल भागातील विद्यार्थ्यांसाठी आश्रमशाळा हे शिक्षणाचे महत्त्वाचे केंद्र मानले जाते. मात्र याच शाळांमध्ये आवश्यक मनुष्यबळाची कमतरता असल्याने शिक्षण व्यवस्थेची घडी विस्कटत असल्याचे चित्र दिसून येत आहे. अनेक ठिकाणी शिक्षकांची पदे रिक्त असल्याने उपलब्ध कर्मचाऱ्यांवर अतिरिक्त जबाबदारी येत आहे. परिणामी विद्यार्थ्यांना अपेक्षित शैक्षणिक मार्गदर्शन मिळते आहे का, असा प्रश्न पालकांकडून उपस्थित केला जात आहे.

शासकीय यंत्रणेकडून आश्रमशाळांच्या माध्यमातून दुर्गम भागातील मुलांना मुख्य प्रवाहातील शिक्षणाशी जोडण्याचा प्रयत्न केला जातो. परंतु शिक्षकच पुरेशा संख्येने उपलब्ध नसतील, तर या योजनेचा अपेक्षित परिणाम कसा साध्य होणार, असा सवाल स्थानिकांकडून केला जात आहे. रिक्त पदांबाबत वारंवार मागणी होऊनही ठोस तोडगा निघत नसल्याने नाराजी वाढत आहे.

**शिक्षकांची कमतरता ठरतेय अडचण**

चिखलदरा तालुक्यातील आश्रमशाळांमध्ये मंजूर पदे आणि प्रत्यक्ष कार्यरत कर्मचारी यामध्ये तफावत असल्याचे सांगितले जाते. एका शिक्षकाकडे एकापेक्षा अधिक वर्ग किंवा विषयाची जबाबदारी सोपवावी लागत असल्याने अध्यापनाचे नियोजनही आव्हानात्मक बनते. विद्यार्थ्यांना वैयक्तिक मार्गदर्शन, अतिरिक्त सराव आणि शंकांचे निरसन यासाठी शिक्षकांना पुरेसा वेळ देणे कठीण होते. विशेषतः दुर्गम भागातील विद्यार्थ्यांना सातत्यपूर्ण शैक्षणिक मदतीची गरज असताना ही परिस्थिती चिंताजनक मानली जात आहे.

**मूलभूत सुविधांकडेही लक्ष देण्याची गरज**

आश्रमशाळा या निवासी पद्धतीच्या असल्याने विद्यार्थ्यांच्या शिक्षणाबरोबरच त्यांच्या दैनंदिन गरजांकडेही गांभीर्याने पाहणे आवश्यक आहे. स्वच्छता, सुरक्षितता,



## रिक्त पदांमुळे शिक्षण व्यवस्थेची कोंडी

पिण्याचे पाणी, निवास व्यवस्था आणि इतर मूलभूत सुविधा व्यवस्थित असणे गरजेचे आहे. शिक्षकांची कमतरता आणि सुविधांशी संबंधित अडचणी एकाच वेळी निर्माण झाल्यास विद्यार्थ्यांवर त्याचा अतिरिक्त परिणाम होऊ शकतो.

त्यामुळे प्रशासनाने केवळ रिक्त पदांचा आढावा न घेता संपूर्ण शाळा व्यवस्थेची पाहणी करावी, अशी अपेक्षा आहे.

**अभ्यासक्रम पूर्ण करण्याचे आव्हान**

शैक्षणिक वर्ष पुढे सरकत असताना अभ्यासक्रम पूर्ण करण्याचे वेळापत्रक, विद्यार्थ्यांच्या चाचण्या, प्रकल्प, सराव आणि परीक्षेची तयारी यावरही लक्ष द्यावे लागते. अशा वेळी शिक्षकांची संख्या कमी असल्यास उपलब्ध शिक्षकांवर कामाचा ताण वाढतो. यामुळे केवळ अध्यापनाचे तासच नव्हे तर विद्यार्थ्यांच्या प्रगतीचा नियमित आढावाही प्रभावित होण्याची शक्यता आहे. त्यामुळे प्रत्येक आश्रमशाळेची गरज स्वतंत्रपणे तपासून आवश्यक तेवढे शिक्षक उपलब्ध करून देणे गरजेचे आहे.

**तातडीने पदे भरण्याची मागणी**

आश्रमशाळांमधील रिक्त पदे तातडीने भरावीत, अशी मागणी पालक व स्थानिक नागरिकांकडून केली जात आहे. केवळ जाहिरात किंवा भरती प्रक्रिया सुरू करण्याऐवजी प्रत्यक्ष नियुक्त्या होऊन शिक्षक शाळेत रुजू होणे आवश्यक असल्याचे नागरिकांचे म्हणणे आहे.

दुर्गम भागातील विद्यार्थ्यांचे शैक्षणिक वर्ष वाया जाऊ नये आणि त्यांना इतर विद्यार्थ्यांप्रमाणेच गुणवत्तापूर्ण शिक्षण मिळावे, यासाठी शासनाने वेळबद्ध निर्णय घ्यावा, अशी अपेक्षा व्यक्त होत आहे.

स्थानिक पातळीवर या प्रश्नाकडे गांभीर्याने पाहून संबंधित अधिकाऱ्यांनी आश्रमशाळांना भेट देऊन वस्तुस्थिती जाणून घ्यावी, अशीही मागणी होत आहे.

कागदोपत्री उपलब्ध असलेल्या मनुष्यबळापेक्षा प्रत्यक्ष वर्गात किती शिक्षक कार्यरत आहेत, याचा आढावा घेतल्यास परिस्थिती स्पष्ट होऊ शकते. त्यानुसार रिक्त जागा भरण्यासोबतच आवश्यक त्या ठिकाणी अतिरिक्त मनुष्यबळ देण्याची गरज आहे.

मेळघाटातील आदिवासी विद्यार्थ्यांच्या शैक्षणिक भवितव्याचा विचार करता आश्रमशाळांमधील रिक्त पदांचा प्रश्न आता अधिक काळ प्रलंबित ठेवणे योग्य ठरणार नाही.

शासन आणि संबंधित विभागाने प्रत्यक्ष परिस्थितीची पाहणी करून शिक्षकांची कमतरता दूर करावी, मूलभूत सुविधा मजबूत कराव्यात आणि विद्यार्थ्यांना नियमित व दर्जेदार शिक्षण मिळेल याची खात्री करावी, अशी जोरदार मागणी स्थानिकांकडून होत आहे

# आधार कार्डवरील जन्मतारखेच्या नोंदीतील अडचणींमुळे हजारो शिक्षकांचे ई-केवायसी रखडले

## मुदतवाढ देण्याची शिक्षक समितीची मागणी

**अमरावती/का.प्र.**

शासकीय, निमशासकीय तसेच शासन अनुदानातून वेतन घेणाऱ्या कर्मचाऱ्यांसाठी ई-केवायसी अनिवार्य करण्यात आले आहे. मात्र, आधार कार्डवरील जन्मतारीख, नावातील बदल तसेच शाळा व बँकेच्या नोंदीतील तफावतीमुळे राज्यातील हजारो शिक्षकांचे ई-केवायसी पूर्ण करण्यात अडचणी निर्माण होत आहेत. या पार्श्वभूमीवर ई-केवायसी पूर्ण करण्यासाठी किमान सहा महिन्यांची मुदतवाढ देण्यात यावी, अशी मागणी महाराष्ट्र राज्य प्राथमिक शिक्षक समितीने राज्य शासनाकडे केली आहे.

वित्त विभागाच्या दि. २७ मार्च २०२६ रोजीच्या शासन परिपत्रकानुसार शिक्षकांसह शासकीय कर्मचाऱ्यांचे ई-केवायसी अनिवार्य करण्यात आले आहे. सुरुवातीला मे २०२६ पर्यंत मुदत देण्यात आली होती. त्यानंतर वित्त विभागाच्या निर्देशानुसार वाढीव ई-केवायसीची प्रक्रिया ऑगस्ट २०२६ पर्यंत सुरू ठेवण्यात आली आहे.ई-केवायसी करताना शाळेतील प्रणालीमध्ये नोंद असलेले नाव व जन्मतारीख आणि आधार कार्डवरील नोंदी यामध्ये तफावत असल्यास प्रक्रिया पूर्ण होत नाही. तसेच ज्या बँकेतून वेतन घेतले जाते, त्या बँकेच्या नोंदीतील नाव व जन्मतारीख यामध्येही फरक आढळल्यास शिक्षकांना अडचणींचा सामना करावा लागत आहे.

विशेषतः महिला शिक्षकांच्या बाबतीत विवाहापूर्वीचे नाव शाळेच्या नोंदीत असताना आधार कार्डवर विवाहानंतरचे नाव नोंदलेले असल्याने ई-केवायसी पूर्ण होत नसल्याचे शिक्षक समितीने निदर्शनास आणून दिले आहे. अशा प्रकरणांमध्ये शालार्थ प्रणालीतील नाव आधार कार्डवरील नावानुसार बदलण्यासाठी प्रक्रिया पूर्ण करण्यास वेळ लागत आहे.याशिवाय अनेक शिक्षकांच्या जन्माची नोंद ग्रामपंचायत किंवा नगरपरिषदेच्या उपलब्ध नोंदीमध्ये झालेली नसल्याचेही समितीने



नमूद केले आहे. त्यामुळे अशा शिक्षकांची कोणतीही चूक नसताना जन्म प्रमाणपत्र मिळविण्याची आवश्यकता निर्माण झाली आहे.या सर्व अडचणी लक्षात घेऊन आधार कार्डवरील जन्मतारखेची नोंद अद्ययावत करण्यासाठी मूळ सेवापुस्तकातील शासन नियमांनुसार प्रमाणित नोंद ग्राह्य धरण्यात यावी. तसेच नावातील बदलासाठी आवश्यक प्रक्रिया पूर्ण करण्यास पुरेसा कालावधी देण्यात यावा, अशी मागणी करण्यात आली आहे.महाराष्ट्र राज्य प्राथमिक शिक्षक समितीचे राज्य सरचिटणीस राजन कोरगावकर आणि राज्याध्यक्ष विजय कोंबे यांनी शासनाकडे निवेदन देऊन ई-केवायसी पूर्ण करण्यासाठी किमान सहा महिन्यांची मुदतवाढ देण्याची विनंती केली आहे. मुदतवाढीच्या कालावधीत कोणत्याही शिक्षकाचे वेतन थांबवू नये, अशीही समितीने मागणी केली आहे.

## संक्षिप्त

### संकल्पसखी परीवारतर्फे प्रदर्शनी

**अमरावती -** संकल्पसखी परीवारातर्फे महीला उद्योजक सखींना प्रोत्साहन देण्यासाठी आणि लघू उद्योजक सखींना आर्थिकदृष्ट्या सक्षम करून त्यांच्या उत्पादनांना बाजारपेठ मिळवून देण्यासाठी २१,२२ आणि २३ ऑगस्ट २०२६ रोजी रंगोली लॉन्स कठोरा नाका अमरावती येथे वैविध्यपूर्ण स्टॉलनी सज्ज असलेल्या प्रदर्शनीचे आयोजन रक्षाबोंधन आणि मान्सून विशेष करण्यात येत आहे.श्रावणात येणाऱ्या पारंपरिक सणांना साजेश्या आणि उपयुक्त वस्तू , होम डेकोर, ज्वेलरी, हँन्डमेड ज्वेलरी, कॉस्मेटीक्स, अगदी गृह उपयोगी मसाले , वाळवणाचे पदार्थ, साड्या , कूर्ती , गालीचे आणि बाजारात सहज उपलब्ध न होणाऱ्या पण उद्योजक सखींनी कौशल्याने तयार केलेल्या अनेक सजावटीच्या वस्तू , गीफ्ट आर्टिकल असं सर्व आणि लज्जतदार फूड झोन एकाच छताखाली पहायला मिळणार आहे. तसेच प्रदर्शनीस भेट देणाऱ्या प्रत्येक व्हीजीटर्सला संकल्पसखी परीवारातर्फे मिळणार रक्षाबंधन विशेष भेटवस्तू आणि रोज लकी ड्रॉ सूद्धा तेव्हा या वैविध्यपूर्ण स्टॉलनी नटलेल्या प्रदर्शनीस भेट उद्योजक सखींना प्रोत्साहन देणारी ठरणार आहे असे आवाहन संकल्पसखीच्या अध्यक्षा पूनम गोमासे आणि संपूर्ण संकल्पसखी परीवारातील सखींनी शहरवासीयांसाठी केले आहे.



### भारतरत्न डॉक्टर एपीजे अब्दुल कलाम कॉलेजमध्ये रंगनाथन जयंती

**अमंरावती-**शिवाई एज्युकेशनल सोशल अँड मेडिकल ट्रस्टद्वारा संचालित भारतरत्न डॉ. ए.पी.जे. अब्दुल कलाम फॉर यूजी अँड पीजी कोर्सेस विथ मिलेनियम स्किल्स इनोव्हेशन, इन्क्युबेशन अँड रिसर्च या महाविद्यालयात ग्रंथालय विभागाच्या वतीने ग्रंथालय शास्त्राचे जनक डॉ. एस. आर. रंगनाथन यांची जयंती उत्साहात साजरी करण्यात आली.प्रारंभी महाविद्यालयाचे प्रभारी प्राचार्य अक्षय देठे यांच्या हस्ते डॉ. एस. आर. रंगनाथन यांच्या प्रतिमेचे पूजन करून पुष्पहार अर्पण करण्यात आला. कार्यक्रमाची प्रस्तावना महाविद्यालयाच्या ग्रंथपाल प्रा. राखी गचके यांनी केली. यावेळी त्यांनी डॉ. रंगनाथन यांच्या ग्रंथालय क्षेत्रातील योगदानाची माहिती उपस्थितांना दिली.अध्यक्षीय भाषणात प्रा. अक्षय देठे यांनी ग्रंथालय हे अति प्राचीन व सातत्याने वाटचाल करणारी एक प्रक्रिया असल्याचे सांगितले. वाचनाने मनुष्य विचारी ज्ञानी व सुसंस्कृत होतो असे मोलाचे विचार त्यांनी यावेळी मांडले.कार्यक्रमाला प्रा. सोनल लोहाना, प्रा. अर्जित तिवारी, प्रा. मैथिली खारकर, प्रा. धीरज शिरसाट यांची प्रमुख उपस्थिती होती.उपस्थित मान्यवरांनी डॉ. रंगनाथन यांच्या कार्याचा गौरव करून विद्यार्थ्यांनी ग्रंथालयाचा अधिकाधिक उपयोग करून ज्ञानवृद्धी करावी, असे आवाहन केले.कार्यक्रमाच्या यशस्वीतेसाठी संस्थेच्या अध्यक्षा डॉ. स्मिता सूर्यवंशी, संस्थेचे सचिव प्रा. दिनेश सूर्यवंशी तसेच संस्थेचे कोषाध्यक्ष श्री. अभय सूर्यवंशी यांचे मोलाचे मार्गदर्शन लाभले. कार्यक्रमाचे आयोजन ग्रंथालय विभागाच्या वतीने करण्यात आले.



### न.प. जिजामाता प्राथमिक शाळेत शाळा व्यवस्थापन समिती पुनर्गठीत

**चांदूर रेल्वे-** नगर परिषद जिजामाता प्राथमिक कन्या शाळा येथे शाळा व्यवस्थापन समिती पुनर्गठीत करण्यात आली. शाळा व्यवस्थापन समितीला दोन वर्ष पूर्ण झाल्यामुळे पालक सभेचे आयोजन करण्यात आले. पालक सभेचे अध्यक्ष मुख्याध्यापक आरती खरुले होत्या. प्रत्येक वर्गातून दोन पालक प्रतिनिधीची निवड करण्यात आली. निवड झालेल्या पालक प्रतिनिधीतून अध्यक्ष, उपाध्यक्ष यांची निवड करण्यात आले. अध्यक्ष अर्चना कुपाले आणि उपाध्यक्ष दिपाली उज्जैनकर यांची निवड करण्यात आली. सदस्यांमध्ये अलका मसराम,माधुरी भुसारी,प्राजक्ता चौधरी,सारिका खराबे,मोनिका पवार, योगिता शिवणकर,चित्रा वानखेडे,योगिता नेवारे,प्रफुल हरणे,आशिष अंबापुरे तसेच शिक्षण तज्ञ विनोद भोयर,शिक्षक प्रतिनिधी श्रीराम जाधव, सचिव आरती खरुले यांची निवड करण्यात आली.पालक सभेला मोठ्या संख्येत पालक वर्ग उपस्थित होते. संचालन श्रीराम जाधव आभार सारिका ठाकूर यांनी मानले.कार्यक्रमाच्या यशस्वीकरिता मुख्याध्यापक आरती खरुले ,ज्येष्ठशिक्षिका नीलिमा रघुते, श्रीराम जाधव,सारिका ठाकूर, मुक्ता लाड यांचे सहकार्य लाभले.

## प्रा.राम मेघे अभियांत्रिकी व व्यवस्थापन महाविद्यालयात

# विद्युत अभियांत्रिकी विभागाचे ‘नेव्हर गिव्ह अप’ या विषयावर सत्र

**अमरावती/का.प्र.**

विदर्भ यूथ वेल्फेअर सोसायटी संचालित प्रा राम मेघे अभियांत्रिकी व व्यवस्थापन महाविद्यालय, बडनेरा-अमरावती (स्वायत्त संस्था) येथील विद्युत अभियांत्रिकी विभागाने ‘नेव्हर गिव्ह अप’ (कधीही हार मानू नका) या विषयावर एका प्रेरणादायी सत्राचे यशस्वी आयोजन केले. हे सत्र व्यावसायिक मार्गदर्शक आणि उद्योजकता प्रशिक्षक सुमित उरकुडकर यांनी घेतले. त्यांनी आपल्या प्रेरणादायी प्रत्यक्ष अनुभवांतून आणि व्यावहारिक मार्गदर्शनातून विद्यार्थ्यांना आत्मविश्वास, चिकाटी, सकारात्मक दृष्टिकोन आणि



शैक्षणिक व व्यावसायिक उद्दिष्टे साध्य करण्यासाठी ‘कधीही हार न मानण्याची वृत्ती’ जोपासण्यास प्रोत्साहित केले. या संवादात्मक सत्राने विद्यार्थ्यांना आव्हानांवर मात करण्यास आणि जीवनाच्या प्रत्येक क्षेत्रात उत्कृष्टतेसाठी प्रयत्न करण्यास प्रेरित केले.

प्रेरणादायी सत्रानंतर, मागील शैक्षणिक वर्षात आयोजित विविध स्पर्धांमधील विजेत्यांचा गौरव करण्यासाठी पारितोषिक वितरण समारंभ पार पडला. यामध्ये पोस्टर स्पर्धा, रांगोळी स्पर्धा, प्रकल्प (प्रोजेक्ट) स्पर्धा आणि छायाचित्रण (फोटोग्राफी) स्पर्धेतील विजेत्यांना पारितोषिके व प्रमाणपत्रे प्रदान करण्यात आली. या समारंभातून विद्यार्थ्यांची सर्जनशीलता, तांत्रिक कौशल्ये आणि उत्साह यांचा गौरव करण्यात आला, तसेच त्यांना सह-अभ्यासक्रम आणि अभ्यासेतर उपक्रमांमध्ये अधिक सक्रिय सहभाग घेण्यास प्रोत्साहित करण्यात आले. या कार्यक्रमामुळे सहभागी विद्यार्थी आत्मविश्वास आणि दृढनिश्चयाने उत्कृष्टतेचा ध्यास घेण्यास प्रेरित झाले.कार्यक्रमास प्राचार्य डॉ. अजय पी. ठाकरे, उपप्राचार्य प्रा. प्रवीण व्ही. खंडवे, विद्युत अभियांत्रिकी विभागप्रमुख डॉ. अमित व्ही. मोहोड आणि प्राध्यापकवृंद उपस्थित होते.तसेच संस्थेचे अध्यक्ष डॉ. नितीन धांडे, उपाध्यक्ष ॲड. उदय देशमुख, कोषाध्यक्ष प्रा. डॉ. हेमंत देशमुख, सचिव युवराजसिंग चौधरी,नितीन हिवसे, डॉ. पूनम चौधरी,पंकज देशमुख, प्रा. विनय गोहाड, प्रा. गजानन काळे यांनी कौतुक केले.

# मेळघाटातील आदिवासी विद्यार्थ्यांना विषबाधेचा संशय

## खा.वानखडे यांनी घेतली रुग्णालयात भेट



**अमरावती/का.प्र.**

जिल्ह्यातील मेळघाट भागातील आदिवासी विद्यार्थ्यांच्या प्रकृतीशी संबंधित प्रकरण पुन्हा चर्चेत आले आहे. महर्षी पब्लिक स्कूलमधील पाच विद्यार्थ्यांना अचानक उलट्या, जुलाब आणि चक्कर येण्यासारखी लक्षणे जाणवू लागल्याने त्यांना अमरावती येथील एका खासगी रुग्णालयात उपचारासाठी दाखल करण्यात आले आहे. अन्नातून विषबाधा झाल्याचा संशय व्यक्त करण्यात येत असून, याबाबत अधिकृत तपासणीनंतरच नेमके कारण स्पष्ट होणार आहे. घटनेची माहिती मिळताच अमरावतीचे खासदार बळवंत वानखडे यांनी रुग्णालयात जाऊन उपचार घेत असलेल्या विद्यार्थ्यांची भेट घेतली. त्यांनी विद्यार्थ्यांच्या प्रकृतीची डॉक्टरांकडून माहिती घेतली तसेच विद्यार्थ्यांशी प्रत्यक्ष संवाद साधून त्यांना धीर दिला. सध्या रुग्णालयात उपचार घेत असलेल्या सर्व पाच विद्यार्थ्यांची प्रकृती ठणठणीत असल्याची माहिती समोर आली आहे. विद्यार्थ्यांच्या उपचारामध्ये कोणतीही कमतरता राहू नये आणि त्यांच्या प्रकृतीवर योग्य लक्ष ठेवण्यात यावे, अशी अपेक्षा खासदार बळवंत वानखडे यांनी व्यक्त केली. दरम्यान, या प्रकरणावरून खासदार बळवंत वानखडे यांनी महर्षी पब्लिक स्कूलच्या व्यवस्थापनावर गंभीर आरोप केले आहेत. संस्थाचालकांना सरकार आणि स्थानिक प्रशासनाकडून पाठीशी घातले जात असल्याचा आरोप त्यांनी केला. या घटनेमुळे निवासी व शैक्षणिक संस्थांमधील विद्यार्थ्यांच्या भोजनाची गुणवत्ता, स्वच्छता आणि आरोग्य सुरक्षेचा प्रश्न पुन्हा ऐरणीवर आला आहे. वस्तुस्थिती समोर येणे महत्त्वाचे ठरणार आहे.

# उद्योजक किशोर काकाणी यांचा अपघातात मृत्यू

**अमरावती/का.प्र.**

अमरावती-अकोला महामार्गावर लोणी परिसरात दुभाजक ओलांडून विरुद्ध दिशेने आलेल्या ट्रकने कारला दिलेल्या जोरदार धडकेत अमरावतीतील उद्योजक तथा शासकीय कंत्राटदार किशोर काकाणी (६३) यांचा जागीच मृत्यू झाला. मंगळवारी रात्री साडेआठच्या सुमारास हा भीषण अपघात झाला. अपघाताचा आवाज ऐकताच महामार्गालगतचे नागरिक, हॉटेलमधील ग्राहक तसेच वाहनचालकांनी घटनास्थळी धाव घेतली. घटनेची माहिती मिळताच लोणी पोलिसांचे पथकही दाखल झाले. नागरिकांच्या मदतीने बचावकार्य करीत काकाणी यांना कारमधून बाहेर काढण्यात आले; मात्र त्यांचा मृत्यू झाल्याचे स्पष्ट झाले. ते बियाणी कॉलेज परिसरात, दसरा मैदानासमोर राहत होते. त्यांच्या पश्चात पत्नी, दोन मुले डॉ. प्रतीक व डॉ. शुभम, तीन भाऊ, दोन बहिणी, सुना आणि नातवंडे असा परिवार आहे. या अपघाती निधनामुळे काकाणी कुटुंबीयांसह



अमरावतीतील उद्योग व सामाजिक क्षेत्रात हळहळ व्यक्त होत आहे.लोणी पोलिसांनी अपघाताची नोंद करून ट्रकचालकाविरुद्ध कायदेशीर कारवाई सुरू केली आहे.

# शेतकऱ्यांच्या कर्जमाफीच्या प्रक्रियेत फसव्या नोंदी थांबवा-वीरेंद्र जगताप

## कॉंग्रेसच्या आंदोलनाला उत्स्फूर्त प्रतिसाद

**चांदूर रेल्वे/वार्ताहर**

शेतकऱ्यांच्या कर्जमाफीच्या प्रक्रियेत पारदर्शकता ठेवण्याऐवजी त्यांना वारंवार सेतू केंद्र आणि बँकांच्या चकरा मारायला लावून फडणवीस सरकार शेतकऱ्यांचा मानसिक छळ करत आहे. कर्जमाफीच्या नावाखाली शेतकऱ्यांना त्रास देऊ नका, त्यांच्या संयमाचा अंत पाहू नका, असा इशारा माजी आमदार विरेंद्र जगताप यांनी दिला.

उपविभागीय अधिकाऱ्यांशी झालेल्या चर्चेदरम्यान आ. विरेंद्र जगताप यांनी २००७ साली तत्कालीन पंतप्रधान डॉ. मनमोहन सिंह यांच्या नेतृत्वाखाली ज्या पद्धतीने शेतकऱ्यांची कर्जमाफी करण्यात आली, त्याच धर्तीवर सर्वसमावेशक आणि शेतकरीहिताची कर्जमाफी द्यावी, अशी मागणी केली.आज कर्जमाफीच्या प्रक्रियेसाठी शेतकऱ्यांना वारंवार सेतू केंद्रावर रांगा लावाव्या लागत आहेत. त्यानंतर बँकांच्या चकरा माराव्या लागत आहेत. कागदपत्रे, नोंदी आणि प्रक्रियेच्या नावाखाली शेतकरी अक्षरशः हवालदिल झाला आहे. शेतकऱ्याला मदत करण्याऐवजी त्याची फरफट सुरू आहे. शासनाने ही परिस्थिती तातडीने थांबवावी.

शेतकऱ्यांच्या कर्जमाफीच्या नोंदीमुळे त्यांच्या सिबीलवर विपरीत परिणाम होणार नाही, याची शासनाने स्पष्ट हमी द्यावी, अशी मागणीही कॉंग्रेसच्या वतीने करण्यात आली. कारण शेतकऱ्याच्या सिबीलवरील परिणाम भविष्यात त्याच्या कुटुंबातील विद्यार्थ्यांच्या शिक्षणावर होऊ शकतो. Engineering, Medical आणि उच्च शिक्षण घेणाऱ्या विद्यार्थ्यांना शिक्षणासाठी Education Loanची आवश्यकता असते. पालकांच्या कर्जाच्या नोंदीमुळे विद्यार्थ्यांचे शिक्षण कर्ज अडचणीत येणार असेल, तर ही अत्यंत गंभीर बाब आहे.नियमितपणे कर्जाची परतफेड करणाऱ्या शेतकऱ्यांनाही शासनाने जाहीर केलेली ५० हजारांची प्रोत्साहनपर रक्कम अद्याप अनेकांच्या खात्यात जमा झालेली नाही.एकीकडे मोठमोठ्या घोषणा करायच्या आणि दुसरीकडे प्रत्यक्ष लाभ देताना शेतकऱ्यांना कार्यालये, सेतू केंद्रे आणि बँकांच्या चकरा मारायला लावायच्या, ही शेतकऱ्यांची थट्टा आहे.शेतकऱ्यांच्या संयमाचा अंत पाहू नका. त्यांच्या प्रश्नांची



तातडीने सोडवणूक करा, असा इशारा आ. विरेंद्र जगताप यांनी दिला. ‘शेतकऱ्याला कर्जमाफी देताना त्याचा सन्मान, त्याचे आर्थिक भविष्य आणि त्याच्या मुलांचे शिक्षण सुरक्षित राहिले पाहिजे. घोषणा नकोत, आता शेतकऱ्यांना प्रत्यक्ष न्याय हवा,’ अशी ठाम भूमिका आ. विरेंद्र जगताप यांनी व्यक्त केली. यावेळी आंदोलनामध्ये गणेश आरेकर, प्रभाकरराव वाघ, राजेंद्र राजनेकर, बाळासाहेब ठाकरे, अमोल होले, श्रीनिवास सूर्यवंशी, रावसाहेब शेळके, रवी देशमुख, सिद्धू सूर्यवंशी, प्रशांत कोल्हे, नितीन कोपरकार, पंकज शिंदे, अशोकराव चौधरी, नितीन गुंडाणे, हरिभाऊ गवई, अनिस भाई सौदागर, सतपाल वरठे, देवानंद खुणे, सौ इमले, सौ लांजेवार, सुवरठे, मुरलीधरराव सराड, रुपेश पुडके, सुधीर नलगे, अनंत पोलाद, सुनील गावंडे, प्रफुल माईंदे, मोहित देशमुख, पंकज पाटील, उमेश केने, राजू लांजेवार, बाळासाहेब देशमुख, बंडू धावडे, राजेश बनसोड, हरिभाऊ ठाकरे, अर्पित चौधरी, रशीद भाई, शरद घासले, श्रीकांत माने, सागर गरुड, सतीश देशमुख, वैभव चुके कर, अर्जुन देशमुख, दत्ता भुयार, अजय होटे, धनंजय देशमुख, अंकुश राठोड, अमीर भाई आदी उपस्छीत होते.

जनमाध्यम
एक प्रतिष्ठित सवय



# संपत्ती करवाढ, नगरोत्थान निधीवरून आमसभेत गदारोळ

## गॅस पाईपलाईन खोदकाम, दलित वस्ती सुधार निधीवरही चर्चा





**अमरावती/प्रतिनिधीः-** महापालिकेच्या पहिल्याच सर्वसाधारण आमसभेत संपत्ती करात प्रस्तावित वाढ, नगरोत्थान निधीचे वितरण, अदानी गॅस पाइपलाइन खोदाई, दलित वस्ती सुधार निधी आणि प्रशासक राजातील भ्रष्टाचार या मुद्द्यांवरून आज गुरुवार २० ऑगस्ट रोजी आम सभेमध्ये तुफान गदारोळ झाला. काँग्रेससह सर्व विरोधी पक्षांनी प्रशासनाच्या विरोधात आक्रमक पवित्र घेतला. विरोधी आणि सत्ताधारी समोरा-समोर आले.

राज्य सरकारच्या आदेशानुसार शहरातील मालमत्ता करात वाढ करण्याचा प्रस्ताव सभागृहात मांडण्यात आला. यावरून सर्वात जास्त वाद झाला. विरोधी पक्षनेता विलास इंगोले म्हणाले की, शहरात गॅस पाइपलाइनचे काम सुरू असल्याने रस्ते खोदले आहेत. नागरिक आधीच त्रस्त आहेत. अशा परिस्थितीत कर वाढ करणे (पान २ वर)

### २५० कोटींच्या नगरोत्थान निधीवरून राजकारण-

नगरोत्थान योजनेअंतर्गत अमरावतीला मिळालेल्या सुमारे २५० कोटी रुपयांच्या निधीच्या वापरावरूनही खडाजंगी झाली. तत्कालीन आयुक्त व प्रशासक डॉ. प्रवीण आष्टिकर यांच्या कारकिर्दीत हा निधी मिळाला होता. नगरोत्थान योजनेअंतर्गत राज्यातून आलेल्या सुमारे २५० कोटी रुपयांच्या निधीतून शहरात रस्ते, गटारे, सुशोभीकरण यांसारखी अनेक विकासकामे करायची होती पण मंजुरी नाही मिळाली. प्रशासक राज मधील कार्याचा तपास करण्याची मागणी करण्यात आली.

# जुन्या वादातून दोघांवर चाकूहल्ला

## -दोन विधिसंघर्षित बालक ताब्यात

**अमरावती/प्रतिनिधीः-** फ्रेजरपुरा पोलीस ठाण्याच्या हद्दीत जुन्या वादातून दोन जणांवर चाकूने प्राणघातक हल्ला केल्याप्रकरणी अमरावती शहर गुन्हे शाखेने दोन विधिसंघर्षित बालकांना बडनेरा रेल्वे स्टेशन परिसरातून ताब्यात घेतले. या घटनेतील इतर साथीदारांचा शोध सुरू आहे. पंचशील नगर परिसरातील एका घरात १९ ऑगस्ट रोजी रात्री ही घटना घडली. तक्रारदार महिला कुटुंबीयांसह घरी असताना रात्री साडेदोनच्या सुमारास मोठमोठ्याने ओरडण्याचा आवाज आला. आवाजाच्या दिशेने त्या गेल्या असता काही मुले हातात चाकू व लाकडी रॅप्टर घेऊन घराबाहेर पळून जात असल्याचे दिसले. घरातील खोलीत जाऊन पाहिले असता त्यांचा मुलगा व भाचा रक्तबंबाळ अवस्थेत खाली पडलेले आढळले.



आरोपींनी दोघांच्या पाठीवर व पोटावर चाकूने वार करून त्यांना जीवे मारण्याचा प्रयत्न केल्याचे तक्रारीत नमूद आहे. याप्रकरणी फ्रेजरपुरा पोलीस ठाण्यात भारतीय न्याय संहितेतील कलम १०९(१), ११८(२), १८९(४), १९०, १९१(३) व ३३३ अन्वये गुन्हा दाखल करण्यात आला.

घटनेची माहिती मिळताच गुन्हे शाखा युनिट क्रमांक २ चे पोलीस निरीक्षक अतुल वर यांनी पथकासह घटनास्थळी भेट देऊन तपासाची दिशा निश्चित केली. आरोपींचा शोध घेण्यासाठी गुन्हे शाखेची दोन पथके तातडीने रवाना करण्यात आली. दरम्यान, गुन्हे शाखेला मिळालेल्या गोपनीय माहितीनुसार या हल्ल्यात बेनोडा व फ्रेजरपुरा परिसरातील विधिसंघर्षित बालकांचा सहभाग असल्याचे समोर आले. हल्ल्यानंतर ते बडनेरा रेल्वे स्टेशनच्या दिशेने गेल्याची माहिती मिळाल्यानंतर दोन्ही पथकांनी बडनेरा गाठले. रेल्वे स्टेशन परिसरातील पार्किंगमध्ये शोध घेतल्यानंतर दोन्ही विधिसंघर्षित बालकांना ताब्यात घेण्यात आले. चौकशीत त्यांनी इतर साथीदारांसह जुन्या वादातून (पान २ वर)


# बहूचर्चित विजय जाधव हत्या प्रकरणातील दोन्ही आरोपी निर्दोष

## ॲड. परवेज खान आणि ॲड.शिरिष जाखड यांचा यशस्वी युक्तिवाद

**अचलपूर/प्रतिनिधीः-** अचलपूर जिल्हा व सत्र न्यायालयाने सुमारे साडेपाच वर्षांपूर्वी म्हणजे १५ फेब्रुवारी २०२१ रोजी कवठा गावात घडलेल्या बहुचर्चित विजय जाधव हत्या प्रकरणात गुरुवारी महत्त्वपूर्ण निकाल देत दोन्ही आरोपींना संशयाचा लाभ देऊन निर्दोष मुक्तता दिली. न्यायालयाने अभियोजन पक्षाने सादर केलेले पुरावे दोष सिद्ध करण्यासाठी पुरेसे नसल्याचे नमूद केले.

मुख्य आरोपी प्रज्ज्वल उर्फ धीरज जावरकर यांच्याकडून ॲड. परवेज खान तर सहआरोपी निखिल सोनार यांच्याकडून ॲड.शिरीष जाखड यांनी प्रभावी युक्तिवाद केला. दोषारोप पत्रानुसार





जानेवारी २०२१ मध्ये झालेल्या ग्रामपंचायत निवडणुकीत तक्रारदाराच्या पॅनेलचा विजय झाला होता आणि त्यांच्या पॅनेलमधील सदस्य उपसरपंच म्हणून निवडून आल्या होत्या. १५ फेब्रुवारी २०२१ च्या रात्री तक्रारदार घरासमोर उभ्या असताना त्यांचा चुलत (पान २ वर)

# खासदाराच्या तालुक्यातच काँग्रेसला ‘जोरदार झटका’

## दर्यापूर नगर परिषदेत एकाच नगरसेवकाची निष्ठा कायम

**युवराज डोंगरे/खल्लारः-** काँग्रेसचे खासदार असलेल्या दर्यापूर तालुक्यातच काँग्रेसच्या दर्यापूर नगरपरिषदेतील १७ नगरसेवकांनी एकाच वेळी शिवसेना शिंदे गटात प्रवेश केल्याने दर्यापूर शहरासह तालुक्यातील राजकारणात एकच खळबळ उडाली. विशेष म्हणजे दर्यापूर नगरपरिषदेवर काँग्रेसची एकहाती सत्ता असतानाही काँग्रेसच्या नगराध्यक्षांसह नगरसेवकांचा एवढा मोठा गट पक्ष सोडून सत्ताधारी गटात गेल्याने काँग्रेसच्या संघटनात्मक ताकदीवरच आता प्रश्नचिन्ह निर्माण झाले आहे. या राजकीय घडामोडीत केवळ एकच काँग्रेस सदस्य खासदारांसोबत ठामपणे उभा राहिल्याने ‘निष्ठा’ आणि ‘सत्तेचे राजकारण’ यातील फरकही प्रकर्षाने समोर आला आहे.दर्यापूर नगरपरिषद निवडणुकीत काँग्रेसने मतदारांचा विश्वास संपादन करून स्पष्ट बहुमत मिळाले. नगराध्यक्षपदासह मोठ्या संख्येने नगरसेवक निवडून आणण्यात काँग्रेस पक्षाला यशही आले होते. त्यामुळे नगरपरिषदेत काँग्रेसची मजबूत पकड असल्याचे चित्र निर्माण झाले होते.मात्र सत्ता मिळाल्यानंतर काही काळातच पक्षातील (पान २ वर)



### भविष्यात काँग्रेससमोर मोठे आव्हान

दर्यापूर नगरपरिषदेत घडलेली ही राजकीय उलथापालथ आगामी विधानसभा, लोकसभा आणि स्थानिक स्वराज्य संस्थांच्या निवडणुकांवर कितपत परिणाम करेल, हे येणारा काळच ठरवेल. मात्र एवढे निश्चित आहे की, पक्षाच्या तळागाळातील संघटनेला नव्याने उभे करण्याचे आव्हान काँग्रेससमोर उभे ठाकले आहे. नगरसेवकांचा मोठा गट पक्षातून बाहेर गेल्याने स्थानिक कार्यकर्त्यांमध्ये संभ्रम निर्माण होण्याची शक्यता आहे. दुसरीकडे, पक्षाशी निष्ठावान राहिलेल्या कार्यकर्त्यांना सक्रिय करून नव्या नेतृत्वाला संधी दिल्यास काँग्रेस पुन्हा संघटनात्मक ताकद निर्माण करू शकते.


# स्मार्ट मीटरला अंबाडा ग्रामपंचायतीचा विरोध



**अंबाडा/प्रतिनिधीः-** मोर्शी तालुक्यातील अंबाडा व उदखेड ग्रामपंचायत हद्दीत वीज वितरण कंपनीकडून ग्रामस्थांच्या घरांवर कथितरीत्या जबरदस्तीने स्मार्ट मीटर बसविण्यात आल्याचा आरोप ग्रामपंचायतींकडून करण्यात आला आहे. नवीन स्मार्ट मीटरमुळे ग्रामस्थांना आर्थिक भुर्दंड सहन करावा लागत असल्याचे नमूद करत, बसविण्यात (पान २ वर)

# स्पीड ब्रेकर्समुळे दोन ट्रकचा अपघात

## केळीचा ट्रक पलटी, तुरीच्या ट्रकचा लोखंडी बेल्ट तुटला





**मोर्शी/प्रतिनिधीः-** मोर्शी येथील अमरावती सिंभोरा मार्गावर छत्रपती शिवाजी महाराज चौकात चुकीच्या पद्धतीने उंचवटा टाकून ठेवण्यात आलेल्या स्पीड ब्रेकर्समुळे आयशर ट्रकचा मेन लोखंडी पट्टा तुटला. त्यामुळे ट्रकवरील चालकाचे संतुलन बिघडले व ट्रकने रोड डिव्हायडरचे अँगल तोडून मेन चौकात ट्रक पलटी होऊन रोडवर कोसळला.

अचानक झालेल्या या अपघातामुळे डिझेलची टँक फुटल्यामुळे मोठा स्फोट होऊन मोठी दुर्घटना घडू शकली असती.सुदैवाने मात्र कोणत्याही प्रकारची जीवित हानी झाली नसून मोठा अनर्थ टळला. ट्रकमधील डिझेल रस्त्यावर वाहत जाऊन रोडच्या (पान २ वर)

# जिल्हा काँग्रेस कार्यकारणीत दर्यापूर तालुक्यातील चार कार्यकर्त्यांचा समावेश

## दोघांची उपाध्यक्षपदी तर दोघांची सचिवपदी निवड

**खल्लार/प्रतिनिधीः-** अमरावती जिल्हा काँग्रेस कमिटीचा विस्तार करण्यात आला असून अमरावती जिल्हा अध्यक्ष बबलू देशमुख, खासदार बळवंत वानखडे, ॲड.यशोमती ठाकूर यांच्या मार्गदर्शनाखाली अमरावती जिल्हा काँग्रेस कमिटीच्या कार्यकारणी मध्ये दर्यापूर तालुक्यातील काँग्रेसच्या चार कार्यकर्त्यांना समाविष्ट करण्यात आले आहे.



अमरावती जिल्हा उपाध्यक्ष म्हणून माजी पंचायत समिती सभापती तथा येवदाचे माजी सरपंच प्रदीप बाप्पू देशमुख, दारापूर येथिल काँग्रेसचे निष्ठावंत कार्यकर्ते संजय बेलोकार यांची तर जिल्हा काँग्रेस कमिटी सचिव म्हणून दर्यापूरचे माजी शहराध्यक्ष सामाजिक कार्यकर्ते आतिष शिरभाते, माजी शहराध्यक्ष विनोद पवार यांची सचिवपदी निवड करण्यात (पान २ वर)

# बडनेरा-लोणी परिसरातील अवैध सावकारांवर धाड

## -४३ संशयित कागदपत्रे जप्त

**अमरावती/प्रतिनिधीः-** सहकारी संस्था जिल्हा उपनिबंधक कार्यालयाला मिळालेल्या तक्रारींच्या आधारे गुरुवारी बडनेरा आणि लोणी परिसरातील अवैध सावकारांच्या घरांवर मोठे धाडसत्र राबवण्यात आले. जिल्हा उपनिबंधक राजेश भुयार यांच्या नेतृत्वात ४ पथकांनी एकाच वेळी धाड टाकून अवैध सावकारीशी संबंधित ४३ संशयित कागदपत्रे जप्त केली आहेत. पहिल्या पथकाने गुरुवारी सकाळी १० ते दुपारी २.४५ वाजेपर्यंत बडनेरा परिसरात शोध घेतला.या पथकात सहायक निबंधक प्रीती धामणे, दीपक गासे, चेतना कुचे, अमोल लोमटे, सागर (पान २ वर)



# मतदार याद्यांच्या विशेष सखोल पुनरिक्षण कार्यक्रमाचे सुधारीत वेळापत्रक जाहीर

**अमरावती/प्रतिनिधीः-**: निवडणूक आयोगाच्या निर्देशानुसार जिल्ह्यात विशेष सखोल पुनरिक्षण कार्यक्रमास मुदतवाढ देण्यात आली आहे. सुधारीत कार्यक्रमानुसार ४ नोव्हेंबर रोजी अंतिम मतदार यादी प्रसिद्ध करण्यात येणार आहे. मतदान केंद्रांची पुनर्रचना २४ ऑगस्ट रोजी करण्यात येणार आहे. ३१ ऑगस्ट रोजी मतदार याद्यांची प्रारुप प्रसिद्धी करण्यात येणार आहे.



यानंतर ३१ ऑगस्ट ते ३० सप्टेंबर पर्यंत दावे व हरकती दाखल करता येणार आहे. ३१ ऑगस्ट ते २९ नोव्हेंबर पर्यंत दावे व हरकती निकाली काढण्यात येणार आहेत. ४ नोव्हेंबर रोजी अंतिम मतदार याद्या प्रसिद्ध करण्यात येणार आहे, अशी माहिती उपजिल्हा निवडणूक अधिकारी शिवाजी शिंदे यांनी दिली आहे.

# ईद मिलादुन्नबी जुलूस मार्गाची डीसीपींकडून पाहणी

## सुरक्षा व्यवस्थेचा घेतला आढावा

**अमरावती/प्रतिनिधीः-** आगामी २८ ऑगस्ट रोजी साजऱ्या होणाऱ्या ईद मिलादुन्नबी सणाच्या पार्श्वभूमीवर शहरात शांतता, सुरक्षा आणि सौहार्दपूर्ण वातावरण ठेवण्यासाठी पोलिस प्रशासनाने कंबर कसली आहे. याचाच एक भाग म्हणून आज गुरुवार २० ऑगस्ट रोजी पोलिस उपायुक्त यशवंत सोळंके यांनी नागपुरी गेट पोलीस स्टेशन हद्दीतील पारंपरिक जुलूस मार्गाची पाहणी केली. डीसीपी सोळंके यांच्यासोबत नागपुरी गेटचे वरिष्ठ पोलिस निरीक्षक मनोहर कोटणाके आणि अधिकारी कर्मचारी उपस्थित होते. तपासणी दरम्यान डीसीपींनी (पान २ वर)



# खंडेलवाल बुक डेपो चे संचालक श्यामकुमार डंगायच यांचे निधन

**अचलपूर/प्रतिनिधीः-** अचलपूर शहरातील खंडेलवाल बुक डेपो चे संचालक श्यामकुमार डंगायच यांचे गुरुवार २० ऑगस्ट रोजी दुःखद निधन झाले. त्यांच्या निधनाचे वृत्त समजताच संपूर्ण अचलपूर शहर व परिसरात शोककळा पसरली. स्व .श्यामकुमार डंगायच यांच्यावर शोकाकुल वातावरणात अंत्यसंस्कार करण्यात आले.यामुळे डंगायच कुटुंबावर दुःखाचे डोंगर कोसळले आहे. स्व. श्यामकुमार डंगायच यांच्या शांत, हसमुख आणि प्रेमळ स्वभावामुळे त्यांनी वेगळी ओळख निर्माण केली होती.त्यांच्या आकस्मिक निधनामुळे परिसरात शोककळा पसरली असून त्यांच्या अंत्यसंस्कार यात्रेत जुळ्या शहरातील व्यापारी,व्यावसायिक ,नागरिक मोठ्या संख्येने उपस्थितीत होते.



# ’नुटा बुलेटीन’चा सुवर्ण महोत्सव

## २३ ऑगस्ट रोजी अमरावतीत विशेष समारंभ

**अमरावती/प्रतिनिधीः-** नागपूर युनिव्हर्सिटी टीचर्स असोसिएशनच्या (NUTA) अधिकृत मुखपत्र असलेल्या ’नुटा बुलेटीन’ (NUTA BULLETIN) च्या सुवर्ण महोत्सवी वर्षानिमित्त (१९७६-२०२५) एका भव्य विशेष समारंभाचे आयोजन करण्यात आले आहे. हा कार्यक्रम रविवार, दिनांक २३ ऑगस्ट २०२६ रोजी सकाळी ११:०० वाजता संत गाडगेबाबा अमरावती विद्यापीठाच्या डॉ. के.जी. देशमुख सभागृहामध्ये संपन्न होणार आहे.

या सुवर्ण महोत्सवी कार्यक्रमाला शैक्षणिक आणि कायदेक्षेत्रातील नामवंत व्यक्ती उपस्थित राहणार आहेत. सदर कार्यक्रम पूर्वी दिनांक २१ जून २०२६ रोजी आयोजित करण्यात आलेला होता. परंतु प्रा बी टी देशमुख यांच्या दुःखद निधनामुळे हा कार्यक्रम रद्द करण्यात आलेला होता.

’एआयफुक्टो’चे (AIFUCTO) माजी सरचिटणीस प्रा. असोक बर्मन हे या कार्यक्रमात सुवर्ण महोत्सवी वर्षानिमित्त मुख्य व्याख्यान देतील. यावेळी संत गाडगे बाबा अमरावती विद्यापीठाचे कुलगुरू डॉ. मिलिंद बारहाते (पान २ वर)

# तेलाचे तीन डबे चोरणारा विधिसंघर्षित बालक ताब्यात

**अमरावती/प्रतिनिधीः-** दुकानाबाहेर ठेवलेले सोयाबीन तेलाचे तीन डबे चोरीला गेल्याची घटना घडल्यानंतर राजापेठ पोलिसांनी तत्काळ तपासाची चक्रे फिरवत चोरीचा गुन्हा उघडकीस आणला. या प्रकरणात एका विधिसंघर्षित बालकाला ताब्यात घेऊन त्याच्याकडून चोरीस गेलेले ७ हजार ४४० रुपये किमतीचे तीन डबे हस्तगत करण्यात आले.

नंदा मार्केट, दस्तूरनगर रोड परिसरात तक्रारदार महिलेच्या घरालगत गुप्ता किराणा दुकान आहे. २० जुलै रोजी सायंकाळी सातच्या सुमारास दुकानाबाहेर ठेवलेले स्वास्तिक कंपनीचे सोयाबीन तेलाचे तीन डबे अज्ञात व्यक्तीने लंपास केले. या डब्यांची किंमत सुमारे ७ हजार ४४० रुपये असल्याचे तक्रारीत नमूद करण्यात आले आहे. याप्रकरणी तक्रारदार (पान २ वर)

